# द्वितीय वर्ष कला

## सत्र - IV(CBCS)

## ग्रामीण विकास अभ्यासपत्रिका क्र. II

## विकास रणनीती

## विषय कोड : UARD401

© UNIVERSITY OF MUMBAI

**प्राध्यापक सुहास पेडणेकर**
कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक रविंद्र द. कुलकर्णी**
प्र-कुलगुरु,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक प्रकाश महानवर**
संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्रकल्प समन्वयक** : **प्रा. अनिल आर. बनकर**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग व
प्रमुख, मानव्यविद्याशाखा,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**अभ्यास समन्वयक** : **प्रो. सुब्रत कुमार साहू**
सहाय्यक प्राध्यापक ग्रामीण विकास,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**संपादक व लेखक** : **डॉ. बारी बी.एच.**
श्रॉफ महाविद्यालय, ता. डहाणू, जि. पालघरॅ

**लेखक** : **डॉ. कुणाल जाधव**
(डी.एल.एल.एफ), मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्रो. सचिन राऊत**
सहाय्यक प्राध्यापक ग्रामीण विकास,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

: **डॉ. ए. पी. माळी**
जी. जी. महाविद्यालय,
वसई, जि. पालघर

: **डॉ. जे. के. पाटील**
आर. डी. श्रॉफ महाविद्यालय, चिंचणी,
ता. डहाणू, जि. पालघर

**मार्च २०२२, मुद्रण - १**

**प्रकाशक** : संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई -४०० ०९८.

**अक्षर जुळणी व मुद्रण** : मुंबई विद्यापीठ मुद्रणालय,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०००९८

# अनुक्रमणिका


| क्रमांक | अध्याय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १) | कृषी विकास - I | ०१ |
| २) | कृषी विकास - II | १३ |
| ३) | कृषी विकास - III | ३२ |
| ४) | ग्रामीण विकासाचे स्त्रोत - I | ४६ |
| ५) | ग्रामीण विकासाचे स्त्रोत - II | ६२ |
| ६) | पर्यटन विकास - I | ७८ |
| ७) | पर्यटन विकास - II | ९७ |
| ८) | पर्यटन विकास - III | ११६ |


❖❖❖❖

## व्दितीय वर्ष ग्रामीण विकास

# विकास रणनीती

**१) कृषी विषयक योजनांचा अभ्यास**

अ) कृषी विभागामार्फत राबविल्या जाणा-या योजना

ब) पंचायतराज यंत्रणेमार्फत राबविल्या जाणा-या योजना

क) आदिवासी विकास विभागामार्फत राबविल्या जाणा-या योजना

**२) कृषी विकास**

अ) राष्ट्रीय कृषी धोरण २००७ व अन्नसुरक्षा

* संकल्पना
* उद्दीष्ट्ये
* वैशिष्ट्ये
* तरतुदी व उणीवा

ब) पाणीपुरवठा आणि जलव्यवस्थापन

* पाणीपुरवठयाचे शेतीतील महत्व
* पाणीपुरवठयाचे स्त्रोत / साधने
* जलसिंचन पद्धती – आधुनिक व पारंपारीक

क) कृषी विदयापीठ व कृषी विज्ञान केंद्र

* स्थापना
* आवश्यकता व गरज
* कार्य

**३) ग्रामीण रोजगार निर्मितीचे उपक्रम**

अ) स्वयंसहाय्यता गट

* संकल्पना
* उगम आणि विकास
* वैशिष्ट्ये
* ग्रामीण विकासातील महत्व

ब) महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान- (उमेद)(MSRLM)

* उमेद अभियानाची वैशिष्ट्ये
* दशसूत्री संकल्पना
* दशसूत्री
* स्वयंसहाय्यता गट व दशसूत्री

क) कृषी आधारीत उदयोग

* संकल्पना
* प्रकार
* कार्य
* रोजगार निर्मितीतील महत्व
* कृषी उदयोगाच्या समस्या

**४) पर्यटन विकास**

* संकल्पना
* घटक
* पर्यटन व्यवसायातील गुण-दोष

अ) ग्रामीण पर्यटन

* संकल्पना
* स्वरूप
* महत्व
* मर्यादा

ब) कृषी पर्यटन

* संकल्पना
* स्वरूप
* महत्व
* गुण-दोष

क) पर्यावरणीय पर्यटन

* संकल्पना
* स्वरूप
* गरज व महत्व

**सत्र चारप्रश्नपत्रिका ७० गुणांचीअसेल**

# १

## कृषी विकास –I

**पाठाची रूपरेषा**


१.०पाठाची उदिष्टये

१.१ प्रास्ताविक

१.२ राष्ट्रीय कृषी धोरण-2000

१.३ राष्ट्रीय कृषी धोरणाची उदिष्टये

१.४ राष्ट्रीय कृषी धोरणाची वैशिष्टये

१.५ राष्ट्रीय कृषी धोरणापुढील उणिवा

१.६ अन्नसुरक्षा.

१.७ अन्नसुरक्षा - संकल्पना व व्याख्या

१.८ भारतातीत अन्नसुरक्षेची गरज

१.९ भारतातील अन्नधान्य व्यवस्थापन

१.१० दीर्घकालीन अन्नधान्य व्यवस्थापन धोरण

१.११ सारांश

१.१२स्वाध्याय

१.१२.संदर्भसूची


## १.0 पाठाची उदिष्टये

- राष्ट्रीय कृषी धोरण-**2000** समजावून घेणे.
- राष्ट्रीय कृषी धोरणांची उदिष्टये-वैशिष्टये अभ्यासणे,
- राष्ट्रीय कृषी धोरणापुढील उणिवा समजावून घेणे,
- भारतातील अन्नसुरक्षेची गरज अभ्यासणे.
- भारतातील अन्नधान्य व्यवस्थापन आणि धोरणे समजावून घेणे.

## १.१ प्रास्ताविक

कृषी धोरण महाराष्ट्र शासन सर्वांगीण सामाजिक आणि आर्थी विकासासाठी कटिबद्ध आहे. स्वावलंबी आणि शेतकऱ्यांना स्वयंशासित बनवण्यासाठी, शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी कृषी धोरणाच्या माध्यमातून शेतकरी केन्द्रित कृषी विकास कार्यक्रम आखले जातात आणि त्यांची अंमलबजावणी केली जाते. कृषी विकास ह शाश्वत आणि पर्यावरणपूरक असावा आणि त्यानुसार पायाभूत सुविधांचा विवेकपूर्ण, कार्यक्षम आणि प्रभावीपणे वापर करण्याचे नियोजन केले जाते. आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या आणि दुर्बल घटकांच्या प्रगतीवर आणि विशेषतः ग्रामीण भागात कुशल आणि अकुशल रोजगार निर्मितीच्या विकासाला चालना देण्यासाठी विशेष लक्ष केन्द्रित केले जाते. औद्योगिकीकरण आणि व्यापारीकरणाच्या धर्तीवर कृषी विकासाला चालना देण्याचा प्रस्ताव आहे. जेणेकरून हे क्षेत्र देखील उद्योग आणि व्यापाराप्रमाणे सर्वोच्च स्थानावर असेल.




महाराष्ट्र राज्य कृषी पोर्टल -agricoop.nic.in

## १.२ राष्ट्रीय कृषी धोरण-2000

भारत सरकारचे माजी कृषीमंत्री श्री. नितीश कुमार यांनी लोकसभेत २८ जुलै २००० यादिवशी शेतीचे नवीन राष्ट्रीय धोरण मांडले. शेतीक्षेत्राच्या विकासासाठी सर्व ते प्रयत्न व त्याबरोबरआर्थिक विकास हेच मुख्य उदिष्ट या धोरणाचे होते. तसेच या धोरणात शेती क्षेत्राच्या विकासासाठीआतापर्यंत उपलब्ध साधनसामुग्रीपैकी ज्या साधनांचा वापर केला गेला नव्हता, त्या साधनांचा वापरकरून तसेच शेती विकासासाठी ग्रामीण भागात रस्ते, वीजपुरवठा, दळणवळन, वाहतूक, टेलिफोनसेवा, बैंकिंग सेवा, शेतीवर आधारित व्यापार, शेतीला लागणारी संकरित बियाणे, खते, जंतुनाशकेइत्यादींचा पुरवठा करून ग्रामीण भागातील राहणीमान उंचावण्यासाठी व ग्रामीण क्षेत्रातून शहरीक्षेत्रात होणारे लोकसंख्येचे स्थलांतर थांबविण्यासाठी व जागतिकीकरणाने अर्थव्यवस्थेला मिळालेलेफायदे, तसेच मुक्त आर्थिक धोरणाचे फायदे समाजातील ग्रामीण घटकांना पुरवणे, तसेच शेतीक्षेत्रातदरवर्षी किमान ४%वाढीचा दर टिकवून ठेवणे यासाठी साधनसामुग्रीचा पर्याप्त वापर, जमिनीची धूपरोखणे, पाण्याचे नियोजन व वापर करणे, आर्थिक बृद्धी बरोबरच समानता प्रस्थापित

करून देशातीलसर्व प्रदेशांचा संतुलित विकास घडवून आणण्यासाठी, शेतीमाल निर्यात करून शेतकन्यांच्या मालालायोग्य गती मिळवून देणे, तसेच आर्थिक वाढीसाठी योग्य तंत्रज्ञानाचा वापर, योग्य पर्यावरण संरक्षण व आर्थिक विकास ही उदिष्टे प्राप्त करण्यासाठी २००० नवीन शेती धोरणजाहीर करण्यात आलेया धोरणाची उदिष्टे पुढील प्रमाणे आहेत.

## १.३ राष्ट्रीय कृषी धोरणाची उदिष्टये

१.शेतीतील आर्थिक विकास दर ४% राखणे,

२. अन्न व पोषक धान्याची सुरक्षा.

३.साधनसामुग्री व तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर.

४.शेतीक्षेत्रात आर्थिक वृद्धिसाठी प्रोत्साहन देणे.

५.खाजगी क्षेत्र व सार्वजनिक क्षेत्रातून शेतीत गुंतवणूक करण्यास प्रोत्साहन देणे.

६.संस्थात्मक पुनर्रचना

७.धोके व्यवस्थापन

## १.४ राष्ट्रीय कृषी धोरणाची वैशिष्टये

राष्ट्रीय कृषी धोरणामध्ये समाविष्ट असलेल्या प्रस्तावाची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :

१) चिरस्थायी शेती.

२) अन्न व आहारविषयक सुरक्षा.

३) तंत्रज्ञान निर्मिती व हस्तांतरण.

४) आदानांचे व्यवस्थापन.

५) शेतीसाठी प्रलोभने.

६) शेतीमधील गुंतवणूक.

७) संस्थात्मक रचना

८) जोखमीचेव्यवस्थापन.

## १.५ राष्ट्रीय कृषी धोरणापुढील उणिवा

राष्ट्रीय कृषी धोरणाच्या माध्यमातून सरकारला शेती आणि उद्योगधंद्यामधील असमानता दूरकरावयाची आहे. शेती धोरण हे फारसा वाद नसलेले धोरण आहे. तथापि, ह्या धोरणात पुढील काहीउणिवा आहेत.नवीन शेती धोरणात हरितक्रांती, धवलक्रांती (दूध व दुग्ध उत्पादने), निळीकांती(मासे),पिवळीकांती (तेलबिया), सोनेरीती (फळाचे उत्पादन) वरच्या

माध्यमातून भरघोस उत्पादवाढीचीखात्री दिलेली असल्याने या धोरणात सप्तरंगी क्रांतीची खात्री दिलेली आहे. त्यामुळेच या धोरणात...

अ) शेती क्षेत्रातील आर्थिक आर्थिक विकास दरात ४% पेक्षा जास्त वाढ करणे.

ब करार शेतीच्या माध्यमातून जास्तीत जास्त खाजगी क्षेत्राचा सहभाग,

क) शेतकऱ्यांना किमत संरक्षण.

ड) सर्व शेतकरी व सर्व पिकांकरिता राष्ट्रीय विमा योजना. वगैरे घटकांची तरतूद आहे.

अलीकडेअन्नधान्याच्या उत्पादनात फार मोठे चढ-उतार आहेत. नवीन धोरणामुळेनिर्माण झालेल्या आशावादाची फारशी पूर्तता झालेली आहे. त्यामुळे या धोरणात अनेकउणिवा आहेत.

१) शेती उत्पादनाच्या लक्ष्यात निश्चितता नाही :भारतीय शेतीच्या उत्पादनात प्रतिवर्षी ४% पेक्षा जास्त दराने वाढ होणे अत्यावश्यक आहे.मात्र त्यादृष्टीने नवीन धोरणात उत्पादनलाआवश्यकअसलेली निश्चितता नाही.

२) सर्व राज्यांचा समावेश नाही :या धोरणात सर्व राज्यांचा शेती विकास घडवून आणण्याचे ठरवले आहे. परंतु मागासलेलीराज्ये कोणती? त्यासाठी कोणते विशेष उपाय योजले जाणार आहेत याची माहिती दिलेली नाही.

३) लहान शेतकऱ्यांकडे दुर्लक्षःशेतीमधील खाजगी गुंतवणुकीस प्रोत्साहन दिले जाईल, असा नवीन धोरणात उल्लेख आहे.मोठ्या शेतकऱ्याच्या उत्पादकतेमध्ये वाढ करण्यासाठी ट्यूब-वेल्स,शेतीविषयक-आदाने, मानवीसंसाधन विकास वगैरेच्या स्वरूपात खाजगी गुंतवणूक आवश्यक आहे. याबाबत काहीही शंकानाही, मात्र भारतामध्ये फार मोठ्या संख्येने लहान शेतकरी आहेत. त्यांच्या उत्पादकतेत वाढकरण्यासाठी खाजगी गुंतवणुक पेलण्याची त्यांची क्षमता नाही, असे शेतकरी फार मोठ्या प्रमाणातसार्वजनिक गुंतवणुकीवर अवलंबून असतात. अनेक वर्षापासून त्यात घट होत आहे. यापुढेही जाऊनअसेही म्हणता येईल की, गरीब शेतकऱ्याची अधिक संख्या असलेल्या मागास राज्यात केवळ सार्वजनिक गुंतवणुकीमुळे त्यांच्या शेती विकासाला अधिक गती मिळणे शक्य आहे, नवीन धोरणात याबाबतीतकाहीही दायित्व नाही.

४) बेकारीत वाढ: नवीन धोरणात खाजगी क्षेत्रातील सहभागाच्या माध्यमातून करार शेती लागू करण्यावर भरआहे. लिजकराराद्वारे महामंडळ क्षेत्राचा सहभाग त्यामध्ये राहणार आहे. भांडवलदारी शेतीऐवजीकरारशेती असा गोंडस शब्द वापरला आहे. करार शेतीचा अवलंब झाल्यास रोजगारात घट होईलरोजगार विस्ताराचे उद्दिष्ट साध्य होणार नाही. देशाच्या एकूण श्रमशक्तीपैकी जवळजवळ ५०%कामगार शेतीक्षेत्रात सामावून घेतले जातात. त्यामुळे भारतासारख्या अतिरिक्त श्रम असलेल्याअर्थव्यवस्थेत करारशेती आणि महामंडळ क्षेत्राचा त्यातील अवलंब या गोष्टी फारशा शहाणपणाच्याठरणाऱ्या नाहीत.

५) अंमलबजावणी यंत्रणेचा अभाव :भारत सरकारने नवीन शेती धोरणात शेतीचा विकास करण्यासाठी सर्वव्यापी शिफारशीचाअवलंब केलेला आहे. मात्र या धोरणाची अंमलबजावणी

करण्यासाठी आवश्यक असलेल्या यंत्रणेचाया धोरणात उल्लेख नाही. भारतातील शेती राज्य सरकारच्या अखत्यारित आहे. त्यामुळे शेतीच्याविकासाकरिता केंद्र राज्य सरकारकडून राबविली जाणारी कृषी योजना तयार करणे आवश्यकहोते. मात्र नवीन धोरणात तसा विचार केलेला नाही. शेतीच्या या नवीन धोरणात त्रुटी असल्या तरीएका नवीन पर्वास या धोरणाने सुरूवात केली आहे. या योजना योग्य पद्धतीने राबवल्यास भारतीयशेती व शेतकरी अधिक सक्षम बनण्यास हातभार लागेल एवढे मात्र नक्की.

## १.६ अन्नसुरक्षा

**प्रस्तावना :**देशातील लोकांना पुरेसे अन्नधान्य उपलब्ध करून देणे. हे आर्थिक नियोजनाचे सर्वाधिकमहत्त्वाचे उद्दिष्ट असते. अन्नधान्यांचे केवळ पुरेसे उत्पादन करून भागणार नाही, तर पुरेशाउत्पादनाबरोबरच समाजातील सर्व लोकांमध्ये त्या अन्नधान्यांचे योग्य वाटप केले जाणेही आवश्यकठरते. पुरेशा अन्नाच्या अभावी मानवी कल्याण, सामाजिक न्याय, लोकशाही या गोष्टी प्राप्त करूनघेणे भारताला जवळजवळ अशक्य होईल.भारताने अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्णता साध्य केली असली तरी भारताची अन्नसमस्या,भारतीय अर्थव्यवस्थेतील एक मूलभूत समस्या आहे. त्यामुळे अन्नधान्य सुरक्षा सर्वांनाच प्राप्त करूनदेणे हे सरकारचे महत्त्वाचे कार्य व जबाबदारी ठरते.




**Youtube.com**

## १.७ अन्नसुरक्षा - संकल्पना व व्याख्या

Food and Agriculture organisation (FAO) च्या नुसार "अन्नधान्य सुरक्षाम्हणजे सर्व लोकांना कोणत्याही वेळी भौतिक व आर्थिकदृष्ट्या सहज प्राप्त होऊ शकेल, अशामूलभूत अन्नधान्याची सार्वत्रिक उपलब्धता होय**."**

जागतिक विकास अहवाल (१९८६) नुसार "अन्नधान्य सुरक्षा म्हणजे सर्व लोकांना सुदृढआरोग्यदायी जीवनासाठी आवश्यक असलेल्या पुरेशा अन्नधान्याची कोणत्याही वेळी होऊ शकेलअशी उपलब्धता होय." यावरील दोन्ही व्याख्यांवरून अन्नधान्य सुरक्षेबाबत पुढील बाबी लक्षातयेतात.

१.सर्व लोकांसाठी अन्नधान्याची भौतिक उपलब्धता.

२.मूलभूत अन्नधान्यासाठी आर्थिक सुसाध्यता म्हणजेच, हवे असलेले अन्नधान्य विकत घेण्याचीलोकांची खरेदीशक्ती.

३. मूलभूत अन्नधान्य हे असे अन्न आहे की ज्यात पोषणक्षमता असेल,

४. कोणत्याही वेळी व सार्वत्रिक उपलब्धता : याचाच अर्थ अल्पकाळ किंवा दीर्घकाळ कोणत्याही वेळी भौतिक व आर्थिकदृष्ट्या सुसाध्य अशी अन्नधान्याची उपलब्धताहवी. यामुळेच अन्नधान्याचा पुरवठा पुरेसा असणे आवश्यक ठरते.

५.निरोगी, आरोग्यदायी जीवनास आवश्यक असणारा पुरेसा अन्नपुरवठा : यात धान्य,कडधान्य, दूध व दुग्धजन्य पदार्थ, भाज्या, फळे, मासे, अंडी व मटण यांचा अनुगमे समावेशवाढत जायला हवा.

## १.८ भारतातीत अन्नसुरक्षेची गरज

अन्नधान्य समस्या ही मागणी व पुरवण्याची समस्या आहे. उत्पादन, आयात, सरकार वखाजगी क्षेत्राने राखलेला शिलकी अन्नधान्याचा साठा यावर पुरवठा अवलंबून असतो. यावरूनचअन्नधान्याची निव्वळ उपलब्धता ठरत असते. १९६०, १९७० व १९८०च्या दशकांत भारतातअन्नधान्याचा तुटवडा होता, पण हरितक्रांतीच्या साहाय्याने भारतीय शेती उत्पादनाचे चित्र पूर्णपणेपालटल्याचे दिसते. भारत यामुळेभारत एक अन्नधान्य मुबलकतेचा देश म्हणून ओळखला जाऊ लागला.पण वाढत्या लोकसंख्येची अन्नधान्याची मागणी विचारात घेता पुढील कारणांमुळे अन्नधान्य सुरक्षेचीभारतात गरज वाटू लागली.

१. अन्नधान्याच्या उत्पादनात स्वयंपूर्णता आणणेदेशाची वाढती लोकसंख्या व त्यानुसार मागणी लक्षात घेऊन भारतीय नियोजनकारांनीअन्नधान्याच्या उत्पादनात देशाला स्वयंपूर्ण करण्याचे उदिष्ट कायमच लक्षात ठेवले आहे.

२. अन्नधान्याची आयात कमी करणे :देशात हरितक्रांती घडून आल्यामुळे अन्नधान्याच्या उत्पादनात स्वयंपूर्णता साध्य करणे शक्यझाले आहे. त्यामुळे १९६५ पर्यंत होत असलेली सातत्यपूर्ण अन्नधान्याची आयात टाळणे १९६५नंतर शक्य झाले. भारतात १९५०-५१मध्ये अन्नधान्याचे उत्पादन ५१दशलक्ष टन होते ते २००१-०२मध्ये २१२दशलक्ष टनापर्यंत वाढले. त्यामुळे अन्नधान्याची आयात पारच थोड्या प्रमाणात करण्याचीगरज ठरली आहे.

३. अन्नधान्य तुटवड्याची समस्या दूर करणे :हरितक्रांतीमुळे अन्नधान्य उत्पादन वेगाने वाढले. त्यामुळे अन्नधान्य तुटवड्याची समस्यादूर करणे शक्य झाले. तसेच धान्याचा साठा करणेही शक्य झाले. असा अन्नधान्याचा साठा इतरवेळी तुटवड्याची स्थिती असताना वापरणे शक्य झाले आहे.सार्वजनिक वितरण व्यवस्था व भारतीय अन्न महामंडळाची (FCI) स्थापना यांच्या साहाय्यानेअन्नधान्य समस्या दूर करणे शक्य झाले आहे.

४. नैसर्गिक आपत्तीच्या वेळी अन्नधान्य सुरक्षा प्राप्त करणे;भारतात अजूनही २६.१% लोक दारिद्र्यरेषेखाली असल्याने कुपोषण व भूकबळी, उपासमारआहेच, जर नैसर्गिक आपत्ती मोठया प्रमाणात घडून आली तर त्याचे खूप मोठे परिणाम दिसूनयेतात. दुष्काळावर

मात करणे हे अन्नधान्य सुरक्षेमुळे शक्य झाले आहे.सरकारने दुष्काळ, पूर, युद्ध इत्यादी कारणांमुळे निर्माण झालेल्या आपत्तींना तोंड देण्यासाठीविविध उपाययोजना योजल्या आहेत. सुयोग्य सार्वत्रिक वितरण व्यवस्थेचा विकास, विकसित अन्नधान्यविभाग, राष्ट्रीयीकृत सार्वत्रिक व्यापार यांचा वापर केला आहे. पण आणीबाणीच्या, प्रखर अडचणींच्याकाळात योग्य अन्नधान्य पुरवठा करण्याच्या दृष्टीने भारतात योग्य अशी अन्नधान्य सुरक्षा प्रणालीविकसित करणे आवश्यक ठरते.

## १.९ भारतातील अन्नधान्य व्यवस्थापन

भारतात अन्नधान्याचे व्यवस्थापन करण्यासाठी सरकारने पुढील उपाययोजना राबवल्याआहेत. सार्वजनिक वितरण व्यवस्था अ) पुरवठ्याच्या दृष्टिकोनातून ब) मागणीच्या दृष्टिकोनातूनराबवता येते. त्याचे विवेचन पुढीलप्रमाणे करता येईल,

अ) पुरवल्याच्या दृष्टिकोनातून उपाययोजना :यानुसार लोकांना योग्य, पुरेशा प्रमाणात अन्नधान्याची उपलब्धता व्हावी व पुरवठा व्हावायाकडे सरकार लक्ष देते. यात पुढील गोष्टींचा समावेश होतो.

१) अन्नधान्याचा शिलकी साठा वाढविणे (Buffer Stock) :ज्यावेळी मुबलक प्रमाणात अन्नधान्य पिकते, त्यावेळी जास्तीचा अन्नधान्य पुरवठा सरकारशेतकऱ्यांकडून विकत घेऊन त्याचा साठा करते व अडी-अडचीच्या वेळी अल्पकाळात धान्याचातुटवडा भासल्यास या शिलकी साठ्यातीलधान्य बाहेर काढले जाते. शिलकी साठा ही संकल्पनाव धोरण चौथ्या पंचवार्षिक योजनेपासून राबवण्यास सुरुवात झाली. शिलकी साठा सरकारकडेकिती असावा याबाबत दर ५ वर्षातून एकदा निर्णय घेतला जातो. ऑक्टोबर २००५मध्ये तांदळाचा४.८दशलक्ष टन, तर गहाचा १०.३दशलक्ष टन इतका शिलकी साठा सरकारकडे होता. सरकारनेठरवलेल्या प्रमाणापेक्षा हा शिलकी साठा कमीच आहे. ऑक्टोबर २००५मध्ये तांदळासाठीचे प्रमाण५.२ दशलक्ष टन व गव्हासाठी ११ दशलक्ष टन इतके ठरवले गेले होते. असे असले तरी सरकारकडेअसलेला साठा पुरेसा समाधानकारक आहे.

२) सार्वजनिक वितरण व्यवस्था (Public Distribution System (PDS):या व्यवस्थेत तांदूळ, गहू, साखर, रॉकेल, खाद्यतेल यासारख्या महत्त्वाच्या वस्तू अनुदानितकिमतीस पुरवल्या जातात. सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील विक्रीत या वस्तूंचा वाटा जवळजवळ८.६%इतका आहे. (साखर - ३५%, तांदूळ - २७%, गहू - १०%, रॉकेल - १५%) संपूर्णभारतभर ही व्यवस्था कार्यरत आहे. शिधापत्रिका अशा सर्व व्यक्तींना देण्यात येते की ज्यांचानोंदणीकृत निवासाचा राहण्याचा पत्ता आहे. भारतात १९६० साली ४७हजार रास्त भावाची धान्याचीदुकाने होती, तर २००० साली ती एकूण ४.७लाख इतकी होती. २००० लोकसंख्येसाठी एक रास्तभावाचे धान्याचे दुकान असते.सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत १९६१-६५च्या दरम्यान ६.५ दशलक्ष टन इतके धान्यवितरित केले गेले, तर १९९०-९२मध्ये १८०४ दशलक्ष टन धान्य वितरित केले गेले.

३) पूर्णलक्षित सार्वजनिक वितरण व्यवस्था (Targeted R.D.S):ही योजना जास्त गरीब लोकांच्या गरजा पुरवणारी व्हावी यासाठी जून १९९७ मध्ये सुरूकरण्यात आली.

दारिद्र्यरेषेखाली असलेल्या कुटुंबांना विशेष अनुदानित दराला अन्नधान्यपुरवण्याचे ध्येय या व्यवस्थेचे आहे. आतापर्यंत ६५.२ दशलक्ष गरीब कुटुंबांना १८.५२ दशलक्ष टनधान्य पुरवण्याचे काम या व्यवस्थेमार्फत करण्यात आले आहे. दरमहा प्रत्येक कुटुंबाला सरासरी २५किलो धान्याचा फायदा झाला आहे. अन्नधान्याचे वितरण करताना किंमत ही राज्य सरकारकडूनठरविली जाते.

४) भारतीय अन्न महामंडळ (FCI-Food Corporation of India):१९६५मध्ये या महामंडळाची स्थापना करण्यात आली. ही सार्वजनिक वितरण व्यवस्थेलाअन्नधान्य पुरवठा करणारी संस्था आहे. या महामंडळाची महत्वाची जबाबदारी म्हणजे अन्नधान्याचीखरेदी, साठवणूक, वाहतूक वितरण व विक्री करणे होय. एका बाजूला शेतकऱ्यांना त्यांच्या मालालायोग्य ती किंमत मिळेल, तसेच ग्राहकांनायोग्य भावात अन्नधान्यही मिळेल याची खबरदारी हेमहामंडळ घेत असते,या महामंडळाकडे अन्नधान्याचा साठा मुबलक झाल्यामुळे आता आयातीवर अवलंबून राहणेकमी झाले आहे व परकीय चलन ही बचत करणे शक्य झाले आहे. या महामंडळाने ज्यांच्याकडूनअन्नधान्य विकत घेतले आहे, त्यांना योग्य, किफायतशीर किंमत प्राप्त झाल्या आहेत. तसेच यामहामंडळाने वाजवी दरात वस्तू पुरवल्यामुळे भाववाढ रोखण्यासाठी मदत झाली आहे. सरकारलाशिलकी साठा वाढवून सार्वत्रिक वितरण व्यवस्थेची गरज पूर्ण करण्यासाठीही या महामंडळाने मदतकेली आहे. शास्त्रीय पद्धतीने अन्नधान्याचा साठा करण्यासाठी हे महामंडळ प्रयत्न करते.

ब) मागणीच्या दृष्टिकोनातून उपाययोजना:यात सरकारने अन्नभान्याची मागणी वाढवण्याच्या दृष्टीने उपाययोजना केल्या आहेत.

१) सार्वजनिक वितरण व्यवस्था गरीब लोकांपर्यंत पोहोचवणे :ग्रामीण व शहरी भागातील गरीब लोकांची नोंद करणे, जेणे करून त्यांना सार्वजनिक वितरणव्यवस्थेचे फायदे घेता येतील. यासाठी ज्या लोकांना अन्नधान्य अनुदान आवश्यक आहे अशांचा'टारगेट गट' तयार करणे व जे लोक या गटात बसत नसतील त्यांना वगळणे. अशा लोकांची यादीग्रामीण भागातील पंचायतींच्या साहाय्याने तयार करता येते. यामुळे फक्त गरीब लोकांनाच याचाफायदा मिळतो, यातून अन्नधान्याचे अनुदान कमी होऊन केंद्र सरकारची तूट कमी होते.

२) सार्वत्रिक उपक्रम व सुरक्षा जाळे :सार्वत्रिक वितरण व्यवस्थेचे मुख्य ध्येय म्हणजे गरीब लोकांना पुरेसे अन्नधान्य योग्य अनुदानितकिंमतीस उपलब्ध करून देणे व त्यांना सुरक्षित ठेवणे, त्यांचे वाढत्या किंमतीपासून संरक्षण करणेहे होय.ग्रामीण भागातील कार्यक्रम जर रोजगार हमी योजना (EGS), जवाहर रोजगार योजना,रोजगार हमी योजना(EGS) त्यांच्या मार्फत गरिबांना सुरक्षा गटात घेऊन दारिद्र्याचे निर्मूलनकरणे व त्यांना योग्य रोजगार प्राप्त करून देणे हे उदिष्ट असते.

३) रोजगार कार्यक्रमःभारत सरकारने राज्यातील दुष्काळ व इतर नैसर्गिक आपत्तीने पीडित ग्रामीण भागांसाठीFood For Work Programme सुरु केला, १५ ऑगस्ट २००१ या दिवशी संपूर्ण ग्रामीणरोजगार योजना सुरू करण्यात आली. या योजनेअंतर्गत २६.०४ दशलक्ष टन अन्नधान्याचे वाटप२००२ पर्यंत करण्यात आले. डिसेंबर

२०००मध्ये अंत्योदय अन्न योजना सुरू करण्यात आली.यानुसार गहू २रू. किलो व तांदूळ ३रू. किलो दराने २५किलोधान्य गरीब कुटुंबांना देण्याचे ठरले,.

४) अन्नपूर्णा योजना:ही योजना प्रधानमंत्रालयातर्फे २००१ साली सुरू करण्यात आली. या योजनेंतर्गत ६५ वर्ष वत्यापेक्षा अधिक वय असलेल्या वृद्धांना व ज्यांना निवृत्ती वेतन मिळत नाही अशा व्यक्तींना दरमहा१०किलोअन्नधान्याचा मोफत पुरवठा केला जातो.

५) सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे विकेंद्रीकरण :सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे विकद्रीकरण होणे आवश्यक आहे. यात पहिल्या गटात पंचायतव स्थानिक संघटनांचा अन्न सुरक्षा व्यवस्थेत समावेश करावा. त्यांनी गरिबांची नोंद करावी व यालोकांना रोजगार व अन्नधान्य पुरवणाऱ्या कार्यक्रमांची अंमलबजावणी करावी.यात दुसऱ्या गटात राज्य पातळीवर अन्न सुरक्षा व्यवस्था कार्यरत असावी. सर्वसाधारणव्यापारी ज्या भागांपर्यंत अन्नधान्य पोहचवू शकत नाहीत, त्या भागांना मान्य पोहोचवण्याची जबाबदारीया राज्य पातळीच्या गटाने घ्यावी. किंमत स्थैर्य राखण्यासाठी राष्ट्रीय किंमत धोरण आचरणातआणावे.दारिद्रय निर्मूलनाकरता वापरल्या जाणाऱ्या मार्गाचा उपक्रमांच्या साहाय्याने 'अन्न सुरक्षा'उदिष्टावर भर द्यायला हवा.या सार्वजनिक वितरण व्यवस्थेला 'कल्याणकारी कार्यक्रम' याचा दर्जा प्राप्त झाला आहे.ग्रामीण भागात जाळे पसरवण्याचे कार्य व व्यवस्थेने केले आहे. रास्त भावाच्या दुकानांची (fairprice shops) संख्या ग्रामीण भागात वाढलेली आहे. अनेक रोजगार उपक्रमांमध्ये वेतन म्हणूनअनुदानित अन्नधान्य वितरित केले गेले. जास्तीत जास्त गरीब लोकांना या व्यवस्थेचा फायदा झालाआहे.भारतासारख्या प्रचंड लोकसंख्येच्या देशात सार्वत्रिक वितरण व्यवस्था राबवताना पुढीलमर्यादा येतात.

१) गरिबांना मर्यादित फायदा :ग्रामीण व शहरी भागातील गरीब सार्वजनिक वितरण व्यवस्थेपेक्षा खुल्या बाजारातील वस्तूंवरजास्त अवलंबून राहतात. त्यामुळे या व्यवस्थेचा गरिबांना कमी फायदा होतो.

२) सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील प्रादेशिक तफावत :बिहार, मध्य प्रदेश, राजस्थान उत्तरप्रदेश या भागांत दारिद्रयरेषेखालील एकूण लोकसंख्येच्या४७.६%लोक राहतात, पण या भागंना फक्त १०.४% इतकेच धान्य सार्वत्रिक वितरण व्यवस्थेच्यामदतीने १९९५मध्ये मिळाले. तर आंध्र प्रदेश, कर्नाटक, केरळ, तामीळनाडू या भागांत १९९३-९४मध्ये १८.४%लोक दारिद्रयरेषेखाली असताना त्यांना १९९५मध्ये ४८.७%इतके धान्य वितरितकेले गेले.

३) खर्च जास्त:सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या साहाय्याने गरीब लोकांपर्यंत धान्याचे वितरण करण्याचाखर्च खूप जास्त आहे. त्यामुळे सरकारला याचा बोजा उचलावा लागत आहे.

४) सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे फायदेखरे गरीब जे आहेत त्यांच्यापर्यंत पोहोचत नाही. कारण शिधापत्रिका त्यांनाच दिल्या जातात ज्यांच्याकडे निवासाच्या पत्त्याची नोंद आहे.गरिबांना घरच नसल्याने शिधापत्रिकाही नाही. त्यामुळे या सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे फायदेहीमिळत नाहीत.

५) अन्नधान्य अनुदानाचा सरकारवर फार मोठा बोजा पडत आहे:सार्वजनिक वितरण व्यवस्थेला स्वस्त दरात अन्नधान्य पुरवण्यासाठी सरकारला धान्यवरअनुदान द्यावे लागते.

५) सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील गळती:वाहतूक, साठवणूक, खुल्या बाजारात धान्य आणणे यात बऱ्याचदा गळती झालेली दिसूनयेते. विक्रीदर सार्वजनिक वितरण व्यवस्थेला मिळालेले धान्य खुल्या बाजारात विकताना आढळतात.शिधापत्रिकांच्या बोगस नोंदणी झालेल्या आढळतात. गरिबांपर्यंत वस्तू पोहोचवण्याच्या व्यवस्थेतहीत्रुटी असल्याचे आढळते.असे असले तरीही भारतासारख्या देशात जिथे अजूनही २६%जनता दारिद्रयरेषेखालीआहे, त्यांच्या कल्याणाकरता सार्वजनिक वितरण व्यवस्थेला पर्याय नाही.

## १.१० दीर्घकालीन अन्नधान्य व्यवस्थापन धोरण

अन्नधान्य व सार्वजनिक वितरण व्यवस्था खात्याने १६नोव्हेंबर २००० साली दीर्घकालीनअन्नधान्य व्यवस्थापनासाठी एक उच्चस्तरीय समिती गठीत केली. ३१ जुलै २००२ साली यासमितीने आपला अहवाल सादर केला. यात पुढील काही महत्वाच्या शिफारशी या समितीने केल्या.

१) सार्वजनिक वितरण व्यवस्थेसाठी अन्नधान्य खरेदी करताना गुणवत्तेचा निकष काटेकोरपणेपाळला जावा.

२) केंद्र सरकारने व राज्य सरकारने भारतीय अन्नधान्य महामंडळाकडे (FCI) द्यावयाचीरक्कम वेळेवर द्यावी

३) तांदळासाठी किमान खरेदी किंमत सर्व जातींसाठी एकच ठेवावी.

४) खरेदी किंमतीमधील तफावत कमी करून रास्त भावांच्या अन्नधान्य दुकानांची वितरणव्यवस्थेतील व्यवहार्यता वाढवावी.

५) अन्नधान्यांचा चालू साठा संपल्यावर राहिलेले अन्नधान्य रोजगार योजनांसाठी वापरून ग्रामीणभागांतील सुविधा वाढविण्यास प्राधान्य द्यावे,

६) अंत्योदय अन्न योजना: समाजातील सर्व प्रांतातील आर्थिकदृष्ट्या अत्यंत कमकुवत लोकांसाठीसुद्धा राबवली जावी.

७) केंद्राने पुरस्कृत केलेल्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा देशातील सर्व लोकांसाठी वापर.

८) पेरणीच्या आधी केंद्र सरकारने दरवर्षी किमान हमी किंमत जाहीर करावी. यासाठी कृषी खर्चव किंमत आयोगाच्या (Agricultural Costs & Price Commission) शिफारशीविचारात घ्याव्यात.

९) कवी खर्च व किंमत आयोगाला वैधानिक अधिकार देण्यात यावेत,

१०) अन्नधान्यासाठी किमान हमी किंमत ठरवताना सर्व प्रकारच्या खर्चाचा अंदाज घेऊनच ती

द्यावीउदा. जमिनीचे खंड, घरगुती (कौटुंबिक), श्रम, भांडवल खर्च इत्यादी.

११) अन्नधान्य खरेदी करताना स्थानिक उत्पादन खरेदी करून वाहतूक खर्चात बचत करावी.

१२) भात गिरण्यांवर सरकारद्वारे लावल्या जाणाऱ्या करांची रक्कम त्वरित काढूनघेणे,

१३) जेव्हा किमान हमी किंमतीला अन्नधान्य उपलब्ध होत नसेल व त्यामुळे सार्वजनिक वितरणव्यवस्थेसाठी लागणाऱ्या धान्याच्या पुरवठ्यासाठी अन्नधान्य कमी पडत असेल, त्यावेळीशेतकऱ्यांकडून बाजारभावाने अन्नधान्य खरेदी केले जाते.

१४) भारतातील लोकांच्या आहाराच्या सवयीत होत असलेल्या बदलानुसार अन्नधान्य उत्पादनातफेरबदल करण्यासाठी विशेष उपक्रम हाती घ्यावा.

१५) मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार करून अन्नधान्याची आवश्यकतेनुसार आयात व निर्यात करावी.

१६) अन्नधान्याच्या खाजगी व्यापारातील आर्थिक, तसेच कायदेशीर अडचणी दूर करून व्यापारातसुलभता आणावी.

१७) भारतीय अन्नधान्य महामंडळाने संपूर्ण गुणवत्तापालन निकषचा विचार करून सार्वजनिक वितरण व्यवस्थेत गुणवत्ता आणावी.नवीन धोरणानुसार पुढील तीन मुद्यावर भर दिला आहे.

१ .फळफळावळ व भाज्या यांच्या उत्पादनाचे प्रमाण वाढवणे.

२ .अन्नधान्य साठवणुकीच्या सुविधात वाढ करणे,

३. नाशवंत वस्तूंच्या उत्पादनावरून प्रक्रिया उद्योग वाढवणे, यावरून हेच लक्षात येते की, उत्पादकतेबरोबरच गुणवत्ता वाढविण्याचा विशेष प्रयत्न अन्नधान्य व्यवस्थापन धोरणात केला आहे.

## १.११ सारांश

१९९१पासून भारतात उदारीकरणाचे वारे वाहू लागले आहेत. जागव्यापार संघटनेनुसारशेतीक्षेत्रालाही मोठ्या प्रमाणावर स्पर्धेला तोंड द्यावे लागणार आहे. त्यामुळे या क्षेत्रात जास्तीतजास्त उत्पादकता व कार्यक्षमता वाढवण्याचे प्रयत्न करावे लागणार आहेत. शेतकऱ्याला जास्तबाजाराभिमुखी बनवावे लागणार आहे. या सर्वासाठी योग्य असे वातावरण निर्माण करणे गरजेचेठरते. त्यामुळे शेतीक्षेत्रातील विषमता व इतर अडथळे दूर करण्याच्या उद्देशाने सरकारने २०००सालीआपले नवीन राष्ट्रीय शेती धोरण जाहीर केले व राबविण्यास सुरूवात केली.

## १.१२ स्वाध्याय

१ राष्ट्रीय कृषी धोरणाची **उदिष्टये** स्पष्ट करा.

२ राष्ट्रीय कृषी धोरणाची वैशिष्ट्ये सांगा.

३ राष्ट्रीय कृषी धोरणापुढील प्रणिया स्पष्ट करा.

४ अन्नसुरक्षेची संकल्पना सांगून भारतात अन्नसुरक्षेची गरज आहे कायसांगा,?

५ भारतसरकारचे अन्नधान्य व्यवस्थापनाचे धोरण स्पष्ट करा.

**संदर्भसूची:**


1) ***Dr. Sinha H. K. challenges in Rural Development,1998 Discovery Publication House New Delhi- 110002.***
2) ***Dr. Dubey M. K. Rural and Urban Development in India, 2000, common wealth***

***Publisher DoryaGonj New Delhi-110002.***

3) ***Dr. Desai A. R. Rural Society in India 1978 Popular Publication House***
4) **http://mospi.nic.in/sites/default/files/Statistical_year_book_india_chapters/ch12.pdf**
**https://kids.britannica.com/students/article/irrigation/275094**
**https://www.cdc.gov/healthywater/other/agricultural/types.html**
**https://en.wikipedia.org/wiki/Irrigation**
**https://civiltoday.com/water-resource-engineering/irrigation/63-importance-of-irrigation-**
**https://www.smsfoundation.org/water-management/**
**https://www.nrcs.usda.gov/Internet/FSE_DOCUMENTS/nrcs141p2_017781.pdf**
**\https://thefactfactor.com/facts/pure_science/biology/irrigation/2277/**
**https://www.teachoo.com/9803/2972/Step-4---Irrigation/category/Concepts/**


❖❖❖❖

# २

# कृषी विकास - II

**पाठाची रूपरेषा**

२.० उद्दिष्टे

२.१ परिचय

२.३ सिंचन आणि पाणी व्यवस्थापन

२.४ सिंचन

२.५ शेतीमध्ये सिंचनाचे महत्त्व

२.६ सिंचन स्त्रोत

२.७ सिंचन पद्धती - आधुनिक आणि पारंपारिक

२.८ पाणी व्यवस्थापन

२.९ सारांश

२.१० संदर्भ

## २.० उद्दिष्टे

1. सिंचन आणि पाणी व्यवस्थापन संकल्पना समजून घेणे.
2. पाणी व्यवस्थापन महत्त्व अभ्यासणे.
3. शेतीमध्ये सिंचनाचे महत्त्व अभ्यासणे.
4. सिंचन स्त्रोत माहिती घेणे.
5. सिंचन पद्धती - आधुनिक आणि पारंपारिक समजून घेणे.

## २.१ परिचय

पाण्याच्या उपलब्धते बाबत भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा देश असून, जगांत दरवर्षी १२,५०० ते १४,००० घन किमी पाणी मानवी वापरासाठी उपलब्ध होते. या पाण्यापैकी १,८६९ घकिमी म्हणजेच वापरण्या योग्य एकूण पाण्याच्या (१.५%) पाणी भारतात उपलब्ध होते. महाराष्ट्रात दरवर्षी १६३.८२ घन किमी भूपृष्ठजल तर २०.५ घकिमी भूजल उपलब्ध होते.

महाराष्ट्रात उपलब्ध होणाऱ्या वापरायोग्य भूपृष्ठजलाचे प्रमाण भारतातील वापरायोग्य पाण्याच्या ९% तर जगातील वापरायोग्य पाण्याच्या ०.१३% एवढे आहे. चितळे जलसिंचन आयोगाच्या अंदाजानुसार, राज्यात भूपृष्ठ जल व भूजलासह वापरासाठी सरासरी १३९,२२७ दलघमी एवढे पाणी उपलब्ध आहे.

२०३० साली राज्याची सिंचनाच्या व इतर पाण्याची एकूण गरज केवळ ९७,६६८ दलघमी एवढी असणार आहे. म्हणजेच पाण्याच्या वाढत्या गरजा भागवूनही २०३० साली सुमारे ४१,५५९ दलघमी एवढे पाणी महाराष्ट्रात शिल्लक राहणार आहे. म्हणजेच निसर्गाने महाराष्ट्राला भरभरुन पाणी दिले आहे.


मात्र, महाराष्ट्राची राज्यपातळीवरील पाण्याची आकडेवारी, समाधानकारक दिसत असली तरी ती फसवी आहे. या आकडेवारीच्या अंतरंगाना जाणून घेतल्यानंतर सदर फसवेपणा लक्षात येऊ शकतो. अन्यथा मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध असणाऱ्या महाराष्ट्रात पाणी टंचाई जाणवली नसती.

देशातील धरणांचा विचार करता, सर्वात जास्त धरणे महाराष्ट्रात आहेत. देशात जेवढी मोठी धरणं आहेत त्यातील ३५% एकट्या महाराष्ट्रात आहेत. राज्याची पाणी साठा करण्याची क्षमता देशात सर्वात जास्त आहे. मात्र राज्यात आजपर्यंत निर्माण केलेली सिंचन क्षमता व वापरात आलेली सिंचन क्षमता यात मोठी तफावत आहे. तफावत ही कमी करण्यासाठी पाणी व्यवस्थापन अत्यंत महत्त्वाचे आहे.

## २.३ सिंचन आणि पाणी व्यवस्थापन

सिंचन: वाढत्या लोकसंख्येच्या अन्नाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी कृषी उत्पादनात वाढ करण्यासाठी सिंचन हे महत्त्वाचे साधन आहे. कृषी उत्पादनाला चालना देणे आणि स्थापित करणे हे प्रमुख घटकांपैकी एक आहे. पारंपारिक शेतीचे आधुनिक शेतीत रूपांतर करण्यासाठी वेळेवर आणि पुरेशा प्रमाणात पाण्याची उपलब्धता ही अत्यावश्यक अट आहे.

सिंचनाला महत्त्वाची भूमिका दिली जाते कारण हा एकमेव सर्वात महत्वाचा घटक आहे जो दुर्मिळ शेतजमीन संसाधनांचा पूर्ण वापर सुलभ करतो आणि शेती स्तरावर सुधारित तंत्रज्ञान स्वीकारणे सुलभ करतो. सधन शेती हा कृषी विकासाच्या सध्याच्या कार्यक्रमाचा मुख्य आयाम आहे, ज्यासाठी सिंचन सुविधांचा विस्तार आवश्यक आहे. जास्त लोकसंख्येच्या दबावाखाली आणि अन्नधान्याची तीव्र टंचाई असलेले बहुतेक विकसनशील देश त्यांच्या सिंचन सुविधांना भरपाई देण्याचा प्रयत्न करत आहेत. स्वातंत्र्य मिळाल्यापासून भारत आपल्या शेतजमिनी सिंचनासाठी यशस्वी होण्यासाठी ठोस प्रयत्न करत आहे.





कृषी इकार भारतातील सिंचन: स्थिती, आव्हाने आणि पर्याय

शेतकरी आणि पशुपालक पिके घेण्यासाठी शेतीचे पाणी वापरण्याचे दोन मुख्य मार्ग आहेत: पावसावर आधारित शेती आणि सिंचन.

पावसावर आधारित शेती म्हणजे थेट पावसाद्वारे जमिनीत नैसर्गिक पाणी वापरण्याची प्रक्रिया. पावसावर अवलंबून राहिल्याने अन्नपदार्थ दूषित होण्याची शक्यता कमी असते परंतु जेव्हा पाऊस कमी होतो तेव्हा पाण्याची कमतरता असते आणि दुसरीकडे, पाण्याचा कृत्रिम वापर पिके दूषित होण्याचा धोका वाढवतो.

सिंचन म्हणजे पाईप्स, खड्डे, स्प्रिंकलर इत्यादी कृत्रिम माध्यमांद्वारे पिकांच्या उत्पादनात मदत करण्यासाठी जमिनीवर नियंत्रित प्रमाणात पाण्याचा वापर करण्याची कृत्रिम प्रक्रिया आहे. सिंचन शेती पिके वाढण्यास, मुबलक धान्य प्रमाण राखण्यास, अपुऱ्या पावसाचा प्रभाव कमी करण्यास आणि पुनरुत्पादनास मदत करते.

सिंचन प्रणालीचे अनेक प्रकार आहेत, ज्यामध्ये संपूर्ण शेताला एकसमान पाणीपुरवठा केला जातो. सिंचनाचे पाणी भूगर्भातील पाण्यामधून, झरे किंवा विहिरींद्वारे, पृष्ठभागावरील पाणी, नद्या, तलाव किंवा जलाशयांमधून किंवा इतर स्त्रोतांमधून येऊ शकते, जसे की प्रक्रिया केलेले सांडपाणी किंवा विलवणीकरण केलेले पाणी.




भारतातील सिंचन स्रोत – GKToday gktoday.in

## २.४ पाणी व्यवस्थापन

- राज्यातील नव्या जुन्या सर्व विहीरी तसेच विंधन विहीरींच्या नोंदी अनिवार्य करणे;
- ठिंबन सिंचन पध्दतींचा वापर बंधनकारक करणे;
- पूर्वपरवनगीशिवाय विंधन विहीर घेतल्यास फौजदारी गुन्हा दाखल करणे;
- भूजलाच्या अमर्याद उपशास केवळ संबंधित शेतकऱ्यास जबाबदार न धरता. कायद्याच्या अंमलबजावणीस जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित करणे;
- विंधन विहीरी घेणाऱ्या सर्व यंत्राच्या शासन दप्तरी नोंदी ठेवणे;
- भूजलाचा अतिउपसा होणाऱ्या क्षेत्राची माहिती सार्वजनिक करणे;
- लोकसहभागातून भूजलाचे व्यवस्थापन करणे;
- भूजल पुनर्भरणाची कामे तसेच छतावरील पाणी संकलनाचे काम बंधनकारक करणे;
- भूजलाचे पुनर्भरण व उपसा यांचा गावनिहाय सामाजिक लेखाजोखा ठेवणे;
- सामुदायिक विहीरींचा प्रसार व प्रचार करणे;
- सांडपाण्याचा पुनर्वापर, वाळू उपशावर बंधने, तसेच सिंचन पध्दतीत बदल;
- जनतेचे प्रबोधन करणे;

**पाणी वापर संस्थांचा सहभाग -** सिंचन व्यवस्थापनात शेतकऱ्याच्या पाणी वापर संस्थांना सक्रिय सहभागी करुन घेण्याची आवश्यकता आहे. पाणी वापर संस्थावर केवळ कालवा व्यवस्थेच्या देखभाल दुरुस्तीची जबाबदारी न सोपविता, पाणी व्यवस्थेचे नियोजन करणे, अंदाजपत्रक तयार करणे तसेच कामाच्या अंमलबजावणीमध्ये त्यांना सक्रिय सहभागी करुन घ्यावे. त्यासाठी त्यांची क्षमता बांधणी करावी. पाणी वापर संस्थाच्या तसेच लाभक्षेत्र व्यवस्थापनाच्या कामाचे वेळोवेळी मूल्यांकन करावे व आवश्यक त्या ठिकाणी योग्य त्या सुधारणा त्या त्या वेळी हाती घ्याव्यात असे वाटते.

**पाणी व्यवस्थापनाचे प्रशिक्षण -** महाराष्ट्र शासनाची पाणी व भूमी व्यवस्थापन संस्था शास्त्रशुध्द सिंचन व्यवस्थापनाचे प्रशिक्षण शेतकऱ्यांना तसेच जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना देते. परंतु या संस्थेने प्रशिक्षित केलेले अधिकारी परत विभागकडे गेल्यावर त्यांना बरेच वेळा बांधकामे, सर्वेक्षणाची कामे दिली जातात, किंवा त्यांना कार्यालयामध्ये बसवले जाते. असे न होता असे प्रशिक्षित अधिकारी एकाच प्रकल्पामध्ये मोठ्या संख्येने नियुक्त केले गेले तर त्यांच्या प्रशिक्षणाचा प्रभाव वाढून सिंचनाची कार्यक्षमता वाढू शकेल.

**भारतातील सिंचन: भारतातील सिंचन प्रकल्पांचे तीन प्रकारांमध्ये वर्गीकरण केले आहे.** लघु, मध्यम आणि प्रमुख सिंचन. २००० हेक्टर किंवा त्यापेक्षा कमी सीसीए असलेले प्रकल्प लघु प्रकल्प म्हणून ओळखले जातात. ज्यांचे १०,००० हेक्टरपेक्षा कमी परंतु २००० हेक्टरपेक्षा जास्त सीसीए आहे त्यांना मध्यम प्रकल्प आणि ज्या प्रकल्पांमध्ये लागवडीयोग्य कमांड एरिया (सीसीए) जास्त आहे ते प्रकल्प प्रमुख सिंचन म्हणून ओळखले

जातात. १०,००० हेक्टर पेक्षा जास्त क्षेत्राला प्रमुख प्रकल्प म्हणून संबोधले जाते. लघु पाटबंधारे प्रकल्पांमध्ये भूपृष्ठीय आणि भूजल दोन्ही स्त्रोत आहेत, तर मोठे आणि मध्यम प्रकल्प मुख्यतः भूपृष्ठावरील जलस्त्रोतांचे शोषण करतात.

**प्रश्न -** पाणी व्यवस्थापन टीप लिहा.

## २.५ शेतीमध्ये सिंचनाचे महत्त्व

१) अनियमित, अपुरा किंवा अनिश्चित पावसामुळे अनेकवेळा शेती मोठ्या प्रमाणात बाधित होते. योग्य सिंचन प्रणाली अखंडित शेती सुरक्षित करू शकते.

२) बागायती जमिनीची उत्पादकता ही बागायत नसलेल्या जमिनीपेक्षा जास्त असते. पावसावर अवलंबून असलेल्या क्षेत्रापेक्षा बागायती भागात पिकांचे उत्पादन सातत्याने जास्त असते.

३) बियाणे कोरड्या जमिनीत वाढू शकत नाही कारण बियाणे उगवण करण्यासाठी ओलावा आवश्यक असतो परंतु सिंचन पुरवठा बियाण्याच्या वाढीसाठी जमिनीतील आवश्यक आर्द्रता सुनिश्चित करू शकतो.

४) सिंचनाद्वारे एका वर्षात अनेक पीक घेणे शक्य आहे आणि ते उत्पादन आणि उत्पादकता वाढवू शकते. भारतातील सिंचनाची सोय असलेल्या अनेक भागांमध्ये वर्षातून दोन किंवा तीन पिके घेतली जातात.

५) आवश्यक प्रमाणात हायड्रोजन आणि ऑक्सिजनचा पुरवठा करणे शक्य आहे, जे सिंचनाद्वारे वनस्पतींच्या मुळांच्या योग्य विकासासाठी महत्वाचे आहे.

६) एक वनस्पती सिंचन केलेल्या जमिनीतून खनिज पोषक द्रव्ये शोषू शकते, म्हणून झाडाच्या सामान्य वाढीसाठी सिंचन आवश्यक आहे.

७) सिंचनाद्वारे अधिक जमीन लागवडीखाली आणणे शक्य आहे.

८) अपुऱ्या पावसामुळे दुष्काळ आणि उपासमार देखील होऊ शकते परंतु दुष्काळ आणि दुष्काळाच्या काळात सिंचन एक संरक्षणात्मक भूमिका बजावू शकते.

९) सिंचनामुळे आर्थिक वाढ आणि गरिबी कमी होण्यास हातभार लागतो. सिंचनामुळे उत्पादन वाढते आणि परिणामी ग्रामीण भागात उत्पन्नात भरीव वाढ होते कारण उत्पन्न आणि रोजगार यांचा उत्पादनाशी जवळचा संबंध असतो.

**प्रश्न - सिंचनाचे महत्त्व सांगा.**

## २.६ सिंचन स्रोत

माती, पर्जन्यमान, बारमाही आणि बारमाही न येणाऱ्या नदी, जमिनीची उपलब्धता आणि पिकांचे स्वरूप यासारख्या विविध घटकांवर सिंचनाच्या पद्धती बदलतात.

**१) कालवा सिंचन:**

कालवा सिंचन हा सिंचनाचा सर्वात महत्वाचा स्त्रोत आहे. देशातील एकूण सिंचनापैकी २४**%** वाटा कालवा सिंचनाचा आहे. खालच्या स्तरावरील खोल सुपीक माती आणि बारमाही नदीचा भाग हा सिंचनाचा एक प्रभावी स्त्रोत आहे.



**कालवा सिंचनाची कारणे आणि परिणाम... aboutcivil.org**

कालवा सिंचनाचे दोन प्रकार आहेत एक म्हणजे इंडेशन कालवे आणि दुसरे म्हणजे बारमाही कालवे.

**पुराचे कालवे:** कोणत्याही बॅरेज आणि धरणाशिवाय पाणी बाहेर काढले जाते, पूर वळवण्यासाठी उपयुक्त आणि पावसाळ्यात चालू राहते.



**पूरग्रस्त कालव्याच्या प्रतिमा, स्टॉक फोटो ... shutterstock.com**

**बारमाही कालवे:**



**लिंक कालवे, बॅरेजेस आणि धरणे slideshare.net**


भारतातील बहुतेक कालवे बारमाही नद्यांमध्ये बॅरेज बांधून बारमाही कालव्याखाली येतात.

**2) विहीर सिंचन:** विहीर, टाकी आणि कालव्याद्वारे सिंचन उपलब्ध नसलेल्या भागात सिंचन लोकप्रिय आहे.

सिंचन स्वस्त आणि विश्वासार्ह आहे.

विहीर सिंचनाचे दोन प्रकार आहेत - खुली विहीर आणि नलिका विहीर.

**खुल्या विहिरी -** जेथे पुरेसे भूजल आहे तेथे ओपन वेल्सचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. उदा: कावेरी, कृष्णा, गोदावरी, महानदीचा डेल्टा प्रदेश आणि ताप्ती आणि नर्मदा खोऱ्यांचा काही भाग.




ओपन विहीर आणि ट्यूबमधला फरक... youtube.com

**नलिका विहिरी -** नलिका विहिरींचा वापर अशा ठिकाणी केला जातो जेथे पृष्ठभाग मऊ आहे आणि पाण्याची पातळी कमी आहे आणि त्या कठीण खडकाळ प्रदेशात देखील खोदल्या जातात. उदा: तामिळनाडू, मध्य प्रदेश, पंजाब आणि महाराष्ट्र.

**3) टाकी सिंचन:**

टाकी सिंचन ही भारतातील सिंचनाची जुनी प्रणाली आहे. टाक्या नैसर्गिक आणि मानवनिर्मित दोन्ही आहेत आणि टाकी सिंचन द्वीपकल्पीय भारतात लोकप्रिय आहे. नाला, कालवे ओलांडून बंधारा बांधून पृष्ठभागावर पोकळी निर्माण केली जाते.



भारतातील टाकी सिंचन indianetzone.com

टाक्यांचा वापर पावसाळ्यात पाणी गोळा करण्यासाठी केला जातो जे सिंचन आणि इतर कारणांसाठी साठवले जाते. त्यात तलावांचा समावेश आहे.

**प्रश्न - सिंचनाचे वेगवेगळे स्त्रोत कोणते आहेत?**

## २.७ सिंचन पद्धती - आधुनिक आणि पारंपारिक

**अ) सिंचनाच्या आधुनिक पद्धती:**

विविध प्रकारच्या सिंचन तंत्रांमध्ये उगमस्थानातून मिळालेले पाणी शेतात कसे वितरीत केले जाते यावरून भिन्नता आहे. सर्वसाधारणपणे, संपूर्ण शेताला समान रीतीने पाणी पुरवणे हे उद्दिष्ट आहे, जेणेकरून प्रत्येक रोपाला आवश्यक तेवढे पाणी असेल, जास्त किंवा कमी नाही. सिंचनाच्या पद्धती स्थानिक परिस्थितीवर अवलंबून असतात, ज्यात स्थलाकृति, सिंचनासाठी पिके, पाणी पुरवठ्याचे स्वरूप आणि स्थान आणि मातीची निचरा वैशिष्ट्ये यांचा समावेश होतो. म्हणून आधुनिक सिंचन पद्धती पाच सामान्य श्रेणींमध्ये मोडतात: पूर, फरो सिंचन, उपसिंचन, शिंपडणे आणि ठिबक सिंचन.

**अ) पृष्ठभाग सिंचन:** पृष्ठभाग सिंचन प्रणालीमध्ये, पाणी जमीन ओली करण्यासाठी आणि जमिनीत घुसण्यासाठी साध्या गुरुत्वाकर्षण प्रवाहाने जमिनीवर सोडले जाते. जेव्हा सिंचनामुळे पूर येतो किंवा लागवड केलेल्या जमिनीच्या जवळ पूर येतो, तेव्हा पृष्ठभाग सिंचन फ्युरो, बॉर्डर स्ट्रिप किंवा बेसिन सिंचनमध्ये विभागले जाऊ शकते. याला अनेकदा पूर सिंचन असे म्हणतात. पूर सिंचन पद्धतीत पाणी सिंचन प्लॉटच्या पृष्ठभागावर सतत जमा राहते आणि तेथे लहान कडे किंवा कड्यांनी साचवले जाते.



<u>**पृष्ठभाग सिंचन - एक विहंगावलोकन ... sciencedirect.com**</u>

ज्या शेतांना सिंचन करायचे आहे ते सहसा लहान खोऱ्यांमध्ये विभागले जातात. शेतातील खंदकांमधून किंवा दुय्यम खंदकांच्या मातीच्या कड्यांमधून तात्पुरते अंतर कापून पाणी सोडले जाते. बेसिन पाण्याने भरल्यानंतर, शेतकरी अडथळे काढून टाकतो किंवा अंतर बंद करतो आणि पुढील बेसिनमध्ये प्रक्रिया पुन्हा करतो.

**ब) फरो सिंचन:**

फरो सिंचनामध्ये अनेक पिकांना फरोद्वारे सिंचन केले जाते, ते कड्यांच्या दरम्यानचे खड्डे असतात ज्यावर पिके लावली जातात. पार्श्वभागातून येणारे पाणी, मातीची एक लहान डिक कापून प्रत्येक फरोमध्ये प्रवेश करते, त्यामुळे काही अंतर पाणी पुढे जाते. जेव्हा प्रत्येक

फरोमधील पाणी इच्छित पातळीपर्यंत पोहोचते, तेव्हा खड्डा पुन्हा बंद करून पुरवठा खंडित केला जातो. पाणी जमिनीत मुरते आणि जमीन पोसते.



**<u>फरो इरिगेशन हाय रिझोल्यूशन स्टॉक ... alamy.com</u>**

वनस्पतींची मुळे. पुराच्या तुलनेत ही पद्धत तयार करणे आणि चालवणे अधिक महाग आहे. ते भाजीपाल्यासारख्या उच्च-मूल्याच्या पिकांसाठी वापरले जाऊ शकते. फरो सिंचनच्या अडचणींपैकी एक म्हणजे दिलेल्या शेतात पाण्याचा एकसमान प्रसार सुनिश्चित करणे. फरो सिंचनाची आणखी एक अडचण म्हणजे पाणी वाहून जाण्याची शक्यता वाढते.

**i) लाट सिंचन:**

सर्ज इरिगेशन हा फरो सिंचनचा एक प्रकार आहे ज्यामध्ये नियोजित कालावधीत पाणीपुरवठा चालू आणि बंद केला जातो.



**<u>सर्ज इरिगेशन – Agristudyinfo agristudyinfo.com</u>**

या प्रकारच्या सिंचनातील ओले आणि कोरडे चक्र पाणी वहन दर कमी करतात. परिणामी जलद आणि उच्च एकसमान कालावधी नंतर सतत प्रवाह सुरु असतो.

**ii) खंदक सिंचन:**

ही एक पारंपारिक पद्धत आहे, जिथे खड्डे खणले जातात आणि ओळींमध्ये रोपे लावली जातात आणि झाडांच्या ओळींमध्ये कालवे किंवा चर टाकून त्यांना पाणी दिले जाते.



**<u>सिंचन खंदक, केरळ, भारत-5.jpg ... flickr.com</u>**

मुख्य खंदकातून पाणी कालव्यात नेण्यासाठी सायफन ट्यूबचा वापर केला जातो.

**क) उपसिंचन:**

मातीची परिस्थिती अनुकूल असल्यास आणि भूजल तक्ता पृष्ठभागाजवळ असल्यास, उपसिंचन किंवा अंडरबेड सिंचन वापरले जाते. उप-सिंचन, ज्याला कधीकधी सीपेज सिंचन देखील म्हणतात. पाण्याची पातळी जास्त असलेल्या भागात शेतातील पिकांसाठी अनेक वर्षांपासून वापरली जात आहे. कृत्रिमरित्या पाण्याचे पुरवठा वाढवण्याची ही एक पद्धत आहे ज्यामुळे झाडांच्या मुळांच्या खाली माती ओलसर होऊ शकते. येथे पाणी खंदकांमध्ये शेतात पोचवले जाते आणि जमिनीत मुरण्याची सोय केली जाते जेणेकरून वनस्पतींच्या मुळांना खायला हवे अशी भूजल पातळी राखली जाईल.



**<u>उपसिंचन | Britannica britannica.com</u>**

पंपिंग स्टेशन्स, कालवे, विअर्स आणि गेट्सची प्रणाली त्यास खड्ड्यांच्या नेटवर्कमध्ये पाण्याची पातळी वाढवण्यास किंवा कमी करण्यास अनुमती देते आणि त्याद्वारे पाण्याची पातळी नियंत्रित करते. पूर पद्धतीच्या तुलनेत, सिंचनाच्या पाण्याचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी होते, परंतु उपसिंचनासाठी देखील चांगल्या दर्जाचे आणि कमी क्षाराचे पाणी आवश्यक असते. हा दृष्टीकोन स्ट्रॉबेरी, लहान फळे आणि भाज्या यांसारख्या नाजूक वनस्पतींसाठी प्रभावी आहे कारण ते झाडांच्या शीर्षस्थानी कोरडे ठेवते आणि सडणे किंवा बुरशीमुळे खराब होण्यास प्रतिबंध करण्यास मदत करते. उप-सिंचन देखील व्यावसायिक हरितगृह उत्पादनात वापरले जाते, सामान्यतः कुंडीतील वनस्पतींसाठी. पाणी खालून वितरीत केले जाते, वर शोषले जाते आणि पुनर्वापरासाठी गोळा केले जाते.

### ड) स्थानिक सिंचन:

स्थानिकीकृत सिंचन ही एक अशी प्रणाली आहे जिथे पाणी कमी दाबाने पाईप नेटवर्कद्वारे, पूर्वनिश्चित नमुन्यात वितरीत केले जाते आणि प्रत्येक झाडाला किंवा त्याच्या शेजारील लहान स्त्राव म्हणून लागू केले जाते. ठिबक सिंचन, तुषार किंवा सूक्ष्म-स्प्रिंकलर सिंचन या सिंचन पद्धतींच्या या श्रेणीतील आहेत.

### अ. ठिबक सिंचन:

ठिबक सिंचन, ज्याला ट्रिकल इरिगेशन असेही म्हणतात, त्याच्या नावाप्रमाणेच कार्य करते. झाडांच्या रूट झोनमध्ये किंवा त्याच्या जवळ पाणी, थेंब थेंब टाकून दिले जाते. इस्त्रायलमध्ये विकसित झालेल्या ठिबक किंवा ट्रिकल सिंचनमध्ये जमिनीवर छिद्रयुक्त प्लास्टिक पाईप टाकला जातो. छिद्रांची रचना वनस्पतींच्या मुळांजवळ नियंत्रित प्रमाणात पाणी सोडण्यासाठी केली जाते.



**ठिबक सिंचन प्रणाली - एक संपूर्ण... agrifarming.in**

बाष्पीभवन आणि प्रवाह कमी केल्यामुळे ही पद्धत योग्यरित्या व्यवस्थापित केल्यास, सिंचनाची सर्वात जल-कार्यक्षम पद्धत असू शकते. आधुनिक शेतीमध्ये, ठिबक सिंचन अनेकदा प्लास्टिकच्या आच्छादनासह एकत्रित केले जाते, ज्यामुळे बाष्पीभवन कमी होते आणि ते खत वितरणाचे साधन देखील आहे. ही पद्धत बाष्पीभवन आणि मुळांच्या पातळीच्या खाली खोल गळतीमुळे पाण्याचे नुकसान कमी करते. हे प्रामुख्याने ज्या भागात पाणीपुरवठा मर्यादित आहे अशा ठिकाणी केला जातो. ठिबक प्रणाली रोपाच्या मुळाजवळ थेंब थेंब पाणी देणे आणि मोठ्या झाडासाठी आणि बागायतीसाठी उपयुक्त आहे. *प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना* **(PMKSY)** ही पाणी वाचवण्यासाठी ठिबक आणि तुषार सिंचनाला चालना देण्यासाठी भारत सरकारने प्रायोजित केलेली सूक्ष्म सिंचन योजना आहे जी PER DROP MORE CROP (पाणी वापर कार्यक्षमता सुधारणे) संदेश देते. महाराष्ट्र, आंध्र प्रदेश कर्नाटक, गुजरात आणि तामिळनाडू या राज्यांत देशातील एकूण सूक्ष्म सिंचनाचा वाटा ७८% आहे.

### ब. तुषार सिंचन:

स्प्रिंकलर किंवा ओव्हरहेड सिंचनमध्ये, शेतातील एक किंवा अधिक मध्यवर्ती ठिकाणी पाणी पाइपद्वारे टाकले जाते आणि ओव्हरहेड उच्च-दाब स्प्रिंकलर किंवा बंदुकांनी वितरित

केले जाते. शिंपडण्याची पद्धत ही काही प्रकारे सर्वात सोयीस्कर आणि कार्यक्षम सिंचन प्रणाली आहे. बहुतेक प्रकारच्या स्प्रिंकलरसाठी पाइपिंग आणि पंप आवश्यक असतात. पाणी जिथे आवश्यक आहे तिथे ठेवता येते आणि प्रवाह दर इतर प्रणालींपेक्षा अधिक अचूकपणे नियंत्रित केला जाऊ शकतो. खडबडीत आणि डोंगराळ जमिनीवर गुळगुळीत आणि प्रतवारी न करताही स्प्रिंकलर प्रभावीपणे वापरता येतात.



<u>**तुषार सिंचन: एक संभाव्य सूक्ष्म ... krishijagran.com**</u>

स्प्रिंकलरचे अनेक प्रकार आहेत, काही लॉन स्प्रिंकलरसारखे आहेत. युनिट्स पोर्टेबल, कायमस्वरूपी किंवा अर्धस्थायी असू शकतात. स्प्रिंकलर्स, स्प्रे किंवा कायमस्वरूपी स्थापित राइझर्सवर ओव्हरहेड बसवलेल्या बंदुकांचा वापर करणारी प्रणाली बहुतेकदा घन-सेट सिंचन प्रणाली म्हणून ओळखली जाते. उच्च दाबाचे स्प्रिंकलर जे फिरतात त्यांना रोटर्स म्हणतात आणि ते बॉल ड्राइव्ह, गियर ड्राइव्ह किंवा प्रभाव यंत्रणेद्वारे चालवले जातात. बंदुकांचा वापर केवळ सिंचनासाठीच केला जात नाही तर धूळ दाबणे आणि लॉगिंग यांसारख्या औद्योगिक वापरासाठी देखील केला जातो. जलस्रोतांना नळीने जोडलेल्या फिरत्या प्लॅटफॉर्मवर स्प्रिंकलर बसवता येतात. ट्रॅव्हलिंग स्प्रिंकलर्स म्हणून ओळखल्या जाणाऱ्या स्वयंचलितपणे फिरणाऱ्या चाकांच्या सिस्टीममुळे लहान शेत, क्रीडा मैदाने, उद्याने, कुरणे आणि स्मशानभूमी यांसारख्या भागात सिंचन होऊ शकते.

**अ) रेन गन:**



<u>**रेन गन स्प्रिंकलर इरिगेशन सिस्टिम... dreamstime.com**</u>

या पद्धतीत वॉटर गन किंवा रेन गन वापरून पावसाप्रमाणे पाणी फेकले जाते. हे स्प्रिंकलर 4 फूट (**1.22** मीटर) किंवा त्याहून अधिक उंचीच्या पिकासाठी वापरले जातात.

**ब) केंद्र-पिव्होट इरिगेशन किंवा सेंट्रल पिव्होट इरिगेशन:**



**<u>शेतीवरील प्रगत तंत्रज्ञान... articleshubspot.com</u>**

याला वॉटरव्हील किंवा सर्कल इरिगेशन असेही म्हणतात आणि त्यात एक स्प्रिंकलर असतो जो फिरतो आणि पिकांना पाणी देतो.

**क) बहुउद्देशीय नदी खोरे प्रकल्प:**

नद्यांवर धरणे बांधणे यासारख्या वैज्ञानिक पद्धती वापरून पाण्याचे व्यवस्थापन करणे.



**<u>भारतातील बहुउद्देशीय नदी खोरे प्रकल्प allexamgurublog.com</u>**


बहुउद्देशीय नदी खोरे प्रकल्प हा बहुउद्देशीय अनुप्रयोग आहे जसे की पूर, मत्स्यपालन, औद्योगिक गरजा आणि जलवाहतूक इत्यादींच्या नियंत्रणासाठी वापरल्या जाणाऱ्या जलविद्युत प्रकल्पांसह सिंचनाचे संयोजन करणे.

**प्रश्न - सिंचनाच्या विविध आधुनिक पद्धती कोणत्या आहेत?**

**ब) सिंचनाच्या पारंपरिक पद्धती:**

पूर्वीच्या काळी खालील सिंचन पद्धती वापरल्या जात होत्या आणि आजही ग्रामीण भागातील काही छोटे शेतकरी त्यांचा वापर करतात. या पद्धती आधुनिक पद्धतींइतक्या कार्यक्षम नसून आधुनिक पद्धतींपेक्षा स्वस्त आहेत. यापैकी काही पद्धती आहेत,

**१) खंदक किंवा पुली प्रणाली:**





**in.pinterest.com**

जमिनीला पाणी देण्यासाठी जनावरांच्या (बैलांच्या) साहाय्याने विहिरीतून किंवा अशा स्त्रोतातून पाणी काढणे यात समाविष्ट आहे. ही एक वेळ घेणारी आणि श्रम-केंद्रित प्रक्रिया आहे, ती खूप किफायतशीर आहे आणि पाण्याचा अपव्यय टाळते.

**२) साखळी पंप:**

साखळी पंपामध्ये साखळीने जोडलेली दोन मोठी चाके असतात ज्यात एक चाक जमिनीवर असते तर दुसरे पाण्याच्या स्त्रोतामध्ये असते.





**चेन पंप – YouTube youtube.com**

बादल्या साखळीला जोडलेल्या असतात आणि चाक वळताच बादली पाणी उचलते. साखळी नंतर पाणी भरलेली बादली वरच्या चाकावर उचलते जिथे पाणी सिंचनासाठी वापरल्या जाणाऱ्या स्त्रोतामध्ये जमा होते आणि रिकामी बादली पुन्हा भरण्यासाठी पाण्याच्या स्त्रोताकडे परत जाते.

**३) ढेकळी :**

ही विहिरीतून किंवा तत्सम स्त्रोतातून पाणी काढण्याची प्रक्रिया आहे ज्यामध्ये लाकडी तुळईचा लांब हात विहिरीच्या दिशेने असताना काटेरी आधारावर लाकडी तुळई ठेवली जाते आणि लहान हात त्यापासून दूर असतो.




<u>**सिंचनाच्या विविध पद्धती sciencemilkyway.blogspot.com**</u>

तोल रोखण्यासाठी वजन लहान हाताला बांधले जाते आणि बादली लांब हाताला दोरीने जोडली जाते आणि विहिरीत खाली खेचली जाते. बादली भरताच दोर सोडला जातो आणि दगडाच्या वजनाने बादली वर ढकलली जाते.

**४) रहाट:**

रहाटमध्ये पशु श्रम वापरले जातात. त्यात विहिरीच्या वर बांधलेले एक मोठे चाक आणि अनेक धातूची भांडी असलेला एक लांब पट्टा आहे.




<u>**pinterest.com**</u>

बैलाने ओढलेल्या लीव्हरच्या मदतीने चाक फिरवले जाते. जेव्हा चाक फिरते तेव्हा खालच्या टोकाचा पट्टा विहिरीतील पाण्यात बुडवतो, तेव्हा धातूची भांडी पाण्याने भरतात, ती वर काढली जातात आणि पाणी रिकामे केले जाते आणि प्रक्रिया पुन्हा केली जाते.

**प्रश्न - सिंचनाच्या पारंपरिक पद्धतींवर टीप लिहा.**

## २.८ पाणी व्यवस्थापन

सिंचन पाणी व्यवस्थापन ही नियोजित, कार्यक्षम पद्धतीने सिंचन पाण्याची वारंवारता आणि वापर दर मात्रा निर्धारित आणि नियंत्रित करण्याची प्रक्रिया आहे,

सिंचन नळ्या, पंपांच्या विविध प्रणालींद्वारे जमिनीत पाण्याचा कृत्रिम पुरवठा आणि फवारण्या आणि याचा वापर सामान्यतः अशा भागात केला जातो जेथे पाऊस विसंगत किंवा कोरड्या स्थितीत असतो किंवा दुष्काळ अपेक्षित आहे.




**<u>सिंचन पाणी व्यवस्थापनाची मूलभूत माहिती ... agrilearner.com</u>**

सिंचन पाणी व्यवस्थापन हे सिंचनाच्या पाण्याच्या वापराचे वेळापत्रक आणि नियमन करण्याची क्रिया आहे ज्यामुळे पाणी, माती, वनस्पतींचे पोषक किंवा उर्जेचा अपव्यय न करता पिकाची पाण्याची गरज भागेल. याचा अर्थ पिकांच्या गरजेनुसार पाणी पिकांना उपलब्ध असलेल्या जमिनीत धरून ठेवता येईल अशा प्रमाणात आणि जमिनीच्या सेवन वैशिष्ट्यांशी आणि जागेच्या धूप धोक्याशी सुसंगत दराने वापरणे.

सिंचन प्रणालीच्या यशामध्ये व्यवस्थापन हा प्रमुख घटक आहे. सिंचनासाठी मोठ्या प्रमाणात पाणी आणि अनेकदा मोठ्या मजुरांची आवश्यकता असते. पाण्याचा काटकसरीने वापर केला तरच सिंचन उपकरणातील गुंतवणुकीतून सिंचनकर्त्याला नफा मिळू शकतो.

योग्य सिंचन पाणी व्यवस्थापनाचे निव्वळ परिणाम सामान्यत:

- सिंचनासाठी पाण्याचा अतिवापर टाळा
- सिंचन प्रेरित धूप रोखा
- श्रम कमी करा
- पंपिंग खर्च कमी करा

• भूगर्भातील पाणी आणि खालच्या पृष्ठभागावरील पाण्याची गुणवत्ता राखणे किंवा सुधारणे

• पीक बायोमास उत्पादन आणि उत्पादन गुणवत्ता वाढवा

सिंचनाच्या पाण्याचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी सिंचनाला मदत करणारी साधने, मदत, पद्धती आणि कार्यक्रमांमध्ये पुढील बाबींचा समावेश आहे:

• संभाव्य पाणी वापर ओळखण्यासाठी पाण्याचे अंदाजपत्रक करणे किंवा शिल्लक साठा वापरणे.

• पाणी सोडण्यासाठी, पुरवठा दर, उपलब्ध पाण्याची क्षमता आणि पाण्याच्या टेबलची खोली परवानगीयोग्य सिंचनासाठी मातीच्या वैशिष्ट्यांसह लागू करणे.

• उत्पन्न आणि गुणवत्ता, मुळांची खोली आणि परवानगीयोग्य वनस्पती ओलावा तणाव पातळी.

• पाणी वितरण वेळापत्रक प्रभाव

• शेतातील पाणी व्यवस्थापनासाठी पाण्याचा प्रवाह मापन

• सिंचन वेळापत्रक तंत्र

• सिंचन प्रणाली मूल्यमापन तंत्र

**सिंचन जल व्यवस्थापन (IWM) संकल्पना:**

सर्वात सोपा आणि मूलभूत सिंचन पाणी व्यवस्थापन साधन हे समीकरण आहे:

QT = DA

कुठे: Q = प्रवाह दर [फूट 3/से (क्यूबिक फूट प्रति सेकंद)]

T = वेळ (ता.)

डी = खोली (मध्ये)

A = क्षेत्र (एकर)

उदाहरणार्थ, १ तासासाठी १cfs (क्यूबिक फूट प्रति सेकंद) प्रवाह दर = १ एकरपेक्षा १ इंच खोली. एकंदरीत सिंचन कार्यक्षमतेने बदललेले हे साधे समीकरण, वनस्पतींच्या दैनंदिन पाणीपुरवठ्याच्या गरजा, स्त्रोतापासून सिंचन करता येणाऱ्या एकरांची संख्या किंवा सिंचन विहिरी किंवा वळवलेल्या पाण्याची खोली वापरण्यासाठी लागणारा वेळ मोजण्यासाठी वापरला जाऊ शकतो. सामान्यत: ८० टक्क्यांहून अधिक IWM या समीकरणाच्या वापराद्वारे किमान अंशतः स्पष्ट केल्या जाऊ शकतात.

**सिंचन केव्हा करावे:**

हे पीक पाणी वापर दरावर अवलंबून आहे, (कधीकधी सिंचन वारंवारता म्हणून संदर्भित). पिकाच्या वाढीच्या विशिष्ट अवस्थेसाठी ईटीसी (पीक बाष्पीभवन) दराची गणना, वनस्पती ओलावा तणाव पातळीचे निरीक्षण, मातीतील पाणी कमी होणे आणि पावसाच्या घटनांचे निरीक्षण करून हे निश्चित केले जाऊ शकते. उपयोजित सिंचनाचे पाणी नेहमी पर्जन्यमानास पूरक मानले पाहिजे. सिंचन निर्णय घेणाऱ्याने संभाव्य पर्जन्यमान साठवण्यासाठी माती प्रोफाइलमध्ये उपलब्ध पाण्याच्या क्षमतेच्या ०.५ ते १.० इंच दरम्यान सोडले पाहिजे. विशिष्ट पीक वाढीच्या कालावधीत पावसाची संभाव्यता आणि घ्यायची जोखीम पातळीचा सिंचन निर्णय घेणाऱ्याने काळजीपूर्वक विचार केला पाहिजे.

**प्रश्न - सिंचन पाणी व्यवस्थापन थोडक्यात उत्तर द्या**.

## २.९ सारांश

भारतातील आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत कृषी क्षेत्राची महत्त्वाची भूमिका आहे. राष्ट्राला अन्न पुरवण्याबरोबरच शेती श्रम मुक्त करते, बचत करते, औद्योगिक वस्तूंच्या बाजारपेठेत योगदान देते आणि परकीय चलन देखील मिळवते. कृषी विकास हा सर्वांगीण आर्थिक विकासाचा अविभाज्य भाग आहे. १९६० च्या दशकाच्या मध्यात, भारत सरकारने आधुनिक कृषी तंत्रज्ञान (बियाणे-खत-पाणी तंत्रज्ञान) हरित क्रांती म्हणून ओळखले जाणारे नवीन कृषी धोरण स्वीकारले. योजना कालावधीत भारतीय शेतीमध्ये ही सर्वात महत्त्वाची तांत्रिक प्रगती आहे. कृषी क्षेत्रातील प्रगतीचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे आयात केलेल्या अन्नधान्यावरील अवलंबित्व नष्ट करण्यात यश मिळणे.

सन २००० मध्ये भारत सरकारने मंजूर केलेल्या राष्ट्रीय कृषी धोरणाचे उद्दिष्ट, नैसर्गिक संसाधनांचा कार्यक्षम वापर आणि इतर उपायांच्या संयोजनाद्वारे कृषी क्षेत्रामध्ये शाश्वत आधारावर ४ टक्क्यांहून अधिक वार्षिक वाढ साध्य करणे. शेतकऱ्यांसाठीचे राष्ट्रीय धोरण विविध राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील स्थानिक गरजांनुसार स्वीकारले जाईल आणि कार्यान्वित केले जाईल. कृषी हवामान आणि इतर स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी कार्यात्मक योजना तयार करून राष्ट्रीय उद्दिष्टे स्थानिक कृती बिंदूंमध्ये रूपांतरित करण्यासाठी राज्य सरकारांना मदत केली जाईल.

वाढत्या लोकसंख्येच्या अन्नाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी कृषी उत्पादनात वाढ करण्यासाठी सिंचन हे महत्त्वाचे साधन आहे. कृषी उत्पादनाला चालना देणे आणि स्थापित करणे हे प्रमुख घटकांपैकी एक आहे. पारंपारिक शेतीचे आधुनिक शेतीत रूपांतर करण्यासाठी वेळेवर आणि पुरेशा प्रमाणात पाण्याची उपलब्धता ही अत्यावश्यक अट आहे.

सिंचनाला महत्त्वाची भूमिका दिली जाते कारण हा एकमेव सर्वात महत्वाचा घटक आहे जो दुर्मिळ शेतजमीन संसाधनांचा पूर्ण वापर सुलभ करतो आणि शेती स्तरावर सुधारित तंत्रज्ञान स्वीकारण्यास सुलभ करतो.

## २.१० स्व-अभ्यास:

प्रश्न -०१ सिंचनाचे महत्त्व सांगा.

प्रश्न - ०२ सिंचनाचे वेगवेगळे स्त्रोत कोणते आहेत?

प्रश्न - ०३ सिंचनाच्या विविध आधुनिक पद्धती कोणत्या आहेत?

प्रश्न -०४ थोडक्यात सिंचन पाणी व्यवस्थापन स्पष्ट करा.

प्रश्न - ०५ टीपा लिहा:

अ) सिंचन जल व्यवस्थापन (IWM) संकल्पना ब) सिंचनाच्या पारंपारिक पद्धती.

क) फरो सिंचन ड) उपसिंचन. इ) स्थानिक सिंचन फ) तुषार सिंचन

## २.११ **संदर्भ सूची:**


1) *Dr. Sinha H. K. challenges in Rural Development,1998 Discovery Publication House New Delhi- 110002.*
2) *Dr. Dubey M. K. Rural and Urban Development in India, 2000, common wealth*
   *Publisher DoryaGonj New Delhi-110002.*
3) *Dr. Desai A. R. Rural Society in India 1978 Popular Publication House.*

http://mospi.nic.in/sites/default/files/Statistical_year_book_india_chapters/ch12.pdf
https://kids.britannica.com/students/article/irrigation/275094
https://www.cdc.gov/healthywater/other/agricultural/types.html
https://en.wikipedia.org/wiki/Irrigation
https://civiltoday.com/water-resource-engineering/irrigation/63-importance-of-irrigation-
https://www.smsfoundation.org/water-management/
https://www.nrcs.usda.gov/Internet/FSE_DOCUMENTS/nrcs141p2_017781.pdf
\https://thefactfactor.com/facts/pure_science/biology/irrigation/2277/
https://www.teachoo.com/9803/2972/Step-4---Irrigation/category/Concepts/


❖❖❖❖

# ३

# कृषी विकास - III

**पाठाची रूपरेषा**

३.० पाठाचे उद्देश

३.१ प्रास्ताविक

३.२ कृषी विद्यापीठे व स्थापना

३.३ कृषी विद्यापीठाची रचना

३.४ कृषी विद्यापीठ स्थापन करण्याचे आदेश

३.५ कृषी विद्यापीठाची इतर उदिष्टे

३.६ कृषी विद्यापीठाची कार्य

३.७ कृषी विज्ञान केंद्र

३.८ कृषी विज्ञान केंद्राचे उदेश

३.९ कृषी विज्ञान केंद्रामार्फत स्वयंरोजगार/ व्यवसाय प्रशिक्षण

३.१० कृषी विज्ञान केंद्राचे संचलन आणि व्यवस्थापन

३.११ प्रशिक्षणार्थ्यांना सुविधा व प्रशिक्षण

३.१२ सारांश

३.१३ स्वाध्याय

## ३.० पाठाचे उद्देश

- कृषी विद्यार्थ्यांची स्थापना आणि रचना जाणून घेणे.
- कृषी विद्यापीठाचे उद्देश कोणते आहेत ते समजाणून घेणे.
- कृषी विद्यापीठ आणि कृषी विज्ञान केंद्राचे महत्त्व समजावून घेणे.
- कृषी विद्यापीठ आणि कृषी विज्ञान केंद्र कार्य अभ्यासणे.
- कृषी विज्ञान केंद्रामार्फत राबवले जाणाऱ्या उपक्रमाची माहिती मिळवणे.

- कृषी विज्ञान केंद्राचे संचलन आणि व्यवस्थापनाची माहिती मिळवणे.
- कृषी विद्यापीठ आणि कृषी विज्ञान केंद्रात प्रशिक्षणार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या सुविधांचा अभ्यास करणे.

## ३.१.प्रास्ताविक

फार पूर्वीपासून शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. आजही देशात शेती व शेतीसंबंधित क्षेत्रावर अवलंबून असणाऱ्या लोकांची संख्या ६५% पेक्षा अधिक आहे. शेती क्षेत्रातील शास्त्र आणि कला यांचे अध्यापन भारतात वैदिक काळापासून होत असल्याचे संदर्भ सापडतील. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर कृषि क्षेत्राला गती देण्यात, **भारतीय कृषी अनुसंधान परिषदेचा (Indian Council for Agriculture Research (ICAR)** मोठा वाटा आहे. भारतीय कृषी अनुसंधान परिषद पूर्वी इम्पीरियल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्च म्हणून ओळखली जात असे, रॉयल कमिशन ऑन ॲग्रिकल्चरच्या अहवालानुसार, सोसायटी नोंदणी कायदा, 1860 अंतर्गत नोंदणीकृत सोसायटी म्हणून 16 जुलै 1929 रोजी परिषदेची स्थापना वास्तविक अर्थाने करण्यात आली आहे. ICAR चे मुख्यालय, नवी दिल्ली येथे आहे.

भारतीय कृषी अनुसंधान परिषद संपूर्ण देशात फलोत्पादन, मत्स्यपालन आणि प्राणी विज्ञानासह कृषी क्षेत्रातील संशोधन आणि शिक्षणाचे समन्वय, मार्गदर्शन आणि व्यवस्थापन करणारी प्रमुख संशोधन संस्था आहे. परिषद भारतीय शेतीच्या उत्पादकता वाढीसाठी आणि विविधीकरणासाठी, कृषी संशोधन, शिक्षण-प्रशिक्षण आणि विस्तार उपक्रमांचे नेतृत्व करत आहे.

आज संपूर्ण जगामध्ये अनेक परिवर्तनात्मक बदल होत आहेत. वाढती लोकसंख्या, बदलती जीवनशैली, विस्तारते शहरीकरण आणि वेगाने होणारे हवामान बदल यामुळे राष्ट्रीय कृषी संशोधन प्रणालीसमोर नवीन आव्हाने निर्माण होत आहेत. सुदैवाने पूर्वी पुरेसे अन्न पुरवण्याचे आव्हान होते, परंतु आता आरोग्याला चालना देण्यासाठी पुरेसे पोषक तत्वे पुरवण्याचे आव्हान आहे. भविष्यात व्यक्तीच्या अनुवांशिक प्रोफाइलवर आधारित आव्हानांसह इष्टतम पोषक तत्त्वे प्रदान करणे हे आव्हान असेल. विज्ञानातील घडामोडी आव्हानांना तोंड देण्यासाठी नवीन मार्ग तयार करत आहेत. भारतीय कृषी संशोधन परिषद **(ICAR)** आणि राष्ट्रीय कृषी संशोधन आणि शिक्षण प्रणाली मोठ्या प्रमाणावर, समाजाच्या कल्याणासाठी विज्ञान तंत्रज्ञानचा उपयोग करण्यासाठी कटिबद्ध आहेत. शेतकरी, उद्योग, उद्योजक आणि ग्राहक यांच्याशी पूर्णपणे गुंतलेल्या संघटनेत स्वतःचे रूपांतर करण्यासाठी परिषद वचनबद्ध आहे.

भारतीय कृषी विकाससाठी चार राष्ट्रीय संस्था व परिषदेशी संबंधित एकूण ५४ संस्था आहेत. ज्यातून कृषी आणि आनुषंगिक विषयांमध्ये पदवीपूर्व व पदव्युत्तर शिक्षण दिले जाते. त्यापैकी चार कृषी विद्यापीठे महाराष्ट्रात आहेत. कृषी विकाससाठी राष्ट्रीय स्तरावर चार मोठ्या संस्था खालीलप्रमाणे-

१) भारतीय कृषी संशोधन परिषद, नवी दिल्ली.

२) भारतीय दुग्ध संशोधन संस्था कर्नल - हरियाणा

३) भारतीय पशुवैद्यकीय संशोधन, संस्था इज्जतनगर, उत्तरप्रदेश

४) केन्द्रीय मत्स्य शिक्षण संस्था वर्सोवा. मुंबई -५

या शिवाय तीन पारंपरिक विद्यापीठांमध्ये कृषी विद्याशाखा आहेत.

१) बनारस हिन्दू विद्यापीठ, बनारस.

२) विश्व भारतीय विद्यापीठ.

३) उत्तर पूर्व डोंगरी विद्यापीठ.

महाराष्ट्र हे भारतातील इतर राज्यांप्रमाणेच कृषीप्रधान अर्थव्यवस्था असलेले राज्य आहे. साहजिकच- महाराष्ट्रातील आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाचा कृषी विकासाशी निकटचा संबंध आहे. कृषी क्षेत्रात प्रगती केल्याशिवाय राज्याची प्रगती किंवा विकास होऊ शकत नाही हे ओळखून महाराष्ट्रात १९६७ साली गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर कृषी विद्यापीठाची प्रथम स्थापना करण्यात आली. त्यानंतर राज्याची भौगोलिक परिस्थिती, हवामान व शेती व्यवसायातील विविधता विचारात घेऊन मराठवाड्याच्या चार विभागांसाठी स्वतंत्र कृषी विद्यापीठांची स्थापना करण्यात आली, ज्या विद्यापीठामध्ये पदवीपूर्व शिक्षण घेण्याची सुविधा उपलब्ध आहे. ही कृषी विद्यापीठे अशी आहेत. महात्मा फुले कृषी विद्यापीत राहुरी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली आणि मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी, या विद्यापीठांमध्ये कृषी उद्यानविद्या, वनविज्ञान, मत्स्यविज्ञान, अन्नतंत्रज्ञान, वनस्पती जैवतंत्रज्ञान, कृषी अभियांत्रिकी, गृहविज्ञान आणि कृषी व्यवसाय व्यवस्थापन या विषयांमध्ये पदवीपूर्व शिक्षण घेण्याची सोय आहे. महाराष्ट्रातील चारही कृषी विद्यापीठांमध्ये पदवीपूर्व शिक्षण घ्यावयाचे झाल्यास गुणवत्तेनुसार थेट प्रवेश दिला जातो. यासाठीची प्रवेश प्रक्रिया महाराष्ट्र ज्ञान मंडळाच्या सहयोगाने महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्यामार्फत राबविली जाते. विज्ञान शाखेतील बारावी परीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी ह्या प्रवेश प्रक्रियेदारा विविध पदवीपूर्व अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ शकतात. यासाठी प्रवेश प्रक्रिया महाराष्ट्र ज्ञान मंडळाच्या सहयोगाने महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्या मार्फत राबविली जाते. विज्ञानशाखेतील बारावी परीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी ह्या प्रवेश प्रक्रियेद्वारा विविध पदवीपूर्व अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ शकतात.

## ३.२ महाराष्ट्तील कृषी विद्यापीठे व स्थापना

| कृषी विद्यापीठ | ठिकाण | कार्यक्षेत्र | स्थापना वर्ष | स्थापना आधार |
|---|---|---|---|---|
| 1) महात्मा फुले कृषी विद्यापीठ | राहुरी, जि. नगर | . (पश्चिम महाराष्ट्र) पुणे, सातारा, सांगली, धर्तीवर कोल्हापूर, धुळे. नंदुरबार, | १९६९ | ९ लॅन्ड ग्रेन्ट कॉलेज, धर्तीवर |
| 2) डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, | अकोला जि अकोला | अकोला ववतमाळ, बुलढाणा, वर्धा, नागपूर, चंद्रपूर, भंडारा,गडचिरोली,वाशिम, गोंदिया | १९६९ | ९ लॅन्ड ग्रेन्ट कॉलेज, धर्तीवर |
| ३) डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, | दापोली, जि रत्नागिरी | रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, मुंबई, मुंबई उपनगर जिल्ह्या करिता (कोकण विभागाकरिता) | १९७२ | ९ लॅन्ड ग्रेन्ट कॉलेज, धर्तीवर |
| ४)मराठवाडा कृषी विद्यापीठ, | परभणी, जि. औरंगाबाद | लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली नागपूर | १९७२ | ९ लॅन्ड ग्रेन्ट कॉलेज, धर्तीवर |
| ५)पशुवैद्यक मत्स्य विज्ञान विद्यापीठ, महाराष्ट् | नागपूर | संपूर्ण महाराष्ट् | २००० | ९ लॅन्ड ग्रेन्ट कॉलेज, धर्तीवर |




Jobchjob.in

### ३.३ कृषी विद्यापीठाची रचना

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | कृषी विद्यापीठाची रचना | | | |
| | कृषी<br>विद्यापीठ<br>कुलपती<br>उपकुलपती | | कुलगुरू | | राज्य शासन<br>राज्यपाल<br>कृषीमंत्री |
| | | | विद्यापीठ स्तर | | |
| | संचालक<br>संशोधन<br>कार्य | संचालक<br>विस्तार<br>अधिष्ठाता | संचालक शिक्षण | कुलसचिव | नियंत्रण |
| | संशोधन<br>कार्यास गती<br>देण | विस्तार | शिक्षण प्रबळ<br>बनविणे | प्रशासन<br>नोंदणी | अर्थिक<br>नियोजन<br>व अंमलबजावणी |
| | | | सहयोगी अधिष्ठाता | | |
| सहयोगी<br>संशोधन | कृषी | पशुवैद्यकीय | दुग्धविज्ञान | गृहविज्ञान | कृषीअभियांत्रिक |
| | | | विभाग प्रमुख<br>प्राध्यापक<br>सहयोगी प्राध्यापक<br>सहयोगी प्राध्यापक<br>साहाय्यक<br>प्राध्यापक<br>कृषी अधिकारी<br>कृषी पर्यवेक्षक<br>कृषी साहाय्यक<br>माळी, शेतमजूर | | |

## ३.४ कृषी विद्यापीठ स्थापन करण्याचे उद्देश

कृषी आणि कृषी व्यवसायाशी निगडित समस्यांविषयी एकत्रित विचार करून त्या सोडवण्यासाठी स्वतंत्र कृषी विद्यापीठांची स्थापना करण्यात आली.

### मुख्य उद्देश

**मुख्य उद्देश**

| कृषी संशोधन | कृषी शिक्षण | कृषी विस्तार |
|---|---|---|
| १) पीक संशोधन | १) कृषी पदवी, पदव्युत्तर | १) विस्तार गट |
| २) फळ संशोधन | २) पशुसंवर्धन, पशुवैद्यकीय पदव्युत्तर | २) विस्तार शिक्षण योजना |
| ३) भाजीपाला संशोधन | | ३) राष्ट्रीय प्रात्यक्षिक योजना |
| ४) पशुखाद्य संशोधन | ३)दुग्धव्यवसाय पदव्युत्तर | ४) प्रयोग शाळेतून शेतीकडे |
| ५) दुग्धव्यवसाय संशोधन | ४)मत्स्यविभाग पदव्युत्तर | ५) प्रशिक्षण संस्था |
| ६)गृहआहाराविषयी संशोधन | ५) गृहशास्त्र पदव्युत्तर | ६) प्रशिक्षण व भेट योजना |
| ७) मत्स शेती संशोधन | ६) कृषी अभियांत्रिकी | ७) एक खिडकी योजना |
| | **पदव्युत्तर** | ८) कृषी विज्ञान केंद्र |
| | ७) निम्नस्तरीय शिक्षण | ९) प्रसारण केंद्र |
| | | १०)आकाशवाणी, दूरदर्शन |
| | | ११) शेतकरी मेळावे |
| | **कृषी महाविद्यालय** | १२) शेती दिन |
| **संशोधन केंद्र** | ● ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र | १३) गाठीभेटी |
| | ● कृषी पदविका | १४) सभा, समूह चर्चा |
| | ● माळी प्रशिक्षण | १५) विस्तार सेवा केंद्र |
| | ● पशुधन पर्यवेक्षक | १६) प्रात्यक्षिक |
| | ● दुग्ध व पशुशास्त्र | |
| | ● कुक्कुटपालन | |
| | **शेतकरी** | |

## ३.५ कृषी विद्यापीठाची इतर उदिष्टे

१) शेती व शेतीला पूरक विषयांची माहिती देणे.

२) शेती तत्सम विषयांचे ज्ञान आणि संशोधन यांचा विकास करणे.

३) शेतीच्या विविध शास्त्रातील शिक्षणाचा विकास करणे आणि त्यामध्ये समन्वय साधणे.

४) कृषीविस्तार करणे आणि चाललेल्या कामात मार्गदर्शन करणे,

## ३.६ कृषी विद्यापीठांची कार्य

भारताच्या शेती विकासात कृषी विद्यापीठांचे मोठे योगादान आहे. कृषी विद्यापीठांची कृषी शिक्षण, संशोधन आणि विस्तार शिक्षण ही अत्यंत महत्त्वाची कार्ये समजली जातात. आपल्या देशातील कृषी विद्यापीठे कृषी आणि तदनुषंगिक विषयांमध्ये शिक्षण देणे, शेतकऱ्यांच्या गरजांवर आधारित संशोधन करून सुधारित तंत्रज्ञान विकसित करणे आणि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात विस्तार, शिक्षण उपक्रमाचे आयोजन करणे अशा प्रकारची कार्य करीत असतात.

**शिक्षण:** देशातील सर्व कृषी विद्यापीठांमधून कृषी आणि अनुषंगिक विषयामध्ये पदवीपूर्व व पदव्युत्तर शिक्षण दिले जाते. आज या व्यवस्थेतून दरवर्षी १५०० पदवीधर, ११००० पदव्युत्तर आणि १००० आचार्य पदवीधारक विद्यार्थी निर्माण होतात.

**पदवीपूर्व अभ्यासक्रमः**

देशातील सर्व कृषी विद्यापीठांमधून मुख्यत्वे पुढील विषयांमधील पदवीपर्यंतचे शिक्षण दिले

१) कृषी

२) उद्यानविद्या

३) वनस्पती शास्त्र

४) मत्स्यविद्यान

५) गृह-विज्ञान

६) रेशीम संगोपन

७) कृषी अभियांत्रिकी

८) दुग्धतंत्रज्ञान

९) अन्नशास्त्र तंत्रज्ञान

१०) कृषी विपणन

११) सहकार

१२) जैवतंत्रज्ञान

**पदव्युत्तर अभ्यासक्रमः**

राष्ट्रीय पातळीवर एकूण २० मुख्य विषयांमध्ये पदव्युत्तर शिक्षण घेण्याची सोय उपलब्ध आहे. त्यामध्ये पुढील विषयाचा समावेश आहे.

१. वनस्पती जैवतंत्रज्ञान

२. वनस्पती शास्त्र

४. कीटकशास्त्र आणि कृमी-शास्त्र

५. कृषीविद्या

६. सामाजिक शास्त्र

७. संख्याशास्त्र

८. उद्यान विद्या

९. वनशास्त्र / कृषीवनिकी शास्त्र

१०. कृषी अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान

११. जलशास्त्र आणि संत्रशास्त्र

१२. गृहविज्ञान

१३. जैवतंत्रज्ञान

१४. पशुवैद्यकशास्त्र

१५. प्राणी शास्त्र

१६. मत्स्य शास्त्र

१४. दुग्धशाख

१८. दुग्धतंत्रज्ञान

१९. अजशास्त्र तंत्रज्ञान

२०. कृषी व्यवसाय व्यवस्थापन

**संशोधनः**

देशातील प्रत्येक कृषी विद्यापीठ आपल्या कार्यक्षेत्रातील भौगोलिक परिस्थिती व शेतकऱ्याच्या गरजा यांचा अभ्यास करून विविध संशोधन प्रकल्प राबवीत असते. त्याचप्रमाणे राष्ट्रीय स्तरावरील देशाचे शेतीबाबतचे धोरणाही विचारात घेतले जाते. शेतकऱ्यांच्या गरजांवर आधारित संशोधन करून शेतकऱ्यांना सुधारित तंत्रज्ञानाच्या शिफारसी केल्या जातात. यामध्ये प्रामुख्याने जमिनीचे आरोग्य व व्यवस्थापन, विविध पिकांचे सुधारित व संकरित वाग, विविध पिकांच्या लागवड पद्धती काढणी पश्चात तंत्रज्ञान, विपणन व साठवणूक तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान सुधारित कृषी अवजारे / यंत्र, पशु-पक्ष्यांच्या

विविध जाती, पशु व्यवस्थापन पद्धती, मत्स्यसंवर्धन, तंत्रज्ञान यासारख्या तंत्रज्ञानाचा समावेश होतो.

**विस्तार शिक्षणः**

कृषी विद्यापीठामध्ये विकसित केलेले तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी विद्यापीठामार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये विविध विस्तार, शिक्षण उपक्रमांचे आयोजन केले जाते. यामध्ये प्रशिक्षण, शेतकरी सहली, प्रात्यक्षिके, शेतकरी मेळावे, गटचर्चा, शेतकऱ्यांच्या शेतांना भेटी, समूह माध्यमांचा वापर यासारख्या उपक्रमांचा समावेश असतो. भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्लीतर्फे सर्व कृषी विद्यापीठांमध्ये कृषीतंत्रज्ञान माहिती केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे. ज्यामध्ये शेतकऱ्यांना एकाच ठिकाणी कृषी तंत्रज्ञानाबद्दलची माहिती मिळू शकते व विद्यापीठ निर्मित कृषी निविष्ठा उत्पादनही मिळू शकतात. अशा त-हेने कृषी विद्यापीठे शेतीक्षेत्रात फार महत्त्वाची भूमिका बजावीत असून कृषी आधारित भारतीय अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी ठोस पावले उचलीत आहेत.

## ३.७ कृषी विज्ञान केंद्र

'कृषी विज्ञान केंद्र' ही शेती शिक्षणातील एक नवीन संकल्पना आहे. जागतिक कीर्तीचे शेती शास्त्रज्ञ डॉ. एम.एस. स्वामीनाथन ह्यांची ही मूळ कल्पना असून ती मूर्त स्वरूपात आणण्यामागे भारतीय कृषी अनुसंधान परिषदेचे उपमहासंचालक डॉ. सी. प्रसाद ह्यांचे परिश्रम कारणीभूत आहेत, शेती व्यवसाय हा विज्ञानावर आधारित आहे. प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांतून विज्ञानाचा प्रशिक्षणाद्वारे प्रसार होऊन शेती उत्पादन वाढाये किंवा शेती व्यवसाय स्वयंरोजगार निर्माण व्हावा हा कृयी विज्ञान केंद्रांमागील मूळ हेतू आहे.

mpsctestseries.in

आपल्या भारतामध्ये अन्नसुरक्षिततेच्या बाबतीत १९६५ साली हरितक्रांतीसारखी चांगली सुधारणा घडवून आणली. त्यांचा सर्वांना आनंद आहे. हे शक्य होण्याचे कारण कृषी संशोधन कृषी शिक्षण आणि कृषी विस्तार याचा चांगला समन्वय साधू शकलो. जरी हे झाले असले तरी ८० टक्के कोरडवाहूशेती आणि सामान्य शेतकरी ह्यापासून वंचित राहिले. कारण कृषी क्षेत्रात मौल्यवान असे संशोधन झाले आहे त्यापैकी बरेचसे संशोधन अद्याप गरजू शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेच नाही. त्यासाठी अशा शेतकऱ्याजवळ उपलब्ध असलेल्या साधनसामुग्रीचा विचार करून त्यांच्या गरजेवर आधारित असलेल्या प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे शेतीविषयक प्रशिक्षण दिल्यावर उत्पादनात वाढ होते. हे लक्षात घेऊन भारतीय कृषी

अनुसंधान परिषदेने कृषी विज्ञान केंद्र, हे कृषी संशोधन आणि विस्तार कार्य करणाऱ्या संस्था यामध्ये समन्वय साधण्याचे कार्य करते या सर्वांचा विचार करून डॉ. मोहनसिंग मेहता समितीमार्फत कृषी विज्ञान केंद्र स्थापन करण्याची शिफारस केली. आणि प्रायोगिक तत्त्वावर पाँडेचरी येते पहिल्या कृषीविज्ञान केंद्राची स्थापना १९७४ रोजी केली आणि भारती कृषी अनुसंधान परिषदेने गोखले एज्युकेशन सोसायटीचे कृषी विज्ञान केंद्र, कोसबाड , देशातील दुसरे राज्यातील पहिले केंद्र म्हणून १ एप्रिल १९७७ साली कोसबाड हिल, ता. डहाणू येथे सुरू केले. भारतात सध्या प्रत्येक जिल्ह्यासाठी एक कृषी विज्ञान केंद्र सुरू करण्याचा भारत सरकारचा मानस असून पाचव्या पंचवार्षिक

योजनेपर्यत १८ यी विज्ञान केंद्राच्या स्थापनेला मंजुरी देण्यात आली. तसेच १९८४ मध्ये उच्चस्तरिय मूल्यमापन समितीतर्फे देशामध्ये आणखी कृषी विज्ञान केंद्र स्थापण्याची शिफारस करण्यात आली.

सध्या देशामध्ये ५७१ कृषी विज्ञान केंद्र अस्तित्वात आहेत.

## ३.८ कृषी विज्ञान केंद्राचे उदेश

सुरूवातीस कृषी विज्ञान केंद्र स्थापनेमागे उद्देश हा होता की, शेतकी शाळा अथवा कृषी महाविद्यालयामधील अभ्यासक्रम हा चाकोरीबद्ध असतो. प्रवेशाकरिता उमेदवारांची शैक्षणिक अर्हता व यय विचारात घेतले जाते. शेती करणारे बहुतांशी शेतकरी अशिक्षित आणि वयस्कर असतात, उत्पादन वाढीसाठी त्यांना तांत्रिक ज्ञानाची गरज भासते. हे शेतकरी शेतकी शाळेत किंवा कृषी महाविद्यालयात जाऊ शकणार नाहीत, अशा शेतकऱ्यांना त्यांना गरजेनुसार प्रशिक्षण देऊन त्यांचे उत्पादन वाढावे किंवा स्वयंरोजगार निर्मितीचे कार्य कृषी विज्ञान केंद्र करीत असे. केंद्रातील कार्य कौशल्यावर आधारित असल्यामुळे बौद्धिकांवर भर न देता प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांवर भर दिला जात असे. आता त्यानुसार पुढील उद्देश ठरविण्यात आले आहेत.

१) परिस्थितीनुरूप कृषी तंत्रज्ञान शोधण्याकरिता प्रक्षेत्र चाचण्यांचे आयोजन करणे.

२) विविध पिकांची आणि उद्योगांची शेतकयाच्या शेतावर उत्पादन क्षमता तपासण्यासाठी प्रात्यक्षिकांचे आयोजन करणे,

३) शेतातील आधुनिक तंत्रज्ञान आणि कौशल्य यांची अद्ययावत माहिती होण्यासाठी शेतकरी प्रशिक्षणाचे आयोजन करणे.

४) आधुनिक तंत्रज्ञान विस्तार होण्यासाठी अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणे,

५) जिल्ह्यांची कृषी आर्थिक व्यवस्था सुधारण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचे केंद्र उभारणे.

६) कृषी विस्तार उपक्रमांचे आयोजन करणे,

७) बियाणे, रोपे, कलमे यांचे उत्पादन करणे, अशी विविध उरिष्टे ठरविण्यात आली. तसेच शेती व शेतीपूरक व्यवसायातील उत्पादनात वाढ करणे, ग्रामीण भागात स्वयंरोजगार निर्मिती करणे आणि ग्रामीण समाजाचा आर्थिक आणि सामाजिक दर्जा उंचावणे अशी

उद्दीष्टे आहे. कृषी विज्ञान केंद्राच्या कार्यामध्ये स्थापनेपासून आतापर्यंत असंख्य बदल झाले आहेत. या सगळ्याचा विचार करून कृषी विज्ञान केंद्राची संकल्पना मांडायची झाल्यास कृषी विज्ञान केंद्र हे जिल्हा पातळीवर विस्ताराचे काम करणारी अतिशय महत्त्वाची यंत्रणा आहे. विशेष म्हणजे समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणारी अशी कृषी विज्ञान केंद्र ही संस्था आहे. की जे अद्ययावत कृषी तंत्रज्ञान आहे ते वेगवेगळ्या प्रात्यक्षिकामार्फत वेगवेगळ्या सूक्ष्म शेती पद्धतीमध्ये अमलात आणण्याचे कार्य हे कृषी विज्ञान केंद्र करते.

## ३.९ कृषी विज्ञान केंद्रामार्फत स्वयंरोजगार / व्यवसाय प्रशिक्षण

१) कुक्कुटपालन

२) रोपवाटिका व्यवस्थापन

३) अन्न उत्पादन

४) गांडूळ खत व बीज पैदास निर्मिती

५) औषभी वनस्पती लागवड

६) दुग्ध उत्पादन

७) वराहपालन

८) शेळीपालन

९) फळे आणि भाजीपाला प्रक्रिया

१०) बीजोत्पादन तंत्र

११) आधुनिक शेतीसंबंध प्रशिक्षण

१२) सुधारित पद्धतीने भात लागवड

१३) गळीत धान्य, कडधान्य, पिके लागवड

१४) फळे आणि भाजीपाला लागवड

१५) एकात्मिक कीड, अन्नद्रव्य व्यवस्थापन

१६) पीक संरक्षण

१५) मधुमक्षिका पालन

१८) रेशीम उद्योग



राजतंत्र

**कोसबाडचे कृषि विज्ञान केंद्राचे ॲप कार्यान्वीत**

कृषि विज्ञान केंद्र आता शेतकऱ्यांच्या मार्गदर्शनासाठी एका क्लिकवर उपलब्ध

**kvkpalghar.co.in**

अशा विविध उपक्रमांवर प्रशिक्षण कार्यक्रमावर भर देण्यात येतो. वरील प्रशिक्षणाबरोबरच कृषी विज्ञान केंद्रामध्ये नवीन संकल्पना राबविण्याचे कार्य पुढीलप्रमाणे चालू आहे.

१) स्थानिक पातळीवर उपलब्ध स्रोताचा विशेषतः जमिनीचा वापर करून एखादे कृषी तंत्रज्ञान स्थानिक पातळीवर चाचणीच्या माध्यमातून घेणे,

२) दुसरे महत्त्वाचे कार्य म्हणजे वेगवेगळ्या पिकांवरती प्रथम प्रात्यक्षिके घेऊन उत्पादनासंबंधी माहिती मिळविणे आणि त्या कृषी तंत्रज्ञानाबद्दलचा शेतकऱ्यांचा अभिप्राय मिळविणे.

३) विस्तार कार्य करणारे कर्मचारी/ संस्था यांना वेळोवेळी अद्ययावत कृषी तंत्रज्ञानाबदल प्रशिक्षण देणे,

४) शेतकरी, ग्रामीण युवक यांना लघु आणि दीर्घ मुदतीच्या कृषी तंत्रज्ञानाबद्दल व्यावसायिक प्रशिक्षण देणे ज्या-योगे कृषी तंत्रज्ञान प्रत्यक्ष काम करून अनुभवणे आणि त्यामार्फत शेतीचे उत्पादन वाढवणे व शेतकरी आणि ग्रामीण युवकांना रोजगार मिळवून देणे. थोडक्यात लघू आणि दीर्घ मुदतीचे कृषी आणि कृषी संलग्न बाबतीत रोजगाराभिमुख प्रशिक्षण शेतकऱ्यांना उपलका करून देणे, असे नावीन्य पूर्व उपक्रम सध्या कृषी विज्ञान केंद्राकडून राबविले जात आहेत.

## ३.१० कृषी विज्ञान केंद्राचे संचलन आणि व्यवस्थापन.

कृषी विज्ञान केंद्र ही योजना केंद्रित कृषी खात्याच्या भारतीय कृषी अनुसंधान परिषदेची असून, त्याकरिता शंभर प्रतिशत आर्थिक साहाय्य या परिषदेकडून दिले जाते. व्यवस्थापनाची जबाबदारी राज्य शासन, कृषी विज्ञापीठे अथवा ग्रामीण विकासात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थेकडे सोपविण्यात आलेली असते. केंद्राचे कार्य लोकाभिमुख होऊन ते कृषी उत्पादन वाढीशी निगडित असते, म्हणून कार्याचे नियोजन करण्याकरिता एक स्थानिक व्यवस्थापक समिती' असते व्यवस्थापकीय संस्थेचे प्रमुख या समितीचे पदसिद्ध अध्यक्ष असतात आणि कृषीखाते, पशुसंवर्धन खाते, ग्रामीण विकास खाते, भारतीय कृषी अनुसंधान खाते, ग्रामीण विकास खाते, भारतीय कृषी अनुसंधान

परिषद, कृषी विद्यापीठातील प्रतिनिधी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा कृषी अधिकारी, दोन प्रगतिशील शेतकरी, दोन समाजसेवक आणि सामाजिक कार्य करणाऱ्या महिला इत्यादी या समितीचे सदस्य असतात. समितीच्या सभा वर्षातून दोन अथवा तीन वेळा भरतात, त्यात केंद्राच्या कामाचे मूल्यमापन आणि नियोजन ठरविले जाते.

## ३.११ प्रशिक्षणार्थ्यांना सुविधा व प्रशिक्षण




**Marathikrishijagaran,com**

कृषी विज्ञान केंद्रातील प्राध्यापक खेड्यात जाऊन तेथील उपलब्ध साधनसंपत्ती आणि गरजेवर आधारित सर्वेक्षण करतात. अभ्यासाच्या आधारावर प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करतात आणि लाभार्थ्यांना प्रशिक्षणासाठी उद्युक्त करतात, ज्या पुरुष महिलांना शेतीविषयक प्रशिक्षण हो असेल ते केंद्राशी संपर्क साधतात. शिक्षण, उपयुक्त व परिणामकारक व्हावे म्हणून प्रशिक्षणार्थ्यांना संख्या पंचवीसपर्यंत ठेवली जाते. प्रशिक्षण काळात प्रशिक्षणार्थ्यांची निवासाची आणि भोजनाची व्यवस्था विनामूल्य केली जाते. मात्र प्रवासखर्च प्रशिक्षणार्थ्यांना स्वतः करावा लागतो. शेती , फळबाग, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, गृहविज्ञान, मत्स्यव्यवसाय यासारख्या व्यवसायाचे प्रशिक्षण देण्याची सोय असते. अभ्यासवर्गाचा कालावधी एक दिवसापासून तीन महिन्यांपर्यंत असू शकतो. प्रशिक्षणाचे आयोजन केंद्राच्या प्रक्षेत्रावर केले जाते. काही शेतकऱ्यांच्या आणि विशेषतः महिलांच्या अडचणी लक्षात घेऊन प्रसंगी गावातील प्रगतिशील शेतकऱ्याकडे प्रशिक्षण वर्ग आयोजित केले जातात. अशा प्रकारचे प्रशिक्षण फार प्रभावी आणि उपयुक्त, परिणामकारक असते.

## ३.१२ सारांश

भारतीय कृषी अनुसंधान परिषद संपूर्ण देशात फलोत्पादन, मत्स्यपालन आणि प्राणी विज्ञानासह कृषी क्षेत्रातील संशोधन आणि शिक्षणाचे समन्वय, मार्गदर्शन आणि व्यवस्थापन करणारी प्रमुख संशोधन संस्था आहे. परिषद भारतीय शेतीच्या उत्पादकता वाढीसाठी आणि विविधीकरणासाठी, कृषी संशोधन, शिक्षण-प्रशिक्षण आणि विस्तार उपक्रमांचे नेतृत्व करत आहे.

## ३.१३ स्वाध्याय

१. कृषी विद्यापीठाची स्थापना करण्यामागील उद्देश सांगून कार्य स्पष्ट करा.

२. कृषी विद्यापीठाची रचना सांगून कृषी विद्यापीठाची उद्दिष्टे सष्ट करा.

3. कृषी विज्ञान केंद्राचे उदेश सांगून कृषी विज्ञान केंद्रामार्फत दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणाची सविस्तर चर्चा करा.

४. कृषी विज्ञान केंद्राची भूमिका स्पष्ट करा.

५. कृषी  विद्यापीठाची भूमिका स्पष्ट करा.

**संदर्भ:**


- *Dr. Swaminathan M. S. An action plan for agriculture for 25 years*
- *https://icar.gov.in/content/state-agricultural-universities*
- *https://en.wikipedia.org/wiki/Agricultural_Universities_(India)#cite_note-1*
- *https://icar.org.in/content/about-us*
- *https://icar.org.in › सामग्री › about-us*
- *http://dare.nic.in/major-functions*
- *https://kvk.icar.gov.in/aboutkvk.aspx*
- *https://www.rpcau.ac.in/about-pusa/*


❖❖❖❖

# ४

# ग्रामीण विकासाचे स्रोत - I

**पाठाची रचना**

४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेचे स्वरूप व व्याप्ती

४.३ बचत गट (स्वयंसाहाय्यता गट) संकल्पना, स्वरूप व इतिहास

४.४ बचत गट (स्वयंसाहाय्यता गट) वैशिष्ट्ये

४.५ बचत गट (स्वयंसाहाय्यता गट) प्रकार

४.६ बचत गट (स्वयंसाहाय्यता गट) कार्य

४.७ महाराष्ट्र राज्य ग्रामीण उपजीविकामिशन (MSRLM)

४.८ सारांश.

४.९ स्वाध्याय.

## ४.० उद्दिष्टे

१) बचत गट (स्वयंसाहाय्यता गट)संकल्पना समजून घेणे.

२) बचत गटाची वैशिष्टये अभ्यासणे,

३) बचत गटाची गरज समजून घेणे.

४) बचत गटाच्या कार्याचा अभ्यास करणे.

५) महाराष्ट्र राज्य ग्रामीण उपजीविकामिशन (**MSRLM**) योजनेचे स्वरूप समजून घेणे.

## ४.१ प्रास्ताविक

भारतात बहुसंख्य जनता ही आजही खेडयात या ग्रामीण भागात राहते. भारतात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ग्रामीण विकासाचा वेग वाढविण्यासाठी मोठ्या प्रमागात प्रयत्न करण्यात आलेत्यामध्ये अत्यल्प भूधारक, भूमिहीन शेतमजूर, कारागीर, सर्वसामान्य शेतकरी, भेटे व्यावसायिकयांसारख्या लोकांचे जीवनमान उंचाविण्यासाठी, तसेच सावकाराच्या

तावडीतून या लोकांची सुटकाहोण्यासाठी बँकांचे राष्ट्रायीकरण करण्यात आले. ११ जुलै १९६९ रोजी १४ प्रमुख व्यापारी बैंकांचेव एप्रिल १९८० मध्ये आगखी सहा बँकांचे राष्ट्रीयीकरण भारत सरकारने केले. परंतु वरील गरजूघटकांच्या कर्जविषयक गरजा भागवण्यावर ही संस्थात्मक पतपुरवठ्याची सोय अपुरी पडत होती.ग्रामीण भागातील या घटकांच्या कर्जविषयक गरजा या नेहमीच व तातडीच्या उदभवणाऱ्या असतात.कर्जाची रक्कमही लहान (अल्प) असते. अल्प रकमेची कर्जे हाताळण्यास व जोखीम पत्करण्यासबैंका तयार नसतात. अशा वेळी या गरजू घटकांना असंस्थात्मक स्त्रोतांकडे (सावकार, जमीनदार,श्रीमंत शेतकरी, व्यापारी इ.) जाण्याशिवाय पर्याय नसतो. त्यामुळे ग्रामीण भागातील सर्वसामान्यगरीब नागरिक बैंकांकडे जाण्यास उत्सुक नसतात. अर्थात ही जनता विविध सवलतींपासून वंचितराहते. त्यावर प्रभावी उपाय म्हणून स्वयंसाहाय्यता बचत गट स्थापन करण्यात आले. ह्या बचतगटांच्या माध्यमातून फार मोठे परिवर्तन ग्रामीण भागात घडून येत आहे.

## ४.२ स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेचे स्वरूप व व्याप्ती

आपला भारत देश लोकशाही प्रधान, लोककल्याणकारी राष्ट्र आहे. तथापि बाबती लोकसंख्या,नैसर्गिक आपत्ती, अतिवृष्टी, आतंकवाद, नक्षलवाद, कुपोषण, निरक्षरता, बेरोजगारी इत्यादी विविधसमस्यांना तोंड द्यावे लागत आहे. या समस्या निर्मूलनासाठी केंद्र सरकार व राज्य शासनाकडूनविविध लोककल्याणाच्या योजना राबविल्या जातात.या योजना राबविताना शासनाने स्वयंरोजगार कार्यक्रमाला महत्त्व दिले असून स्वर्णजयंतीग्राम स्वयंरोजगारींना लहान लहान उद्योग व्यवसायासाठी कर्ज व अनुदान देऊन ग्रामीण भागामध्येस्वयंरोजगार निर्माण करून देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेला केंद्राकडून ७५% व राज्य शासनाकडून २५%निभी पुरविण्यात येतो. ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील गरीब जनतेच्या क्षमतेवर आधारितउद्योग सुरू करणे व




**Indiagoverment.com**

त्यामुळे स्वयंरोजगारी निर्माण करून, या योजनेचा लाभ घेणाऱ्या कुटुंबांना तीनवर्षात दारिद्र्यरेषेच्या वर आणणे, तसेच दरमहा २०००रु. उत्पन्न मिळावे असे ध्येय ठरवले आहे. यायोजनेंतर्गत दारिद्र्यरेषेतील व्यक्तींना विशेषत : महिलांना एकत्रित करून व स्वयंसाहाय्यता गटस्थापन करून उद्योग निर्मितीस कर्ज, बाजारपेठा मिळवून स्वयंरोजगार

निर्माण केला जातो, यायोजनेनुसार ग्रामीण भागातील प्रमुख व्यवसायाची निवड करून बँकांमार्फत चित्तसाहाय्य दिले जाते.व्यवसायासाठीच्या एकूण निधीच्या ७५% निधी प्रकल्पांवर, २५% निधी इतर सुविधांवर खर्च केलाजातो. या योजनेंतर्गत दिवसांच्या प्रशिक्षणानंतर बँका कर्ज वितरण करतात,स्वयंरोजगारी निवडताना ग्रामसभेची मान्यता घेण्याचे बंधन आहे. यासाठी त्रिस्तरीय समितीआहे. यामध्ये सरपंच, बैंक शाखाधिकारी, गटविकास अधिकारी यांचा समावेश असतो. एखाद्यागावात दारिद्रयरेषेखालील गटांची संख्या नसेल, तर बिगर दारिद्रयरेषेखालील व्यक्तींना नटात घेतायेते. परंतु त्यांना यामध्ये गटाचे कोणतेही पदाधिकारी राहता येत नाही आणि त्यांना अनुदान प्राप्तहोत नाही.दारिदम निर्मूलनाच्या योजना राबविण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीची देखील आहे. ही योजनागावात प्रभावीपणे राबविल्यास गावांमध्ये जास्तीत जास्त बचत गट स्थापन होऊन त्याचा खालीलपमागे महत्त्वपूर्ण सहभाग मिळू शकतो.

१) स्वयंसाहाय्यता बचत गट गावातील ग्रामसभेच्या बैठकीला उपस्थित राहून गावाच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका पार पाडू शकतात.

२) स्वयंसाहाय्यता बचत गट गावातील सार्वजनिक साफसफाई, लसीकरण, जनजागृती, शिक्षण, वनराई बंधारे यासारख्या सामाजिक उपक्रमात भाग घेऊन ग्रामपंचायतीला विकास कामात मदत करू शकतात.

३) स्वयंसहाय्यता बचत गटाने सुरू केलेल्या उद्योग व्यवसायामुळे गावांतील इतर मजुरांना रोजगार मिळू शकतो.

४) ग्रामपंचायतीचा कर वसूलीसाठी स्वयंसाहाय्यता बचत गटातील सदस्यांमध्ये तसेच गवकांमध्ये जनजागृती करून बचत गट कर वसुलीसाठी मदत करू शकतात.

५) स्वयंसहाय्यता बचत गटामुळे सामाजिक एकोपा गावांमध्ये तयार होतो.

## ४.३ बचत गट (स्वयंसाहाय्यता गट) संकल्पना, स्वरूप व इतिहास

**संकल्पना**स्वयंसहाय्यता गटाची**(**बचत गट**)** व्याख्या करणे कठीण आहे. या स्वयंसहाय्यता गटाची चळवळ ही समूह गट, शेजार गट, महिला बचत गट, स्वावलंबी बचत गट, काटकसर बचत गट अशा वेगवेगळ्या संकल्पनेतून जोमात सुरू आहे.तरीही पुढीलकाही सर्वस्पर्शी संकल्पना/व्याख्या सांगता येतील.

१) "समान गरजा असलेल्या व्यक्तींनी एकत्र येऊन समान आर्थिक उद्दिष्टे व सामाजिक उदिष्टेसाध्य करण्यासाठी एकाच प्रदेशात व विभागातील व्यक्तींनी एकत्र येऊन समूह स्थापनववृद्धिंगत करून स्वेच्छेने सहभागी होणे याला स्वयंसहाय्यता / बचत गट म्हणतात."

२) "परावलंबित्वाकडूनस्वावलंबनाकडे सर्वसंमतीने सामुदायिकपणेबचतीच्या निमित्ताने केलेली वाटचाल म्हणजे स्वयंसाहाय्यता बचत गट होय.'

३) "जीवनामध्ये नव्याने येणाऱ्या आव्हानांना तोंड देण्यासाठी / पेलण्यासाठी क्षमता विकसित करणारा सुसज्ज संच म्हणजे स्वयंसाहाय्यता गट होय."

४) "एकाच गावातील १० ते २० सभासदांनी एकत्र येऊन नियमित बचतीतून एकमेकांच्या गरजा, अडचणी, जीवनमूल्ये उंचावण्यासाठी अर्थसहाय्य केले जाते, उद्योगधंदाउभारला जातो, परस्पर सहकार्य, सहभाग नेतृत्व व कर्तव्य, विचारांची देवाण-घेवाण,सातत्यपूर्ण व प्रयत्नशील सदस्यांच्या समूहला स्वयंसहाय्यता गट म्हणतात."

५) "समान प्रादेशिकता असलेल्या समविचारी समान गरजा, समान अपेक्षा असलेल्या १० ते२० महिलांनी स्वल्प बचत करून बचतीचा विनियोग उपभोगासाठी करून, कर्ज घेऊन,व्यवसाय करणाऱ्या व लोकशाही संघटन प्रणाली असलेल्या समूहास स्वयंसाहाय्यता बचतगट असे म्हणतात."

६) "A Self-help group is a voluntary association of homogenous set of people, either working together or living in the neighbourhood, engaged in similar activity, working with or without registration for the common good of their members."

७) "दारिद्रय निर्मूलन कार्यक्रमाचे पुरोगामी-सहभागी-प्रतिगामी दुवे साधणारा मंच म्हणजे स्वयंबचतगट होय.'

८) "स्वेच्छेने एकत्र येऊन जीवनाच्या सर्वांगीण विकासाकरिता महिलांनी परस्पर सहकार्यातून चालवलेली लोकशाही संघटना म्हणजे स्वयंसाहाय्यता बचत गट होय.'

समाज सुधारकांच्या दृष्टीने स्वयंबचत गट हे समाज सुधारण्याचे माध्यम, शासनाच्या दृष्टीने आर्थिक विकासाचे साधन, धर्मशास्त्राच्या दृष्टीने परोपकाराचे माध्यम, सांस्कृतिकदृष्ट्या मूल्यांचेव संस्कृतीचे जतन करण्याचे माध्यम या विचारातून स्वयंसाहाय्यता बचत गटाची संकल्पना स्पष्टहोत आहे. ह्यामध्ये महिलांना आघाडीचे स्थान देण्यात आले आहे, कारण महिला ह्या आतापर्यंत दुर्बल घटक म्हणून उपेक्षित राहिल्या आहेत. महिलांना ह्या संकल्पनेत मोठया प्रमाणात समाविष्ट करून महिला बचत गट स्थापन करण्यावर अधिकाधिक भर देण्यात आला आहे.

**स्वरूप :**प्रत्येक व्यक्तीला जेव्हा उत्पन्नापेक्षा अधिक खर्च असतो त्यावेळी (ऋण) कर्जाची गरजभासत असते. गरज भागविण्यासाठी असंस्थात्मक किंवा संस्थात्मक स्त्रोतांकडे व्यक्तीला जावेलागते. परंतु अत्यंत गरीब लोकांसाठी संस्थात्मक स्त्रोत फारसे कार्य करताना दिसत नाहीत.

गरीब लोकांकडे उत्पन्नाची साधने तुटपुंजी असतात. त्यामुळे तारणही कमी पर्यायाने कर्ज मिळण्याचेमार्ग दुर्मिळ होत असतात. अशा वेळी सावकार, जमीनदार, श्रीमंत शेतकरी यांसारख्या असंस्थात्मकस्त्रोतांकडून कर्ज मिळविले जाते. सावकारी पाशातून मुक्तता मिळावी म्हणून सहकार क्षेत्राचीजोमाने सुरूवात झाली. परंतु १०० वर्षानंतर ह्या चळवळीला उतरती कळा लागली. राजकारणा,भ्रष्टाचार, दप्तरदिरंगाई ह्यामुळेसहकार चळवळ बदनाम झाली. ह्याचा सुवर्णमध्य म्हणून स्वयंसाहाय्यतागट चळवळ जोमाने फोफावत आहे.

**इतिहास:** २१व्या शतकात ग्रामीण दारिद्रय निर्मूलन आणि त्याद्वारे ग्रामीण विकास साध्य करणारीयंत्रणा म्हणून स्वयंसहाय्यता गट हा बचतगट किंवा लघु वित्त / पत गट या नावाने ओळखलीजातो. या संकल्पनेचा उगम करणारे नोबेल पारितोषिक मिळालेले बांगलादेशाचे **अर्थशास्त्रज्ञ डॉ.महंमद युनुस** हे आहेत. बांगलादेशामधील शेतकऱ्यांच्या व भूमिहीन शेतमजुरांच्या कर्जबाजारीपणा वदारिद्रयाने व्यथित झालेल्या या विचारवंताने असंघटित व शोषित समुदायाच्या समस्यांचे निराकरणकरण्यासाठी १९७३ साली लघु वित्ताची (Micro Finance) संकल्पना मांडली. त्याचा पुढचाटप्प्या म्हणजे या दुर्बल घटकांना लघु-वित्तपुरवठा करणाऱ्या ग्रामीण बँकांची संकल्पना होय. यासंकल्पनेचा त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला आणि त्याची परिणती १९८३ साली ग्रामीण बँकांच्यास्थापनेत झाली. बांगलादेशामधील ग्रामीण विकास दारिद्रय निर्मूलनाचा प्रयोग यशस्वी झाला, आणित्याची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवर नेण्यात आली. १९९४ साली अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्षश्री. बिल क्लिंटन यांनी ह्याबाबत विशेष स्वारस्य दाखविले आणि जागतिक बँक व आंतरराष्ट्रीयनाणेनिधी या जागतिक पातळीवर वित्तीय, संघटनांनी दारीद्र निर्मूलनाची प्रभावी उपाययोजना'अशीप्रशस्ती केली. त्याचा परिणाम १९९०च्या दशकांत आशिया, आफ्रिका आणि मध्य व दक्षिणअमेरिका खंडातील विकसनशील देशांत लघुवित्त आणि स्वयंसाहाय्यता गट या संकल्पनेचा प्रसारझाला.बचत ही संकल्पना नवीन नव्हती. जगात चिट फंड, भिशी या वेगवेगळ्या स्वरूपात बचतकेली जात असे. दक्षिण अमेरिका व आफ्रिका भागात (Rotating Saving And creditAssociation) हा बचततीचा प्रकार निधीशी संबंधित होता. हा प्रकार ग्रामीण बँकेच्या धर्तीवरविकसित करण्यास सुरुवात झाली आहे. इंडोनेशियात GTZ या जर्मन फडिंग एजन्सीने हा प्रयोगसर्वप्रथम केला आहे. येथे (SHG) Self Help Group यानावानेजन्म झाल्याचे आढळते. मलेशियातमा. नेल्सन यांनी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना संघटित करणारी आणि एकता, शिस्त, साहसआणि कठोर परिश्रम या गुणवैशिष्ट्यांचा मिलाफ साकारणारीस्वयंसाहाय्यता गटाची संकल्पनायशस्वीरीत्या राबविली. त्याचा प्रसार श्रीलंका, फिलीपाईन्स, आखाती देश, आफ्रिका व दक्षिणअमेरिकेतील विकसनशील देशांमध्ये झाला,

**भारतातील स्वयंसाहाय्यता गट चळवळः**

भारतामध्ये स्वयंसाहाय्यता गटाची चळवळ 'मैसूर रिसेटलमेंट अँड डेव्हलपमेंट' एजन्सी(मायराडा) या संस्थेने सुरू केली. मायराडाच्या माध्यमातून स्वयंसाहाय्यता गटाची निर्मिती होतअसताना राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक, म्हणजेच नाबार्ड (NABARD) १९९१-९२साली स्वयंसाहाय्यता गट या ग्रामीण दारिद्रय निर्मूलनविषयक प्रतिमानास स्वीकृती दिली. स्वयंसाहाय्यतागटांना कायदेशीर मान्यता प्राप्त झाल्यावर श्रीमती जया अरूणाचलम यांच्या पुढाकाराने, नाबार्डच्यामाध्यमातून आंध्र प्रदेश, कर्नाटक, तामिळनाडू आणि केरळ या दक्षिणेकडील राज्यात स्वयंसाहाय्यतागट चळवळीची सुरूवात झाली. १९९६ मध्ये रिझर्व बँकेने, बँकांशी संलग्न असणाऱ्या स्वयंसाहाय्यतागटांना प्राधान्यक्रमाने पतपुरवठा करण्याचे निर्देश दिले. भारत सरकारने १९९९ साली स्वर्णजयंतीग्रामस्वयंरोजगार कार्यक्रमाच्या अंतर्गत दारिद्रय निर्मूलनासाठी स्वयंसाहाय्यता गटांना आर्थिक अनुदानदेण्याचा निर्णय घेतला. यातून स्वयंसाहाय्यता गट चळवळीला पोषक वातावरण देशात निर्माण झाले.१९९९ ते २००९ या मागील दशकात स्वयंसाहाय्यता गट चळवळीचा देशाच्या सर्व राज्यांतप्रसार झाला. यामध्ये सर्वाधिक गट

८२% गट हे महिलांचे होते.स्वयंसाहाय्यता गटांच्या माध्यमातून ग्रामीण विकास, ग्रामीण दारिद्र्य निर्मूलन आणि महिलांचेसबलीकरण ही उदिष्टे साध्य करण्यासाठी स्थानिक पातळीवर स्वयंसेवी संस्थांना या उपक्रमातसहभागी होण्यास प्रोत्साहन देण्यात आले. स्वयंसेवी संस्थांच्या पुढाकाराने संघटित होणाऱ्यास्वयंसाहाय्यता बचत गटांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. शासन आणि वित्तीय संस्थांचास्वयंसाहाय्यता गट चळवळीविषयीचा दृष्टिकोन सकारात्मक असल्याने आनि स्वयंसेवी संस्थांचाकार्यभाग विधायक असल्याने या दशकात ही चळवळ देशव्यापी नक्कीच बनेल व ग्रामीण भागातीलउर्वरित दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्या दारिद्र्य निर्मूलनाच्या लढाईत सहभागी होऊन, ग्रमीग विकासासह दारिद्र्य निर्मूलनाचे उद्दिष्ट साध्य होईल, असा आशावाद व्यक्त होत आहे.

**महाराष्ट्रातील स्वयंसाहाय्यता गटः**

महाराष्ट्र हे देशातील पुरोगामी राज्य आहे. प्रचलित अर्थानुसार स्वयंसाहाय्यता गट चळवळीचाप्रसार १९९० च्या दशकात झाला असला तरी १९४७ साली अमरावती जिल्ह्यात काहीसासू-सुनांनी एकत्र येऊन बचत गट सुरू केला होता. १९७०च्या दशकात नामवंत समाजशास्त्रज्ञइलायेन भट यांनी महिला व सूक्ष्म वित्तपुरवठा या विषयाची मांडणी केली होती. १९८४ सालीगडचिरोली जिल्ह्यातील वडसा तालुक्यात काही स्वयंसाहाय्यता गटांची स्थापना करण्यात आलीहोती.१९९४ मध्ये आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधीच्या साहाय्याने व केंद्रसरकारच्या मदतीनेमहाराष्ट्र ग्रामीण पतपुरवता प्रकल्प नमुना म्हणून चार जिल्हयांत राबविण्यात आला. या योजनेतमहिला विकास योजनेचा समावेश करून ती राबविण्याची जबाबदारी महिला आर्थिक विकासमहामंडळावर होती. या कार्यक्रमांतर्गत महिलास्वयंसाहाय्यता गट स्थापनेस सुरुवात झाली. सन१९९९ मध्ये भारत सरकारने स्वर्णजयंती ग्रामस्वयंरोजगार योजनेची कार्यवाही केल्यावर या चळवळीलामहाराष्ट्रात वेग प्राप्त झाला.




**Marathislogan.com**

**आपली प्रगती तपासाः**

१) स्वयंसाहाय्यता बचत गटाची संकल्पना सांगा.

## ४.४ बचत गट (स्वयंसाहाय्यता गट) वैशिष्ट्ये

समान गरजा, समान उरिष्टे, समान विचारसरणीचे लोक जेव्हा एकत्र येतात आणिसमूहशक्तीच्या जोरावर प्रतिकूल परिस्थितीवर मात करून सहजरीत्या समूह शक्तीचे प्रदर्शन

करीत सर्वांगीण प्रगती करतात. अशा स्वयंसाहाय्यता बचत गटांची वैशिष्टये पुढीलप्रमाणे सांगतायेतील.

### ४.४.१ आर्थिक वैशिष्ट्ये:

१) काटकसर वृत्ती:स्वयंसाहाय्यता बचत गटातील सदस्य हे आर्थिकदृष्ट्या कमकुवत असतात. उत्पादनाची पर्यायानेउत्पन्नाची साधने मर्यादित असल्यामुळे दैनंदिन उत्पन्नातून जमेल त्याप्रमाणात काटकसर करूनगटांमध्ये पैसे भरत असतात. यातूनच काटकसर वृत्ती जोपासली जाते. हे स्वयंसाहाय्यता गटाचेमहत्वाचे वैशिष्ट्य आहे.

२) स्वेच्छा सभासदत्व:बचत गटात येण्यासाठी कोणावरही जबरदस्ती केली जात नाही. सर्वजण स्वखुषीने सभासदत्वस्वीकारतात. फक्त सहयोगी गरजूला प्रबोधन करीत असतात. सभासदत्व मिळविण्यासाठी तशीकोणत्याही प्रकारची अट नसते.

३) सभासद संख्याःस्वयंसाहाय्यता बचत गटाची सभासद संख्या १० ते २० पर्यंत मर्यादित असते.

४) लोकशाही तत्त्वांवर कार्य:स्वयंसाहाय्यता गटात सर्व आर्थिक कारभार हा लोकशाही तत्वानेचालत असतो. सर्वानुमतेनिर्णय घेतले जातात. प्रत्येकाच्या मताचा आदर केला जातो. लोकशाही मूल्ये जोपासली गेल्यामुळेगट मजबूत होत असतात.

५) आर्थिक व्यवहारःस्वयंसाहाय्यता बचत गटांच्या माध्यमातून सर्व सभासद ठरलेल्या वेळी नियमित बचत जमाकरतात. उन्नतीतून पैसा वा पत निर्माण होत असते. त्यातून गरजेनुरूप सभासद कर्जव्यवहारकरतात, तर काही व्यवसाय करतात. सर्व व्यवहार कांच्या मदतीने होत असतात. त्यामुळे स्वयंबचतगट हे आर्थिकदृष्ट्या सक्षम बनत आहेत.

६) अधिकृत नोंदणी:स्वयंसाहाय्यता गटांना शासकीय यंत्रणेत सहकार व कायद्याप्रमाणे अधिकृत नोंदणी करण्याचीगरज नसते. फक्त गटाच्या नावाने बैंकित खाते उघडले जाते. परंतु गटातील सामाजिक, आर्थिकव्यवहारांच्या नोंदी ठेवल्या जातात. त्यामुळे गटांत पारदर्शकता येते.

७) रोखीचा व्यवहारःस्वयंसाहाय्यता बचत गटातील बचत आणि कर्ज हे व्यवहार रोखीने केले जातात, त्यामुळेव्यवहारात पारदर्शकता येते. रोखीच्या व्यवहारामुळे सभासदांना व्यवहाराचे ज्ञान प्राप्त होते.

८) लाभाचे समान वाटप:स्वयंसाहाय्यता बचत गटात व्याजरूपात व्यवासायरूपात नफा प्राप्त होऊन गटास लाभांशप्राप्त होतो. या लाभांश (नफा) रकमेचे वाटप समान पद्धतीने

केले जाते. नफ्याचे वाटप करण्याचेबंधन गटांवर असत नाही. सभासदांच्या इच्छेनुसार नफ्याचे वाटप करतात.

९) नियोजनपूर्वक व्यवहार:स्वयंसाहाय्यता बचत गटामध्ये प्रत्येक तपशिलाचे नियोजन केले जाते. नियोजनानुसारगटाचे कामकाज चालते. म्हणून गट नियोजनाचा विविध अंगाने विचार नियोजनपूर्वक व्यवहारकरतो.

१०) स्वनिर्मितीव लवचिक नियमावली:स्वयंबचत गटाची स्थापना, दैनंदिन कामकाज इ. संघटिका आणि सहसंघटिका यांना इ.बाबत शासकीय नियमावली नसते. प्रत्येक गटाने आपली नियमावली परिस्थितीनुरूप बनविलेलीअसते. या नियमावलीत गरजेनुसार लवचिकता आणली जाते. गटाने स्वतः नियमावली तयारकेलेली असल्यामुळे त्यात बदल करता येतो. सदर नियमावली अतिशय लवचिक असते.

११) सहकाराचे प्रशिक्षण:स्वयंसाहाय्यता बचत गटात लघु स्वव्यावसाचा सहकार असतो. सहकाराप्रमाणे व्यावसायिकशिक्षण प्रशिक्षण देण्यात येते. सभासदांना सतत मार्गदर्शन केले जाते. सहकाराच्या शिक्षणामुळेव्यावसायिक वृत्ती विकसित होते. त्यांच्यामध्ये ऐक्याची भावना निर्माण होते. सहकारीवृत्ती वाढीसलागते.

१२) सहकारांतर्गत सहकार:स्वयंसाहाय्यता बचत गटाची चळवळ ही सहकाराप्रमाणे असून एकमेकांस साह्यकरणारीसंघटना आहे. प्रत्येक गटाचे प्रत्येक गटाला सहकार्य मिळते. तसेच सभासद संख्या मर्यादितअसल्यामुळे सभासदांमध्ये सहकार्याची भूमिका असते. गटाचे कामकाज चालविण्यासाठी संघटिकाव सहसंघटिका यांना सहकार्य लाभते.

१३) स्वेच्छा नोंदणी:स्वयंसाहाय्यता बचत गटांना सहकारी संस्थांप्रमाणे अधिकृत नोंदणी करावी लागत नाही,फक्त पंचायत समिती किंवा स्वयंसेवी संस्थांना गट स्थापना केल्याची तोंडी नोंद फक्त करावीलागते. सरकारी खात्यामार्फत अधिकृत नोंदणी करण्याची गरज नसते. त्यामुळे गटाची स्थापनाकोणालाही करता येते. परंतु स्वयंसाहाय्यता बचत गटांना सूक्ष्म वित्त संस्था म्हणून काम करतांनाकंपनी कायद्यानुसार नोंद करावी लागते.

१५) विधायक सचे शिक्षण:जागतिकीकरणामध्ये विघातक स्पर्धा टाळण्यासाठी स्वयंसाहाय्यता बचत गटांचा उगम असूनस्पर्धेचे शिक्षण गटातून मिळते. त्यातून समाजकल्याण होते.

### ४.४.२ सामाजिक वैशिष्टये.

१) समानतेचे तत्व:भारतीय लोकशाहीतील समानता तत्वांचे पालन स्वयंसाहाय्यता बचत गटात होते. ही समानतावय, व्यवसाय, लिंग, भाषा, सुखदुःखे, समस्या इ. बाबत असते. जणूकाही हा लहानपद्धतीचा सहकाराचाच भाग आहे.

२) समान उद्दिष्टे व गरजा:स्वयंसाहाय्यता बचत गटात एकमेकांशी साधर्म्य असणारे लोक एकत्र येत असतात. समानगरजा व समान विचार ह्यामुळे एकत्र येऊन गटाचा विकास होण्यास होते.

३) स्वयंशक्ती व समूहशक्तीची जाणीव:स्वयंसाहाय्यता बचत गटामुळे गटातील लोक एकत्र येत असल्यामुळे आपल्या गटबळावरत्यांना आपल्या समस्या सोडविता येतात. गटशक्तीचे दर्शन समाजाला होत असताना समूहशक्ती/ गटशक्ती प्रबळ बनते.

४) सामुदायिक निर्णय कृती:स्वयंसाहाय्यता बचत गटातील सर्व मंडळी मीटिंगच्या वेळी एकत्र येऊन निर्णय घेत असतात.आणि सामुदायिक निर्णयातून प्रत्यक्ष कृती करण्यावर भर देतात.

५) एकतेची भावना:स्वयंसाहाय्यता गटातील सदस्य / महिला सदस्य हे एकाच गावात राहणाऱ्या असल्यामुळेएक-दुसऱ्याबद्दलआदर, आपुलकी, आस्थेची भावना असणाऱ्या असतात. तसेच भावनिक संबंध,परस्सर बांधीलकीची भावना एकमेकांस साहाय्य यामुळे आपोआप एकतेची भावनावाढीस लागून समाज एकजुटीने राहण्यास मदत होते.

६) विश्वासाचे प्रतिक:स्वयंसाहाय्यता बचत गट हे एकमेकांच्या विश्वासाने चालणारे, सर्व निर्णय पारदर्शीपणे घेणारे, विश्वासानेव्यवहार करणारे असतात. ह्यामुळे कोणाचीही फसवणूक होत नाही. ह्यामुळे एकमेकांवर सहजविश्वास ठेवला जातो. यामुळे गटात विश्वास वाढीस लागतो. त्यामुळे गट हे जगू विश्वासाचे प्रतीकबनत आहे.

७) सुरक्षितताःस्वयंसाहाय्यता बचत गटातील सभासद अन्यायास प्रतिकार करण्यासाठी एकत्र येतात.त्यामुळे स्त्रीला सुरक्षितता प्राप्त होते. तसेच स्वयंसाहाय्यता बचत गटाच्या सभासदाला व व्यवसायालासुरक्षित कवच असते. उत्पादनाला सुरक्षित बाजारपेठाही मिळू शकतात.

८)हक्काचे व्यासपीठ:स्वयंसाहाय्यता बचत गट हे महिलांना एकत्रित कल्याचे माध्यम असून महिलांच्या कलागुणांनाबाब, नेतृत्व, वक्तृत्वास संधी देगारे, विचारांचे प्रबोधन करणारे तसेच समाजाचे सर्वांगीण प्रबोधनकरणारे महिलांचे हक्काचे व्यासपीठ आहे.

९) समाज परिवर्तन प्रक्रियेचे साधन:समाजातील बहुतांशी महिलावर्गाचे फार मोठे परिवर्तन बचत गटामुळे होत आहे. सुरवातीसकुटुंबात, गावात, समाजात पर्यायाने देशपातळीवर आज मोठ्या प्रमाणात परिवर्तन होत आहे.

१०) मुक्त अभियान:स्वयंसाहाय्यता बचत गट ही अनौपचारिक चळवळ आहे. गटात कोणीही सदस्य होऊशकतात. घटाची स्थापना, निर्मिती ह्या प्रक्रियेत कोणालाही सहभागी होता येते. नवीन बचत गटाचीनिर्मिती करताना गटाचे सदस्य परस्परांना व्यक्तिगत पातळीवर मार्गदर्शन करू शकतात.

### ४.४.३ सांस्कृतिक वैशिष्टे:

स्वयंसाहाय्यता बचत गटामुळे भारतीय संस्कृतीचे रक्षण मोठ्या प्रमाणात होत आहे. नवीनविचारांचा स्वीकार होत असला तरी सण, उत्सव, रीतिरिवाज ह्यांचे आवर्जून पालन, सामूहिकरीत्यामहिला बचत गटातून केले जाते. यावेळी उत्साहाचे वातावरण बचत गटांत असते. आपला सांस्कृतिकवारसा जपण्याचे कार्य स्वयंबचत गटांमुळे होत आहे.

### ४.४.४ राजकीय वैशिष्टये:

१) नेतृत्वस्वयंसाहाय्यता बचत गटाचे संघटिका व सहसंघटिका हे नेतृत्व करतात. शिवाय प्रत्येकसभासदांस गटाचे नेतृत्व करण्याची संधी मिळते. तसेच प्रत्येक जण गटाचे व्यवस्थापन करूननेतृत्व सांभाळतो. प्रत्येकास ही संधी मिळाल्यामुळे नेतृत्व गुणांचा विकास होऊन राजकीय क्षेत्रातस्वतःचे वलय तयार होते.

२) लोकशाही संघटनःस्वयंसाहाय्यता बचत गट हे लोकांनीच लोकांकरिता चालविलेले असतात. त्यामुळे लोकशाहीसंघटन असते. शिवाय गटांच्या संघटिका, सहसंघटिकांची निवड लोकशाहीप्रमाणे होते. सभासदांच्यामताला फार महत्त्व असते. सभासदांचे भांडवल, धर्म, जात, वर्ण, वंश या घटकांना मुळीच थारानसतो. गटातील सर्व कारभार व निर्णय, कृती सर्वानुमते केली जाते. प्रत्येक सभासदांच्या मताचीकदर केली जाते. त्यामुळे खरी लोकशाही मूल्ये जोपासली जातात.

३) लोकशाही मूल्यांची जपणूक:स्वयंसाहाय्यता बचत गटांमध्ये स्वातंत्र्य,समता, बंधुता, न्याय, सर्वानुमते निर्णय, प्रत्येकाच्यामतांची कदर, धर्मनिरपेक्षता ह्यासारखी लोकशाहीची मूल्ये जोपासली जातात. तसेच बचत गटामध्येमहिलांची संख्या जास्त असल्यामुळे स्वयंशिस्तीने जबाबदारी आपापले कर्तव्य नीट बजावले जाते.

४) दबाव गटःबचत गटांमध्ये बहुसंख्य बचत गट महिलांचे आहेत. प्रत्येक पाड्यावर, गावात, बचत गटांचीनिर्मिती होत आहे. दुपारच्या वेळी महिला ह्या रिकाम्या असतात. मर्यादित सभासदांमुळे तोंडी निरोपदिले तरी महिला वेळेत जमा होतात. त्यामुळे समाजातील अपप्रवृत्तींविरुद्ध दाद मागितली जाते.समाजातील ह्या गटांमुळे वा गटांच्या दबावामुळे महिलांवरील अत्याचार कमी होत आहेत.

५) राजकीय व धार्मिक तटस्थता:जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरणाच्या या युगात अनेक प्रकारच्या समस्या समाजातनिर्माण होत आहेत. ह्यातून स्वयंसाहाय्यता बचत गट प्रभावीपणे पुढे जात आहेत. समान संधी,समान लाभ मिळत असल्यामुळे तसेच समाजातील इतर घटकांबरोबर संपर्क वाढल्यामुळे सभासदांनाबऱ्या-वाईटाची जाण निर्माण झाली आहे. त्यामुळे राजकीय प्रभाव व धार्मिक दडपणांस स्वयंसाहाय्यताबचत गट बळी पडत नाहीत.

अशा विविध प्रकारची वैशिष्ट्ये स्वयंसाहाय्यता बचत गटांची दिसून येतात.

## ४.५ बचत गट (स्वयंसाहाय्यता गट) प्रकार.

स्वयंसाहाय्यता बचत गट हे गरजू गरीब कुटुंबातील ग्रामीण भागातील व्यक्तींनी एकत्र येऊन

स्थापन केलेले असतात. गट स्थापनेमध्ये प्रेरकाची भूमिका महत्त्वाची असते. गटाची निर्मिती कोणत्याउद्देशाने झाली आहे. त्यानुसार गटांचे पुढीलप्रमाणे प्रकार पडतात.

१) पुरुष स्वयंसाहाय्यता बचत गट:ज्या स्वयंसाहाय्यता समूहामध्ये सर्वच्या सर्व पुरुष सदस्य असतात, त्यांस पुरूप स्वयंसाहायतागट म्हणतात.

२)महिला स्वयंसाहाय्यता बचत गट:ह्यामध्ये फक्त महिला सभासद असून महिलांद्वारे व्यवस्थापन केले जाते. त्यास महिलास्वयंसाहाय्यता गट म्हणतात.

३) मिश्र स्वयंसाहाय्यता बचत गट:ह्या गटामध्ये स्त्री व पुरुष हे दोघेही सभासद असतात त्यांना मिश्र स्वयंसाहाय्यता बचत गटअसे म्हणतात.

४) स्वर्णजयंती स्वयंरोजगारांर्गत स्वयंसाहाय्यता बचत गटःज्या स्वयंसाहाय्यता बचत गटातील सदस्य दारिद्र्यरेषेखालील असतात त्यांना स्वर्णजयंतीस्वयंरोजगार स्वयंसाहाय्यता बचत गट असे म्हणतात. या योजनेनुसार तयार होणाऱ्या गटांनाअनुदान स्वरूपात लाभ मिळत असतो.

**५**) बचत गट:आपल्या खर्चातील काटकसरीद्वारे बचत करून त्याद्वारे सभासदांना गरजेनुसार कर्ज रूपानेपैसे देणे, कर्जाची परतफेड करने, व्यवसाय करणे, वित्तीय संस्थाकडून कर्ज उभारणी करणे, विमा,उत्पादनासाठी वैयक्तिक व सामूहिक उद्योग निर्माण करणे, सर्व सदस्य आत्मनिर्भर बनवणे अशासमूहास बचत गट म्हणतात. हा प्रकार सर्वव्यापक असून या गटांचा प्रचार व प्रसार मोठ्या प्रमाणातहोत आहे.

## ४.६ बचत गट स्वयंसाहाय्यता गटाची कार्य

इच्छाशक्ती, आत्मविश्वास, चिकाटी, प्रयत्न, महत्त्वाकांक्षा यांच्या बळावर माणूस कुठलेहीअवघड ध्येय गाठू शकतो. या गुणांच्या बळावर काही महिला बचत गटाच्या माध्यमातून यशस्वी होतआहेत. स्वयंसाहाय्यता बचत गटाची चळवळ ग्रामीणभागाबरोबर दुर्गम अशा आदिवासी भागातहीमोठ्या जोमाने वाढत आहे. अशा ह्या स्वयंसाहाय्यता गटाची थोडक्यात **कार्ये** पुढीलप्रमाणे सांगतायेतील.

**अ)आर्थिक कार्ये**

१) आर्थिक स्वावलंबन: इच्छाशक्ती, आत्मविश्वास, चिकाटी, प्रयत्न ह्यांच्या जोरावर महिला काम करून आपलाउद्योग व्यवसाय वाढविताना दिसत आहेत. महिला उद्योजक बनण्यास मदत होत आहे. गटातूनव्यवसाय प्रशिक्षण कर्ज मिळत असल्यामुळे आर्थिक स्वावलंबनाबाबतचे महत्त्वाचे कार्य कुटुंबासाठी करताना दिसत आहेत.

२) शिक्षणव्यक्ती परिवर्तनाचे मुख्य साधन शिक्षण आहे. शिक्षणामुळे साक्षरता वाढून जीवनमान उंचावते. सर्वांगीण विकास होण्यास मदत होते. स्वयंसाहाय्यता बचत गटामुळे आर्थिक स्थितीत बदल घडूनआल्यामुळे कुटुंबातील बालकांना शिक्षणाची संधी मिळू लागली आहे. विशेषतः कुटुंबातील मुलींनाशिक्षणाची संधी प्राप्त झाली आहे. स्वयंबचत गटांच्या माध्यमातून शिक्षणाबाबतही मोठ्या प्रमाणात प्रबोधन होत आहे.

३)आरोग्य स्वयंसाहाय्यता बचत:_गटांच्या माध्यमातून आरोग्याबाबत प्रबोधन करण्यात येते. तसेच शिबिराचे आयोजन, गाव स्वच्छता मोहीम ह्यासारख्या कार्यक्रमातून स्वच्छता, आरोग्यविषयक जागृतीचे शिक्षणही मिळत आहे. महिला सुदृढ आरोग्यामुळे व्यक्ती विकासाबरोबर देश विकास होतो.

४) कल्याणगटामार्फत रोजगार निर्मिती झाल्यामुळे समाजात महिलांची मान उंचावत आहे. आर्थिक, सामाजिक, राजकीय कल्याण होत असल्यामुळे महिलांचे सबलीकरण होत असताना दिसते.

१) कार्यसहभाग : गटामार्फत सभा आयोजित केल्या जातात. जबाबदाऱ्या वाटप केले जाते. विविध उपक्रम आयोजित केले जातात. ह्यातून महिलांचे सबलीकरणाचे कार्य मोठया प्रमाणावर होत आहे.

६) घरगुती ताण-तणाव मुक्ती: महिलांच्या हाती पैसा आल्यामुळे कौटुंबिक अर्थार्जनास मदत होत आहे. त्यामुळे कुटुंबामध्ये स्त्रियांच्या मताचा आदर केला जात आहे. चर्चेतून प्रसन्न वातावरण निर्माण झाल्यामुळे ताण-तणाव कमी होऊन खेळीमेळीचे वातावरण निर्माण होत आहे. पुरुषांच्या जाचही कमी होताना दिसत आहे.यासाठी स्वयंसाहाय्यता बचत गट उपयुक्त ठरत आहे.

७) आत्मसन्मान संवर्धन: स्वयंसाहाय्यता बचत गटांमुळे महिलांची आर्थिक स्थिती पर्यायाने कुटुंबाची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत झाली आहे. आत्मसन्मान जागृत होऊन संवर्धन होण्यास मदत झालीआहे.

**ब. स्वयंसाहाय्यता गटाचे समाजाप्रतीच कार्य**:

१) कर्तव्याची जाणीवस्त्री समाजात अनेक भूमिका पार पाडत असते. कन्या, पत्नी, आई या भूमिकेतून जातअसताना स्वतःवर अन्याय न करता कौटुंबिक व सामाजिक कर्तव्य पार पाडता येण्यासाठी स्वयंसाहाय्यता गटात समाविष्ट झाल्याने अजूनही अनेक पैलू दिसून येण्यास मदत होते.

२) हक्कांची जाणीवप्रत्येक महिलेला आपल्या हक्काची जाणीव होणे गरजेचे आहे. समानता, शिक्षण, रोजगार, संपत्ती, मतस्वातंत्र्य, आरोग्य इ. बाबतीत हक्काची जाणीव झाली पाहिजे. पालनपोषणाचा हक्कतसेच वडिलांच्या संपत्तीत समान वाटा ह्या सर्वाची जाणीव निर्माण करण्यासाठी स्वयंसाहाय्यता गटांनी केलेले कार्य महत्त्वपूर्ण आहे.

३)अधिकाराची जाणीव प्रत्येक स्त्रीला स्वत:च्या अधिकाराची जाणीव होणे गरजेचे आहे. स्वातंत्र्य, समता, न्यायह्या अधिकाराची जाणीव होत असताना लग्नाचे वय, संतती नियमन, आरोग्य सांभाळणे, त्यासाठी पैसा खर्च करणे, विश्रांती घेणे ह्यासारख्या अधिकाराची जाणीव होणे अगत्याचे आहे. त्यासाठीसंघटित होऊन कृती होणे अगत्याचे आहे. स्वयंसाहाय्यता गटाच्या माध्यमातून तळागाळातील स्त्रियांसाठी फार मोठे कार्य होत आहे.

४) सामाजिक नीतिमूल्यांची जाणीवः महिलांना सामाजिक नीतिमूल्यांची जोपासना करण्याची जाणीव लहानपणापासून करून दिली जाते. परंतु पुरुषांनीही नीतिमूल्यांची बंधने पाळल्यास महिलांवरील अन्याय मोठ्या प्रमाणात दूर होऊन समाजात स्त्रियांना समान दर्जा प्राप्त होऊ शकतो. समाजात मूल्यांची जोपासना स्वयंबचत गटामार्फत आज होताना दिसते.

५) समानतेची जाणीव स्वयंसाहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून महिलांना आर्थिक साधने प्राप्त होतात. त्यामुळेलिंगभेद न करता महिलांना आर्थिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रांत पुरुषांबरोबर समान हक्ककुटुंबात व समाजात प्राप्त होताना दिसत आहेत.

६) कायद्याची जाणीवस्वयं साहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून महिला एकत्र येत असल्यामुळे त्यांना सभेच्यावेळी मुलीच्या लग्नाचे वय १८ वर्षे, वडिलोपार्जित संपत्तीत हक्क, हुंडाबंदी, पोटगीचा दावा, अपहरण, व्यभिचारी कृत्य, अवैध दुसरी पत्नी या संदर्भातील कायद्यांविषयी माहिती देता येतो. यासाठी कार्यकरताना नेतृत्व व धैर्य लागते यासंदर्भात बचत गटांमार्फत फार मोठे कार्य होताना दिसत आहे.

७) नेतृत्वविकास: स्वयंसाहाय्यता बचत गटांमध्ये विविध जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. स्व-प्रयत्नानेविकासात्मक अनुकूल परिणाम घडवून आणण्यासाठी महिलांमध्ये असलेली कौशल्य पणांला लागतात.यातूनच नेतृत्व गुणांचा विकास होण्यास मदत होते. यामध्ये संभाषन, माहिती मिळविण्याचे कौशल्य, लिखाणाचे कौशल्य, आयोजन, नियोजन, कार्याचे व्यवस्थापन, निर्णयक्षमतेचा विकास स्वयंसाहाय्यताबचत गटांमुळे वाढीस लागत आहे.

समूह शक्तीचा विकास समूहशक्तीचा विकास होत असताना महिलांमध्ये जवळीकता निर्माण होते. ह्यातूनच दबावगट निर्माण झाल्याचे दिसतात. ह्या दबाव गटामार्फत गावात अन्याय योग्य बाबींवर दबाव आणलाजातो. पुढे ह्याचा योग्य वापर शासन व प्रशासनाविरुद्धच्या कार्यातही होऊ शकतो. स्वयंसाहाय्यताबचत गटांच्या मार्फत समूह शक्तीचा विकास होण्याच्या कार्यात मदत होत आहे.

**क.शिक्षणविषयक कार्य:** स्वयंसाहाय्यता बचत गटामुळे महिलांमध्ये शिक्षणाबाबत जागृतता निर्माण होत आहे. गटआता सामाजिक व आर्थिक क्षेत्राबरोबरच शिक्षणाच्या क्षेत्रातही आपली चळवळ व्यापक करीतआहेत. समाजातील अल्पशिक्षित व अशिक्षित महिलांना शिक्षणाच्या वाटेवर आणून सामाजिक जबाबदारी आणखी भक्कम करण्यात बचत गटही हातभार लावीत आहे. कुटुंबातील मुलांबरोबर मुलींनाही शिक्षणाची संधी मिळत आहे. मुलींच्या शिक्षणाबाबतच्या दृष्टिकोनात बदल होत आहे.ह्यामध्ये स्वयंसाहाय्यता गटांचे कार्य स्तुत्य आहे.

**ड. पर्यावरणविषयी कार्य:** स्वयंसाहाय्यता बचत गटांमार्फत पर्यावरण जागृतीबाबत अनेक कार्यक्रम आयोजित केलेजातात. वृक्षारोपणाचे कार्यक्रम आयोजित केले जातात. स्वयंसाहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून अगोदर स्वतःचे, नंतर कुटुंबाचे व्यक्तिमत्त्व बदललेल्या शेकडो महिला आपल्या आसपास असतील.गटाच्या माध्यमातून मोठी झेप घेतलेल्या आणि खऱ्या अर्थाने क्रांती घडवलेल्या अनेक महिलांच्या यशोगाथाही वेळोवेळी समोर येत असतात. गेल्या काही वर्षात बचतगट हे खऱ्या अर्थाने महिलासबलीकरणाचे एक सशक्त आणि अत्यंत प्रभावी माध्यम ठरले आहे.

## ४.७ महाराष्ट्र राज्य ग्रामीण उपजीविकामिशन (MSRLM)

**प्रास्ताविक**: 1 अप्रैल 1999 मध्ये सुरू करण्यात आलेल्यास्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचे राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानात (National Rural Livelihoods Mission) (NRLM) केंद्र शासनाने २०११मध्येरुपांतर करण्याचा निर्णय घेतला आहे.

राज्यात स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना ही महाराष्ट्र राज्य ग्रामीण उपजीविकामिशन(**MSRLM**)या स्वरुपात राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. सदर अभियान केंद्र शासन 75% व राज्य शासन 25% पुरस्कृत आहे.

केंद्र शासनाने 29 मार्च 2016 मध्ये सदर योजनेच्या निधी अंत्योदय योजना - राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका५०० कोटीरूपया पर्यंत वाढीद्वारे योजनेची व्याप्ती वाढवूनया योजनेचे विलीनीकरणदीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय ग्रामीण उपजीविकामधे केले गेले.

महाराष्ट्र **राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची** (**MSRLM**)

**अभियानांचाउद्देश**

"तळागाळातील गरीबांसाठी मजबूत अशा संस्थांची बांधणी करुन त्याद्वारे लाभादायक स्वयंरोजगार व कुशल वेतनी रोजगाराची संधी मिळविणे गरीब कुटुंबांना शक्य व्हावे व त्याद्वारे दारिद्रय कमी करणे, परिणामी कायमस्वरुपी तत्वावर त्यांच्या उपजिविकेत उल्लेखनीय सुधारणा करणे"

महाराष्ट्र**राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची वैशिष्टे:-**

- संवेदनशिल सहाय्य रचना
- सर्व समावेशक सामाजिकसहभाग
- दारिद्रय रेषेखालील स्वरोजगारींच्या संस्थांचे उन्नतीकरण
- मागणी आधारित पतपुरवठा
- प्रशिक्षण व क्षमता बळकटीकरण
- फिरता निधी
- सर्वसमावेशक आर्थिक अंतर्भाव
- व्याजदरासाठी अनुदान
- मुलभूत सुविधानिर्मिती व विपणन सहाय्य
- अन्ययोजनांचे एकत्रिकरण व समन्वय.

**महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची खालील मार्गदर्शक तत्वे आहेत.**

- दारिद्रयातून बाहेर येण्याची गरीबांची प्रबळ इच्छाश्क्ती आहे आणि ते करण्याची त्याकडे अंगभूत क्षमता आहे**.**
- सामाजिक संघटन करण्यास**,** संस्थांची बांधणीकरण्यास व त्यांचे सक्षमीकरण करण्याची प्रक्रिया करण्यास प्रेरणा देण्यासाठी बाहय समर्पित व संवेदनक्षम आधारभूत रचना आवश्यक आहे**.**

- ज्ञानाचा प्रसार, कौशल्य बांधणी,पतपुरवठा, बाजारपेठ आणि उपजिविकेच्या इतर सेवा उपलब्ध झाल्यास, या वाढत्या संघटनास खालून आधार मिळेल.
- राज्यामधील सर्वात कमी मानवीविकास निर्देशांक असलेल्या (ठाणे, रत्नागिरी, नंदूरबार, सोलापूर, जालना, यवतमाळ, उस्मानाबाद, वर्धा, गडचिरोली व गोंदिया) या **10** जिल्हयातील **36** तालुके प्रथम टप्प्यात निवडून तेथे राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान राबविण्यात येणार आहे.
- उर्वरित तालुक्यांमध्ये सदर अभियानपुढील टप्प्यात राबविण्यात येणार आहे.
- राज्यातील Poverty Diagnostic करण्याचे काम गोखले इन्स्टिटयूट यांना देण्यात आलेले आहेत.
- या अभियानाचा SPIP तयार करण्याच्या कामी मदत करण्यासाठी CORE GROUP व THEMATIC GROUP ची स्थापना करण्यात आली आहे. यामध्ये अभियानाच्या संबंधित नामवंत तज्ञ, सहभागी घटक, क्षेत्र कार्यातील प्रतिनिधी, युनिसेफ, माविम, नाबार्ड, TISS नामवंत स्वयंसेवी संस्था, ग्रामस्तरीय संस्था इ. चा समावेश करण्यात आलाआहे.

**Sukshmalok.com**

- सन 2014-15 यावर्षाकरिता आदिवासी उपयोजनेंतर्गत राज्यस्तरावरून रु.991.00 लाखाची तरतूद या योजनेसाठी केली आहे.
- ग्रामीण गरिबीच्या आव्हानाचा सामना करण्यासाठी, केंद्र आणि राज्य सरकारे संयुक्तपणे प्रकल्पांनानिधी देतात.

## ४.८ सारांश

सारांशाने असे सांगता येईल की, स्वयंसाहाय्यता बचत गटात चारचौघींना भेटून, वेगवेगळ्या विषयांवर बोलून थोडा वेळ कुटुंबाशिवाय अन्य विचार केल्यामुळे विकासाची कवाडे खुली होतात.वेगवेगळ्या निमित्ताने सामाजिक संस्था, बँकर्स, सरकार यांच्याशी महिलांचा संपर्क येतो. बचतगटकार्याच्यानिमित्ताने विविध बचत गटांच्या महिलांशी बोलता येते. या सगळ्यामुळे विकासाची एक एक पायरीघडून विकासाचं स्वप्न दृष्टि पथात येतं. स्वयंसाहाय्यता बचत गट या प्लॅटफॉर्ममुळे एकाच दिशेनेविविध पैलू पाडत पुढे नेणं शक्य

झालं आहे शिवाय, एकीचं तत्व सर्वश्रुत आहे. राजकीय पक्षांनाहीया चळवळीची दखल घ्यावी असं वाटू लागलंय.

.या चळवळीचा वेग थोडा कमी वाटला तरी ही चळवळ एका निश्चित दिशेने सुरू आहे.ज्या सामाजिक गटांतल्या लोकांसाठी ही चळवळ सुरू आहे. त्या दृष्टीने हा वेग इतका असणेसाहजिक आहे. यामध्येही काही धोके, अडचणी असतील, पण त्यांच्या तुलनेने चांगल्या बाजूअसल्याचे दिसते. यापुढे जाऊन भविष्यात यातून सहकाराची पुन्हा एकदा नवीन चळवळ उभीराहून सावकारी समूह नष्ट झालेली दिसून येईल. आजच्या जागतिकीकरण, खाजगीकरण,उदारीकरणाच्या युगातही ह्या चळवळीमुळे सूक्ष्मस्तरावर, गावपातळीवर असलेली ही चळवळ नक्कीचमहत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडण्यास मदत होईल, अशी आशा आहे. बलशाली भारत बनविण्याकरिताअल्पबचत नियोजन हे तत्त्वज्ञान नक्कीच उपयुक्त ठरेल, अशी अपेक्षा आहे.

## ४.९ स्वाध्याय

१. स्वयंसाहाय्यता गटाची ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगा.

२. स्वयंसाहाय्यता गटांची विविध वैशिष्ट्ये सांगा.

३. स्वयंसाहाय्यता गटाचे स्वरूप व कार्ये सांगा.

४. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची वैशिष्ट्येव तत्वेसांगा.

**संदर्भ:**

***1.*** *यशदा- यश मंथन- स्वयंसाहाय्यतागट विशेषांक यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे.*

***2.*** *स्वयंसाहाय्यता गट प्रशिक्षण पुस्तिका-भाग-१, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच,* महाराष्ट्रशासन*.*

***3.*** *भारतातील सामाजिक समस्या. श्री रा. ज. लोटे पिंपळापुरे एन्ड के पब्लिशर, नागपूर- ४४००२२* https://niti.gov.in/writereaddata/files/Maharashtra_Report_0.pdf

https://www.nabard.org/content1.aspx?id=23&catid=23&mid=530

https://www.nabard.org/auth/writereaddata/tender/cir क्र. 199.pdf

https://www.nabard.org/auth/writereaddata/tender/1709200741Cir_244_E.pdf

https://www.nabard.org/auth/writereaddata/tender/1709201406Cir_251_E.pdf

https://pib.gov.in/Pressreleaseshare.aspx?PRID=1575524

❖❖❖❖

# ५

# ग्रामीण विकासाचे स्रोत - II

**पाठाची रूपरेषा**

५.० उद्दिष्टे

५.१ प्रास्ताविक

५.२ कृषी- आधारित उद्योगसंक्षिप्त इतिहास

५.३ कृषी आधारित उद्योगसंकल्पना

५.४ कृषी आधारित उद्योगप्रकार

५.५ कृषी उद्योगाची कार्य

५.६ कृषी आधारित उद्योगमहत्त्व

५.७ सारांश

५.८ स्वाध्याय

## ५.० उद्दिष्टे

१) कृषी **आधारित**उद्योगाची संकल्पना समजून देणे.

२) कृषी आधारित उद्योगप्रकारमाहितीविद्यार्थ्यास देणे.

३)ग्रामीण विकासात कृषी **आधारित**उद्योगाचे महत्त्व विद्यार्थ्यास समजून देणे.

## ५.१ प्रास्ताविक

प्राचीन काळापासून शेती हा आपल्या भारत देशाचा प्राथमिक व मुख्य व्यवसाय आहे. आजहीआपण शेतीला महत्त्व देत आहोत. अशा या सर्वसमावेशक शेतीमध्ये कृषीला अनन्यसाधारण महत्त्वआहे. अतिरिक्त प्रमाणात तयार होणाऱ्या कृषी उत्पादनामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये म्हणूनत्याचबरोबर शेतीतील उत्पादनात सातत्य असावे, किमत स्थैर्य असावे या अनुषंगाने कृषी मालावरप्रक्रिया करणे अतिशय महत्त्वाचे आहे. यासाठी उद्योग हे महत्त्वपूर्ण कामगिरी बजावू शकतात. अशाकृषी **आधारित** उद्योगांविषयी माहिती मिळविणे गरजेचे आहे. भारतासारख्या कृषीप्रधान देशात कृषी **आधारित** उद्योग, प्रादेशिक समतोल विकासाचे उद्दिष्ट साध्य करणे व ग्रामीण भागातील बेकारी,दारिद्रय कमी करण्यासाठी कृषी उद्योग महत्त्वपूर्ण आहेत. जम्मू काश्मीर ते कन्याकुमारी तसेचअरुणाचल प्रदेश ते महाराष्ट्र, राजस्थान ह्या प्रदेशांचा म्हणजेच भारतासारख्या विशाल आणि

हवामान,तापमानातही विविधता लाभणाऱ्या संपूर्ण देशात विविध कृषी पिके आणि त्यावर आधारित उद्योगांचाविकास होताना आढळत आहे.

## ५.२ कृषी- आधारित उद्योगसंक्षिप्त इतिहास

सूती वस्त्र उद्योग हा भारतातील सर्वात प्राचीन उद्योग आहे. भारतातील पहिली कापड गिरणी कावसजी नाना भाय दावर यांनी २२ फेब्रुवारी १८५४ रोजी मुंबई येथे सुरू केली. देशातील पहिली कापड गिरणी फोर्ट ग्लास्टर येथे सुरू झाली. पण ती कापड गिरणी तात्काळ बंद पडली. सूती वस्त्र उद्योग याचा वाटा राष्ट्रीय औद्योगिक उत्पादनात १४ टक्के आहे. मुंबई, मालेगाव, इचलकरंजी ही शहरे सुती वस्त्रोद्योगासाठी प्रसिद्ध आहेत.

लोकरी वस्तू उद्योग साठी कानपूर येथील "लाल ईमली" हि देशातील पहिली लोकर गिरण सुरू झाली. यानंतर १८८१ मध्ये धारीवाल पंजाब, १८८२ मुंबई आणि १८८६ मध्ये बंगलोर कर्नाटक येथेही लोकर गिरण्या सुरू झाल्या. पंजाब मधील धारीवाल अमृतसर लुधियाना खरार येते २५७ लोकर गिरण्या आहेत आणि त्याचा उत्पादनात पहिला क्रमांक लागतो. महाराष्ट्र मध्ये मुंबई येथे ३१ आहेत आणि त्याचा उत्पादनात दुसरा क्रमांक लागतो. उत्तर प्रदेशामध्ये कानपूर, शहाजहानपूर, मिर्झापूर, आग्रा, वाराणसी येते लोकरीचे ३७ गिरण्या आहेत आणि त्याचा तिसरा क्रमांक लागतो. त्यानंतर गुजरातमध्ये जामनगर, अहमदाबाद, बडोदा, कलोल येथे १० गिरण्या आहेत आणि त्याचा चौथा क्रमांक लागतो. ऑस्ट्रेलिया, इटली व UK मधून आयात केलेल्या लोकरीपासून महाराष्ट्रात वस्त्रे तयार केली जातात.

साखर उसाच्या कच्च्या मालापासून तयार होते. साखर उद्योग हा कृषी-आधारित देशातील दुसऱ्या क्रमांकाचा मोठा उद्योग आहे. उत्तर प्रदेश हे उसासाठी सर्वाधिक क्षेत्र आहे. भारत हा जगातील ऊस व साखर उत्पादनात दुसऱ्या क्रमांकावर आहे. महाराष्ट्र मध्ये साखर उत्पादनात प्रथम क्रमांक आहे. आणि उत्तर प्रदेशाचा दुसरा क्रमांक आहे. महाराष्ट्र मधील अहमदनगर, कोल्हापूर, सांगली, सातारा, नाशिक, पुणे या जिल्ह्यात ३५ टक्के साखर उत्पादन तयार होते. आणि उत्तर प्रदेशामध्ये गोरखपूर, देवडीया, मेरट, सहारनपुर २४ टक्के साखर उत्पादन तयार होते. तामिळनाडूमध्ये कोईमतुर, तिरुचिरापल्ली, करुर, तिरुप्पुर येथे साखर उत्पादन ९.५३ टक्के होते. आंध्र प्रदेशामध्ये पूर्व गोदावरी, पश्चिम गोदावरी, कृष्णा, चित्तूर येथे ५.८ टक्के साखर उत्पादन होते. गुजरात मध्ये सुरत, भावनगर,अमरेली, बनासकांठा, जुनागढ येथे ५.५६ टक्के साखर उत्पादन होते. भारत जगातील सर्वात मोठा साखर उत्पादक देश असे ओळखले जाते. १०० टन उसापासून १० ते १२ टन साखर मिळते.

ताग उद्योग हा सुती वस्त्रोद्योग यानंतर दुसऱ्या क्रमांकाचा वस्त्रोद्योग आहे. १८५५ साली कोलकत्ता जवळ रिश्रा याठिकाणी भारतातील पहिली ताग गिरणी सुरू झाली. तागाचे उपयोग दोर आणि यासारख्या अनेक उत्पादनासाठी केला जातो. पश्चिम बंगाल मधील कोलकात्ता, हावडा, टिटाघर, बालीगंज, नैहाती, भद्रेश्वर येथे ६४ ताग गिरण्या आहेत आणि त्याचा उपयोग ८४% होतो. त्यानंतर आंध्र प्रदेशामध्ये गुंटूर विशाखापट्टणम एलूरू ओंगोल चिलीवेसला येथे सात ताग गिरण्या आहेत त्याचा दुसरा क्रमांक लागतो व तेथे तागाचा

उत्पादन १० टक्के केला जातो. देशांमधील एकूण ८३ ताग गिरण्या आहेत. ताक उत्पादक विकास महामंडळाकडून ताग उद्योगाचे व्यवस्थापन केले जाते. ताग उत्पादनात पश्चिम बंगाल हे राज्य देशात आघाडीवर आहे.

किंबहुना 20 शतकातभारतात १९६० पासून हळूहळू परंपरागत (शेती) कृषी पद्धतीत बदल होत गेले. अन्नधान्याबाबतस्वयंपूर्ण होण्यासाठी भारताने हेतुपुरस्सर हा कृषी क्षेत्रात बदल घडवून आणला. ह्यातूनच पुढे हरितक्रांतीचा उदय झाला. आधुनिक व नवीन तंत्र व यंत्र यांच्याशी मिळत्या-जुळत्या नसणाऱ्या शेती/

जमीन कसण्याच्या जुन्या व परंपरागत पद्धतीचा त्याग करून त्याऐवजी नवीन पद्धती या काळातअवलंबिली जाऊन त्याद्वारा कृषी उत्पादनाची पातळी वाढविण्याचा प्रयत्न केला गेला.कृषीसाठी लागणाऱ्या वरील गोष्टींबरोबरच कर्जाची सोय, पीक संरक्षणाबाबत मार्गदर्शन,कृषी संशोधन, शेतमाल किंमत शाश्वती, साठवणूक सोयी, अश अनेक प्रकारच्या योजनाराबवण्यात आल्या.उद्देश हा की, जमिनीतून निर्वाह स्वरूपाचे उत्पादन न घेतात्यामध्ये व्यापारी दृष्टिकोन निर्माण व्हावा आणि कृषीला महत्त्व प्राप्त व्हावे, अन्नधान्याच्या बाबतहीस्वयंपूर्णत्व मिळावे ह्या दृष्टीने कृषीमध्ये नवनवीन प्रयोग करण्यात आले.

## ५.३ कृषी आधारित उद्योगसंकल्पना

प्रत्यक्ष जमीन कसून जे जमिनीतून उत्पादन घेतले जाते ते **कृषी उत्पादन** होय. आजही **७०%** जनता ही शेतीवर प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे अवलंबून आहे. शेतीचे/जमिनीचे क्षेत्रदिवसेंदिवस कमी होत आहे. त्यामुळे शेतीवरील लोकसंख्येचा भार वाढला आहे. या अतिरिक्तअसलेल्या लोकसंख्येला उद्योग आणि सेवाक्षेत्रात रोजगार देण्याची संधी निर्माण झाली आहे. अशावेळीकृषीमालावर वा शेतीमालावर प्रक्रिया करून दुय्यम स्वरूपाचा टिकावू माल तयार करणारे कृषीउद्योग हे महत्त्वाचे ठरत आहे.देशाच्या आर्थिक नियोजन आणि प्रगतीमध्ये कृषी-उद्योगांच्या विकासाला महत्त्वपूर्ण महत्त्व प्राप्त झाले आहे.

**संकल्पना:**

**"कृषीतून किंवा शेतीतून उत्पादित झालेल्या मालावर प्रक्रिया करणारी कारखानदारी किंवा कृषी मालाचाकच्चा माल म्हणून वापर करणारे कारखाने यांना कृषी आधारितउद्योग असे संबोधले जाते".**

**"**कृषी-आधारित उद्योग म्हणजे फुलशेती आणि भाज्यांची लागवड आणि सर्व फळे आणि भाजीपाला कापणीनंतरच्या प्रक्रियासह**,** कृषी आणि बागायती पिकांच्या नियंत्रित परिस्थितीत लागवडीमध्ये गुंतलेली कोणतीही क्रिया**".**

काही वेळेस शेतीला पूरक असणाऱ्या उद्योगांचाही समावेश कृषी उद्योगात केला जातो.तसेच शेती वा कृषी विकासाकरिता आवश्यक असणारी खते, अवजारे, यंत्रसामुग्री,किटकनाशके इ. वस्तूंची निर्मिती करणाऱ्या उद्योगांचाही समावेश कृषी उद्योगात केला जातो.




**Youtube.com**

## ५.४ कृषी आधारित उद्योगप्रकार

कृषी उद्योगांचे प्रकार अभ्यासण्यासाठी उद्योगांचे जे प्रामुख्याने चार विभागात वर्गीकरण केलेजाते ते आपण पाहू.

१) साधनांवर आधारित उद्योग,

२) मागणीवर आधारित उद्योग,

३) कौशल्यावर आधारित उद्योग,

४) दुय्यम स्वरूपाचे उद्योग,

**१) साधनांवर आधारित उद्योगाचे पुढील प्रकार पडतात**

**अ. कृषी आधारित उद्योग,**

ब. खनिजांवर आधारित उद्योग,

क. पशुधन व कुक्कुटपालनावर आधारित उद्योग,

**कृषी उद्योगांचे साधारण दोन प्रकारांत वर्गीकरण केले जाते.**

**अ)** उत्पादनावर आधारित उद्योग,

**ब)** निविष्टा (Input) उत्पादन करणारे उद्योग,

**अ)उत्पादनावर आधारित उद्योगांमध्ये खालील प्रकार पडतात**

***i) कृषी प्रक्रिया उद्योग,***

***ii) शेतमालावर आधारित वस्तूनिर्माण उद्योग,***

***iii) अन्न उद्योग (Food Industry)***

***iv) पशुधन व कुक्कुटपालनावर आधारित उद्योग.***

**ब)निविष्टा (Input) उत्पादन करणाऱ्या उद्योगात खालील प्रकारांचा समावेश होतो:**

***१. कृषी सेवा केंद्र.***

***२. शेतीसाठी लागणाऱ्या बाबी/निविष्टा उत्पादन करणारे घटक,***

वरील **कृषीआधारित**उद्योगांचे वर्गीकरण सविस्तराने करता येईल.कृषी क्षेत्रात तयार झालेल्या कच्च्या मालावर प्रक्रिया करून दुय्यम स्वरूपाचा माल उत्पादितकेला जातो. ह्यामध्ये कच्च्या मालाचे मूळस्वरूप व नव्याने प्रक्रिया करून उत्पादित झालेल्या मालामध्येफारसा फरक आढळत नाही. तसेच मालाची वाहतूक, हाताळणी, साठवणूकही सोयिस्कर व्हावी हाउद्देश डोळ्यासमोर ठेवून केवळ साधी प्रक्रिया केली जाते. उदा. भातगिरणी, डाळगिरणी,शेतमालावर आधारित वस्तूची निर्मिती करणारे उद्योग:ह्यामध्ये शेतमालाचा कच्चा माल म्हणून उपयोग करून पूर्णपणे नवीन वस्तू उत्पादित केलीजाते. ह्यामध्ये नव्याने उत्पादित झालेली वस्तू पूर्णपणे वेगळी असते. उदा. कॉफी, कापड, साखर,तेल, कोको वगैरे.

**अ) उत्पादनावर आधारित उद्योगांमध्ये खालील प्रकार पडतात**

***i) कृषी प्रक्रिया उद्योग,***

**१) भातपीक:**भातापासून तांदूळ, पोहे, कुरमुरे तयार केले जातात. तसेच कोंड्यापासून तेलही तयारकेले जाते. भातापासून नुडल्स तयार करण्याचे प्रयत्न यशस्वी झाले आहेत.

**२) मका:**मक्यापासून पीत, मक्याची कणी, स्टार्च, ग्लुकोज, कागद, मक्याच्या कडव्यापासून पशुखाद्य

तयार करण्यावर भर दिला जातो.

**३) तेलबिया**:भुईमूग, जवस,करडई, सूर्यफूल, मोहरी, तीळ, सोयाबीन, सरकी ह्यापासून मोठ्या प्रमाणात

खाद्यतेल निर्मितीवर देण्यात आला आहे. उरलेल्या कॉड्याचा पेंड म्हणून पशुखाद्यासाठी वापरकरण्यात येतो.

**४) ऊस:**उसापासून साखर कारखाने, गुन्हाळे, खांडसरी, मळी, चिपाडे, ॲसेटीन, आंबवण यारकेले जातात. राहिलेल्या पाचटपासून कागद तयार करण्यावर भर दिला जातो.

**१) कापूस**ह्यामध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणात कापड निर्मिती कारखाने उभे आहेत.

**६) चहा :**चहाचे विविध प्रकार बाजारात उपलब्ध आहेत.

**७) फळे:**विविध प्रकारच्या फळांपासून लोणचे, जॅम, जेली, पावडर, पाल्प, सरबते तयार करणारेउद्योग कार्यरत आहेत. काही फळांचा उपयोग हा सौंदर्य प्रसाधनात होताना दिसतो.

**८) भाज्या :**विशेषत : टोमॅटोपासून रस, पावडर, केचप तयार करणारे उद्योग आहेत. तसेच मेथीपासूनकस्तुरी मेथी तयार करणारे उद्योग आढळतात. इतरही भाज्या वाळवून त्यापासून पूड तयार करण हा उद्योग करणारे लघु कारखाने आढळतात.

***ii) शेतमालावर आधारित वस्तूनिर्माण उद्योग,***

**मसाल्याचे पदार्थ :**मिरची, हळद, दालचिनी, मिरी, जिरे ह्यासारख्या मसाल्यांच्या पदार्थांवर प्रक्रिया करून

पावडर केली जाते. हे मसाल्याचे पदार्थ स्वयंपाकात उपयोगात आणले जातात. तर बऱ्याच पदार्थाचासमावेश आयुर्वेदातील औषधे तयार करण्यासाठी केला जातो.ह्यासारख्या इतर अनेक कृषी उत्पादन उद्योगांचा समावेश ह्यामध्ये होतो.

***iii) अन्न उद्योग (Food Industry)***

शहरी भागातून अन्नउद्योग म्हणजेच तयार मालास (Instant) भरपूर मागणी आहे. शहरातपती-पत्नीच नोकरी करण्याचा कल अधिक असतो. त्यामुळे अन्न पदार्थ / जिन्नस तयार स्वरूपातस्वीकारणाऱ्यांचे प्रमाणही अधिक असते. ह्यामध्ये बेकरीतील पदार्थ, गोठवलेले अन्न, प्रक्रिया केलेलीफळे - भाज्या, पेये, हवाबंद डब्यात असलेले मांस, मासे, शीतपेये दुधउत्पादने ह्यांचा समावेशअसतो. अतिशय कमी वेळेत शिजवून तयार होतील किंवा नुसते गरम केल्यास खाता येतील किंवाआहे त्या स्वरूपात स्वाद घेता येईल ह्याचा विचार शहरातील धावपळीच्या जीवनात अधिक होतानादिसतो. त्यामुळे वरील उत्पादनांना मोठ्या प्रमाणात मागणी असते.ह्यासाठी योग्य संघटन, विपणन (बाजारपेठ), आधुनिक उत्पादन तंत्र, शास्त्रीय व्यवस्थापनह्यामुळे अन्नउद्योग शहरी भागात मोठ्या प्रमाणात पसंतीस उतरत आहेत.

***iv) पशुधन व कुक्कुटपालनावर आधारित उद्योग.***

आहाराचा दर्जा सुधारण्यासाठी ह्या उद्योगांना महत्त्वाचे स्थान आहे. दुग्ध व दुग्धजन्य पदार्थह्यांना फार मोठी मागणी आहे. ह्या उद्योगातून विपणन, संकलन, प्रमाणीकरण, प्रक्रिया व वितरणह्यासाठीच्या बाबतीत रोजगार निर्मितीस फारच मोठा वाव आहे. आमूल, वारणा, महानंदा ही उदाहरणेदेता येतील. दुग्ध प्रक्रियांमध्ये चीज, लोणी, मख्खन, श्रीखंड, लस्सी, खवा, अनेकविध स्वीट्स.अशा प्रकारे उत्पादने घेता येतात.तसेच मांस व पक्षापासून (कॉबडी, बदक) अंडी ह्यापासून दुय्यम स्वरूपाची उत्पादने म्हणजे

मांस गोठवणे वा तयार स्वरूपात खाण्यास उपलब्ध करून देण्यासाठी हवाबंद डब्यातून विक्रीसउपलका करून देणे तसेच कातडीपासून चामडे - चामड्यापासून इतर अनेक वस्तू तयार करणारेउद्योग, शिंगे, पिसे ह्यापासून शोभिवंत वस्तू तयार करणारे उद्योग, मेंढरांच्या लोकरापासून विविधवस्तू तयार करणारे उद्योग ह्यांचाही समावेश ह्या उद्योगात होतो.

**ब) निविष्टा (Input) उत्पादन करणाऱ्या उद्योगात खालील प्रकारांचा समावेश होतो:**

***१. कृषी सेवा केंद्र.***

ह्यामध्ये रोपवाटिका, कृषी बाजारपेठा, वित्तपुरवठा कृषी यंत्रसामुग्री, कृषी प्रशिक्षण संस्था,कृषी विद्यापीठे, कृषी संशोधन केंद्रे, कृयीच्या विकासाबाबतचे साहित्य प्रकाशन, कृषीविषयक सल्लाह्यांचा समावेश होतो. कधी बाजारपेठेत घडणाऱ्या विविध प्रकारच्या क्रिया त्यामध्ये मालाची प्रतवारी, श्रेणीकरण, प्रमाणीकरण, वाहतूक, साठवणूक, हाताळणी, बाजारमाहिती, पॅकिंग, जाहिरातबाजी,विविध खरेदी-विक्रीच्या पद्धती त्यातील अजते, दलाल, कमिशन एजंट इ. चा समावेश होतो. कृषीसंशोधन शेतकऱ्यांपर्यंत जाण्यासाठी विविध प्रसार माध्यमांचा स्वीकार केला जातो. पाणीपुरवठ्याची आधुनिक पद्धती तयार करणारे उद्योग उदा.जैन इरिगेशन. ह्या सर्वांचा समावेश कृषी सेवा उद्योगातm झालेला दिसून येतो.असे विविध प्रकारात कृषी उद्योगांचे वर्गीकरण करता येईल.

***२. शेतीसाठी लागणाऱ्या बाबी/निविष्टा उत्पादन करणारे घटक:***

शेती निविष्टा उत्पादन करणारे उद्योगशेतीसाठी विविध संसाधनांची गरज असते. शेतीची/जमिनीची मशागत करण्यासाठी लागणारीसाधने अगदी विळी, फावडे, कुदळ ह्यापासून कार, टॅक्ट्रपर्यंतची साधने ही शेतीसाठी गरजेचीअसतात.तसेच बी-बियाणे तयार करण्यासाठी लागणाऱ्या प्रयोगशाळा, खते तयार करणारे कारखाने, औषधे तयार करणारे उद्योग, मालाची वाहतूक करणारी साधने ह्यासारख्या बाबींसाठी साहाय्यकउद्योगांची मोठ्या प्रमाणावर गरज असते. ह्यामध्ये कुशल श्रमिकांना प्रथम स्थान दिले जाते. ह्यामुळेउत्पादन वाढीला चालना मिळते. शेती व उद्योगांचा समतोल विकास साधण्यास साहाय्यक उद्योगमहत्त्वाची भूमिका बजावतात.

## ५.५ कृषी उद्योगाची कार्य

भारताच्या ग्रामीण विकासात कृषी मालावर आधारित उद्योगांचे कार्य महत्त्वाची आहेत. हेपुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल,

### १) रोजगार पुरवठा

कृषी उद्योग हे मूलत : लहान प्रमाणावर चालत असल्याने त्यांची रोजगार निर्मितीची क्षमताजास्त आहे. भांडवल गुंतवणूक व रोजगाराचे प्रमाण जास्त असल्याने ग्रामीण लोकांना रोजगाराचीसंधी उपलब्ध होते. ग्रामीण भागात आढळणारी अर्धबेकारी, हंगामी बेकारी, छुपी बेकारी व उघडबेकारी कमी करण्याच्या दृष्टीने हे उद्योग महत्त्वाची कामगिरी पार पाडतात.

### २) शेतमालाला पूरक व्यवसाय:

अनेक कृषी उद्योग हे शेतीला पूरक अथवा साहाय्यभूत ठरतात. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होते.




Youtube.com

**३) कमी भांडवल:**

भारतात भांडवलाची टंचाई आहे. अशा स्थितीत आर्थिक विकास साध्य करण्यासाठी कमीभांडवलावर उभारता येणारे कृषी उद्योग ही महत्त्वाची भूमिका पार पाडतात.

**४) ग्रामीण भागात अस्तित्व**

बहुसंख्य कृषी उद्योगाचे स्थानिकीकरण ग्रामीण भागात झाल्याचे आढळते. उदा. साखरउद्योग, रेशीम उद्योग, हातमाग उद्योग इ. त्यामुळे शहरीकरणाचे दुष्परिणाम टाळता येतात. शहरीउद्योगामुळे अनेक सामाजिक व राजकीय व इतर समस्या निर्माण झालेल्या आढळतात. या ग्रामीणभागातील उद्योगांमुळे शहरीकरणावरील ताण कमी व्हायला मदत होते.

**५) स्थानिक कच्चा माल :**

कृषी उद्योगावर आधारित उद्योगात सामान्यत : स्थानिक कच्च्या मालाचा वापर केलाजातो. त्यामुळे तेथील शेतमाल उत्पादकाच्या उत्पादनास योग्य किंमत मिळून त्यांचे उत्पन्न वाढते.

**६) समतोल विकास:**

मोठे उद्योग प्रामुख्याने शहरी भागात केंद्रित झाल्याने शहरी भागाचा विकास होऊन ग्रामीणभाग अविकसित राहतो. परंतु देशात कृषी उद्योगांची वाढ झाल्यास प्रादेशिक विकास होऊन आर्थिक विकासातील विषमता कमी होणे शक्य होते.

**७) कुटिरोद्योग:**

बरेच कृषी उद्योग हे शेतकरी कुटुंबांना स्वत :च्या घरातच करता येत असल्यामुळे त्यांच्याघरातील (कुटुंबातील) व्यक्तींना त्यात काम उपलब्ध होते.

**८) अल्प तंत्रज्ञान:** मत्स्यपालन, पशुपालन, दुग्धोत्पादन, मधुमक्षिका पालन यासारखे अनेक कृषी उद्योग अल्पशातंत्रज्ञानावर सुरू करता येतात. म्हणजे त्यांच्या स्थापनेची सुलभता असल्याने कमी शिक्षित ग्रामीण लोकांना हे सहजासहजी करता येतात.

**९) उत्पादनात विविधता**:कृषी उद्योगांनी विविध वस्तूंची निर्मिती होते. त्यामुळे त्यात विविधता येते.

**१०) नैसर्गिक साधनसामुग्रीचा पर्याप्त उपयोग:**

कृषी उद्योगांना आवश्यक कच्चा माल त्या-त्या ठिकाणच्या उत्पादनातून मिळत असल्याने देशातील नैसर्गिक साधनसामुग्रीचा योग्य आणि पूर्णपणे उपयोग होऊ शकतो.

**११) उपफल निर्मिती:**साखर उद्योग आणि अन्य काही उद्योग पूरक वस्तूंची म्हणजेच उपफलांची निर्मिती होत असल्याने उत्पादनात विविधता येतेच, शिवाय उत्पादनाचा सरासरी खर्चही कमी व्हायला मदतहोते.

**१२) औषधी वनस्पतींचा वापर:**कृषी उद्योगात डोंगराळ दुर्गम भागात आढळणाऱ्या औषधी वनस्पतींचा वापर केला जातअसल्याने भटक्या आदिवासी जनजातींच्या विकासास साहाय्य होते.

**१३) ग्रामीण उत्पन्नात वाढ व दारित्र्य निर्मूलन**ग्रामीण भागात कृषीवर आधारित उद्योग उभारल्याने त्यांच्या मालाचा कच्चा माल म्हणूनवापर झाल्याने अथवा त्यावर प्रक्रिया करणारे उद्योग अस्तित्वात आल्याने त्यांच्या शेतमालाला चांगली किंमत मिळून त्यांचे उत्पन्न वाढते. शिवाय पूरक कृषी उद्योगांमुळे त्यांच्या उत्पन्नात वाढहोण्यास मदत होते. एकूण ग्रामीण भागातील लोकांच्या उत्पन्नात वाढ होऊन त्यांना दारिद्रय रेषेच्यावर आणणे शक्य होते. सारांशाने असे सांगता येईल की, दारिद्रय निर्मूलनाच्या कार्यात कृषी उद्योगांचा सहभाग महत्त्वाचा आहे.

**१४) आर्थिक विषमता कमी करणे :**ग्रामीण भागात आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणात आढळते. कृषी उद्योगांचा विकास झाल्यासकमी उत्पन्न गटातील लोकांना पूरक व्यवसाय उपलब्ध होऊन त्यांची उत्पन्न पातळीतही वाढ होते.त्यामुळे ग्रामीण भागातील आर्थिक विषमता कमी होण्यास साहाय्य होते.

**१५) साठवणुकींच्या सोयींचा विकास :**कृषी उद्योगांच्या वाढीमुळे ग्रामीण भागात शेतमाल साठविण्यासाठी साठवणुकींच्या सोयींचा विकास घडून येतो.

**१६) वाहतूक व दळणवळणाचा विकास** :

कृषी उद्योगामुळे ग्रामीण भागातील रस्ते वाहतुकीचा विकास घडून येतो. वाहतुकीच्या साधनातव सोयीत वाढ होते. पोस्ट, तारघर, टेलिफोन, फॅक्स, इंटरनेट, मोबाईल यासारख्या दळणवळणाच्या साधनातही विकास होऊन समतोल विकास नियोजनाचे उरिष्ट साध्य व्हायला मदत होते.

**१७) ग्रामीण बचतीत वाढ:**ग्रामीण उद्योगांमुळे ग्रामीण भागातील लोकांचे उत्पन्न वाढून त्यांची बचत करण्याची क्षमताबाळगते. मुळातच ग्रामीण लोकांची उपभोग क्षमता कमी असल्याने अतिरिक्त उत्पन्नाचा बराच भागबचत होऊन तो देशाच्या विकास कार्यासाठी उपलब्ध होतो.

**१८) प्राथमिक सोयीत बाढ:**

रस्ते, वीज, पाणी, शिक्षण, बँका, सहकार, वाहतूक व्यवस्था, पोस्ट यासारख्या सोयीकृषी उद्योगांमुळे ग्रामीण भागात अस्तित्वात येतात. त्यामुळे ग्रामीण भागाथा सर्वांगीण विकास घडूनयेण्यास चालना मिळते.

**१९) बाजारपेठ विकास:**प्राथमिक सोयीत वाढ झाल्याचा फायदा म्हणजे शेतमालाची विक्री करण्यासाठी बाजारपेठांचा उदय व विकास घडून येतो. विशेषत : सहकारी बाजारपेठांची चळवळ उदयास येऊन त्यांची

यशस्वितही वाढते. ह्यामुळे शेतमाल उत्पादकांचा अनेक बाजूंनी फायदा झाल्याचे दिसते. तसेच राजकारणातही सक्रियता वाढलेली दिसून येते.

**२०) ग्रामीण उपक्रमशीलतेला बाब:**बऱ्याच ठिकाणी उद्योगांच्या स्थापनेसाठी अल्प भांडवल व अल्प तंत्रज्ञानाची आवश्यकता असल्याने ग्रामीण भागातील नवीन उद्योजक या क्षेत्रात पदार्पण करतात. त्यामुळे त्यांच्या ठिकाणी असलेल्या संयोजन कौशल्यावर संधी मिळते.

**२१) सहकारी संस्थांचा विकास:**सहकार हे दुर्बल घटकांचे ऐच्छिक संघटन आहे. ग्रामीण भागात सहकारी तत्त्वांवर कारखानदारी वाढीस लागली आहे. कृषी उद्योगांमुळे प्रक्रिया, उत्पादन, वितरण, पतपुरवठा, वाहतूक, सातवणूक, खरेदी-विक्री क्रिया इ. बहुतेक सर्वच क्षेत्रांत सहकारी चळवळ ग्रामीण भागात फोफावली आहे.

**२२) निर्यात वाढ:**रेशीम कापड, चहा, कॉफी, साखर, कापड, ज्यूट, मसाले यासारख्या असंख्य कृषीउद्योगातील उत्पादनाची निर्यात होत आहे. अलीकडे फळावर प्रक्रिया करून त्यांची निर्यात वाढविण्याचा

उद्योग विकसित होऊ लागला आहे. अशा निर्यातीपासून देशाला बहुमोल असे परकीय चलन उपलब्धहोते.

**२३) लोकांच्या राहणीमानात बदल:**वरील सर्व कार्यांचा ऊहापोह होत असताना असे लक्षात येते की, कृषी उद्योगांमुळे ग्रामीण भागातील लोकांच्या राहणीमानात सुधारणा घडून येत असून ग्रामीण भागाचा कायापालट करण्यासाठी कृषी उद्योग कार्य करीत आहेत,अजून काही **उदाहरणे आपण पाहू.** ह्या उदाहरणांवरून आपणांस हा भाग समजण्यास अधिक सोपाजाईल.

**नारळ** नारळाच्या झाडापासून कॉयर बनवतात, अनेक शोभिवंत वस्तू तयार करण्यासाठी नारळाच्याझाडापासून उपयोग केला जातो. नारळाचे दूध काढून ते विक्रीसाठी उपलब्ध करून दिले जाते.ताडाच्या झाडापासून चटया, पिशव्या देशात, तसेच परदेशातही जास्त लोकप्रिय आहेत.तसेच पामतेल, ताडगूळ, नीरा, ताठी तसेच सफाईचे ब्रश तयार केले जातात.

**तुती:** तुतीच्या झाडापासून रेशीम उद्योग करता येतो. रेशीम उद्योग हा कृषीवर आधारित रोजगाराची

प्रचंड क्षमता असलेला गृहउद्योग आहे. ह्यामध्ये कुटुंबातील महिला व्यस्त असतात. छोट्याशाजागेत आपण रेशीम किडे पाळून त्यापासून कोष मिळविण्याचा व्यवसाय करू शकतो. रेशीम उत्पादनाची परदेशात निर्यात होते. त्यामुळे परकीय चलन मिळण्यास हा व्यवसाय उपयुक्त आहे.

**बांबू:** बांबूपासून अनेक प्रकारचे व्यवसाय करता येतात. बांबू कामापासून अनेक शोभिवंत वस्तू तयार करणे, ग्रामीण भागातील घराच्या बांधकामात बांबूला महत्त्वाचे स्थान आहे. उत्तर –पूर्वीय भागात तसेच आदिवासी समाजात आहारात बांबूचा उपयोग केला जातो. बांबू शूट पिकल नावाचीलोणची तयार करण्याचे प्रयत्न यशस्वी होताना दिसत आहे. भविष्यात बांबूपासून अनेक प्रकारचे उत्पादन तयार करण्याबाबत संशोधन चालू आहे. आदिवासी भागातील लोकांसाठी फार मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होऊ शकते.

**कापूस:** कापसातून सरकी काढून कापसाचे जिनिंग व प्रेसिंग करून त्यांच्या गाठी बांधणारे उद्योगविकसित झाले आहे. शिवाय देशात सूत गिरण्या व कापडगिरण्या अस्तित्वात येऊन लाखो कामगारांना

रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. हातमागावर अजूनही रोजगार उपलब्ध आहे. कापसापासूनकाढलेल्या सरकीपासून तेल काढण्याचा व्यवसाय केला जातो.

**गळिताची पिके:** गलीतांच्या पिकांपासून मोठ्या प्रमाणात तेल उद्योग विकसित झाले आहेत. यामधून मिळालेल्या तेलाचा वापर खाद्यतेल म्हणून तसेच वनसती तूप, साबण, औषधे इ. मध्येही मोठ्या प्रमाणात होताना दिसतो. आज प्रचंड मोठ्या प्रमाणात ह्यापासून रोजगार होत आहे. तंबाखू तंबाखूपासून तपकीर, जर्दा, विड्या, सिगरेट, पेस्ट ह्यांची निर्मिती मोठ्या प्रमाणात होताना दिसते. टिंबुर्णीची पाने गावाकडे उपलब्ध असल्यामुळे मोठ्या प्रमाणात विड्या वाळण्याचे उद्योग ग्रामीण भागात दिसून येतात.

**अन्नधान्य व कडधान्ये:**अनेक प्रकारच्या अन्नधान्यापासून विविध पिठं तयार करून त्यापासून इतर दुष्यम स्वरूपाचे उत्पादन घेतले जाते. उदा. नागलीपासून पापड करण्याचे उद्योग आदिवासी भागात सुरू आहेत. ह्यामुळे महिलांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळाला आहे.

कडधान्ये कडधान्यापासून डाळी आणि पुढे डाळीपासून पीठ आणि पिठापासून विविध खाद्य उत्पादनेm तयार करण्यावर भर दिला जात आहे.

**ज्यूट:** ज्यूट उद्योग भारतात पूर्वीपासूनचा उद्योग आहे. त्यापासून पोती, गोणपाट, गालीचे यासारख्या वस्तूंचे उत्पादन मोठ्या प्रमाणात केले जाते.

**कॉफी:** कॉफीचे पीक व्यापारी पीक म्हणून घेतले जाते. आज विविध कंपन्या (कारखाने) आपणकेलेल्या प्रक्रियांचे ब्रैड किती चांगले आहेत ह्याची जाहिरात करताना दिसतात.

**कोको:** खाद्य पदार्थाच्या निर्मितीत ह्याचा समावेश केला जातो. उदा. चॉकलेट, केक इ. झाडापानांपासून कोकेन मिळते.

**विविध फळे:** ॲपल, केळी, चिकू, अंजीर, बदाम, आंबा वगैरे ह्यासारख्या फळांवर प्रक्रिया करून ड्रायफूट

तयार करण्याचे उद्योग मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. ह्या ड्रायफूटना मागणीही मोठी आहे.पपयापासून टुटीफूटी करण्याचे उद्योग सुरू झाले. काही फळांपासून अर्क काढला जातो.

**कोकम:** ग्रामीण भागात कोकम ह्या झाडापासून फळे मिळविली जातात. त्याचा उपयोग जेवणात

औषध म्हणून केला जातो. तसेच अर्क, सरबते तयार करण्यासाठीचा उद्योग ग्रामपातळीवर मोठ्याप्रमाणात बाळसे घेत आहे.गावाकडे असलेल्या जंगलापासून अनेक प्रकारची उत्पादने घेतली जातात. उदा. कठीणलाकूड इंधनासाठी (विशेषत : बेकरी) वापरले जाते. औद्योगिक वापरामध्ये प्रामुख्याने मऊ लाकूड

वापरले जाते. मऊ लाकडाचा घरबांधणी, फर्निचरसाठी वापर केला जातो. तसेच पेट्या, आगकाड्या,कागद कारखान्यात लागणाऱ्या लगद्यासाठी वापर केला जातो. लाकडामधील सेल्युलोजपासून रेयॉन, प्लास्टिक, छायाचित्रणासाठी चित्रफिती, लाखेचे रोगण व स्फोटक पदार्थ तयार होतात. ओक वनस्पतीपासून बाटल्यांची बुचे तयार करण्यासाठी त्याचा वापर करतात. तर चंदनासारख्या लाकडाचासुगंधा द्रव्याचा उपयोग साबण तयार करण्यासाठी, अगरबत्ती तयार करण्यासाठी केला जातो.ह्यासारख्या व्यवसायापासून ग्रामीण भागात, आदिवासी भागात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीझाली आहे.

शेतीपूरक व्यवसायात मत्स्यव्यवसायाचा समावेश होतो. भारताच्या किनारपट्टीत नदी, तलाव,तळी, खाडीचा काही भाग ह्यामध्ये हा व्यवसाय चालतो. माशांचे अंडीपुंज कमावणे, बोटुकली एवढीमासळी तयार करणे किंवा मोठ्या माशांचे उत्पादन घेणे. ह्यासारख्या व्यवसायातून मोठ्या प्रमाणातगावपातळीवर रोजगार निर्मिती होत आहे.ग्रामीण भागात जमीन कसत असताना इतर कृषी संलग्न व्यवसाय ग्रामीण भागात मोठ्याप्रमाणात केले जात आहे. प्रक्रिया उद्योगही मोठ्या प्रमाणात असल्यामुळे रोजगार निर्मितीही त्याचप्रमाणातहोत आहे. त्यामुळे लोकांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा घडून येत आहे. म्हणजेच कृषी उद्योगाचाविकास म्हणजे खऱ्या अर्थाने भारतीय ग्रामीन अर्थव्यवस्थेचा विकास होय.

## ५.६ कृषी आधारित उद्योगमहत्त्व

वरील उल्लेखावरून आपणांस हे कृषी उद्योग भारतीय अर्थव्यवस्थेत मोलाची कामगिरीबजावताना दिसून येतात. पुढील विश्लेषणावरून ग्रामीण रोजगार निर्मितीत कृषी उद्योगांचे महत्त्वअजून स्पष्ट करता येईल.

### १) रोजगार निर्मिती:

कृषी उद्योगामुळे लहान/मोते/मध्यम प्रमाणात प्रक्रिया उद्योग उभे राहतात. अर्थात ह्यासाठीकुशल व अकुशल कामगारांची मोत्या प्रमाणावर गरज असते. या उद्योगांमुळे दोन्ही

प्रकारच्या कामगारांना रोजगाराची संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध झालेली दिसून येते. रोजगार निर्मितीच्या दृष्टिकोनातून कृषी उद्योग मोठ्या प्रमाणत महत्त्वाची भूमिका बजावतात.

**२) स्थूल राष्ट्रीय उत्पादनात सहभाग**:

राष्ट्रीय उत्पन्न वाढून दरडोई उत्पन्न वाढल्यास लोकांचे राहणीमान उंचावते. कृषी उद्योगराष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडवून आणण्याची कामगिरी करतात. प्रत्यक्ष कृषीमाल प्रक्रिया उद्योग आणित्यासाठी साहाय्यक अगर पूरक उद्योग म्हणजेच कृषी उद्योगांना सुटे भाग पुरविणारे उद्योग तयारझाल्यामुळे मोठ्या प्रमाणात राष्ट्रीय उत्पादनात पर्यायाने उत्पन्नात वाढ झाली आहे.

**३) सामाजिक आर्थिक विकासात वाढ**:

कृषी उद्योगामुळे शेतकऱ्यांस भांडवल य सेवा पुरविल्या जातात. (उदा. बियाणे, प्रशिक्षण,संसाधने, उत्पादन व बाजारपेठा) शेतकी उत्पादकता वाढविण्यासाठी, शेतमालाच्या सतत मागणीसाठी,शेतकऱ्यांची शेतीविषयक साहसता वाढविण्यासाठी कृषी उद्योगांचे फारच महत्त्व आहे.तसेच शेतकऱ्यांना बाजारपेठेसोबत जोडण्यास, बाजारपेठेतील व्यवहार करण्यास, प्रक्रियाकरण्यास अतिरिक्त मालाचे उत्पादन घेऊन ते विकण्यास शेतकी मालाचे वितरण करण्यात महत्त्वआहे.शेतीउत्पादकता आणि गुणवत्तेमुळे शोतीतील परतावा, यामुळे आर्थिक स्थैर्य निर्माण होते.त्यामुळे कौटुंबिक संरक्षण व अन्न सुरक्षितता यामध्ये फार मोठा नवा बदल घडून येप्यास ही मूल्यसाखळी महत्त्वाची आहे.

**४) दारित्र्य निर्मूलनास:**

सबळ कृषी उद्योगामुळे उत्पादनात वाढ आणि लहान भूधारकांसाठी सबळ साखळी निर्माणहोण्यास मदत होते. पर्यायाने दारिद्रय निर्मूलनास मदत होते. म्हणजेच गावपातळीवर अल्प, अत्यल्प,भूधारक, कारागीर, भूमिहीन शेतमजूर यांची संख्या मोत्या प्रमाणात आहे. या घटकाला मोठ्याप्रमाणात शेतात रोजगार व कृषी उद्योगात कुशल रोजगारी मिळते. महिलांनाही त्यांच्या क्षमतेप्रमाणे उद्योगात वा शेतात सामावून घेतले जाते. त्यामुळे कृषी उद्योग ज्या ज्या ठिकाणी आहेत त्या भागातील लोकांच्या जीवनमानात नक्कीच सुधार येऊन दारिद्रय निर्मूलनास मदत झाली आहे.

**५) स्थलांतर रोखण्यास मदत** :

ग्रामीण भागातून रोजगारीच्या शोधार्थ मोठ्या संख्येने शहरी भागात व उपनगरात कुशल वअकुशल श्रमिकांचे स्थलांतर होत असते. अशा वेळी कृषी उद्योग ग्रामपातळीवर निर्माण झाल्यासमोठ्या प्रमाणात भूमिहीन शेतमजूर, अल्प, अत्यल्प भूधारक यांच्या स्थलांतरावर मोठ्या प्रमाणातमर्यादा येण्यास मदत झाली आहे.

**६) नागरी समस्यांवर मर्यादा :**

रोजगारांच्या संधी गाय किंवा तालुका पातळीवर उपलब्ध झाल्यामुळे मोठ्या शहराकडे होणारे स्थलांतर रोखले गेल्यामुळे नागरी भागात स्थलांतरामुळे निर्माण होणाऱ्या सामाजिक अंतर्गतसमस्या काही प्रमाणात का होईना रोखण्यास मदत झाली आहे.

### ७) संपत्ती निर्मितीस पाठबळ :

कृषी उद्योगामुळे ग्रामीण भागात तयार झालेल्या कृषी उत्पादनावर प्रक्रिया झाल्यामुळे विभागीयविकासास हातभार लागला आहे. गावपातळीवर रोजगार निर्मिती झाल्यामुळे गावाकडील दारिद्र्यातघट होत आहे. शहरी भागाकडे असलेले कारखानदारीचे आकर्षण आणि त्याबाबतचे प्रशिक्षणयामुळे फारच मोठी तफावत निर्माण होते. मात्र कृषी उद्योग हे लहान/मध्यम स्वरूपाचे असल्यामुळे स्थलांतरांस मज्जाव होऊन विभागीय विकास होण्यास महत्त्वपूर्ण कामगिरी ह्या कृषी उद्योगांमुळेहोत आहे.

### ८) ग्रामीण भागातील आहार दर्जा सुधारण्यास मदत:

रोजगाराअभावी दारित्र्य आणि मग अशा वेळी मिळणारा आहारही तुटपुंजा. मात्र कृषी मालप्रक्रिया उद्योगामुळे रोजगार निर्मिती होण्यास मदत होत आहे. पर्यायाने ग्रामीण भागातील लोकांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत झाली आहे. अर्थात ह्याचा परिणाम आहार दर्जात सुधारणा होण्यास झाला आहे.

### ९) कृषी क्षेत्र व औद्योगिक क्षेत्राचा समान विकास:

कृषी क्षेत्राला लागणाऱ्या अनेक घटकांसाठी विशेषत : यंत्रे, ट्रॅक्टर, नटबोल्ट, खिळे, स्कूवगैरेंसाठी तसेच त्यांच्या निर्मितीसाठी औद्योगिक क्षेत्राची आवश्यकता लागते. अशा वेळी शेतीसाठी लागणाऱ्या सर्व वस्तूंची निर्मिती औद्योगिक क्षेत्रात होत असल्यामुळे कृषी क्षेत्रासोबत औद्योगिकक्षेत्राचाही समान विकास होताना दिसत आहे.

### १०) नाशवंत मालापासून दुय्यम स्वरूपाचे उत्पादन:

शेतमाल हा नाशवंत स्वरूपाचा असतो. तसेच तो हंगामी स्वरूपाचाही असतो. अशा मालावरप्रक्रिया झाल्यामुळे मालाला काळ उपयोगिता निर्माण होते, त्यामधील टिकावूपणा वाढतो. बिगरहंगामातही माल मिळू शकतो.

### ११) अल्म प्रशिक्षण व कौशल्य

ग्रामीण भागातील लोकांना परंपरागत व्यवसायात कौशल्य प्राप्त झालेली असतात. कवीप्रक्रिया उद्योगात गरजेनुसार महिला व इतर घटकांना अल्प प्रशिक्षण देऊन रोजगाराची प्राप्तीझालेली दिसून येते.अशा अनेकविध प्रकाराने आपणांस ह्या कृषी उद्योगांची महती पटवून देता येईल. एकूणभारतीय अर्थव्यवस्थेत कृषी उद्योगाचे स्थान महत्त्वाचे आहे. त्यामुळे ग्रामीण भागाचा विकास पर्यायानेदेशाचा विकास निश्चितहोणार आहे.मात्र कृषी उद्योग सुरू करताना काही महत्त्वाच्या बाबी लक्षात घेणे गरजेचे आहे.

१) कृषी उद्योग सुरू करण्यापूर्वी शेतीतील सर्व साधनांचा पूर्ण अभ्यास करणे गरजेचे आहे.

२) तसेच संपूर्ण जिल्ह्यांचा त्यामध्ये घडणाऱ्या क्रिया, आवडी, आपल्या व्यवसायासाठी असलेलीव्याप्ती यांचा सखोल अभ्यास करणे गरजेचे आहे.

3) व्यवसाय चालू करण्यापूर्वी आधीच अस्तित्वात असलेले व्यवसाय, त्यांची स्थिती, शिल्लकसाधने ह्यांचा अभ्यास असणे अगत्याचे आहे.

४) आपण गुंतवीत असलेली साधनसामुग्री, प्लॉट, भांडवल श्रम ह्यांचा पूर्ण उपयोग होणे गरजेचेआहे. ह्यासाठी ह्या घटकांचा पूर्ण अभ्यास सर्व्हे करून लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

५)प्रशिक्षित संयोजक व सुयोग्य तंत्रज्ञान ह्यांचा योग्य वापर करणे महत्त्वाचे आहे.

६) पतधोरण, बाजारपेठ आणि आपल्या उत्पादनाला भविष्यात होणारी मागणी ह्यांचा अभ्यास

करून वर्तमान व भविष्यकालीन धोरणे निश्चित करणे गरजेचे आहे.हा **व्यवसाय करताना पुढील समस्या प्रकर्षाने जाणवतात.**

१) अन्नधान्याची साठवणूक व हाताळणी.

२) अन्नधान्य प्रक्रिया तंत्रज्ञानामध्ये सुधारणा.

३) उपउत्पादनांचा वापर.

४) मान्सून व बदलत्या पीक आकृतिबंधाचा परिणाम.

५) आधुनिकीकरणांसाठी योग्य मार्गदर्शनाचा अभाव ,

६) वित्तपुरवठ्याचा अभाव,

७) उत्पादित मालाबाबत व कच्च्या मालाबाबत बाजार अनिश्चितता.

८) शेतमालाचे हंगामी स्वरूप,ह्यासारख्या समस्यांचा आधीच विचार करून कृषी प्रक्रिया उद्योगात उतरल्यास नक्कीचफायदा व्यावसायिकांना होऊ शकतो.

## ५.७ सारांश

शेतातून येणाऱ्या अधिकतम उत्पादनाचा योग्य विनियोग करण्यासाठी शेतकऱ्याची उत्पादनघेण्याची सततची क्षमता वाढविण्यासाठी उत्पादनाला किंमत स्थैर्य मिळवून देण्याच्या दृष्टीने कृषीप्रक्रिया उद्योग हे महत्त्वपूर्ण ठरत आहेत. ग्रामीण भागातील कुशल-अकुशल श्रमिकांना रोजगाराचीसंधी प्राप्त होण्यासाठीही आणि ग्रामीण भागात जीवनमानाचा दर्जा सुधारण्यासाठी कृषी प्रक्रियाउद्योग महत्त्वपूर्ण कामगिरी बजावत आहेत. ग्रामीण भागात वाहतूक- दळणवळण सोयींचा विकासहोण्यासाठीही फार मोठा हातभार ह्या कृषी उद्योग व्यवसायांमुळे झाला आहे. ग्रामीण भागातीलहोतकरू लोकांमध्ये व्यावसायिक वृत्ती वाढीस लागत आहे. वित्तीय संस्थांचा ग्रामीण भागात विकासहोण्यास मदत झाली आहे. ग्रामीण लोकांची वित्तीय संस्थांकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात बदल झालाआहे. ग्रामीण जनता वित्तीय संस्थांकडे जात आहेत. ही नक्कीच आनंदाची बाब आहे. बचतीमध्ये सुधारणा होऊ लागली आहे एकंदरीत असे सांगता येईल की, कृषी उद्योग हे आज महत्त्वपूर्ण ठरत आहेत.

## ५.८ स्वाध्याय

१. कृषी उद्योगाची संकल्पना सांगून कृषी उद्योगांचे प्रकार सांगा.

२. कृषी उद्योगांची विविध कार्ये सांगा,

३. ग्रामीण रोजगार निर्मितीत कृषी उद्योगांचे महत्त्व सांगा.

४. कृषी उद्योग सुरू करताना महत्त्वाच्या कोणत्या बाबी लक्षात घ्याव्या लागतात?

५. कृषी उद्योगांसंबंधी समस्यांचा आढावा घ्या.

## ५.९ संदर्भ सूची:

1) *Dr. Sinha H. K. challenges in Rural Development,1998 Discovery Publication House New Delhi- 110002.*
2) *Dr. Dubey M. K. Rural and Urban Development in India, 2000, common wealth Publisher DoryaGonj New Delhi-110002.*
3) *Dr. Desai A. R. Rural Society in India 1978 Popular Publication House*
4) http://mospi.nic.in/sites/default/files/Statistical_year_book_india_chapters/ch12.pdf

https://kids.britannica.com/students/article/irrigation/275094
https://www.cdc.gov/healthywater/other/agricultural/types.html
https://en.wikipedia.org/wiki/Irrigation
https://civiltoday.com/water-resource-engineering/irrigation/63-importance-of-irrigation-
https://www.smsfoundation.org/water-management/
https://www.nrcs.usda.gov/Internet/FSE_DOCUMENTS/nrcs141p2_017781.pdf
\https://thefactfactor.com/facts/pure_science/biology/irrigation/2277/
https://www.teachoo.com/9803/2972/Step-4---Irrigation/category/Concepts/

❖❖❖❖

# ६

# पर्यटन विकास - I

**पाठाची रूपरेषा**

६.० उद्दिष्टे

६.१ प्रास्ताविक

६.२ पर्यटन संकल्पना

६.३ ग्रामीण पर्यटन

६.४ ग्रामीण पर्यटनाचे स्वरूपव व्याप्ती

६.५ ग्रामीण पर्यटनाची वैशिष्ट्ये

६.६ ग्रामीण पर्यटनाचे महत्त्व

६.७ ग्रामीण पर्यटनाचे फायदे

६.८ ग्रामीण पर्यटनाच्या मर्यादा

६.९. सारांश

६.१० स्वाध्याय

## ६.० उद्दिष्टे

१) ग्रामीण पर्यटन व्यवसायाचा अर्थ समजून घेणे.

२) ग्रामीण पर्यटन व्यवसायाचे महत्त्व समजून घेणे.

३) ग्रामीण पर्यटन व्यवसायाच्या मर्यादा समजून घेणे.

२) ग्रामीण पर्यटन व्यवसायास मिळारी शासकीय मदत व भोरण अभ्यासणे.

## ६.१ प्रास्ताविक

प्राचीन काळापासून प्रवास हा मानवी जीविताचा एक अविभाज्य घटक बनलेला आहे. सुरुवातीच्या काळात अज्ञात प्रदेशाचा शोध घेणे. नवीन पर्यावरणातील बदल अनुभवणे. धार्मिकदृष्ट्या पवित्र स्थळांना भेटी देणे इ. साठी पर्यटन होत असे. पर्यटन व्यवसायाला खऱ्या अर्थाने दुसऱ्या महायुद्धानंतरच चालना मिळाली. लोकांचे राहणीमान, आर्थिक

सुबत्ता, तंत्रज्ञान, माहितीचा विस्फोट, पर्यटनाच्या अद्ययावत सोयी, उपग्रहीय दळणवळण, इंटरनेट व संगणकामुळे जगातील कोणत्याही ठिकाणाची क्षणार्धात मिळणारी माहिती व त्यामुळे होणारे संपर्क या कारणामुळे पर्यटन व्यवसाय अत्यंत गतिमान झाला आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतून तर पर्यटन हा एक सेवा-व्यवसाय बनला आहे. जगातील काही निवडक प्राकृतिक देशापैकी भारत हा एक आहे. त्यामुळे भारतात मोठया प्रमाणात प्राचीन किल्ले, मंदिरे, लेणी व आश्चर्ये आहेत. तसेच भारतातील जैवविविधताइतर देशांपेक्षा जास्त आहे. भारतीय संस्कृती, सण, उत्सव, ऐतिहासिक स्थळे, निसर्गरम्य ठिकाणे.विविध स्पर्धाचे आयोजन इ. घटक विदेशी पर्यटनाच्या मनाला भूरळ घालतात. भारत सरकारकडून पर्यटन व्यवसायाच्या वाढीसाठी मममतुल्य भारत या नावाने पर्यटनाचा प्रसार व प्रचार केला आहे. पर्यटनातून रोजगारनिर्मिती, ग्रामीण भागाचा विकास, राहणीमान सुधारणा, परकीय चलन, रस्ते विकास व एकूणच आर्थिक विकास इ. गोष्टी साध्य होतात. वर्ल्ड ट्रॅव्हल आली टुरिझम कौन्सिल २०१० यांच्या आकडेवारीनुसार सान २००८ मध्ये ३० दशकास रोजगार निर्मिती ही पर्यटन उद्योगातून झाली होती. तर २०१० अखेर ४९ दशलक्ष रोजगारनिर्मिती ही पर्यटन उद्योगाद्वारे झाली हीच वाट पुढे चालू राहिली तर सन २०२० मध्ये ५८ दशलक्ष रोजगार निर्मिती पर्यटन उद्योगातून अपेक्षित आहे. २०१०च्या पहिल्या तिमाहीत मागील वर्षाच्या तुलनेत विदेशी पर्यटकांच्या संख्येत १२.८ टक्के, तर परकीय चलनामध्ये ४१.३ टक्क्यांनी वाढ झाली आहे. विदेशी पर्यटकांच्या आगमनामध्ये भारताचा क्रमांक ४१ वा आहे. तर पर्यटनापासून मिळणाऱ्या परकीय चलन प्राप्तीमध्ये भारताचा क्रमांक २२ वा आहे.

## ६.२ पर्यटन संकल्पना

पर्यटनाची संकल्पना ही मानवी उत्पत्तीपासून आहे. अतिप्राचीन काळापासून आदिमानव अन्न, वस्त्र, निवारा यांच्या शोधात भटकत होता नंतर तो एका ठिकाणी स्थिर शेती करून आपली उपजीविका करू लागला. परंतु नंतरच्या कालावधीत मात्र त्यास व्यापार, आर्थिक उपलब्धी, लढाया इ. च्या निमित्ताने भटकावे लागले. १७ व्या शतकात युरोपमध्ये खऱ्या अर्थाने पर्यटनाचीसुरूवात झाली त्या ठिकाणी दूरवरच्या सहली निघू लागल्या. नंतर १८ व १९ व्या शतकात तत्कालीन श्रीमंत व्यापाऱ्यांनी व्यापाराच्या निमित्ताने पर्यटनाला चालना दिली. त्या प्रमाणे कोलंबस मार्को पोलो, बास्को-द-गामा अशा साहसी दर्यावर्दीनी नव्या भूमीच्या शोधात जगाच्या वेगवेगळ्या भागात समुद्रमार्गे सफर केली. २०व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात समाजातील तथाकथित उच्चभू लोकच पर्यटन करीत असत. अलीकडील कालावधीत ही सामाजिक, आर्थिक व वैज्ञानिक विकासामुळे पर्यटनाच्या स्वरूपात बदल घडून येत आहेत. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे पर्यटन व्यवसायाच्या प्रगतीचे चक्र अधिक गतिमान झाले आहे. आज जगातील सिंगापूर, न्यूझिलंड,थायलंड, द.आफ्रिका, ब्राझिल इ. देशांनी केवळ पर्यटन व्यवसायावर आपली प्रगती साध्य केली आहे. भारतातही अनेक राज्यांचे उत्पन्न हे पर्यटन उद्योगावर आधारित आहे. उदा. जम्मू-काश्मिर, हिमाचल प्रदेश, गोवा इ.

**पर्यटन म्हणजे काय?**

पर्यटन हा शब्द इंग्रजीतील Tourism या शब्दाचे मराठी रूपांतर आहे.Tourism हा शब्द tour (प्रवास) ह्या शब्दापासून taur हा शब्द लॅटिन भाषेतील TORNOS या शब्दापासून आला आहे. याचा अर्थ वर्तुळाकार असा होतो. या शब्दापासून वर्तुळाकार प्रवास हा शब्द रूढझाला. तसेच TORNOS या शब्दाचे रूपांतर नंतर tourn मध्ये झाले um याचा अर्थ journey (प्रवास किंवाभ्रमंती) असा होतो. हा प्रवासकिंवाभ्रमंती जागेसंबंधी शोध घेणे. शिकणे, अभ्यास करणे तसेच व्यवसाय वा आनंदासाठी होत असतो.यामध्ये माणसाने ज्या विषयी ऐकले आहे ते पाहण्याची इच्छा अंतर्भूत असते.

## ६.३ ग्रामीण पर्यटन

प्रास्ताविक: भारताला खेड्यांची भूमी असे संबोधले जाते. साधारणपणे ७० कोटी भारतीय शेतकरी सुमारे ६ लाख खेड्यांमध्ये वसलेले आहेत. राष्ट्रीय उत्पन्नामध्ये सध्या शेतीचा वाटा हा १८.५ टक्के एकदा आहे. भारताच्या लोकसंख्येतील ७० टक्के जनता शेती आणि इतर शेती उत्पन्नावर आधारित जीवन जगत आहे त्यामुळे शेती हा भारतासारख्या देशासाठी केवळ एक व्यवसाय नसून शेती ही भारताची परंपराच आहे' असे म्हणायला काही हरकत नाही.




स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात पाश्चिमात्य आधुनिक सुधारणांचा स्वीकार होऊ लागला. आरोग्य, शिक्षण, बीज, वाहतूक आणि औद्योगिक क्षेत्राबरोबरच शेती क्षेत्रातही सुधारित बदल होऊ लागले. याचाच एक भाग म्हणून देशातील शेती क्षेत्रात पहिली हरित क्रांतीसुरू केली. सुधारित मशागत पद्धती, बी-बियाणे, खते, अवजारे आणि जलसिंचनाच्या पायाभूत सुविधा यांच्यामाध्यमातून जास्तीत जास्त उत्पादन वाढ हे प्रमुख उदिष्ट ठेवण्यात आले. सुरूवातीचा काळ आणि काही ठराविक राज्यांचा अपवाद वगळता यातून अपेक्षित यश प्राप्त होऊ शकले नाही. परिणामतः खेड्यांमध्ये दारिद्रय आणि बेकारी यांचे प्रमाण वाढतेच राहिले. याला अन्यही काही कारणे कारणीभूत ठरली. याचकाळात दुसरीकडे मात्र औद्योगिक क्षेत्राचा विकास व विस्तार झपाट्याने होत राहिला आणि आजमितीस तो सुरूच आहे. तसेच सद्यस्थितीत जगभराप्रमाणे भारतातही माहिती व तंत्रज्ञानाचा प्रचार व प्रसार मोठ्या प्रमाणात होत आहे. याच माहिती-तंत्रज्ञानाला अनुसरून ग्रामीण भागातआज दिवसेंदिवस शेती यांत्रिकीकरणाने तसेच आधुनिक तंत्रज्ञानाने केली जाते आहे. याचाविशेष अवलंब मोठे व मध्यम जमीनदार शेतकरी, प्रगतिशील व बागायतदार शेतकरी,

निर्यातदारशेतकरी करत आहेत आणि या शेती यांत्रिकीकरणाला व आधुनिक तंत्रज्ञानाला फारच कमी मनुष्यबळ लागत असल्याने ग्रामीण भागात बेरोजगारीची पर्यायाने दारित्र्यांची समस्या अधिकच प्रमाणात निर्माण झाली आहे. तसेच या सर्व प्रतिकूल बाबी व परिस्थितीमुळे ग्रामीण भागातील लोक विशेषतः तरूण पिढी रोजगारासाठी मोठ्या प्रमाणावर शहरांकडे वळत आहे. बेरोजगारांच्या लोंढ्यामुळे शहरामध्ये अनेक जटिल समस्या निर्माण झाल्या आहेत. यासाठी ग्रामीण भागातील लोकांना ग्रामीण भागातच अनेक योजना, प्रकल्प व कार्यक्रमांतर्गत प्रयत्न केले जात आहेत.ग्रामीण पर्यटन हा यासाठी उत्तम पर्याय ठरू शकतो.ग्रामीण भागातील प्रत्येक गावात उपजतच उपलब्ध असलेल्या धार्मिक स्थळे, ऐतिहासिक स्थळे, निसर्ग, विविध समाजाच्या जीवनपद्धती व सांस्कृतिक कला या घटकांच्या माध्यमातून शहरी पर्यटकांना वाजयी खर्चात मनोरजन व आनंद मिळविण्यासाठी राबविले जाणारे पर्यटन म्हणजेच ग्रामीण पर्यटन होय.

ग्रामीन पर्यटन हे शहरी पर्यटकांनी ग्रामीण जीवनशैलीचा अनुभव घेण्यावर, तसेच ग्रामीण जनतेला उत्पन्नाचा नवा मार्ग मिळण्यावर प्रकाश टाकते. हे पर्यटन पर्यावरणीय पर्यटनापेक्षा (इको टुरीझम) वेगळ्या स्वरूपाचे होऊ शकते. योन्याशा किमान नियोजन व व्यवस्थापनाने कोणतेही गाव पर्यटकांचे आकर्षण होऊ शकते. मुळातच ग्रामीण लोक हे खूप आतिथ्यशील आहेत.जगभरच वेगाने विस्तारणारा आणि प्रथम क्रमांकाचा होऊ पाहणारा व्यवसाय म्हणून पर्यटन व्यवसाय ओळखला जातो. याचाच एक प्रकार म्हणजेच ग्रामीण पर्यटन ही संकल्पना कमी भांडवलव परिश्रमात ग्रामीण जनतेच्या विकासासाठी एक नवा पर्याय व दिशा ठरू शकेल.

**ग्रामीण पर्यटनाची संकल्पना:**

ग्रामीण विकासाचा नवा मार्ग किंवा पर्याय म्हणजे ग्रामीण पर्यटन असे मानले जात आहे. पर्यटन स्थळ आणि पर्यटक असे मानले जात आहे. पर्यटन स्थळ आणि पर्यटक या दोहोंच्या दृष्टीने ही महत्त्वाची बाब ठरते. याला अनुसरून गावातील प्रत्येक घटक व बाबी या वैशिष्ट्यपूर्ण असतात. उदा. गावातील निसर्ग, गावांची रचना, कौलारू, मातीची घरे, गावातीलविविध समाजाच्या लोकांची जीवनपद्धती, त्यांची बोली भाषा, वेशभूषा, रूढी, परंपरा, धार्मिक स्थळे, सण-उत्सय, संस्कृती, सांस्कृतिक कला, हस्तकला, ग्रामीण व्यवसाय इ. यामुळे पर्यटनदृष्ट्या प्रत्येक गाव वैशिष्ट्यपूर्ण आढळते. नोकरी व व्यवसायाच्या संधी उपलब्धीमुळे शहराची लोकसंख्या बेसुमार वाढत आहे. संधी व स्थिती यामुळे शहरी जीवन धावपळीचे झाले आहे. भौतिक सुख व सुविधांमुळे त्यामध्ये कमालीचे झाले आहे. भौतिक सुख व सुविधांमुळे त्यामध्ये कमालीचा कृत्रिमपणा वाढत चालला आहे. सोबतच शहरी जीवनात ताणतणावाचे प्रमाणही प्रचंड वाढले आहे. यावर शहरी मनावरील ताण हलका करण्यासाठी त्याला पुन्हा अधिक कार्यक्षम करण्यासाठी शहरी मंडळींना पर्यटन गरजेचे वाटते.आपसूकच त्यांची पावले मग प्रचलित पर्यटन स्थळांकडे वळतात. परंतु तेथील प्रचंड गर्दी,गोंगाट, पायाभूत सुविधांच्या गैरसोयी, विविध प्रकारचे प्रदूषण, गुन्हेगारी, अनैतिक बाबी आणि तेथील सर्वच सुविधांचे प्रचंड महागडे दर असतात. उदा. गोवा व तत्सम प्रचलित स्थळे व शहरे शांत व निवांतपणा, निखळ आनंद यांच्या अपेक्षेने गेलेल्या पर्यटकांचा तेथे प्रचंड भ्रमनिरास व अपेक्षाभंग होतो. त्याऐवजी शांत, निवांतपणा, नैसर्गिक शुद्धता व साधेपणा असलेल्या पर्यटन पर्यायाची

त्यांना गरज भासते. ग्रामीण पर्यटन त्याला उत्तम पर्याय ठरू शकते. तर प्रत्येक गाव त्यादृष्टीने अनुकूल आणि वैशिष्ट्यपूर्ण ठरू शकेल, खेड्यातील निसर्गाच्या सान्निध्यातील कौलारू घरे त्यापुढील अंगण, तुळशी वृंदावन, मागील परसबागेतील विविध फळझाडे, त्याची हिरवीगार शेती या वातावरणाची शहरामध्ये फ्लॅट कल्चरमध्ये राहणाऱ्या लोकांना अतिशय ओढ असते. गावातील लोकांचे शांत-निवांत जीवन, पाळलेली गुरेढोरे, विहीर, त्यांची बोलीभाषा साधी राहणी, खाद्यसंस्कृती, रूढी, परंपरा, सण, उत्सव जिव्हाळायुक्त प्रेमळ आतिथ्य या सर्वांमधून निर्माण होणाऱ्या ग्रामीण जीवनाचा सुखद अनुभव घेऊन त्यातून पर्यटनाचा निखळ आनंद मिळविणे यातूनच ग्रामीण पर्यटनाचा उदय झाला. पुण्याजवळील व सिंधुदुर्गातील ठिंगणे येथील मामाचे गाव नावाने विकसित केलेली गावे शहरीपर्यटकांना ग्रामीण जीवनाचा परिपूर्ण आनंद व अनुभव देतात. अमेरिका आणि ग्रामीण पर्यटन संकल्पना प्राधान्याने आणि जाणीवपूर्वक राबविणारा देश आहे. या ठिकाणी ग्रामीण पर्यटनाचा विकास मोठ्या प्रमाणावर झाला आहे. येथे ग्रामीण पर्यटन ठिकाणासाठी विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे. ग्रामीण समाज सुधारणेसाठी तिथे ग्रामीण पर्यटनाला प्राधान्य देण्यात आले आहे. विविध कार्यक्रम, पर्यटनदृष्ट्या आवश्यक घटकांच्या विकासामुळे ग्रामीण लोकांचे आर्थिक उत्पन्न बांगल्या प्रकारचे आहे.? संशोधकांच्या मतानुसार, "देश आणि ग्रामीण भागाच्या आर्थिक सुबत्तेतील पर्यटन हा अमेरिकेतील महत्वाचा घटकआहे. अमेरिकेमध्ये ३.६टक्के लोकांना पर्यटनातून रोजगार मिळतो. येथील ग्रामीण स्थानिकलोक नेहमी पर्यटन व्यवसायात लक्ष देतात. या लोकांचे राहणीमान पर्यटनामुळे विकसित झालेआहे. अमेरिकेप्रमाणे अन्य पाश्चिमात्य देशांनी प्रचलित पर्यटनाबरोबरच ग्रामीण पर्यटनांनासुद्धा चालना दिली आहे.

**ग्रामीण पर्यटनाची व्याख्याः**

१) ग्रामीण भागातील धार्मिक स्थळे, ऐतिहासिक स्थळे, निसर्ग व भौगोलिक वैशिष्टये, विविध सांस्कृतिक घटक, तसेच विविध समाजाच्या जीवनपद्धती, त्यांची संस्कृती, कला आणि ग्रामीण व्यवसाय यांच्यापासून निखळ आनंद मिळविणे आणि मनोरजंन करण्यासाठी जेपर्यटन राबविले जाते ते म्हणजे ग्रामीण पर्यटन होय.

२) ग्रामीण पर्यटन म्हणजे असे क्षेत्र जिथे नैसर्गिक वातावरण उपलब्ध असून नैसर्गिक, आर्थिक,सामाजिक वैशिष्ट्यांनी परिपूर्ण जसे परंपरा, स्थानिक जीवनशैली, स्थानिक सहकार्य व विश्वास यांच्या संमिश्राने तयार होणारे एकमेवादित्य पर्यटन उत्पादन जे की नैसर्गिकदृष्ट्या मैत्रीपूर्ण व शाश्वत, तसेच ग्रामीण जीवनाचा खराखुरा आनंद आणि अनुभव देणारे असेल.असा भाग किंवा प्रक्षेत्र म्हणजेच ग्रामीण पर्यटन क्षेत्र होय.

३) ग्रामीण भागातील उपलब्ध नैसर्गिक घटकांचा महत्तम वापर व ग्रामीण वैशिष्ट्यांची जपणूक करून केले जाणारे पर्यटन म्हणजे ग्रामीण पर्यटन होय.

## ६.४ ग्रामीण पर्यटनाचे स्वरूपव व्याप्ती

आज शहरामध्ये राहणारे लोक हे नोकरी-व्यवसायासाठी कधी काळी आपल्या गावातूनच आलेले असतात. त्यांच्या सुखाचा आणि प्रगतीच्या कल्पना या वाढत्या असतात. त्या साध्य करताना त्यांना खूप ताणतणाव जाणवत असतो. हा ताणतणाव नाहीसा करण्यासाठी

तसेच शरीरमनाला आराम देण्यासाठी आणि कुटुंबासोबत आनंद मिळविण्यासाठी त्यांना पर्यटनाची आवश्यकता भासते. अशा वेळी सर्वप्रथम त्यांच्या नजरेसमोर आपले गाव येते. गावातील निसर्गसौंदर्य, शांत निवांतपणा, ग्रामीण भोजनाचा आस्वाद या सर्वांची आठवण होते. यामुळेच विविध सुत्र्यांच्या निमित्ताने,गावातील शेती. फळांचे हंगाम, गावातील विविध जत्रा, सण, उत्सव यांच्या निमित्ताने शहरी मंडळी स्वत:च्या, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच काही विशेष बाबींसाठी प्रसिद्ध असणाऱ्या गावांमध्ये जातात. शहरात एक प्रकारच्या सिमेंटच्या जंगलात राहणाऱ्या, भौतिक सुविभाचा कृत्रिमपणा आणि तोचतोचपणाला कंटाळलेल्या शहरी पर्यटकांना ग्रामीण पर्यटनाच्या निमित्ताने गावातील व ग्रामीण जीवनशैलीतील प्रत्येक बाबीमध्ये नैसर्गिक आनंद, शुद्धता, ग्रामीण बाजार आणि विशेष म्हणजे ग्रामीण आपलेपणा अनुभवता येतो, उदा. गावातील हिरवागार निसर्ग-शेती, शुद्ध हवा, टुमदार कौलारू घरे, अस्सल ग्रामीण चवीचे भोजन आणि ग्रामीण लोकांचे प्रेमळ आदरातिथ्य,ग्रामीण पर्यटनामध्ये शहरी पर्यटकांना काही जाणीवपूर्वक निर्माण केलेल्या सुविधांची अपेक्षानसते. तर ग्रामीण लोकांच्या दैनंदिन जीवनातील बाबींमधून आनंद मिळवायचा असतो. उदा. ग्रामस्थासोबत त्यांच्या शेतावर, रानावनात फेरफटका मारणे, बैलगाडीतून सवारी करणे, विहिरीचेपाणी काढणे, पोहणे, गायीचे दूध काढणे, झुणका भाकर, ग्रामीण भोजनाचा आस्वाद घेणे, स्थानिकभवन, दशावतार, तमाशा, लावणी, यासारख्या ग्रामीण सांस्कृतिक कार्यक्रमांचा आस्वाद घेणे.नदी, तलावामध्ये मासेमारी करणे, डोंगरचढाई, जंगलभ्रमंती यातून आनंद मिळविणे, गावातीलपरिसरातील भार्मिक व ऐतिहासिक स्थळांना भेटी देणे, ग्रामीण वस्तू-उत्पादनाची खरेदी करणे,थोडक्यात ग्रामीण लोकांनी आपल्या दैनंदिन जीवनातील बघर-शेती परिसरातील नेहमीच्या जीवनातील व घर-शेतीपरिसरातील नेहमीच्या बाबी शहरी पर्यटकांना त्यातून आनंद मिळविण्यासाठी नीटनेटकेपणा सादर करणे, उपलब्ध करणे असे ग्रामीण पर्यटनाये स्वरूप आढळले. ग्रामीण पर्यटनहे अशा साध्या सोप्या स्वरूपाचे, तसेच कमी भांडवल खर्चाचे असून त्यात गावाच्या व ग्रामीण जनतेच्या आर्थिक विकासाची चांगली पर्यायी क्षमता आहे.

**ग्रामीण पर्यटन आणि कोकण:**

कोकण ही परशूरामाची भूमी म्हणून ओळखली जाते. निसर्गाने कोकणाला मुक्त हस्ताने दान केले आहे. सह्याद्रीच्या डोंगर रांगा, समृद्ध वृक्षसंपदा, नया, तलाव, विस्तीर्ण, समुद्रकिनारा, भरपूर पाऊस आणि डोंगराच्या पायथ्याशी वसलेली टुमदार कौलारू घरांची खेडी अशी कोकणची ओळख महाराष्ट्रात, देशात परिचित आहे. कोकणची संस्कृती ही वैशिष्ट्यपूर्ण मानली जाते.येथील मासे -भाताचे भोजन; आगरी, बाणकोरी, संगमेश्वरी, राजापूरी व मालवणी या बोलीभाषा;विविध जाती-धर्माच्या लोकांच्या वस्ती: गावातील विविध देवदेवतांची देवालये व त्यांचे सण-उत्सवव जत्रा; तारपा नृत्य, जाखडीनृत्य, नमन खेळे, दशावतार, धनगर बांधवांचे गजा व चपईनृत्य;वारली चित्रकला, ठाकर मित्रकथी, कळसुत्री बाहुल्यांचा खेळ, कापड खेळे, भजन आदी कला यलोककला इ. आणि सोबत कोकगी पाहुणचार आदीबाबींमुळे कोकण ग्रामीन पर्यटनच्या दृष्टीनेअनुकूल आहे. त्याचप्रमाणे राष्ट्रीय महामार्ग क्र.१७ आणि कोकणच्या पर्यटन विकासाला मोठाचहातभार लागला आहे.

**पर्यटन विकासाच्या दृष्टीने कोकणचे तीन विभाग पाहता येतील:**

**अ) उत्तर कोकण:**

भौगोलिक व सामाजिकदृष्ट्या कोकणचे उत्तर कोकण आणि दक्षिण कोकण असे दोनप्रमुख भाग मानले जातात. या उत्तर कोकण विभागात ठाणे आणि रायगड हे दोन जिल्हे येतात.ठाणे आणि रायगड या दोन जिल्ह्यांच्या विकासाच्या बाबतीत औद्योगिक विकासाला प्राधान्य दिल्याचेदिसून येते. मुंबई, नवी मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, भिवंडी, मीरा-भाईदर आणि वसई-विरार या महानगरांच्या निकटच्या सान्निध्यामुळे या दोन्ही जिल्ह्यांमध्ये औद्योगिक क्षेत्राचा विस्तारझपाट्याने वाढत आहे यामुळे येथील स्थानिक लोकांना मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्धहोत आहेत. परंतु या दोन्ही जिल्ह्यांचा अंतर्गत भाग हा दुर्गम सर्वागिणदृष्टीने अविकसित आहे. याभागामध्ये आगरी आणि वारली व कातकरी या आदिवासी समाजाची लोकसंख्या मोठ्या प्रमाणातआहे. भात पीक आणि भाजीपाला ही यांची प्रमुख शेती उत्पादने आहेत, तर शिक्षण आणि वविकासाची आरोग्याच्या गैरसोयीमुळे यांच्या रोजगाराची समस्या निर्माण झाली आहे. परंतु आगरीआणि आदिवासी समाजाची वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती आणि येथील निसर्ग संपन्नता यांची ग्रामीणपर्यटन संकल्पनेशी सांगड घालून त्यांना विकासाचा नया पर्याय निर्माण करून देणे शक्य आहे.या दोन्ही जिल्ह्यांच्या समुद्रकिनारी भागात आणि अंतर्गत निसर्गरम्य भागात हॉटेल आणिहॉलिडे रिसॉर्टच्या रूपाने प्रचलित पर्यटन विकास मोठ्या प्रमाणात झाला आहे. परंतु त्याचा लाभ स्थानिकांऐवजी बाहेरच्या धनिकांनाच झाला आहे. म्हणूनच स्थानिक ग्रामीण जनतेचा रोजगारआणि उत्पन्नाच्या दृष्टीने विकास होण्यासाठी ग्रामीण पर्यटन संकल्पना येथे महत्वाची आहे.येथील आदिवासी लोकांची संस्कृती बाह्यजगापासून अलिप्त आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे.यांची घरे व गावांधी रथना, तुकड्या-तुकड्यातील शेती, त्यांची वेशभूषा, वारली आणि कातकरीया बोलीभाषा, धार्मिक रूढी, परंपरा, सण, उत्सव प्रसिद्ध तारपानृत्य, निसर्गाशी एकरूप जीवनपद्धतीआणि जागतिक स्तरावर प्रसिद्ध पावलेली वारली चित्तशैली इ. सर्वच बाबी वैशिष्ट्यपूर्ण आहेत.त्यामुळेच त्याला बाह्यजगताच्या म्हणजेच शहरी आणि पर्यटकांच्या दृष्टीने खूप पर्यटनमूल्य आहे.या बाबींचा ग्रामीण पर्यटन संकल्पनेशी सांगड घालून आदिवासी लोकांचा विकास करणे शक्यआहे. यातून त्यांचे कमालीचे दारिद्र्य बऱ्याचशा प्रमाणात दूर करता येईल. त्यांना विकासाच्याप्रवाहात आणता येईल.यासाठी शासन, स्वयंसेवी संस्था व इतर घटकांनी जाणीवपूर्वक व नियोजनबद्ध प्रयत्नकरणे आवश्यक आहेत. असा एक उत्तम व पथदर्शक प्रयत्न ठाणे जिल्ह्यामध्ये जव्हार तालुक्यातील 'केळीचा पाडा' या गावात 'बायफ मित्र या स्वयं संस्थेने ग्रामीण पर्यटन आणि शेती विकास यांच्यामाध्यमातून केला आहे आणि विशेष म्हणजे याला स्थानिक आदिवासी जनतेने आणि शहरी पर्यटकांनीउत्तम प्रतिसाद दिला आहे.आदिवासी लोकांप्रमाणेच येथील प्रस्थापित समाजातील शेतकरी लोकांच्या विकासाचीदयनीय अवस्था आहे. ग्रामीण पर्यटनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या घरात पर्यटकांची राहण्याचीव्यवस्था, त्यांचे स्थानिक भोजन, गावातील निसर्ग, सण, उत्सव, जत्रा यांमधून शहरी पर्यटकांनाग्रामीण पर्यटनाचा खरा आनंद देता येईल.अशा प्रकारे ग्रामीण पर्यटन व्यवसायातून आदिवासी आणि ग्रामीण लोकांना आर्थिक विकासाचा,रोजगार, स्वयंरोजगाराचा नवा मार्ग उपलब्ध करून देता येईल.

## ब) दक्षिण कोकण



दक्षिण कोकण भागामध्ये रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग हे दोन जिल्हे येतात. येथील ग्रामीण जनता संस्कृती आणि सामाजिकदृष्ट्या उत्तर कोकणपेक्षा अधिक सुधारित वाटते. ग्रामीण पर्यटनाच्या दृष्टीने येथील परिस्थिती अधिक अनुकूल आहे. येथील गावांमध्ये विविध जाती-धर्माच्या लोकांच्या वाडी-वस्त्या, पयकी चिरेबंदी  कौलारू घरे, चांगली शेतीवाडी, गुरे - ढोरे, आंबा-काजू- नारळपोफळीच्या बागा, विविध देवतांची मंदिरे, विविध सण, उत्सव, जत्रा, तसेच पारंपरिक लोककला,ग्रामीण उत्पादने इ. घटक ग्रामीण पर्यटनातून शहरी पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहेत. यासह रस्ते व रेल्वे वाहतूक सेवा वाहतुकीची साधने, वीज-दूरसंचार सेवा, सरकारी वखाजगी आरोग्यसेवा यासारख्या पायाभूत सेवा सुविधांचा चांगला विकास झाला आहे. रत्नागिरीआणि सिंधुदुर्ग हे दोन्ही जिल्हे पर्यटनासाठी यापूर्वीच पर्यटकांच्या पसंतीस उतरले आहेत. पर्यटनाचायेथे चांगला विकास होत आहे. सद्यस्थितीतील येथील पर्यटन हे प्रसिद्ध परंतु प्रचलित स्वरूपाचेआहे. यामध्ये सागरकिनारे; गणपतीपुळे, मार्लेश्वर, कुणकेश्वर, आंगणेवाडी ही धर्मिकस्थळे; विजयदुर्ग, मालवण हे सागरी किल्ले थिबा पॅलेस; चिपळूण, नांगरतास आंबोलीचे प्रसिद्ध भवभये; आंबोलीहे थंड हवेचे ठिकाण या प्रसिद्ध स्थळांचा समावेश होतो. याचा आर्थिक लाभ मर्यादित स्थानिकांनाचहोतो. उर्वरित ग्रामीण भागातील जनतेला याचा फारसा लाभ होत नाही. येथील गावांतील निसर्ग,डोंगर-दऱ्या, नदी-तलाव, कौलारू मातीची घरे, शोती-बागायती, गाई-म्हशी-शेळ्यांसारखे पशुधन,विविध देवतांची देवालये, सण-उत्सव-जत्रा, विविध लोककला, हस्तकला इ.सर्वामुळे येथीलप्रत्येक गाव मुळातच एक परिपूर्ण पर्यटन स्थळ आहे. ग्रामीण पर्यटन संकल्पनेतून येथील ग्रामीण लोकांना शेतीव्यतिरिक्त शाश्वत व निरंतर आर्थिक उत्पन्नाचा पर्याय निर्माण करता येणे शक्यआहे.

## समुद्रकाठचे पर्यटन

महाराष्ट्राला म्हणजेच कोकणाला ७२० कि.मी. लांबीचा विस्तीर्ण समुद्र लाभला आहे. यामध्ये ताणे जिल्ह्यातील डहाणू-पालघरपासून ते सिंधुदुर्गातील रेडीपर्यंतच्या विस्तीर्ण समुद्रकिनाऱ्याचा समावेश होतो. जगभरातील बहुसंख्य पर्यटकांची प्रथम पंसती ही समुद्रकिना-याच्या पर्यटनाला असल्याचे दिसून येते. सागरकिनाऱ्यावरील शुभ्र मऊशार वाळू, समुद्राच्या लाटा, समुद्राचा वारा,या वाऱ्यावर डोलणारी किनाऱ्यावरील सुरूची बने व नारळ, आंब्याची झाडे, मच्छिमारांच्या होड्याया सर्व आल्हाददायक सागरी वातावरणाची पर्यटकांना भुरळ पडते. कोकणच्या समुद्रकिनाऱ्यावरकोळी, खारवी, दालदी व गाबीत इ. मच्छिमार समाजाची लोकवस्ती मोठ्या प्रमाणात आहे. यातीलबहुसंख्य मच्छिमार हे पारंपरिक पद्धतीने मासेमारी करतात. त्यातून मिळणाऱ्या तुटपुंज्या उत्पन्नावरदो कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत असतात. परंतु अलीकडील वाढत्या यांत्रिक मासेमारीमुळे आणि समुद्रातील मत्स्य-दुष्काळामुळे त्यांच्यासमोर मोठे आर्थिक संकट निर्माण झाले आहे. त्यांची शेतीहीनसते. त्यामुळे त्यांची बिकट परिस्थिती झाली आहे. ग्रामीण पर्यटन संकल्पना ही या पारंपरिकमच्छिमारांना नया आर्थिक पर्याय निर्माण करू शकते. समुद्रकाठची मच्छिमारांची गाये-वल्या;बाळू परिसरातील कौलारू घरे, झोपड्या लगतची नारळ-सुपारी-आंबा-काजूभी किरकोळ झाडे;त्यांची वैशिष्ट्यपूर्ण वेशभूषा; कोळी, बागकोटी दालदी उर्दू व मालबनी या

बोलीभाषा, त्यांची परंपरा, सण, नारळी पौर्णिमा उत्सव प्रसिद्ध कोळी गीते व कोळी नृत्य: मासेमारीची होडी, जाळी

व इतर साधने: मासळी सुकविण्याची झोपडी, कट्टे या सर्व वातावरणातून एक वैशिष्ट्यपूर्ण ग्रामीणमच्छिमार संस्कृती निर्माण झाली आहे. याचेही बाहा समाज घटकांना, तसेच शहरी पर्यटकांनाआकर्षण आहे. कोकणातील सागरकिनारी पर्यटनाचा चांगला विकास झाला आहे. परंतु त्याचेस्वरूप फक्त ठराविक समुद्रकिनारे आणि मोठे हॉटेल उद्योजक, यांच्यापुरताच सीमित आहे.सामान्य मच्छिमार लोकांना यांचा विशेष आर्थिक लाभ होत नाही. तसेच येथील अतिउत्साह पर्यटकांच्या स्वैराचार व अनैतिक बाबींमुळे सर्वसाधारण पर्यटकांना कुटुंबासह सागरकिनारी पर्यटनाचाखरा आनंद घेता येत नाही. ग्रामीण पर्यटन संकल्पनेतून व सामान्य मच्छिमार लोकांच्या सहभागातूनयेथे ग्रामीण सागरी पर्यटन राबविता येईल. जसे की, मच्छिमारांच्या राहत्या घरात पर्यटकांचीनिवास व्यवस्था; ताज्या मासळीचे विविध पदार्थ व मासे व भात भोजनाचा आस्वादः होडीतूनसमुद्र आणि खाडीतील जलविहार, पोहणे; वाळूवरील विविध खेळ मासेमारीचा आनंद; मच्छिमाराच्याकोळी गीते व नृत्यात प्रत्यक्ष सहभागातून आनंद तर परतीच्या वेळी सुक्या मासळीची, मत्स्यप्रक्रियापदाथांची (योबिल, कोळंबीच्या चटण्या, कोबी लोणचे) खरेदी इ. स्वरूपात येथे ग्रामीण सागरीपर्यटन राबविता येणे शक्य आहे. याला शहरी पर्यटकांचा चांगल्या प्रतिसाद लाभेल. तर मच्छिमारलोकांना मासेमारी व्यतिरिक्त आर्थिक उत्पन्न व विकासाचा नवा मार्ग मिळेल.

**ग्रामीण पर्यटन आणि सिंधुदुर्ग जिल्हा:**

१९९९ साली कोकणातील सिंधुदुर्ग जिल्हा हा देशातील पहिला व एकमेव पर्यटन जिल्हा म्हणून घोषित झालेला आहे. विपुल जंगलसंपदा, सह्याद्रीच्या डोंगरदऱ्या, भरपूर पाऊस, आल्हाददायक हवामान, १२० कि.मी. लांबीचा विस्तीर्ण समुद्रकिनारा, किल्ले व डोंगरीगड, डोंगरकुशीत तसेच समुद्र-खाडी-नदी किनारी वसलेली मालवणी संस्कृतीची खेडी, या खेड्यातील विविध जातीधर्माच्या लोकांच्या वाडी-वस्त्या, विविध देवतांची, धर्माची देवालये, त्यांच्या परंपरा उत्सव- जत्रा, लोककलाहस्तकला, भात शेती-आंबा, काजू, नारळ सुपारीच्या बागायती, मासेमारी, मालवणी बोलीभाषा इ.वैशिष्ट्यामुळे हा संपूर्ण जिल्हा पर्यटनदृष्ट्या समृद्ध बनला आहे.तसेच राष्ट्रीय महामार्ग क्र.१७,कोकण रेल्वे व नजीकच्या गोवा राज्यातील विमानतळ या आधुनिक वाहतुकीच्या सुविधाही उपलब्धआहेत. जिल्हयांचा पर्यटनदृष्ट्या प्रचार, प्रसार मोठया प्रमाणात होत आहे. पर्यटकांचा प्रतिसादहीचांगला आहे. परंतु पर्यटन विकास मात्र योग्य प्रमाणात व सर्वसमावेशक होताना दिसत नाही.जिल्ह्यातील प्रचलित पर्यटन हे ऐतिहासिक मालवण किल्ला, विजयदुर्ग किल्ला, मालवण शहर,मालवण तारकली, देवबाग, शिरोडा, वेळागर हे सागरकिनारे; विशाल धामापूर तलाव: कुणकेश्वर, आंगणेवाडी ही प्रसिद्ध धार्मिक स्थळे: संस्थानकालीन सावंतवाडी शहर आणि आंबोली हे गिरीस्थान आणि तेथील धबधबा या मोजक्याच पर्यटन स्थळापुरता मर्यादित आढळतो. यात मालवण किल्ला, मालवण शहर आणि तारकर्ली, देवबाग येथील समुद्रकिनारे इ. सर्वाधिक आघाडीवर आहेत. जिल्ह्यातील या प्रसिद्ध स्थळांच्या पर्यटन विकासाचा लाभ ठराविक क्षेत्र आणि मोजक्या घटकांच्यापुरता मर्यादित आढळतो. तसेच सागरकिनारी 'स्कूबा डायव्हिंग आणि स्नॉर्कलिंग' हे विदेशी व नाविन्यपूर्ण साहसी सागरी पर्यटन प्रकार सुरू करण्यात आले आहेत. तर सी वर्ल्ड' हा पर्यटनदृष्ट्या

महत्त्वाकांक्षी प्रकल्प होऊ घातला आहे.सद्यस्थितीत बहुतांशी ग्रामीण लोक जिल्ह्यातील पर्यटन विकासाच्या लाभापासून वंचितआहेत. तसेच दिवसेंदिवस बदलणाऱ्या अनिश्चित पर्जन्यमान, हवामान, तापमानवाढीमुळे शेती,बागायती उत्पादनात होणारी घट: औद्योगिक रोजगाराचा अभाव यामुळे ग्रामीण, तसेच मच्छिमारलोकांच्या रोजगार व आर्थिक विकासाचा प्रश्न निर्माण झाला आहे.ग्रामीण पर्यटन संकल्पना ही ग्रामीण भागातील सर्व घटकांना सामावून घेणारी आहे. उपलब्धपर्यटन वैशिष्ट्ये व घटकांमुळे येथील प्रत्येक गाव स्वतंत्र पर्यटन स्थळ बनण्यास योग्य आहे, जसेकी, गावातील लोकांच्या राहत्या घरात त्यांची निवास व्यवस्था, मालवणी भोजन व विविध पदार्थाचाआस्वाद, शेती-बागायती-डोंगर-निसर्ग-रानावनात भटकंती, बैलगाडीतून सफर, नदी-तलाव,खाडीत पोहणे, मासे पकडणे, झाडावर चढणे, जनावरांचे दूध काढणे, विहिरीचे पाणी काढणे,गावातील धार्मिक व ऐतिहासिक स्थळे-वास्तू पाहणे, सण-उत्सव-जत्रांमध्ये सहभागी होणे, रात्रीलोककलांचा आनंद घेणे, गावातील चांदण्या रात्रीचा अनुभव यांसारख्या ग्रामीण जीवनातील दैनंदिनबाबींमधून येणाऱ्या पर्यटकांना आनंद अनुभवण्यास देणे. अशा प्रकारचे सहजसाध्य, कमी खर्चिकव प्रदूषणमुक्त पर्यटन या जिल्ह्यातील ग्रामीण जनतेचा रोजगार व आर्थिक विकासासाठी ग्रामीणपर्यटन संकल्पनेतून राबविणे शक्य आहे. याला शहरी पर्यटकांचा निश्चितच चांगला प्रतिसादलाभेल. तसेच पर्यटन सिंधुदुर्ग जिल्ह्यांच्या पर्यटन विकासाला चालना मिळेल.

## ६.५ ग्रामीण पर्यटनाची वैशिष्ट्ये

१) ग्रामीण संस्कृतीचे जतन, संवर्धन आणि तिचा शहरी लोकांना परिचय होण्यास ग्रामीण पर्यटनामुळे मदत होते.

२) ग्रामीण लोकांच्या आर्थिक उत्पन्नाचे प्रभावी साधन.

३) ग्रामीण जतनेच्या रोजगारासाठी नवे साधन

४) ग्रामीण व स्थानिक उत्पादनांच्या विक्रीचे प्रभावी माध्यम.

५) ग्रामीण कला, हस्तकला, लोककला व ग्रामीण खेळ यांच्या विकास व प्रसारास प्रोत्साहन मिळेल.

६) पर्यावरणपूरक पर्यटन.

७) ग्रामीण विकासाला चालना देणारे पर्यटन,

८) छोट्या व कौटुंबिक, तसेच गाव सामूहिक स्तरावर करता येणारे पर्यटन.

9) शहरी पर्यटकांना कमी खर्थिक स्वरूपाचे पर्यटन.

१०) आधुनिक जम, बदल व विकास याबाबतीत शहरी व ग्रामीण समाजात सुसंवाद घडविणारे पर्यटन.

## ६.६ ग्रामीण पर्यटनाचे महत्त्व

ग्रामीण भागात निसर्गातच उपलब्ध असलेल्या भौगोलिक, पर्यावरणीय, धार्मिक, सामाजिक,सांस्कृतिक, व्यावसायिक वैशिष्ट्यांचा ग्रामीण भागाच्या विकासासाठी उपयोग करून घेणे आवश्यक आहे. त्यांची ग्रामीण पर्यटन संकल्पनेशी सांगड घालून ग्रामीण भाग व लोकांचा पर्यटनात्मक दृष्टिकोनातून रोजगार, स्वयंरोजगार आणि आर्थिकविषयक विकास करणे शक्य आहे. यादृष्टीनेग्रामीण पर्यटनाला खूप मोठा वाव आहे. ते पुढीलप्रमाणे पाहता येईल.

**१) नैसर्गिक घटकांचा उपयोग:**

गावामध्ये शेती व संबंधित व्यवसायाच्या व गरजांच्या वापरानंतर उपलब्ध असलेल्या जंगल,डोंगर-दऱ्या, नदी, तलाव, खाडी, सागर किनारे, वन्यजीवन, मुसळधार पाऊस, शुद्ध हवा या सर्वनिसर्ग सौंदर्यांचा उपयोग करून ग्रामीण लोकांचा रोजगार व आर्थिक विकास करण्यास येथे खूपमोठा वाव आहे.

**२) पर्यटकांची शांत- निवांतपणाची गरजः**

आज जगभरातील विकसित, विकसनशील देशातील, महानगरातील शहरी लोक तेथीलवाढती प्रचंड गर्दी, गोंगाट, प्रदूषण, धावपळ, ताणतणाव, स्पर्धा यामुळे खूप त्रस्त झालेले दिसतात.त्यामुळे तेथे शांत-निवांतपणा दुर्मिळ होत चालला आहे. शरीर-मनाला आनंद,उत्साह देण्यासाठीयाची त्यांना नितांत गरज भासत आहे. ग्रामीण भागात व लोकजीवनामध्ये निसर्गत:च उपलब्ध असलेला हा शांत व निवांतपणा ग्रामीण पर्यटनाच्या माध्यमातून शहरी पर्यटकांना अनुभवू देण्यासयेथे सहजसाध्य आहे.

**३) ग्रामीण लोकजीवन व संस्कृतीचे आकर्षण:**

शहरातील आधुनिक जीवनशैलीत भौतिक सुविधा व आधुनिक मनोरंजनाची साधनेमाध्यमे यांचा विकास झाला आहे. परंतु यामध्ये येणारा तोचतोचपणा व कृत्रिमपणा तसेच अभिरूचीतीलबदल म्हणून वेगळ्या पर्यायाची गरज भासते. त्याचप्रमाणे ग्रामीण संस्कृती ही शहरी संस्कृतीपेक्षानिन्न आणि मनाला खरे समाधान व पर्यटनाचा शाश्वत आनंद देणारी असल्याने त्यांना ग्रामीणसंस्कृतीचे आकर्षण वाटत आहे. त्यामध्ये ग्रामीण लोकजीवन, त्यांची वेशभूषा, बोलीभाषा, स्थानिक खाद्यसंस्कृती, धार्मिक परंपरा, लोककला, शेती व पूरक व्यवसाय इ. वैशिष्ट्यांच्या आधारे शहरी पर्यटकांना ग्रामीण पर्यटनासाठी आकर्षक करता येईल.

**४) कौटुंबिक मनोरंजनाचे साधनः**

जीवनाच्या प्रत्येक बाबीविषयी जागरूक असणारे शहरी लोक आपल्या मानसिक व मनोरंजन स्वास्थ्यासाठी पर्यटनाला प्राधान्य देतात. परंतु प्रचलित व प्रसिद्ध पर्यटन स्थळावर आढळणारा बाळता बीभत्सपणा, स्वैराचार, गुन्हेगारी, अनैतिक बाबी यांमुळे त्यांना कुटुंबासह मनोरंजन, पर्यटनाचामनापासून आनंद घेता येत नाही. परंतु ग्रामीण पर्यटन माध्यमातून गावातील विविध सण,उत्सव,जत्रा, ग्रामीण खेळ, विविध लोककला, शेतावरील-

रानावनातील भटकंती, तसेच बैलगाडीची सफर आदी बाबींमधून ग्रामीण पर्यटनाचा व मनोरंजनाचा कुटुंबासह निखळ आनंद घेता येईल.

**५) कमी खर्चिक स्वरूपाचे पर्यटन:**

आज पर्यटन ही केवळ उच्च वर्गाचीच मिरासदारी राहिली नसून तर शहरी जीवनशैलीतीलवाढती स्पर्धा, ताणतणाव आदींमुळे समाजातील सर्व घटकांची ती एक गरज बनली आहे. तसेचजगभर पर्यटनाच्या वाढत्या प्रचार व प्रसारामुळे समाजातील सर्व घटकांना त्याची भुरळ पडलीआहे. परंतु प्रचलित पर्यटन स्थळांच्या ठिकाणी निवास व्यवस्था, खानपान सुविधा, वाहतूकव्यवस्था व अन्य अनुषंगिक सुविधा यांचे दर प्रचंड प्रमाणात वाढलेले असल्याने बहुतांश सामान्यपर्यटक घटकांना त्यापासून दूर व वंचित राहावे लागते. यातुलनेत ग्रामीण पर्यटन सर्वार्थाने कमीखर्चिक स्वरूपाचे असल्याने शहरी पर्यटकांचा चांगला प्रतिसाद मिळविल्यास येथे संधी आहे.

**६) ग्रामीण संस्कृती व परंपराचे जतन**

आधुनिक जीवनशैली, सुधारित सुखसुविधा, मनोरंजनाची नवी सामने, शहरीकरणाचा वाढता विस्तार, शहरांशी विविध कारणांनी येणारे वाढते संबंध इ. अनेक बाबींचा ग्रामीण भागावरप्रभाव पडत आहे त्याचप्रमाणे ग्रामीण लोकही शहरी व आधुनिक बाबींचा स्वीकार करू लागलेआहेत. या सर्व कारणांचा ग्रामीण संस्कृती व परंपरांवर बरे वाईट परिणाम होत आहेत. ग्रामीणसंस्कृती ही वैशिष्ट्यपूर्ण देशाचा वारसा असल्याने तिचे भविष्यकाळाच्या दृष्टीने जतन होणे महत्त्वाचेआहे. ग्रामीण पर्यटनामुळे या ग्रामीण संस्कृती विविध परंपरांचे जतन होण्यास हातभार लागू शकतो,

**७) ग्रामीण कला, लोककला, हस्तकलांचा प्रसार:**

संस्कृतीमध्ये आढळणाऱ्या विविध कला, लोककला व हस्तकला या ग्रामीण जीवनाशामहत्त्वाचा भाग आहेत. तसेच ती त्याची वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक ओळखही आहे. शेकडो वर्षांच्यापरंपरेने त्या जतन केल्या आहेत. आतापर्यंत त्या ग्रामीण भाग व संस्कृतीपुरत्या मर्यादित होत्या.परंतु वाढत्या पर्यटन प्रसारामुळे त्यांना सांस्कृतिक, व्यावसायिक आणि पर्यटनमूल्य प्राप्त झालेआहे. ग्रामीण पर्यटनामुळे बाह्यजगताशी परिचय होऊन त्यांचा देश-विदेश स्तरावर प्रसार होतआहे. उदा. वारली चित्रकला, मालवणी दशावतार, सावंतवाडीची लाकडी खेळणी, कोळीगीते वनृत्ये इ.

**८) ग्रामीण उत्पादनांना बाजारपेठ:**

ग्रामीण भागातील लोक आपल्या उदरनिर्वाहासाठी तसेच दैनंदिन उपयोगासाठी विविधउत्पादने व वस्तू तयार करीत असतात. त्यांना ग्रामीण उत्पादने असे म्हणतात. ही ग्रामीण उत्पादने नैसर्गिक स्वरूपाची तसेच गुणवतापूर्ण असतात. त्याचप्रमाणे ही ग्रामीण उत्पादने त्यांच्या आर्थिक मिळकतीचे साधन असतात. परंतु ग्रामीण भागातील स्थानिक व आठवडे बाजार ही त्यांना मर्यादित बाजारपेठ असते. त्यातून त्यांना मर्यादित बाजारपेठ असते त्यातून त्यांना तुटपुंजे आर्थिक उत्पन्नमिळते. दुसरीकडे शहरी लोकांना या वैशिष्ट्यपूर्ण ग्रामीण वस्तू व उत्पादनाचे औत्सुक्य व आवडअसते. ग्रामीण पर्यटनाच्या

माध्यमातून आलेल्या देशी-विदेशी पर्यटकांच्या रूपाने त्यांना चांगलीबाजारपेठ उपलब्ध होऊ शकते. आर्थिक उत्पन्न मिळू शकते. उदा. हात साडीचे तांदूळ, कोकम,सुकी मासळी, अंगराचे पीठ, कापडी बांबू,लाकडाच्या शोभेच्या वस्तू, मातीची भांडी, चामड्याच्या चपला बगैरे.

**९) स्थलांतराला आळा आणि बेकारी निर्मूलन:**

ग्रामीण भागातील शेती आणि अन्य पारंपरिक व्यवसायातून पुरेसा व वर्षभर रोजगार उपलब्धहोत नाही. तसेच पर्यायी रोजगाराचा अभाव यामुळे ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात बेकारी आढळते.परिणामी दारिद्रय व गरिबी आढळते. तर दुसरीकडे शहरांतील औद्योगिक व सेवा व्यवसायांच्याविकासामुळे रोजगाराच्या विविध संधीची उपलब्धता आहे. यामुळे ग्रामीण भागातील लोक विशेषतः तरूप पिढी रोजगारासाठी शहराकडे मोठ्या प्रमाणात भाव घेत आहे. त्यातून ग्रामीण भागात, स्थलांतरांची मोठी समस्या निर्माण झाली आहे. यावर ग्रामीण पर्यटनाचा प्रभावी व नियोजनबद्ध प्रसार केल्यास त्यातून ग्रामीण भागात विविध स्वरूपाचे रोजगार, स्वयंरोजगार सुरू करता येतील.त्यामुळे ग्रामीण भागातील स्थलारारााला आळा घालून, बऱ्याच प्रमाणात बेकारीचे निर्मूलन करणेशक्य आहे.

**१०) पडीक जमीन व शेती विकासाला चालना:**

शेतीच्या पारंपरिक व हंगामी स्वरूपामुळे तसेच त्यातील मोठया प्रमाणातील रोजगाराच्याअभावामुळे ग्रामीण भागातील लोकांनी विशेषत: तरूमापिटीने शहराकडे रोजगारासाठी मोठ्याप्रमाणात स्थलांतर केले आहे. या स्थलांतरामुळे ग्रामीण भागात बहुतांशी जमीन व शेती पडीक राहिली आहे. ग्रामीण पर्यटनाच्या रूपाने याला साहाय्यभूत पर्याय निर्माण झाला आहे. तर ग्रामीणग्रामीण पर्यटनात शहरी पर्यटकांच्या दृष्टीने असलेली शेती संस्कृतीचे महत्त्वाचे आकर्षण याचापर्यटनपूरक लाभ करून घेण्यासाठी ग्रामीण भागातील पडीक जमीन व शेती विकासाला चालनादेता येईल.

**११) ग्रामीण विकास आणि देशाच्या विकासाला चालनाः**

ग्रामीण भागातील शेतीची असंतुलित स्थिती, पर्यायी रोजगाराचा अभाव, विकास योजनांच्याअंमलबजावणीतील त्रुटी, शासन व शासकीय यंत्रणेची अनास्था, भ्रष्टाचार व वाढती महागाई इ.अनेक कारणामुळे ग्रामीण विकासाची स्थिती चिंताजनक असल्याची आढळते. त्यामुळे ग्रामीन विकासासाठी अन्य उपाय व पर्यायांची गरज निर्माण झाली आहे. ग्रामीण पर्यटन संकल्पना यालाउत्तम व शाश्वत उपाय किंवा पर्याय ठरू शकते. यासाठी आवश्यक पर्यटन घटक गावात, ग्रामीणभागात उपजतच उपलब्ध आहेत. याला मोठ्या भांडवल उभारणीची, व्यावसायिक यंत्रणा वव्यावसायिक विशेष प्रशिक्षणाची आवश्यकता नाही. ग्रामीण पर्यटनातून गावातील प्रत्येक लोक वसमाज घटकाला रोजगार व उत्पन्न मिळू शकेल. परंतू, ग्रामीण जनतेचा प्रतिसाद किमान प्रशिक्षण,ग्रामीण भागात पायाभूत सुविधांचा विकास, स्वयंसेवी संस्थांचा पुढाकार, शासनाचा आस्थापूर्वकसहकार्य, योग्य नियोजन-समन्चय व प्रचाराची निश्चितच गरज आहे. यामुळे ग्रामीण जनता,ग्रामीण विकास व पर्यायाने देशाच्या विकासाला जरूर ती चालना मिळेल.

## ६.७ ग्रामीण पर्यटनाचे फायदे

गावातच उपलब्ध घटकांचे ग्रामीण पर्यटन व्यवसायाच्या दृष्टिकोनातून योग्य ते व्यवस्थापन केल्यास व त्यामध्ये समन्वय साधल्यास त्यातून गावांच्या व ग्रामीण जनतेच्या विकासाचा एक नवापर्याय व मार्ग मिळेल या दृष्टिकोनातून ग्रामीण पर्यटनाचे महत्त्व समजणे आवश्यक आहे. ते पुढीलप्रमाणे.

### १) गावातच रोजगाराची उपलब्धता:

ग्रामीण पर्यटन हे थेट गावातच राबविले जाते. ग्रामीण पर्यटन व्यवसायामुळे लोकांना गावातच रोजगार उपलब्ध होतो. उदा. गावामध्ये पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांची न्याहरी-भोजन व निवासव्यवस्था, वाहतूक व्यवस्था, ग्रामीण जीवनशैलीचं मार्गदर्शन (टुरिस्ट गाईड), गाव-शिवारातून बैलगाडीची सैर करणे, गावातील धार्मिक, ऐतिहासिक, भौगोलिक वैशिष्ट्यांचे स्थलदर्शन घडविणे,पर्यटकांना आवडणाऱ्या ग्रामीण वस्तूचे उत्पादन करणे, पर्यटकांसाठी स्थानिक, सांस्कृतिक कलाव क्रीडा सादर करणे. यासारख्या अनेक बाबींमधून ग्रामीण पर्यटनामुळे लोकांना गावातच रोजगार उपलब्ध होतो.

### २) ग्रामीण व स्थानिक उत्पादनांची विक्री :

गावातील लोक विविध प्रकारची शेती पिके, फळ पिके, अन्नप्रक्रिया पदार्थ, फळप्रक्रिया पदार्थ, घरगुती वापराच्या वस्तू, आयुर्वेदिक औषधे, काही वन उत्पादने इ. यांचे कमी-अधिकप्रमाणात उत्पादन होत असतात. ही सर्व ग्रामीन उत्पादने नैसर्गिक तसेच गुणवत्ता व वैशिष्ट्यपूर्ण असतात. शहरी लोकांना या ग्रामीण उत्पादनांची खूप आवड असते आणि ग्रामीण पर्यटन दरम्यान ते यांची आवडीने खरेदी करतात. यामुळे गावातील लोकांना स्थानिक पातळीवरच आपल्या ग्रामीणउत्पादनांच्या विक्रीसाठी चिक्रीव्यवस्था व विना दलाली उत्पन्नांचा मार्ग उपलला झाला आहे.

### ३) स्थानिक संस्कृतीचा जागतिक स्तरावर प्रसार:

ग्रामीण भागातील लोकांची बोलीभाषा, वेशभूषा, परंपरा, सण , उत्सव, भार्मिक, श्रद्धा,व्यवसाय यातून त्यांची संस्कृती निर्माण होते. ही संस्कृती वैशिष्ट्यपूर्ण आहे. या संस्कृतीचाबाह्यजगताशी फारसा संबंध येत नाही. परंतु ग्रामीण पर्यटनामुळे या संस्कृतीचा शहरी पर्यटकांनाअनुभव व आनंद घेता येतो. तसेच बहुविध प्रकारच्या पर्यटकामुळे त्याचा अगदी राष्ट्रीय व जागतिकस्तरावर प्रसार होण्यास मदत होतो. उदा. ठाणे जिल्ह्यातील आदिवासी लोकांची वारली चित्रशैली,तारपा नृत्यप्रकार, तसेच सिंधुदुर्ग जिल्हयातील दशावतार लोककला व मालवणी बोली भाषा यांचाग्रामीण पर्यटनातून चांगला प्रसार होत आहे. यामुळे शहरी व विदेशी पर्यटकही येथे ग्रामीण पर्यटनासाठी येत आहेत. याचा फायदा तेथील जनतेच्या आर्थिक विकासासाठी होत आहे.

### ४) स्थानिक पर्यावरणाचे जतन:

गावातील निसर्ग, वृक्षसंपदा, शेती, नक्या, तलाय, डोंगर टेकड्या त्यातील बन्यजीवन तसेच धार्मिक व ऐतिहासिक स्थळे या सर्वापासून गावाचे नैसर्गिक, सामजिक व सांस्कृतिक

पर्यावरण जसे आहे, तसेच म्हणजेच नैसर्गिक व पारंपरिक स्वरूपात पाहण्यास शहरी पर्यटकांनाआवडते. ग्रामीण पर्यटन या व्यवसायांच्या संकल्पनेतून याचा रोजगार व उत्पन्न मिळविण्यासाठी आपल्याला लाभ होऊ शकतो. ग्रामीण लोकाना आता पटू लागले आहे. त्यामुळे त्याचे संवर्धन वजतन आपण केले पाहिजे ही भावना ग्रामीण लोकांमध्ये वाढीस लागली आहे. एकंदरीतच ग्रामीणपर्यटन संकल्पनेमुळे ग्रामीण भागातील स्थानिक पर्यावरणाच्या जतन होण्यास मदत होत आहे.

**५) लोककलांचे जतन व त्यास व्यावसायिक रूप**

निसर्गसौंदर्य व अन्य बाबींप्रमाणेच विविध लोककलांच्या बाबतीतही ग्रामीण जीवन समृद्धअसते. ग्रामीण भागात विविध प्रकारच्या लोककला आढळतात. शेकडो वर्षाच्या परंपरेने चालतआलेल्या या लोककलांचे ग्रामीण जनतेने जतन केले आहे. या लोककलांना अस्सल ग्रामीण बाजव दंग असतो. त्यामुळेच त्या शहरातील आधुनिक मनोरंजन कलापेक्षा वैशिष्ट्यपूर्ण असतात. यास्थानिक लोक कलांचे सादरीकरण प्रामुख्याने भार्मिक सण-उत्सव व कौटुंबिक कार्यक्रमांच्या वेळीचकेले जाते. अलीकडच्या काळात शहरी आधुनिक मनोरंजन साधनांच्या आक्रमणामुळे तसेच रोजगारांसाठी स्थानिक लोकांचे शहराकडे वाढते स्थलांतर यामुळे या लोककला हळूहळू लोपपावण्याची स्थिती निर्माण झाली आहे. परंतु ग्रामीण पर्यटनाच्या माध्यमातून शहरी पर्यटकांचात्यास मिळणारा उत्स्फूर्त व सशुल्क प्रतिसाद पाहता या ग्रामीण कलांचे जतन व त्यांना व्यावसायिकरूप मिळण्यास मदतच होत आहे. उदा. ठाणे, रायगड जिल्हयातील जाखडी नृत्य, नमन खेळतसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दशावतार, गाजानृत्य, कापडखेळे, ठाकर समाजाची कळसूत्री बाहुल्यांची चित्रकथी, सायरावाडीची लाकडी खेळणी, गजिफा तर मच्छिमार समाजाची घुमाट लोककला इ.

**६) स्थानिक लोकांच्या राहणीमानाचा वर्जा उंचावेल:**

शेती व्यवसाय हा ग्रामीण भागातील रोजगाराचे प्रमुख साधन होय. परंतू बदलते हवामान,कमी उत्पादकता व पडीक शेतीचे जास्त प्रमाण यामुळे शेतीतून गावातील लोकांना हंगामी काळातकमी प्रमाणात रोजगार मिळतो. त्यामुळे उर्वरित लोकांच्या रोजगाराची समस्या निर्माण झालीआहे. परंतू ग्रामीण पर्यटन व्यवसायातून गावातील बहुतांश लोकांना रोजगार उपलब्ध होऊ शकतो.जसे की शेती व शेतीपूरक उत्पादनाचे उत्पादन, पर्यटकांसाठी भोजन व निवास व्यवस्था, वाहतूकव्यवस्था, स्थानिक-ग्रामीण तसेच हस्तकला उत्पादने, ग्रामीण कला, लोककला व खेळांचे सादरीकरण, पर्यटन मार्गदर्शक (टुरिस्ट गाईड) या व इतर बाबीची ग्रामीण पर्यटनासाठी नितांतगरज आहे. यातून गावातील उत्पादन घेणाऱ्या तसेच पर्यटकांना विविध सेवा देणाऱ्या अशा बहुतांश लोकांना रोजगार प्राप्त होऊ शकतो आणि त्यापासूनच्या उत्पन्नामुळे निश्चितच स्थानिक लोकांच्या राहणीमानचा दर्जा उंचावू शकतो.

## ६.८ ग्रामीण पर्यटनाच्या मर्यादा:

ग्रामीण पर्यटन व्यवसायाच्या माध्यमातून ग्रामीण जनतेच्या विकासासाठी एक नया मार्गकिंवा पर्याय निर्माण केला आहे. परंतु पर्यटक व ग्रामीण जनता या दोहोंच्या

दृष्टिकोनातून त्याचाप्रचार-प्रसार व विकास अपेक्षित गतीने होताना दिसत नाही. याबाबतीत अनेक उणिवा व मर्यादाआदळतात त्या खालीलप्रमाणे.

**१) ग्रामीण भागातील लोकांची मानसिकता:**

ग्रामीण भागातील लोक हे रूबी व परंपरावादी म्हणून ओळखले जातात. तसेच त्याचीमानसिकताही बहुतांशी प्रमाणात स्थितीप्रिय आढळते. बदलते हवामान, वाढता उत्पादन खर्च, बाजारातील अनिश्चित दर, दलाल, सावकारांकडून फसवणूक या व इतर कारणांमुळे तोट्याचीशेती, व्यवसाय यातून शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्यांची ज्वलंत समस्या निर्माण झाली आहे.गावातील लोकांची वाढती आर्थिक हलाखी व बेरोजगारी यावरील अनेक पर्याया पैकी ग्रामीणपर्यटन व्यवसाय हा उत्तम व किफायतशीर पर्याय ठरू शकतो यासाठी गावामध्ये उपजतच उपलब्ध असलेले नैसर्गिक, भौगोलिक, धार्मिक, ऐतिहासिक, सामाजिक व सांस्कृतिक घटक आहेत त्याचस्वरूपात मात्र किमान नियोजन, व्यवस्थापन व प्रशिक्षणाच्या माध्यमातून शहरी पर्यटकांना अनुभवव आनंद मिळविण्यासाठी सशुल्क स्वरूपात उपलब्ध करता येतात. मात्र याच्यासाठी काहीतरी नवेशिकण्याची व करण्याची तयारी पाहिजे. परंतु किरकोळ अपवाद वगळता ग्रामीण भागातील लोकांची मानसिकता यासाठी विशेष तयार झालेली दिसून येत नाही.

**२) आर्थिक अडचण:**

तोट्यातील शेती व्यवसायाला ग्रामीण भागात ग्रामीण पर्यटन व्यवसाय पर्याय म्हणून पुढे येतआहे. तसेच पर्यटनाच्या निखळ आनंद मिळण्याचा चांगला पर्याय म्हणून शहरी पर्यटक ग्रामीणपर्यटनाला चांगला प्रतिसाद देत आहेत. याचा एकत्रित परिणाम म्हणून ग्रामीण भागातील काहीलोक ग्रामीण पर्यटन व्यवसाय सुरू करण्यास पुढे येत आहेत, परंतू त्यांच्यासमोर भांडवल उभारणीही प्रमुख समस्या निर्माण झाली आहे. शासनाकडून ग्रामीण पर्यटन व्यवसायास पूरक म्हणून न्याहरीनिवास योजनेची' परवानगी मिळण्याखेरीज कोणत्याही अर्थसाहाय्याची किंवा अनुदानाची मदतमिळत नाही, तर ग्रामीण पर्यटन ही संकल्पना वा व्यवसाय अजून प्रचलित वा त्याचा विकास नझाल्याने तसेच या व्यवसायातील उत्पन्नाची हमी किंवा त्यात सातत्य नसल्याने सरकारी आणिखाजगी बँका भांडवल उभारणीसाठी अर्थसाहाय्य करण्यास तयार होत नाहीत.

**३) प्रशिक्षणाचा अभाव:**

ग्रामीण भागातील लोकजीवन, तेथील निसर्ग, समुद्रकिनारे, भौगोलिक वैशिष्ट्ये, धार्मिकऐतिहासिक स्थळे, लोककला, उत्सव या सर्वांमधून प्रचलित पर्यटन स्थलोपेक्षा मिळनारा पर्यटनाचाशाश्वत आनंद मिळविण्यासाठी शहरी पर्यटकांची पावले बऱ्यापैकी प्रमाणात ग्रामीण भागातील लोकयाचा लाभ घेताना दिसत नाहीत. यातील प्रमुख कारण म्हणजेच पर्यटन प्रशिक्षणाचा अभाव होय.ग्रामीण पर्यटनाचे व्यवसाय म्हणून अपेक्षित असलेले आतिथ्य, पर्यटकांशी सुसंवाद साधणे, पर्यटकांच्याअपेक्षा जाणून घेने, पर्यटकांना द्यावयाच्या सुविधांमध्ये स्वच्छता-टापटिपपणा-नीटनेटकेपणा, त्यांचीप्रवास व्यवस्था, सुरक्षितता तसेच व्यवसायाचे नियोजन आणि व्यवस्थापन इ. बाबीमुळे त्याच्या व्यवसायामध्ये विस्कळीतपणा जाणवतो. पण पर्यटकांना यामुळे पूर्ण समाधान मिळत नाही.

ग्रामीण लोकांना अशा प्रकारचे प्रशिक्षण देण्यासाठी शासकीय यंत्रणा, तसेच स्वयंसेवी संस्थांनी पुढे येणेगरजेचे आहे.

### ४) पायाभूत सुविधांचा अभाव:

प्रचलित पर्यटन स्थळांकडून होत असलेला भ्रमनिरास, तर दुसरीकडे ग्रामीण पर्यटनामुळेमिळणारा नैसर्गिक व शाश्वत आनंद समाधान यामुळे ग्रामीण पर्यटनाला शहरी पर्यटकांचा चांगलाप्रतिसाद मिळत आहे. तरी याचा फारसा विकास न होण्यामागे ग्रामीण भागात अजून पायाभूत सुविधांचा विकास पुरेशा प्रमाणात व योग्य प्रकारे न होणे ही मुख्य अडचण आहे. आजही बहुतांशीग्रामीण भागात व खेळ्यांमध्ये रस्त्याची दयनीय स्थिती आहे. विविध वाहतूक यंत्रणा टेलिफोन,मोबाईल, आवश्यकप्रसंगी वैद्यकीय सुविधा, तसेच ग्रामीण पर्यटन स्थळांची माहिती देणारी यंत्रणाइ. पायाभूत सुविधा या योग्य स्वरूपात नसल्याने त्याचे दुष्परिणाम ग्रामीण पर्यटनाच्या प्रचार, प्रसारव बाढीवर देखील होत आहेत.

### ५) आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव :

ग्रामीण पर्यटनाची अवस्था कस्तुरीमृगाप्रमाणे आहे असे म्हणावयास हरकत नाही. कारणग्रामीण पर्यटनाच्या माध्यमातून गावातील सर्व घटकांचा म्हणजेच शेतकरी-शेतमजूर, उत्पादकअनुत्पादक, प्रतिष्ठित-सामान्य, ग्रामीण कारागीर-लोककला कलाकार, पुरूष-महिला-युवक इ.चा विकास करण्याचीक्षमता आहे. गरज आहे ती योग्य नियोजन आणि व्यवस्थापनाची तसेचग्रामीण पर्यटनाच्या गतिशील प्रसारासाठी वर्तमानपत्रे, मासिके, याबरोबरच आधुनिक तंत्रज्ञानवापर होणे गरजेचे आहे. परंतू ग्रामीण पर्यटनाच्या बाबतीत याचा अभाव जागवतो. माहिती तंत्रज्ञानाने (इंटरनेट) आज जग जवळ आहे. जगभराच्या पर्यटन व्यवसायाच्या प्रचार व प्रसारामध्ये इंटरनेट तंत्रज्ञानाचा मोलाचा हिस्सा आहे. अगदी राजस्थान व केरळ या राज्यांतील अनुक्रमे ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि निसर्ग पर्यटनाच्या यादीत इंटरनेटवरील जाहिरात व माहिती प्रसाराचा महत्त्वपूर्ण हिस्सा आहे. परंतु महाराष्ट्रातील व कोकणातील ग्रामीण पर्यटनाचा प्रसार व प्रचार यामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा बऱ्यापैकी अभाव आढळतो.

### ६) शासकीय धोरण आणि अनास्थाः

शेतीच्या दुरावस्थेमुळे ग्रामीण जनतेची आर्थिक व रोजगाराच्या बाबतीत दयनीय अवस्थाझाली आहे. ती सुधारण्याची प्राथमिक जबाबदारी शासनाची आहे. अशा पार्श्वभूमीवर ग्रामीणपर्यटना या सक्षम पर्याय निर्माण झाला आहे. परंतु त्याच्या यशस्वितेसाठी शासनाच्या प्रोत्साहनाचीगरज आहे, ग्रामीण पर्यटनाच्या माध्यमातून गावातील लोकांचा पर्यायाने ग्रामीण भागाचा विकास होण्यासाठी शासनाने संबंधित विभागांना एकत्रित आणून एक सर्वकष धोरण तयार करणे आवश्यक आहे. त्यामध्ये प्रत्येक गावाचा पर्यटन विकास आराखडा तयार करणे, लोकांमध्ये ग्रामीण पर्यटनाबाबत जाणीव जागृती निर्माण करणे, योग्य ते नियोजन व व्यवस्थापन करणे, ग्रामीण पर्यटन व्यवसायासाठी इच्छुकांना अर्थसाहाय्य करणे, देश-विदेशात ग्रामीण पर्यटनाचा प्रचार-प्रसार करणे, ग्रामीण पर्यटनमहोत्सव यासारख्या कार्यक्रमांचे आयोजन करणे इ. परंतु शासन आनि शासकीय यंत्रणा यांच्यास्तरावर या बाबतीत निरुत्साह व अनास्थाच आढळून येते.

**७) सांस्कृतिक बदल आणि नैतिक मूल्यांचा हास:**

आधुनिक युगातील सुधारित बदल आणि भौतिक सुविधा काहीशा प्रमाणात ग्रामीण लोकांनी] स्वीकारल्या असल्या तरी आपल्या संस्कृती आणि सामाजिक मूल्यांविषयी ते फार संवेदनशील असतात. वर्षानुवर्षे चालत आलेल्या आपल्या धार्मिक रूढी, परंपरा, चालीरीती, सामजिक मूल्ये,स्थानिक अस्मिता त्यांनी मनापासून जपलेल्या असतात. ग्रामीण पर्यटनाचा त्यांनी स्वीकार केलेलाअसला तरी त्यांना त्यांच्या धार्मिक, सामाजिक व संस्कृतीविषयक मूल्यांमध्ये पर्यटकांच्या रूपानेबाह्य घटकांचा हस्तक्षेप वा आक्रमण नको असते. अन्यथा ते संवेदनशील या नाराज होण्याचीशक्यता असते. यादृष्टीने ग्रामीण भागात पर्यटन हे दुधारी शस्त्र ठरण्याची शक्यता असते. शहरीभागातील व सुधारित सामाजातील लोक हे व्यक्तिस्वातंत्र्याचा व मुक्त जीवनशैलीचा पुरस्कारकरणारे असतात. मौजमजा व आनंदाचा उथळ व सवंग कल्पनांच्या बाबतीत ते पर्यटनवेळी आधिकआग्रही असतात. अशा बाबींच्या अतिरेकामुळे व आक्रमणामुळे स्थानिक संस्कृती व नैतिक मूल्यावरविपरीत परिणाम होऊ शकतात. उदा. गोवा हे पर्यटन राज्य. ग्रामीण पर्यटनाच्या बाबतीतही अशाशक्यता नाकारता येत नाही.

## ६.९.सारांश

प्रास्ताविकामध्ये पर्यटन व्यवसायात ग्रामीण पर्यटन ही नवी संकल्पनादेखील व्यवसाय म्हणून कशी विकसित होत आहे? याचे वर्णन केले आहे. ग्रामीण भागातील निसर्ग, शेती, व्यवसाय, ग्रामीण कारागिरी व व्यवसाय, तसेच धार्मिक, सामाजिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक आदी घटकांना कसे पर्यटन स्वरूप देता येईल ते मांडले आहे. ग्रामीण भागातील स्थलांतर रोखण्यासाठी एक उत्तम पर्याय म्हणून ग्रामीण पर्यटनाकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. शहरी आणि विदेशी पर्यटकांना ग्रामीण संस्कृतीचा परिचय व अनुभव देणे, तसेच किफायतशीर व निखळपर्यटन आनंदाचे साधन म्हणून ग्रामीण पर्यटनाचे महत्त्व व इतर अनेक बाबींची यथासांग चर्चा करण्यात आलेली आहे.

तात्पर्य:ग्रामीण पर्यटन ही संज्ञा अधिकाधिक स्पष्ट व्हावी. ग्रामीण पर्यटनाला ग्रामीण विकासाच्यादृष्टीने असलेले महत्त्व या विषयी विद्यार्थी वर्गाला सखोल माहिती मिळावी या उद्देशातून सदरगृहपाठाचे लेखन केलेले आहे. याशिवाय ग्रामीण पर्यटनाचे स्वरूप, व्याप्ती, महत्त्व, मर्यादा याविषयीदेखील विद्यार्थी वर्गाच्या ज्ञानात भर पसावी या उद्देशातून गृहपाठ लेखनावर भर दिला आहे.ग्रामीण पर्यटनाला विशेषत: कोकणामध्ये आणि भारतातील पहिला पर्यटन जिल्हा सिंधुदुर्गामध्येउपजतच उपलब्ध असलेली अनुकूल पार्श्वभूमी आणि बाब इ. बाबींची माहिती विद्यार्थीवर्गालाकरून देण्याचा प्रयत्नदेखील या पाठातून करण्यात आलेला आहे.

## ६.१० स्वाध्याय

१.ग्रामीण पर्यटनाची व्याख्या सांगा, त्याचे स्वरूप सविस्तर स्पष्ट करा.

२. ग्रामीण पर्यटनाची व्याप्ती व महत्त्व स्पष्ट करा.

३. ग्रामीण पर्यटनास ग्रामीण विकासाच्या दृष्टीने असलेले महत्त्व यावर भाष्य करा.

**टीपा लिहा.**

अ)ग्रामीण पर्यटनाच्या मर्यादा.

ब)ग्रामीण पर्यटन आणि पर्यटन सिंधुदुर्ग जिल्हा.

क) ग्रामीण पर्यटन आणि ग्रामीण संस्कृती.

## ६.११ संदर्भ सूची:


1) Dr. Sinha H. K. challenges in Rural Development,1998 Discovery Publication House New Delhi- 110002.
2) Dr. Dubey M. K. Rural and Urban Development in India, 2000, common wealth Publisher DoryaGonj New Delhi-110002.
3) Dr. Desai A. R. Rural Society in India 1978 Popular Publication House
4) http://mospi.nic.in/sites/default/files/Statistical_year_book_india_chapters/ch***12.***pdf

https://kids.britannica.com/students/article/irrigation/***275094***
https://www.cdc.gov/healthywater/other/agricultural/types.html
https://en.wikipedia.org/wiki/Irrigation
https://civiltoday.com/water-resource-engineering/irrigation/***63-***importance-of-irrigation-
https://www.smsfoundation.org/water-management/
https://www.nrcs.usda.gov/Internet/FSE_DOCUMENTS/nrcs***141***p***2***_***017781.***pdf
\https://thefactfactor.com/facts/pure_science/biology/irrigation/***2277/***
https://www.teachoo.com/***9803/2972/***Step-***4---***Irrigation/category/Concepts/


❖❖❖❖

# ७

# पर्यटन विकास – II

**पाठाची रूपरेषा**


७.० उदिष्टे

७.१ प्रास्ताविक

७.२ कृषी पर्यटनाची संकल्पना

७.३ कृषी पर्यटनाचे स्वरूप

७.४ कृषी पर्यटनाची व्याप्ती

७.५ कृषी पर्यटनाचे महत्त्व

७.६ कृषी पर्यटनाची मर्यादा

७.७ सारांश

७.८ स्वाध्याय

७.८ संदर्भ सूची

७.१० संदर्भ सूची


## ७.० उदिष्टे

1. कृषी पर्यटनाची संकल्पना समजून घेणे.
2. कृषी पर्यटनाचे स्वरूप- व्याप्ती अभ्यासणे.
3. कृषी पर्यटनाची व्याप्तीची माहिती घेणे.
4. कृषी पर्यटनाचे महत्त्व अभ्यासणे.
5. कृषी पर्यटनाची मर्यादा समजून घेणे.

## ७.१ प्रास्ताविक

पर्यटन क्षेत्र हे ग्रामीण भागात नवीन रोजगार निर्मितीचे साधन म्हणून विकसित होत आहे. शहरातील लोकांचा ओढा ग्रामीण भागाकडे आकर्षित होत आहे. रोजच्या धावपळीच्या

जीवनातून एखादा दिवस विरंगुळा मिळावा म्हणून शहरी जनता गावाकडे जाणे पसंत करतात. ग्रामीण भागात पर्यटनाच्या नव्या संधी विकसित होत आहेत. त्या दृष्टीने कृषी पर्यटन ही नवीन संकल्पना उदयास येत आहे. ग्रामीण भागात नव्याने विकसित होणारा पर्यटनाचा महत्त्वाचा व्यवसाय म्हणून कृषी पर्यटनाला ओळखले जाते. हा व्यवसाय इतर पर्यटन स्थळांपेक्षा वेगळा असल्याने शहरी भागातील लोकांना आकर्षित करीत आहे. कृषी पर्यटनातून खऱ्या अर्थाने ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडवले जाते. ग्रामीण भागातील लोकांचा व्यवसाय शेती आहे. आजही ग्रामीण भागातील 70 टक्के लोकसंख्या शेती व्यवसायावर अवलंबून आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थाही शेतीवर अवलंबून आहे, हे जरी सत्य असले तरी निसर्गाचा लहरीपण, अवकाळी पर्जन्य, वातावरणातील बदल, पावसाचा अनियमितपणा, शेतमालाच्या किमतीतील बदल, धोके व अनिश्चितता, शेती उत्पादनाचा वाढता खर्च, वाढती महागाई, कर्जबाजारीपणा, शेतकऱ्यांच्या आत्महत्या या विविध समस्यांना शेतकऱ्यांना नेहमीच सामोरे जावे लागते. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी शेती प्रकारात बदल करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने कृषी पर्यटन हा उत्तम पर्याय आहे. आधुनिक काळात कृषी पर्यटन हा यावर रामबाण उपाय आहे. कृषी पर्यटनातून शेतकऱ्यांना जोडधंदे, रोजगार स्वयंरोजगाराचे चांगले साधन निर्माण होणार आहे.

## ७.२ कृषी पर्यटनाची संकल्पना

कृषिपर्यटन ही नवीन संकल्पना आहे. शेती व पर्यटक यांचे नवीन नाते निर्माण करण्याची प्रक्रिया आहे. पर्यटकांना शेती क्षेत्राकडे आकर्षित करून त्यांना ग्रामीण भागातील शेती संस्कृतीचे दर्शन घडविले जाते. शेतकरी व पर्यटक यांचे परस्पर संबंध दृढ केले जातात. ग्रामीण व शहरी संस्कृतीचा मेळ घालण्याचा प्रयत्न केला जातो. कृषी पर्यटन ही संकल्पना समजून घेणे आवश्यक आहे. कृषी पर्यटनामध्ये ग्रामीण निसर्ग सौंदर्य, शेतीच्या विविध पद्धती, कडधान्ये व तृणधान्ये, गळित धान्य पिके, हरितगृह, फळे-फुले, विविध भाजीपाला पिके, इत्यादींचे उत्पादन कुक्कुटपालन, शेळ्या-मेंढ्या पालन, मधुमक्षिका पालन, दुग्ध उत्पादन, मासेमारी, रेशीम उद्योग, वराह पालन, इमू पालन, शेततळे, ओढे, नद्या इत्यादी बरोबर ग्रामीण खेळ, मनोरंजन, ग्रामीण लोककला, लोकनृत्य, ग्रामीण भोजन, ग्रामीण सण - उत्सव, समारंभ, इत्यादी विविध गोष्टींचा समावेश केला जातो.

**व्याख्या :-**

1) कृषी पर्यटन म्हणजे शहरी, देशी-विदेशी लोकांना ग्रामीण भागात आकर्षित करून त्यांना कृषी संस्कृतीचे दर्शन करून देणे, त्यांना ग्रामीण संस्कृतीशी एकरूप करणे, ग्रामीण भागातील निसर्गसौंदर्य व अनमोल ठेव्यांचे दर्शन घडवून देणे होय.

2) आपल्या शेती व्यवसायातून अधिक उत्पन्न मिळवण्यासाठी पर्यटकांना ग्रामीण भागाकडे आकर्षित करण्याच्या हेतूने शेतकरी आणि ग्रामीण जनता यांच्या तर्फे दिल्या जाणाऱ्या सोई सुविधा व सेवा स्वरूपाच्या अनेक कृती म्हणजे कृषी पर्यटन होय. (गॅनॉन 1988, इन स्लोएस 1998).

3) कृषी पर्यटन म्हणजे पर्यटकांना प्रामुख्याने कृषी किंवा कृषी-आधारित गोष्टींकडे आकर्षित करणे होय. कृषिपर्यटन ही एक अशी सुट्टी साजरी करण्याची संकल्पना आहे की

ज्या योगे एखाद्या कृषी क्षेत्राला, कृषीआधारीत उद्योगाला, फुले व फळबागेला, कृषी क्षेत्राला कृषीआधारीत उद्योगाला फुले व फळबागेला, शेतीपूरक व्यवसायाला भेट देऊन त्यातून मनोरंजन व शिक्षण मिळण्याच्या हेतूने केलेले पर्यटन होय.

4) कृषी ॲटम म्हणजे पर्यटकांना ग्रामीण कृषी संस्कृतीचे दर्शन घडवून देणे होय. यातून पर्यटकांना प्रत्यक्ष शेतावरील सर्व कामकाजामध्ये शेतकऱ्या समवेत भाग घेण्याची संधी प्राप्त करून दिली जाते. यातून पर्यटकांमध्ये ग्रामीण संस्कृतीशी नाळ जोडण्याचा प्रयत्न केला जातो.

## ७.३ कृषी पर्यटनाचे स्वरूप

कृषी पर्यटन ही पर्यटनाची नवीन संकल्पना आहे. खऱ्या अर्थाने कृषी पर्यटनाचा विकास इ.स. 2004 सालापासून झाला आहे. शेतकरी अथवा शेतकऱ्यांचा समूह, खाजगी संस्था, शासकीय व खाजगी संस्थांनी भागीदारी असणाऱ्या संस्था किंवा कृषी पर्यटनासाठी सेवा सुविधा पुरविणाऱ्या संस्थांनी कृषी पर्यटनाची संकल्पना राबवली. या संस्थांच्या, गटाच्या किंवा समूहाच्या माध्यमातून शहरी पर्यटकांना ग्रामीण भागाकडे आकर्षित केले जाते. ग्रामीण भागामध्ये पर्यटकांना शेतावर प्रत्यक्ष चालवणाऱ्या सर्व कामांमध्ये आकर्षित केले जाते. मग शेतावर नांगरणी असो की, एखाद्या पिकाची काढणी असो, किंवा भाजीपाल्याची लागवड असो, सर्व कामांमध्ये त्यांना समाविष्ट करून घेतले जाते. यातूनच ते ग्रामीण कृषी कार्याचा अनुभव घेत असतात. शेतावरील विविध जनावरे शेळ्या, मेंढ्या, गाई, म्हशी आणि बैल यांच्या सानिध्यात ते रमून जातात. मळ्यातील बैलगाडीमधील सफर असो किंवा ट्रॅक्टरवरील फेरफटका असो, त्यांना खूप आनंदित करतो. शेतावरील मुक्काम त्यांना नेहमीच्या शहरी वातावरणापासून दूर घेऊन जातो. ग्रामीण भागातील वेगवेगळ्या पदार्थाची चव त्यांना पिझ्झा-बर्गर पेक्षा कितीतरी बरी वाटते. चुलीवरची ज्वारी बाजरीची भाकरी तंदूररोटी पेक्षाही कितीतरी बरी वाटते.

गावातील विविध यात्रा, उत्सव, आठवडे बाजार व त्यातील विविध वस्तूंची खरेदी त्यांना मोहून टाकते. ग्रामीण भागातील विविध खेळ उदा. विटीदांडू, लंगडी, लपंडाव, लघोरी यांचा ते मनमुराद आनंद घेतात. आपल्या रात्रीच्या मुक्कामामध्ये गौळणी, तरपनृत्य, गरबा, कोळी नृत्य, भारूड, जागरण, गोंधळ, अशा प्रकारच्या ग्रामीण संस्कृतीची ओळख करून देणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. अशा वातावरणात एक दोन दिवसांच्य मुक्कामामध्ये ते शहरी वातावरण विसरून ग्रामीण वातावरणात, निसर्गाच्या सानिध्यात एकरून होऊन जातात. शहरी धकाधकीचे जीवन, कामाचा - नोकरीचा ताणतणाव विसरून जातात. सर्वच लोक या नैसर्गिक वातावरणाशी समरस झाल्याने प्रसन्न जीवनाचा अनुभव घेतात.

**कृषी पर्यटनची गरज किंवा आवश्यकता:-**

भारत हा शेतीप्रधान देश आहे. भारतामध्ये शेती व्यवसायाची हजारो वर्षा पूर्वीपासूनची परंपरा आहे. भारतातील ग्रामीण भागात दर तीन व्यक्तींपैकी दोन व्यक्ती शेती क्षेत्रात प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे गुंतलेल्या दिसतात. परंतु सध्याच्या आधुनिकीकरणाच्या काळात, ग्रामीण संस्कृतीपेक्षा शहरी संस्कृतीला अधिक महत्त्व प्राप्त होऊ लागले आहे. खेड्यांतील लोक

उद्योग, व्यवसाय, शिक्षण अथवा नोकरीच्या निमीत्ताने शहरांकडे जाऊ लागले आहेत. शहरीकरणात झपाट्याने वाढ होत आहे. शहरांचा विस्तार वाढत आहे. औद्योगिकरण, अधुनिकरण व जागतीकीकरणाच्या नावाखाली शहरांचे स्वरूपच बदलले आहे.

शहरी लोकांना ग्रामीण संस्कृतीचा विसर पडला आहे. याला आवर घालायचा असेल तर त्यासाठी कृषी पर्यटन हे चांगले माध्यम आहे. आपल्या पूर्वजांनी जपलेल्या ग्रामीण-कृषी संस्कृतीचे दर्शन या माध्यमातून करून देता येईल व जुन्या आठवणींना उजाळा देता येईल.

निसर्गाचा लहरीपणा, अवकाळी पर्जन्य, सततच्या दुष्काळामुळे घटते उत्पन्न, वाढती महागाई, वाढलेल्या कृषी आदानांच्या किंमती, कृषी मालाच्या बाजारभावातील चढ उतार, कर्जबाजारीपणा, नैराष्य व यातून वाढलेल्या आत्महत्या, यासाठी आपण काळाची गरज ओळखून मार्ग काढला पाहिजे. शेतावरील वाढता बोजा कमी करण्यासाठी योग्य जोडधंदा शोधला पाहिजे. बदलत्या काळामध्ये कृषीपर्यटन हे त्यावरील रामबाण औषध आहे. नव्हे ती तर काळाची गरज आहे. यातून शेतकऱ्यांना जोडधंद्याचे, रोजगाराचे व उत्पन्नाचे चांगले साधन निर्माण होणार आहे. शेतकरी व पर्यटक या दोघांच्याही गरजा भागणार आहेत.

**महाराष्ट्रातील कृषीपर्यटनाचा वारसा** :-

महाराष्ट्र हे नावाप्रमाणेच एक महान राज्य आहे. या राज्याला कृषी पर्यटनासाठी सांस्कृतिक, भौगोलिक, ऐतिहासिक, शैक्षणिक, औद्योगिक, सामाजिक, सहकारी, शहरी व ग्रामीण वारसा लाभलेला आहे. त्यामुळे या उद्योगाच्या भरभराटीस अतिशय चांगले पोषक वातावरण महाराष्ट्रामध्ये असल्यामुळे कृषी पर्यटन हा उद्योग नक्कीच चांगल्या प्रकारे यशस्वी उद्योग म्हणून नावारूपास येणार आहे.

महाराष्ट्रची संस्कृती ही फार उदात्त, वंदनीय व पूज्य अशीच आहे. या संस्कृतीचे धडे देशीविदेशी दिले जातात. अनेक लोक याचे अनुकरण करतात. ही आदर्शवादी संस्कृती आपल्याला खऱ्या अर्थाने ग्रामीण भागातूनच पहावयास मिळते. कृषीपर्यटनातून याचे दर्शन सर्वांना होणार आहे.

महाराष्ट्र हे भौगोलिक विविधतेने नटलेले राज्य आहे. यामध्ये पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा व कोकण या विभागांची खास वेगळी ओळख आहे. आणि ती आपल्याला कृषी पर्यटनाच्या माध्यमातून होणार आहे.

महाराष्ट्राला एक ऐतिहासिक परंपरा आहे. हे राज्य शिवाजी राजे, मावळे याच्या वास्तव्याने पुनीत झालेले राज्य आहे. भरभक्कम अशा खूप मोठ्या संत परंपरेने हे राज्य समृद्ध झाले आहे. हे विविध किल्ल्यांनी नटलेले राज्य आहे. हा ऐतिहासिक ठेवा आपल्याला पर्यटनाच्या माध्यमातून पहावयास मिळणार आहे.

महाराष्ट्रातील पुणे हे विद्येचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्रातील विविध शैक्षणिक विद्यापीठे, कृषी विद्यापीठे त्या अंतर्गत असणाऱ्या विविध शैक्षणिक सुविधा व शैक्षणिक संकूले प्रयोगशाळा ह्या भावी पर्यटनाच्या आकर्षण ठरणार आहेत.

महाराष्ट्र हे औद्योगिक राज्य म्हणून ओळखले जाते. तेथील कारखानदारी, विविध वस्तूंवर प्रक्रिया करणारे उद्योग, मुल्य वृद्धी करणारे असंख्य कृषी उद्योग ही कृषी पर्यटनाची विविध अंगेच आहेत.

समहाराष्ट्रातील सामाजिक व सहकारी चळवळीला फार मोठा इतिहास आहे. या चळवळीतून महाराष्ट्रांची फार मोठ्या प्रमाणावर प्रगती झाली आहे. साखर उद्योग हा या चळवळीचाच पायाभूत घटक आहे. हे असंख्य साखर कारखाने व त्यांनी ग्रामीण भागात निर्माण केलेल्या विविध सेवा सुविधा या कृषि पर्यटनास पुरकच ठरणार आहेत.

कृषी पर्यटनामुळे शहरी व ग्रामीण संस्कृतीचे एकत्रीकरण होऊन त्यातील दरी नक्कीच कमी होणार आहे.

## ७.४ कृषी पर्यटनाची व्याप्ती

कृषी पर्यटनामध्ये फार मोठ्या प्रमाणावर संधी दडलेली आहे. त्या संधी आपल्याला पुढील मुद्द्यांवरून स्पष्ट करता येतील

**1) अल्प खर्चाचा मार्ग :-**

कृषी पर्यटनाचा खर्च म्हणजेच प्रवास, निवास, भोजन व करमणूक यावरील खर्च होय. तो कृषीपर्यटनामध्ये फार कमी असतो. त्यामुळेच कृषी पर्यटनाकडे खूप लोक वळताना दिसत आहेत. सद्ध्याचा प्रवास आणि पर्यटन हे फक्त शहरी भागापुरतेच मर्यादित आहे आणि तेही फक्त उच्च उत्पन्न गटातील लोकांपुरतेच मर्यादित आहे. परंतु कृषी पर्यटनाची व्याप्ती फार मोठी आहे. त्यामध्ये असंख्य लोकांना समाविष्ट केलेले आहे. त्यामुळे या व्यवसायात येणाऱ्यांसाठी फार मोठी संधी आहे.

**2) शेतीची जिज्ञासा आणि ग्रामीण जिवनाबाबतची उत्सुकता :-**

शहरी लोकांना नेहमी ग्रामीण लोकांबद्दल मोठी जिज्ञासा असते. त्यांना ग्रामीण लोकांची जिवनपद्धती जाणून घेण्याची मोठी उत्सुकता असते. शहरात दररोज येणाऱ्या विविध वस्तू उदा. भाजीपाला, फुले, फळे, अन्नधान्य, दूध, अंडी, कच्चामाल कोठे तयार होतो. तो कसा तयार केला जातो, याबाबतची जिज्ञासा त्यांना सतत नवीन गोष्टा जाणून घेण्यास प्रवृत्त करते. ग्रामीण जीवन, तेथील संस्कृती, भाषा, पोशाख, रूढीपरंपरा या सर्वांबाबत जाणून घेण्यासाठी मोठे कुतूहल निर्माण होते. कृषी पर्यटनातील शेती व शेतकरी ही उत्सुकता भरून काढण्यास नेहमी सक्षम असतात.

**3) कौटुंबिक करमणूक करण्याबाबतची मोठी मागणी :-**

आजच्या काळात लहान मुलांपासून वृद्ध माणसांपर्यंत कुटूंबातील सर्व घटकांचे मनोरंजन होईल असे पर्यटन कार्यक्रम हवे असतात. अशाप्रकारच्या गोष्टींना शहरी लोकांकडून मोठी मागणी आहे. कृषी पर्यटनामध्ये हीच खरी मोठी क्षमता आहे. यातून अबालवृद्ध या सर्वांचे कमी खर्चात मनोरंजन होते. सर्वांसाठी खेळता येणारे विविध ग्रामीण खेळ, सण, उत्सव, यात्रा, मेळावे, वेगवेगळे अन्न, पोशाख, निवारा व तेथील निसर्ग या बाबतची मोठी रेलचेल असते.

**4) ग्रामीण भागातील आरोग्यसंपदा व निरोगी जिवनाबाबतची ओढ :-**

शहरी भागातील सततच्या तणावपूर्ण वातावरणामुळे माणसांचे सरासरी आयुर्मान घटत चालले आहे. ग्रामीण भागातील लोकांचा कल आयुर्वेदाकडे जास्त वाढला आहे. आयुर्वेदाचा उगमच खेड्यांतून झाला आहे. खेडेगावातील बहुतांशी लोकांना आयुर्वेदाची चांगली माहिती असते. त्यामुळे त्यांना ग्रामीण भागातील शांततामय जीवनाची अधिक ओढ निर्माण झालेली दिसून येते.

**5) शांतातामय जीवनाची ओढ :-**

आधुनिक काळात माणसांची विचारांची दिशा आणि व्याप्ती फार मोठ्या प्रमाणावर बदलली आहे. त्यामुळे प्रत्येक मनुष्य स्वतःला जास्तीत जास्त वेळ कामांमध्ये गुंतवून घेत आहे व आधुनिक सुखसोयींचा उपभोग घेण्यासाठी सतत पैशाच्या पाठीमागे धावत आहे. त्याने शांततामय जीवनाचा त्याग केला आहे. त्यामुळे त्याला आता शांततेसाठी निसर्गाच्या सानिध्याची ओढ निर्माण झाली आहे.

**6) नैसर्गिक वातावरणाची आवड :-**

रोजच्या धक्का-बुक्कीच्या धावपळीच्या जीवनातून आठवड्याच्या शेवटी एक किंवा दोन दिवस कोठतरी निसर्गाच्या सानिध्यात जावेशे वाटते. तेथील पक्षी, प्राणी, जलापय, निसर्गाचे विविध पाहून मनातील सर्व ताणतणाव विसरून जातात. यातूनच त्यांना नैसर्गिक वातावरणाची ओढ निर्माण होते.

**7) नेहमीच्या सवयींचा आलेला कंटाळा :-**

बदल हा जीवनाचा अविभाज्य भाग आहे. नेहमीच्या वातावरणामध्ये राहून सततच्या कामाचा माणसाला कंटाळा येतो. त्यातून माणसाचा नैराश्याचा सूर चालू होता. यामुळे कंटाळलेल्या जीवाला थोडा बदल घडून आणला तर मनुष्य तितकाच ताजातवाना होतो व उत्साहाने पुढच्या कामाला लागतो. त्यामुळे बदल हा अपरिहार्यच आहे.

**8) आपल्या पूर्वजांबाबतची अस्था :-**

पूर्वीची खेडी ही आजची विकसित शहरे आहेत. काळाच्या ओघात त्यामुळे बदल होत गेले. खेडेगावातील लोक रोजगारासाठी शहराकडे धाव घेऊ लागले. यातूनच निमशहरी भागाचा विकास होऊ लागला व शहरात रूपांतर होऊ लागले. आजच्या शहरी लोकांचा वारसा हा ग्रामीणच आहे. त्यामुळे त्यांना आपल्या पूर्वजांबद्दल आस्था आहेच. त्यामुळे त्यांना आजही ग्रामीण भागाची ओढ आहेच. या प्रेमापोटी ते गावी येण्यास उत्सुकच असतात. परंतु खेडेगावी जाण्यासाठी त्यांना असंख्य अडचणी असतात. त्यावर मात करण्यासाठी कृषी पर्यटन हा चांगला पर्याय आहे.

**9) ग्रामीण मनोरंजनाची आवड :-**

ग्रामीण भागातील कला व उत्सव हे मनोरंजनाचे फार मोठे साधन आहे. ग्रामीण भागातील राहणीमान, त्यांच्या सवयी, पोशाख, संस्कृती, रुढी व परंपरा या सर्व गोष्टीचे शहरी लोकांना

आकर्षण असते. ग्रामीण वातावरणातील कृषी उत्पादन, प्रक्रिया ही शहरी लोकांसाठी मोठा उत्सुकतेचा भाग असतो. तो जाणून घेण्यासाठी मोठा रस असतो. सर्वाधिक उत्पादन देणाऱ्या विविध पिकांच्या जातीबद्दल, सर्वाधिक दूध उत्पादन गायी, म्हशी, शेळ्या, मेंढ्या याबद्दल मोठे कुतूहल असते. कृषी मालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगाला भेट देण्यासाठी ते फार उत्सुक असतात. शेतावरची ताजी भाजी, फळे, फुले यांच्या खरेदीबद्दल त्यांच्या मनात मोठी ओढ असते. यासर्व गोष्टींपासून पर्यटकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी विक्री केंद्रे निवडा आणि खरेदी करा अशा सुविधा, निवडा आणि खेळा अशा सुविधा उदा. बैलगाडीमधून फेरफटका, उंट, घोडा यांच्यावरील फेरफटका, नावेमधून प्रवास, यासारख्या असंख्य गोष्टींना फार मोठा वाव आहे.

**10) कृषीपर्यटनाचे शैक्षणिक मुल्य :**

कृषीपर्यटनातून शहरी भागातील मुलांना ग्रामीण कृषी संस्कृतीचा वारसा प्राप्त होतो. शहरातील सहलींना हा एक चांगला पर्याय आहे. यातून शहरी मुलांना ग्रामीण कृषीचा कार्यानुभव होतो. कृषी विभागात काम करणाऱ्या असंख्य लोकांना यातून प्रशिक्षण देता येते आणि याचा एक शैक्षणिक साधन म्हणून उपयोग करता येतो. एक यशस्वी उद्योग म्हणून त्यांच्या प्रशिक्षणासाठी उपयोग होत असतो. भविष्यातील मोठमोठ्या कृषी पर्यटन केंद्राची बीजे आजच्या या छोट्या मोठ्या कृषी पर्यटन केंद्रामधूनच रोवली जात आहेत. कृषी व्यवसाय व्यवस्थापनामध्ये कृषी पर्यटनाला फार मोठे महत्त्व दिले आहे. यामुळेच कृषी पर्यटनाचा कृषी व्यवसायाशी निगडीत असणाऱ्या अनेक अभ्यासक्रमामध्ये समावेश केला आहे.

**कृषी पर्यटनासाठी योग्य स्थळ कसे निवडावे? :-**

कृषी पर्यटन यशस्वी करण्यासाठी पर्यटनाचे योग्य स्थळ निवडणे फार महत्त्वाचे आहे. निवडलेले स्थळ हे मध्यवर्ती ठिकाणी असावे जेणेकरून ते पर्यटकांना येण्याजाण्यासाठी सोयीचे असावे. निवडलेल्या स्थळाला नैसर्गिक पार्श्वभूमी असावी, कारण शहरी पर्यटकांना नैसर्गिक व ग्रामीण जीवनाची खूप ओढ असते. निवडलेले स्थळ हे रस्त्यांच्या व रेल्वेच्या चांगल्या सुविधांनी जोडलेले असावे. जी स्थळे पर्यटन म्हणून विकसीत पावलेली आहेत. उदा. महाबळेश्वर, पाचगणी, ज्योतीबा, नाशिक, नरसिंहवाडी, पंढरपूर, देहू, आळंदी, अक्कलकोट अशा धार्मिक स्थळांचाही मोठ्या प्रमाणावर उपयोग करून घेता येईल. याशिवाय शेतकऱ्यांना व पर्यटकांना सोईची असणारी असंख्य स्थळे विकसित करता येतील की जी स्थळे शेतकऱ्यांना आर्थिक दृष्ट्या परवडणारी असतील.



Krushidoot,com

**कृषी पर्यटन केंद्र कोण चालू करू शकतो? :-**

ज्या शेतकऱ्याकडे कमीत कमी 3 ते ५ एकर शेतजमीन आहे व शेतावर फार्म हाऊस आहे आणि पुरेशी पाण्याची सोय आहे व जो येणाऱ्या पर्यटकांचे चांगल्या प्रकारे मनोरंजन करण्यास उत्सुक आहे असा कोणताही शेतकरी कृषी पर्यटन केंद्र चालू करू शकतो. एकट्या शेतकऱ्याशिवाय अनेक शेतकऱ्यांनी सहाकरी संस्था, बिगर शासकीय संस्था, कृषी विद्यापीठे व कृषी महाविद्यालये अशा प्रकारचे केंद्र चालू करू शकतात. याशिवाय एखाद्या गावची ग्रामपंचायत शेतकऱ्यांच्या व गावकऱ्यांच्या मदतीने असे केंद्र चालू करू शकते.

**कृषी-पर्यटन केंद्र चालू करण्यासाठी काय करावे? :-**

1) कृषीपर्यटन केंद्र चालू करण्यासाठी आपला प्रस्ताव खालील ठिकाणी करावा.

प्रती,

संचालक,

विस्तार सेवा कृषी पर्यटन विकास संस्था,

पहिला मजला, कर्णिक हेरीटेज,

ओ.बी.सी. बँकेच्या विरुद्ध बाजूस,

फर्ग्युसन रोड, डेक्कन जिमखाना, पुणे 411004.

2) ज्या शेतकऱ्याचा शेतीफार्म हा पर्यटनाच्या दृष्टिकोनातून विकीसत केला आहे अशाच शेतकऱ्याची नोंदणी पर्यटन केंद्रासाठी ग्राहा धरली जाते.

3) विकसित केलेल्या शेतीफार्मवर कमीत कमी तीन रूम राहण्यास योग् असाव्यात.

4) सुरवातीस करारावर सह्या झाल्यानंतर तीन वर्षांसाठी परवानगी दिली जाते. तपासणीमध्ये भेटी दिलेल्या पर्यटकांची एकूण संख्या, पर्यटन केंद्राची जोपासना व त्यातून निर्माण झालेले, आर्थिक उत्पन्न यांचा विचार केला जातो व या बाबी समाधानकारक आढळल्यानंतर पुढील वर्षांसाठी पर्यटन केंद्रास मंजुरी दिली जाते.

5) पर्यटन केंद्र चालकाने प्रत्येक महिन्यात भेट दिलेल्या पर्यटकांची नोंदणी आपल्या नोंदणी रजिस्टरमध्ये करणे गरजेचे आहे व ती माहिती दरमहिन्याला पर्यटन विकास संस्थेच्या बारामती व पुणे ऑफिसला पाठविणे बंधनकारक आहे.

6) कृषी पर्यटन केंद्राची नोंदणी करण्यासाठी केंद्र चालकांनी आपली माहिती खालील परिशिष्टामध्ये भरून देणे गरजेचे आहे.

1) नोंदणी अर्ज परिशिष्ट 1 .

2) सेवा-सुविधांची यादी - परिशिष्ट 2.

3) जारिनामा- परिशिष्ट 3.

4) वचनपत्र- परिशिष्ट 4.

5) पोलिस तपासणी अहवाल परिशिष्ट 5.

7) नोंदणी अर्ज शुल्क रु. ३०००/- डिमांड ड्रफ्टच्याद्वारे कृषी पर्यटन विकास संस्था पुणे यांच्या नावे पुणे येथे देय स्वरूपात भरणे.

8) पर्यटन केंद्रामध्ये निवासादरम्यान काही अपघात घडल्यास पर्यटकाला तातडीची वैद्यकीय मदतसेवा व वाहतुक सेवा पुरविण्याची जबाबदारी पर्यटन केंद्र चालकावर राहील व त्याने तसे केंद्राची नोंदणी करण्याच्या वेळी कृषी पर्यटन विकास संस्थेस लिहून देणे बंधनकारक आहे.

9) कोणत्याही परिस्थितीमध्ये एखाद्या पर्यटकाने लेखी तक्रार नोंदविल्यास पर्यटन केंद्राची नोंदणी रद्द करण्यात येईल.

10) उपयुक्त सेवा सुविधांची यादी शेतकऱ्यांने सही करून कृषी पर्यटन विकास संस्थेकडे देणे बंधनकारक आहे.

11) शेतकऱ्यांच्या कृषीपर्यटन केंद्रामधील सर्व सेवा सुविधांची तपासणी कृषी पर्यटन विकास केंद्राच्या कमीटीकडून केली जाते व त्यावरूनच त्याची नोंदणी कायम केली जाते. नोंदणी कायम केल्यानंतर पुन्हा ठराविक कालानंतर केंद्राच्या सेवा-सुविधामध्ये झालेल्या प्रगतीचा आढावा घेतला जातो.

12) कृषी पर्यटन विकास केंद्रामार्फत मार्गदर्शन व अटींमध्ये वेळोवेळी बदल केला जातो. याचे हक्क विकास केंद्र स्वत:कडे राखून ठेवते.

13) पर्यटन केंद्रासाठी आवश्यक असणाऱ्या वीज, पाणी, मालमत्ता व मनोरंजन यांचे दर व त्यावरील कर हा स्वतः शेतकऱ्यास भरावा लागतो. यासाठी ए.टी.डी.सी. कोणतीही सवलत पुरवत नाही.

14) पर्यटन केंद्र चालकाने कृषि पर्यटन विकास संस्थेचे कोणतेही मानक, चिन्ह, नाव, फलक यांचा वापर पर्यटन केंद्राच्या जाहिरातीसाठी करावयाचा नाही. अथवा बिलबुक, पावती पुस्तक, लेटरहेड, रबरस्टँप यांच्या स्वरूपात करावयाचा नाही. तसे केल्यास ते नियमबाह्य ठरवून केंद्राची नोंदणी रद्द करण्यात येते.

15) पर्यटन केंद्र चालकाने नोंदणी दाखला पर्यटन केंद्राच्या स्वागतकक्षामध्ये किंवा ऑफिसमध्ये लावणे बंधनकारक आहे.

16) दरपत्रकामध्ये केलेला बदल, नवीन सेवा सुविधा अथवा एखादी सुविधा कमी केल्यास केंद्रचालकाने तसे कृषी पर्यटन विकास संस्थेत कळविणे बंधनकारक आहे.

17) शासनाने वेळोवेळी केलेले नियम केंद्र चालकास पाळणे बंधनकारक राहील. कृषीपर्यटन केंद्राची नोंदणी करण्यासाठी अर्जामध्ये खालील गोष्टींचा समावेश असावा.

1) कृषी पर्यटन केंद्राचे नाव.

2) केंद्र चालकाचे नाव व पत्ता.

3) कृषी पर्यटन केंद्राचा संपर्कासाठी पत्ता.

   1) टेलीफोन नं.

   2) फॅक्स, ईमेल,

   3) भ्रमणध्वनी

4) कृषीपर्यटन केंद्रापासूनचे अंतर

   1) हवाई विमानतळ

   2) रेल्वे स्थानक

   3) शहर

   4) मुख्य बाजारपेठ

   5) बसस्थानक

5) कृषी पर्यटन केंद्राची माहिती

   1) कृषी पर्यटन केंद्राची मालकी कशाप्रकारे आहे.

   2) पोलीस तपासणीचा दाखला

   3) निवासाची सोय, एकूण खोल्यांची संख्या, त्यांचे अंदाजे क्षेत्रफळ इत्यादी.

   4) स्नानगृह व शौचालयाची व्यवस्था

   5) भोजन व्यवस्था

   6) वाहनस्थळाची सोय

   7) अग्नीशामक व्यवस्था

   8) नोंदणी शुल्काबाबतची माहिती, ड्रॉफ्ट नंबर, बँकेचे नाव, रक्कम इ.

   9) सेवा सुविधाबाबतची यादी

   10) प्रतिज्ञापत्र




Krushidoot,com

**कृषी पर्यटन केंद्र चालू करण्यासाठी आवश्यक बाबी किंवा घटक:-**

**1) साधनसामग्री:-**

- राहण्याची उत्तम व्यवस्था असावी.
- फार्महाऊस निटनेटके असावे आणि ते आरामदायी असावे. राहण्यायोग्य कमीत कमी सुविधा असाव्यात.
- पाण्याची पुरेसी सोय असावी, फार्महाऊसवर झाडांची लागवड मोठ्या प्रमाणावर असावी.
- तेथील वातावरण नैसर्गिक असावे. स्वयंपाकाची सुविधा असावी.
- फार्महाऊसवर प्रथमोपचाराची सुविधा असावी.
- फार्महाऊसवर विहीर, पोहण्याचा तलाव अथवा तळे असावे. त्यामध्ये मत्सपालन केलेले असावे.
- फार्महाऊसमध्ये बैलगाडी, जनावरे, त्यांचे गोठे इ. सुविधा असाव्यात.
- शेळी फार्म, इमूपालन, रेशीमउत्पादन, हरीतगृह यांसारख्या सुविधा असाव्यात.
- जेवणासाठी स्थानीक महाराष्ट्रीय पद्धतीचे जेवण असावे. त्यामध्ये सकाळी नाष्टा दुपारी जेवण व रात्रीचे जेवण यांचा समावेश असावा.
- फार्महाऊसवर अशाप्रकारच्या सेवासुविधा असाव्यात की जेणेकरून पर्यटक त्या पाहतील व त्यामध्ये सहभागी होऊन त्याचा आनंदही लुटतील.
- फार्महाऊसवर ग्रामीण खेळांची सुविधा असावी.
- आलेल्या पर्यटकांना ग्रामीण संस्कृतीची ओळख करून देण्यात याची. यामध्ये ग्रामीण वेशभुषा, कला, हस्तकला, सण, उत्सव, ग्रामीण रूढी, परंपरा यांचे दर्शन घडून द्यावे. त्यांना यामध्ये प्रत्यक्ष सहभागी करून घ्यावे. त्याची थोडीशी सवय त्यांना करून दाखववावी.
- पर्यटकांसाठी बैलगाडीतून सफर घडून आणावी. घोड्यावरून फेरफटका मारण्याची सुविधा असावी. पाण्यामध्ये मासेमारी करण्याची संधी त्यांना प्राप्त करून द्यावी.
- शेतावर फेरफटका मारत असताना शेतावरील फळे, मक्याची कणसे, भुईमूगाच्या शेंगा, ऊस आणि इतर खूपकाही साहित्य त्यांना शेतावर उपलब्ध करून द्यावे.

- त्यांना ग्रामीण भागातील प्राण्यांची पक्षांची ओळख करून द्यावी. पाण्याचे झरे, धबधबे अशा असंख्य गोष्टी त्यांना पाहण्यासाठी उपलब्ध करून देण्यात याव्यात.
- पर्यटकांना तेथे सुरक्षीतता वाटेल असे नैसर्गिक वातावरण निर्माण करावे. जवळच दवाखान्याची सुविधा असावी.
- सायंकाळी जेवणानंतर, मनोरंजनाचे कार्यक्रम असावेत. त्यामध्ये शेकोटी पालल डान्स, भजन, किर्तन, लेझीमपथक, धनगरी ओव्या यांचा समावेश असावा.
- पर्यटकांना जाताना आठवण म्हणून फार्मवर खरेदी करण्यासाठी विविध स्टॉल असावेत. त्यामध्ये ग्रामीण भागातील विविध वस्तूंचा समावेश असावा.

**इतर सुविधा :-**

- फार्महाऊसवर प्रदूषण विरहीत वातावरण असावे.
- भविष्यात व्यवसाय वाढीसाठी विशेषत: ग्रामीण संस्कृतीवर जास्तीत जास्त भर देण्यात यावा.
- फार्महाऊसवर चांगले प्रशिक्षीत कामगार नेमावेत. त्यांना चांगल्याप्रकारचे प्रशिक्षण देऊन संवाद कौशल्य वाढवावे.
- आलेल्या पर्यटकांशी फार्महाऊसवर बस, रेल्वे यांचे वेळापत्रक लावावे वेगवेगळ्या रस्त्यांची व महामार्गांची सुची देण्यात यावी.

**2) राहण्याच्या सुविधा :-**

- राहण्यासाठी व्यवस्थित खोल्या असाव्यात. त्यामध्ये किमान सुविधा असाव्यात. त्यामध्ये बेडरूम, वॉशप्रुफ, टॉयलेट व बाथरूमची सुविधा असावी.
- झोपण्यासाठी गाद्या, चटण्या, उशा व पांघरूण घेण्यासाठी स्वच्छ कपड़े असावीत.
- जेवणासाठी व्यवस्थित सुविधा असावी, जेवण महाराष्ट्रीयन पद्धतीचेच असावे ते ताजे, स्वच्छ, सकस व घरीच शिजवलेले असावे.
- खोल्यांना चांगल्या खिडक्या असाव्यात ज्यायोगे चांगला सूर्यप्रकाश आत येण्यास मदत होईल व हवाही खेळती राहण्यास मदत होईल. खिडक्यांना चांगले पडदे असावेत.
- दरवाज्यांना चांगल्याप्रकारची कड्या कुलपे असावीत. लाईट गेल्यास मर्यादित काळासाठी का होईना जनरेटर बॅकपची सोय असावी.
- फार्महाऊसवर मेडीकलची सोय असावी. एका फोनकॉलवर डॉक्टर हजर राहण्याची व्यवस्था असावी.
- एकत्रित राहण्यासाठी एखादा मोठा हॉल असावा. तेथे किमान २०० लोकांची सोय होईल अशी व्यवस्था असावी.

### 3) आकर्षक व मनोरंजक शैक्षणिक गोष्टी :-

- फार्महाऊसवर फळझाडांची मोठ्याप्रमाणावर लागवड असावी. जेणेकरून आलेल्या पर्यटकांना विशेषतः लहान मुलाना त्यातून अभ्यासाचे अनेक घडे शक्ता येतील. शेतावर तयार झालेली फळे ग्राहकापर्यंत कशाप्रकारे पोहचविली जातात यासारख्या असंख्य गोष्टींचे ज्ञान होईल.
- शेतावर एखादा गायींचा गोठा असावा त्यातून आलेल्या पर्यटकांना दुग्ध उत्पादनापासून त्याचे विविध पदार्थ कसे तयार होतात. से ग्राहकांपर्यंत कसे पोहचतात. दरम्यान त्यावर कशाप्रकारे प्रक्रिया केली जाते याचे सर्व ज्ञान प्राप्त होईल.
- गायीप्रमाणे शेतावर शेळ्या, मेंढया यांचीही सहभाग असावा.
- रेशीम उत्पादनासाठी तुतीच्या किड्यांच्या संगोपन करून तुतीच्या झाडाची लागवड करावी व त्याचे प्रात्यक्षिक येणाऱ्या पर्यटकांना दाखवावे
- शेतावर वापरत असणाऱ्या विविध साहित्याचे एक संग्रहालय तयार करावे व त्याचे दर्शन यांना करून द्यावे.
- शेतावर एखाद्या ठिकाणी बनऔषधी वनस्पतींची लागवड करून त्या साहित करावयात व आयुर्वेदातील त्याचे उपयोग पर्यटकांना सांगावेत.
- शेतावर विविध फळे, भाजीपाला यांची लागवड करावी व त्या अंतर्गत पिक उत्पादनाचे विविध प्रयोग पर्यटकांना दाखवावे.
- सिंचनाच्या विविध पद्धतींचा वापर करून त्यामध्ये ठिबक, तुषार व धुके तयार करणाऱ्या मिस्टर अथवा फॉगर्सचा वापर करावा व त्याचे प्रात्यक्षिक पर्यटकांना करून दाखवावे.
- विविध जातींच्यापासून तयार केलेल्या रोपांची एखादी रोपवाटिका तयार चांगल्या प्रतिची रोपे कशी तयार करतात याचे ज्ञान पर्यटकांना करून द्यावे.
- उसाच्या शेताजवळ एखादी रसवंती उभारून ऊसाचा ताजा रस पर्यटकांना उपलब्ध करून द्यावा अथवा ऊसाचे तुकडे करून खाण्यास द्यावेत. यातून पर्यटनखरा आनंद प्राप्त होतो.
- शेतावर विविध ग्रामीण खेळाचे आयोजन करावे. त्यामध्ये विटीदाडू, गोठ्या भक्रा, बैलगाडी, टॅक्टर याची सफर यासारख्या असंख्य गोष्टींचा समावेश असावा.
- मधुमक्षीका पालनाचे प्रात्यक्षिक पर्यटकांना दाखवावे, त्यासाठी आवश्यक असणाऱ्या सुविधा शेतावर उपलब्ध असाव्यात.
- शेतावर विजेच्या वापराशिवाय, सोलार, वायुविजन, बायोगॅस यांचा समावेश असावा.
- शेतावर उभारलेल्या विविध स्टॉलमधून पर्यटकांना हस्तकलेचे विविध नमुने, चिखलापासून बनविलेल्या विविध वस्तु, लोणची, पापड, दुग्धजन्य पदार्थ, गुळ, काकवी, फळे, फुले, भाजीपाला व अन्नधान्याचे विविध प्रकार, रोपवाटिकेत तयार केलेली विविध रूपे यांचा समावेश असावा, यातून त्यांना खरेदीचा मनमुराद आनंद घेता येईल.

**4) शेतावरील दैनंदिन कार्यक्रम:-**

यामध्ये शेतावर चालणाऱ्या दैनंदिन कार्यक्रमाचे दर्शन पर्यटकांना घडून द्यावे.

- शेतावर असणाऱ्या विविध जनावरांना चारा घालणे, पाणी पाजणे.
- शेतावर शिवार फेरी घेऊन विविध फळझाडे, फुले, भाजीपाला लागवडीची माहिती करून देणे.
- शेतावर तयार झालेल्या विविध फळभाज्या, पालेभाज्या, फळे, फुले यांची काढणी करणे व याकामात प्रत्यक्ष पर्यटकांना समाविष्ट करून घेणे.
- ग्रामीण भागातील जत्रा, मेळावे, उत्सव यामध्ये त्यांना समाविष्ट करून घेणे, यासाठी आठवडे बाजाराचाही मोठ्या प्रमाणावर उपयोग होऊ शकतो.
- शेतकरी बाजार किंवा तालुक्याच्या ठिकाणी असणारा बाजार यातून एखादा फेरफटका मारून त्यांना विविध गोष्टींची खरेदी करण्याची संधी प्राप्त करून द्यावी. दुध संकलन करणाऱ्या विविध सोसायट्यांमधून एखादा फेरफटका घेऊन दुधाचे संकलन कसे होते. त्यावर कोणत्या प्रक्रिया केल्या जातात व त्यापासून कोणकोणते पदार्थ तयार होतात याचे ज्ञान पर्यटकांना करून द्यावे. शेवटी ते शहरात विविध ग्राहकांपर्यंत कसे पोहचते याचे दर्शन शेतकऱ्यांना घडवून द्यावे.
- ग्रामीण भागात असणाऱ्या विविध मंदिरांचे दर्शन त्यांना घडून द्यावे.

अशाप्रकारे विविध गोष्टींचे जतन करून त्याचे दर्शन पर्यटकांना घडवून आणता येईल व त्यातून त्यांचे मनोरंजन तर होईलच परंतु त्यांना अनेक गोष्टींचे शिक्षणही मिळेत यात शंकाच नाही.

**शेतावरील संध्याकाळचे कार्यक्रम :-**

- यामध्ये शेतावर विविध मनोरंजनाचे कार्यक्रम करता येतील. त्यामध्ये जागरण, गोंधळ, भजन, भारूड, वाघ्या-मुरळीचे कार्यक्रम, ग्रामीण जीवनावर आधारित विविध कार्यक्रमांचे आयोजन त्यामध्ये धनगरी ओव्या, किर्तन यांचा समावेय करता येईल. पौराणिक नाटक यांचा ही समावेश करता येईल.

**ग्रामीण भागातील विविध खेळांचे आयोजन :-**

- विविध खेळांमध्ये विटीदांडू, गोट्या, सुरपारंख्या, कब्बडी, लंगडी, खोखो, गल्लोर यांचा समावेश करता येईल. याशिवाय बैलगाडीतून अथवा ट्रक्टरमधून फेरफटका मारता येईल.

**5) कृषी पर्यटनासाठी योग्य स्थळ :-**

- कृषी पर्यटन यशस्वी करण्यासाठी पर्यटनाचे योग्य स्थळ निवडणे फार महत्त्वाचे आहे. निवडलेले स्थळ हे मध्यवर्ती ठिकाणी असावे, जेणेकरून ते पर्यटकांना येण्याजाण्यासाठी सोयीचे असावे. निवडलेल्या स्थळाला नैसर्गिक पार्श्वभूमी असावी.

कारण शहरी पर्यटकांना नैसर्गिक व ग्रामीण जीवनाची खूप ओढ असते. निवडलेले स्थळ हे रस्त्याच्या व रेल्वेच्या चांगल्या सुविधांनी जोडलेले असावे. जी स्थळे पर्यटन म्हणून विकसित पावली आहेत. उदा. महाबळेश्वर, पाचगणी, नाशिक, ज्योतीबा, नरसिंहवाडी, पंढरपूर, देहू, आळंदी, अक्कलकोट अशा स्थळांचाही मोठ्या प्रमाणात उपयोग करून घेता येईल. याशिवाय शेतकऱ्यांना व पर्यटकांना सोईची असणारी असंख्य स्थळे विकसित करता येतील.

## ७.५ कृषी पर्यटनाचे महत्त्व:

पारंपारिक शेतीचा आर्थिक चेहरा बदलून टाकण्याचे सामर्थ्य कृषी पर्यटन उद्योगामध्ये आहे. याचे विविध फायदे आहेत. यातून शेतकऱ्यांचे व ग्रामीण भागातील असंख्य लोकांचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे फायदे होणार आहेत.




Krushidoot,com

1) रोजगानिर्मिती :-यातून ग्रामीण भागामध्ये फार मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होणार आहे यामध्ये शेतकरी कुटूंबातील सर्वसभासदांना रोजगार मिळणार आहे.

2) आर्थिक उत्पन्न :-शेतकऱ्यांना यातून चांगल्या प्रकारचे आर्थिक उत्पन्न मिळणार आहे. हा उद्योग नक्कीच शेतीसाठी चांगला जोडधंदा म्हणून उपयुक्त ठरणार आहे.

3) ग्रामीण संस्कृतीचे दर्शन:-कृषी पर्यटनातून ग्रामीण संस्कृतीचे दर्शन शहरवासीयांना होणार आहे. या ग्रामीण संस्कृतीचे विविध पैलूंचे दर्शन होणार आहे.

4) राहणीमानात वाढ :-ग्रामीण व शहरी लोकांच्या एकत्रीकरणातून ग्रामीण लोकांमध्ये राहणीमान उंचावण्यास फार मोठी मदत होणार आहे.

5) शेतीबाबत ज्ञान :शहरी लोकांना ग्रामीण भागातील विविध पिकांच्या लागवडीचे ज्ञान प्राप्त होणार आहे. शेतीवर आधारित असणाऱ्या विविध गोष्टींची माहिती शहरवासीयांना होणार आहे.]

6) पर्यटन क्षेत्राकडील ताण कमी :- कृषी पर्यटन हे एक चांगले क्षेत्र विकास पावत असल्याने इतर पर्यटन क्षेत्राकडील ताण कमी होण्यास मदत होणार आहे.

7) नैसर्गिक व्यवसाय :-ग्रामीण पार्श्वभूमी असणारा, प्रदूषण व आवाज विरहित मुक्त स्वरूपाचा नैसर्गिक असा व्यवसाय आहे.

8) अल्प खर्च :-पर्यटनातील जेवण, राहणे, प्रवास व मनोरंजन यावरील खर्च हा अल्प असतो.

9) शहरी विविध समस्यांचे निराकरण :-कृषी पर्यटन व्यवसाय शहरी लोकांच्या असंख्य समस्यांचे निराकरण करतो त्यामध्ये मुख्यतः अन्नाचा उगम, वनस्पती व प्राणी माहिती आणि असंख्य उद्योगांना लागणारा कथा माल याबाबतचे शंका समाधान करून देतो.

10) ग्रामीण जीवनशैलीचे दर्शन:-कृषि पर्यटन व्यवसायातून शहरी लोकांना ग्रामीण हस्तकलांचे, भाषा, संस्कृती, रूढी, परंपरा, पोशाख, ग्रामीण जीवनशैली अशा अनेक पैलूंचे दर्शन घडून येते. ह्या व्यवसायातून खऱ्या अर्थानि पर्यटकांना ग्रामीण जीवनशैली बद्दल उत्सुकता जाणिव निर्माण होते आणि शेतीचे ज्ञान प्राप्त होते.

11) सहजीवनाचा आनंद:-शहरी पर्यटकांना कौटुंबिक सहजीवनाचा आनंद फक्त कृषी पर्यटनातूनच मिळत असतो. कृषी पर्यटनाच्या ठिकाणी पर्यटक नेहमीच्या व्यस्त जीवनापेक्षा मुक्त जीवन जगतात. कुटुंबीयांसमवेत वेळ घालवतात. त्यामुळे त्यांना एक वेगळेच समाधान प्राप्त होते.

12) अनुभवजन्य पर्यटन:-कृषि पर्यटन हा प्रत्यक्ष अनुभव घेण्याचा व्यवसाय आहे. त्यामध्ये प्रत्येक गोष्टीमध्ये पर्यटकांना सहभागी होता येते व त्यांचा अनुभव घेता येतो.

13) नैसर्गिक अनुभूत:- ह्या व्यवसायातून पर्यटकांना काही नैसर्गिक गोष्टींचे निरीक्षण करण्याचा अनुभव घेता येतो. त्यामध्ये पक्षी निरीक्षण, प्राण्यांचे निरीक्षण किंवा एखाद्या जलाशयाचे निरीक्षण करता येते.

14) शिक्षणाचे माध्यम :-कृषी पर्यटन हे एक शिक्षणाचे चांगले माध्यम आहे. यातून ग्रामीण पैलूचे तसेच शेती व शेतीपूरक व्यवसाय याचे विविधांगी शिक्षण मिळते.

15) शहरी व ग्रामीण दरी घटते:-शहरी पर्यटक ग्रामीण भागात कृषी पर्यटनाचा आनंद उपभोगण्यासाठी येतात. त्यांना ग्रामीण लोक, त्यांची जीवनपद्धती, शेती व्यवसाय, ग्रामीण लोकांच्चे शेतीतील काबाडकष्ट याची जाणीव होते. त्यांना ग्रामीण भाग, तेथील लोक, शेती याबाबत आस्था वाटू लागते. यातूनच शहरी व ग्रामीण लोकांच्या जीवनमानातील दरी कमी होण्यास मदत होते.

## ७.६ कृषी पर्यटनाची मर्यादा

महाराष्ट्रामध्ये कृषी पर्यटन व्यवसायाला जरी चांगला नैसर्गिक, भौगोलिक व सांस्कृतिक वारसा असला तरी या व्यवसायामध्ये काही अडचणींना आपल्याला सामोरे जावे लागते. कृषी पर्यटनाच्या काही **मर्यादा** किंवा **अडचणी** पुढीलप्रमाणे सांगता येतील.

1) शेतकऱ्यांना या व्यवसायाचे परीपूर्ण ज्ञान नसते.

2) शेतकऱ्यांना योग्य सुसंवाद राखता येत नाही.

3) लहान व सिमांत शेतकऱ्यांकडे व्यापारी दृष्टीकोन नसतो.

4) मुख्य म्हणजे भांडवलाची मोठी अडचण असते.

5) या व्यवसायासाठी लागणाऱ्या मुलभूत किंवा पायाभूत गोष्टींचा अभाव असतो.

6) या व्यवसायाबद्दलचे लोकांचे अज्ञान किंवा त्याकडे बघण्याचा दृष्टीकोन नसतो.

7) कृषी पर्यटन व्यवसायातील सहीगी व्यक्तीमध्ये असणारा संघटनाचा अभाव असतो.

8) शहरी पर्यटकांना आवश्यक असणारी स्वच्छता, टापटीपतपणा व मुलभूत गोष्टीचा अभाव असतो.

9) लाखो शेतकऱ्यांच्या जमीनचे झालेले तुकडीकरण, त्यातून कमी झालेला जमीनीचा आकार, कमी उत्पादता, पत अभाव, जलसिंचन सोयींचा अभाव व अनियमित पर्जन्य व सततचा दुष्काळ यामुळे शेतकयांमध्ये नवीन गोष्टी स्विकारण्याचा अभाव असतो.

10) महाराष्ट्रातील जवळपास 355 तालुक्यांपैकी 149 तालुके सततच दुष्काळाच्या छायेत असतात.

या सर्व कारणांमुळे त्यामुळे तसेच लोकांचा मागासलेपणा यामुळे या कृषी पर्यटन व्यवसायास विविध समस्या व अडचणींचा सामना करावा लागतो.

**कृषी पर्यटन व्यवसाय वृद्धीसाठी काही महत्त्वाची अंगे. :-**

कृषी पर्यटन व्यवसायाच्या वाढीसाठी काही मुलभूत गोष्टींकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. कृषी पर्यटनाच्या विकासासाठी पुढील उपाययोजना सांगता येतील

**1) जाहिरात :-**

कोणत्याही व्यवसायाच्या वृद्धीसाठी त्याची माहिती सर्व लोकांना करून देणे महत्त्वाचे ठरते. जर एखादा पर्यटन व्यवसाय हा दुर्लक्षित भागामध्ये असेल तर पर्यटक त्या ठिकाणी फिरणार नाहीत यासाठी त्याची मोठ्या प्रमाणावर जाहिरात करणे गरजेचे आहे. त्यासाठी विविध पर्यटन केंद्रानी एकत्र येऊन अथवा वेगवेगळी जाहिरात करणे उपयुक्त ठरते. यासाही ते ए.टी.डी.सी., पर्यटन महामंडळ अथवा बिगर शासकीय संस्थाची मदत घेऊ शकतात. तसेच वृत्तपत्राद्वारेही जाहिरात करून पर्यटकांना आकर्षित करू शकतात. यासाठी माहिती तंत्रज्ञान शास्त्राची मदत घेऊन एखादी वेबसाईट तयार करून त्याद्वारेही जाहिरात करता येते किंवा दोलफ्री मदत सेवा २४ तासांसाठी खुली करूनही पर्यटनाबाबतची माहिती पर्यटकांना देता येते.

**2) वाहतूक सेवा:-**

पर्यटन स्थळापर्यंत पोहचण्यासाठी चांगल्या विकसित रस्त्यांचे जाळे व वहानाची सोय असणे फार महत्वाचे आहे. याशिवाय पर्यटन स्थळाच्या ठिकाणी टेलिफोनची अथवा इंटरनेटची ई-मेल सुविधा असणे जरुरी आहे. रस्ते व दळणवळणाच्या सुविधा या पर्यटन विकासाच्या नसा आहेत.

**3) निवासाची सोय :-**

सुरक्षित व स्वच्छ निवास व्यवस्था हे पर्यटन वाढीचे मुख्य अंग आहे. बहुतांशी शहरी पर्यटकांना एकहाती वावर असणाऱ्या स्वच्छ व हवेशिर खोल्यांची गरज असते. तेथील स्वच्छ पाण्याची सुविधा, चांगल्या दर्जाचे बाथरूम, स्वच्छ संडास व्यवस्था अपेक्षित असते. त्यांना कोणत्याही आधुनिक सोईची गरज नसते.

**4) पर्यटन व्यवस्थापकांचे संघटन:-**

विविध ठिकाणी कार्यरत असलेल्या पर्यटन केंद्राच्या व्यवस्थापकांचे एकत्र संघटन असणे फार महत्त्वाचे आहे. यातून पर्यटकांना लागणाऱ्या विविध सेवा सुविधा चांगल्या प्रकारे पुरविता येतात. याशिवाय देश, राज्य पातळीवर विविध योजना राबविल्या जातात. त्यांचा फायदा घेण्यासाठी सर्व केंद्रप्रमुखांची एक संघटना असणे फार महत्त्वाचे आहे.

**5) शेतकऱ्यांच्या क्षमतांचा विकास :-**

केंद्र चालविणाऱ्या विविध शेतकऱ्यांच्या अंगी असणाऱ्या गुणांचा, त्यांच्या क्षमतांचा विकास करणे फार महत्त्वाचे आहे. यामध्ये विविध सेवा सुविधा पुरविण्याबाबतचे घोरण आदरातिथय, पर्यटकांशी योग्य वागणूक या गोष्टी फार महत्त्वाच्या ठरतात.

**6) पर्यटकांची सुरक्षितता :-**

कृषी पर्यटनासाठी आलेल्या विविध पर्यटकांचे पर्यटन स्थळावर राहणे ही बाब सुरक्षिततेच्या बाबतीत अतिशय महत्त्वाची आहे. जोपर्यंत पर्यटकांच्या मनामध्ये त्या पर्यटनस्थळाबाबत विश्वासाची भूमिका निर्माण होत नाही तोपर्यंत त्यांना त्या पर्यटन स्थळाबाबत सुरक्षितता वाटत नाही. यासाठी सुरवातीपासूनच या गोष्टीला अतिशय महत्त्वाचे स्थान देऊन पर्यटकांची सुरक्षितात जपणे गरजेचे आहे. पर्यटन स्थळावर तातडीची मेडिकल सुविधा, टेलीफोन व्यवस्था व वाहतुक सेवा असणे फार गरजेचे आहे. याशिवाय चोर व जंगली प्राण्यापासून संरक्षणही फार महत्त्वाचे आहे.

**7) खाजगी व बिगरशासकीय संस्थांची भागीदारी:-**

विविध कृषि उद्योजक, प्रगतशिल शेतकरी खाजगी शेतकऱ्यांच्या संस्था, सहकारी व बिगर शासकीय संस्था यांनी एकत्र येऊन शासकिय संस्थाची मदत घेऊन भागीदारीत कृषी पर्यटन केंद्र चालू केल्यास त्याचा दोघांनाही फार मोठ्या प्रमाणावर फायदा होणार आहे. यातून विविध शासकीय फायदे, बँकांच्या सेवा सुविधांचाही मोठ्या प्रमाणावर लाभ उठविता येणे शक्य आहे.

## ७.७ सारांश

महाराष्ट्रामध्ये कृषी पर्यटन व्यवसाय चालू करण्यासाठी तेथील नैसर्गिक वातावरण, विविध पिकांची हवामानानुसार व क्षेत्रानुसार विविधता, महाराष्ट्राचा विविध क्षेत्रातील पर्यटन वारसा, सांस्कृतिक सण व उत्सव अशा प्रकारच्या विविध जमेच्या बाजू आहेत. जवळपास 45 % हून अधिक असणाऱ्या शहरवासीयांना ग्रामीण व कृषी पर्यटनाचा आनंद घेण्याची संधी यामधून उपलब्ध होणार आहे. त्यामुळे असंख्य कृषी उद्योजकांना पर्यटन व्यवसाय चालू करण्याची नामी संधी प्राप्त झालेली आहे. परंतु वित्तपुरवठा व या व्यवसायाबाबतची सखोल माहिती शेतकऱ्यांना असणे फार गरजेचे आहे. यामध्ये महाराष्ट्र शासनाने कृषी खाते विविध कृषी विद्यापीठे, शासकीय व बिगर शासकीय संस्था यामध्ये फार मोठे योगदान देऊ शकतात व या व्यवसायाला समृद्ध करण्यासाठी नवी दिशा देऊ शकतात. या बरोबर शासनाचे पर्यटन महामंडळ, एम.टी.डी.सी यांसारख्या संस्थांची भूमिकाही महत्त्वाची ठरणार आहे.

## ७.८ स्वाध्याय

१) कृषी पर्यटनाची व्याख्या सांगा. त्याचे स्वरूप व्याप्ती स्पष्ट करा.

२) कृषी पर्यटन आणि कोकण या विषयांवर निबंध लिहा.

३) कृषी पर्यटनाची गरज आणि त्याचे महत्त्व यावर भाष्य करा.

**टिपा लिहा**

अ) कृषी पर्यटनाचे फायदे

ब) कृषी पर्यटन आणि सिंधुदुर्ग जिल्हा.

क) कृषी पर्यटन आणि ग्रामीण विकास.

## ७.८ संदर्भ सूची:-


1. *समृद्धीचा महामार्ग कृषी पर्यटन : कटोले रवींद्र, गोडवा कृषी प्रकाशन, पुणे - 9.*
2. *Agri-Tourism - Romila Chawla , Sonali Publication, Delhi. - 110002.*
3. *कृषी पर्यटन एक शेतीपूरक व्यवसाय , मनोज हाडवळे, सकाळ प्रकाशन, पुणे - 411002.*
4. *Dr. Sinha H. K. challenges in Rural Development,1998 Discovery Publication House New Delhi- 110002.*
5. *Dr. Dubey M. K. Rural and Urban Development in India, 2000, common wealth Publisher DoryaGonj New Delhi-110002.*
6. *Dr. Desai A. R. Rural Society in India 1978 Popular Publication House*


❖❖❖❖

८

# पर्यटन विकास – III
# (पर्यावरणीय पर्यटन)

**पाठाची रूपरेषा**


८.० उद्दिष्टे

८.१ प्रास्ताविक

८.२ पर्यावरणीय पर्यटन संकल्पना

८.३ पर्यावरणीय पर्यटनाचे स्वरूप

८.४ पर्यावरणीय पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण स्थळे

८.५ संचालित सहली व शासकीय धोरण

८.६ हंगाम-हवामानानुसार व्यवस्थापन

८.७ पर्यावरणीय पर्यटन जन-जागृती आणि प्रचार

८.८ यशस्वी पर्यावरणीय पर्यटन नियोजनाचे प्रमुख मुद्दे

८.९ पर्यटनाचा पर्यावरणीय घटकांवरील परिणाम

८.१० स्वाध्याय

८.११.संदर्भग्रंथ


## ८.० उदिष्टे

- पर्यावरणीय पर्यटन संकल्पना अभ्यासणे.
- पर्यावरणाचे स्वरूप समजावून घेणे,
- पर्यावरण पर्यटन व्यवसायाच्या व्याप्तीचा अभ्यास करणे.
- पर्यावरण पर्यटन व्यवसायाचे महत्त्व समजावून घेणे.
- पर्यावरण पर्यटन व्यवसायाच्या समस्या जाणून घेणे.

## ८.१ प्रास्ताविक

गेल्या काही दशकांमध्ये पर्यटन क्षेत्रामधील उलाढाल मोठ्या प्रमाणावर वाढलेली दिसूनयेते. ही वाढ संख्यात्मक आणि दर्जात्मक अशा दोन्ही प्रकारची आहे. त्याद्वारे पर्यटनाच्या

प्रकारांमध्येदेखील अनेक प्रकारचे बदल झाले आहेत. तरीदेखील पर्यटनाची बाजारपेठ, प्रवास, प्रवासाचेठिकाण आणि पर्यटनाचा प्रचार या पर्यटन प्रणालीतील चार महत्त्वाच्या मुद्यांमध्ये कोणताही फरकझालेला नाही. सर्व प्रकारच्या पर्यटनासाठी काहीतरी उद्देश असतो. तसेच त्यामागे काहीतरी चेतनाअसते. पर्यटनाचे असे अनेक प्रकारचे उद्देश असतात. त्यामध्ये आसपासच्या प्रदेशाचे सौंदर्य

बघणे, इतर देशांतील जनजीवन अभ्यासणे अशा कितीतरी उद्देशांचा समावेश होत असतो. अशा प्रकारे पर्यटकांच्या इच्छेनुसार अथवा ठिकाणांच्या वैशिष्ट्यांनुसार पर्यटनाचे स्वरूप बदलत असते.

यामधूनच विशेष पर्यटन पर्यावरणीय पर्यटन ही कल्पना उदयाला आलेली आहे.या घटकाच्या अभ्यासावरून आपणाला पर्यावरण पर्यटनाची संकल्पना स्पष्ट होईल. विविधपद्धतीने आयोजित केलेल्या सहलींची वैशिष्ट्ये, फायदे तसेच मर्यादा सांगता येतील आणिकृषीपर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या स्थळांची माहिती होईल. हंगाम आणि हवामानानुसार पर्यटनस्थळाचेव्यवस्थापन कसे करावे आणि पर्यटनस्थळाच्या व्यवसायवाढीसाठी आवश्यक असलेली प्रसिद्धीप्रचार व प्रसार साहित्याद्वारे कशी करावी हेदेखील या घटकातून समजेल.

## ८.२ पर्यावरणीय पर्यटन संकल्पना

**पर्यावरणीय** पर्यटन हा देखील वेगाने वाढणारा व्यवसाय आहे. भारतासारख्या विकसनशील देशातील पर्यटनही गेल्या दशकभरात २५ त ३० टक्क्यांनी वाढले आहे आणि त्यामुळे मिळणाऱ्या परकीय चलनात ४० टक्क्यांनी वाढ झाली आहे. या पर्यटन वाढीचे मुख्य कारण आहे त्या त्या देशातील निसर्ग संपन्न प्रदेश, वैभवशाली इतिहास आणि स्थानिक संस्कृती! तस बघायला गेलं तर उंचसखल डोंगरदऱ्या, समृद्ध जंगले, शांतरम्य समुद्रकिनारे, वैशिष्ट्यपूर्ण जैवविविधता,पर्यावरण जीवनदायिनी नद्या, फेसाळ धबधबे, वाळूची पुळण व खाड्या, कांदळवने, छोटी मोठी बेटे, गवतांचे गालिचे पसरलेली पठारे, पाण्याचे तलाव, अंधाऱ्या गुहा आणि पूर्वापार देवराया म्हणजे पर्यटकांसाठी पर्वणीच असते.
**पर्यावरणीय पर्यटन म्हणजे काय?**

**'निसर्गाची हानी न होता केले जाणारे पर्यटन' म्हणजे निसर्ग पर्यटन अशी निसर्ग पर्यटनाची साधी सोपी व्याख्या आपल्याला करता येईल.**

पर्यावरण ही अतिशय विस्तृत संकल्पना आहे. त्यामध्ये एखाद्या प्रदेशातील जमीन, पाणी,हवा, वनस्पती, प्राणी अशा सर्व जैविक घटकांचा समावेश होतो. अशा सर्व सजीवांची एकमेकांवरअवलंबून असलेली एक प्रकारची साखळी असते आणि प्रत्येक सजीवाचे त्यातील स्थान वैशिष्ट्यपूर्णअसते. त्यामध्ये कोणताही बदल झाल्यास ही साखळी तुटते आणि हा समतोल बिघडतो. अशाप्रकारे समतोल बिघडण्यामुळे होणारे काही प्रकारचे तोटे हे तत्कालीन असतात. परंतु बरेचसे मात्रदीर्घकालीन असतात. पर्यावरणाचे नुकसान करणाऱ्या अन्य घटकांसंबंधीची माहिती करून घेणेमहत्त्वाचे आहे.शुद्ध हवा, स्वच्छ पाणी, भरपूर सूर्यप्रकाश, घनदाट वनसंपदा, सुसहा हवामान यांचीनिसर्गाकडून माणसाला अनमोल देणगी मिळालेली आहे. मात्र तिचा वापर अनेकदा नियोजनपूर्वकहोत नाही, असे आपल्याला

दिसून येते. वाढत्या औद्योगिकीकरणामुळे अशा नैसर्गिक साधनसंपत्तीचानाश तर होत आहेच. परंतु त्याचबरोबर पर्यावरणाचे प्रदूषणदेखील मोठ्या प्रमाणावर होत आहे.अशा सर्व परिस्थितीमध्ये, ज्या ठिकाणी शुद्ध हवा, पाणी, जंगल असे घटक उपलब्धअसतात. अशा ठिकाणी पर्यटक आकर्षीत होतात. यातूनच पर्यावरण पर्यटनाची कल्पना रूढझाली. आज पाश्चिमात्य देशांसह भारतामध्ये देखील ही कल्पना चांगली रूजलेली आहे असेआढळते. पर्यावसाचे रक्षण करून तसेच संवर्धन करून पर्यटनाचा आनंद घेणे हे पर्यावरण पर्यटनामागील प्रमुख उद्दिष्ट असते. अनेकदा एखादे ठिकाण पर्यटनाच्या दृष्टीने प्रसिद्ध झाले की त्या ठिकाणी पर्यटकांची गर्दीदरवर्षी वाढतच जाते. अशा मोठ्या संख्येमुळे त्या ठिकाणच्या सर्व सोयीसुविधांच्या वापरावर अतिरिक्तताण पडतो. अशा मोठ्या गर्दीमुळे तेथे अनेक प्रामुख्याने निवास, वाहतूक, भोजन, करमणूक, संपर्क अशा सेवा-सुविधा पुरविण्याच्या क्षेत्रातच असतात. त्यामुळे ह्या क्षेत्रातील व्यापार व उलाढालवाढते. पर्यायाने अधिक प्रमाणावर नैसर्गिक स्त्रोत नष्ट होतात. म्हणजेच जंगले तोडली जाऊन तेथे इमारती उभ्या राहतात. पायवाटा जाऊन पक्के रस्ते होतात. अशा प्रकारचे आक्रमण निसर्गावरकेले जाते. पर्यटकांच्या अतिरिक्त संख्येमुळे सांडपाणी केले जाते. पर्यटकांच्या अतिरिक्त संख्येमुळेसांडपाणी, कचरा यांच्या विल्हेवाटीबद्दलचे प्रश्न निर्माण होतात.आज पर्यटक मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक पॅकिंगच्या वस्तू वापरत असतात आणि उपयोग झाल्यानंतर त्या तेथेच इतस्ततः फेकून देतात. अशा वस्तूंचा नायनाट होत नसल्याने पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणावर कायमस्वरूपी नुकसान होते.अशा प्रकारे त्या ठिकाणच्या नैसर्गिक सौंदर्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. आजश्रीनगर, मसुरी, उटी किंवा महाराष्ट्रामध्ये महाबळेश्वर अशा पर्यटन ठिकाणी काही प्रमाणात हाधोका दिसू लागला आहे.अशा प्रकारांमुळे होणारे नुकसान हे कायमस्वरूपी व न बदलणारे असते. त्यामुळे पर्यटनस्थळांचे सौंदर्य नष्ट होणार नाही. तेथे प्रदूषण होणार नाही याची काळजी पर्यटक, आयोजक, स्थानिक रहिवासी आणि व्यावसायिक यांनी एकत्रितपणे घेणे आवश्यक ठरते.

## ८.३ पर्यावरणीय पर्यटनाचे स्वरूप

**पर्यावरणीय** पर्यटनासाठी या क्षेत्रातील तज्ञांनी काही मार्गदर्शक तत्वे सांगितली आहेत. कोणत्याही पर्यटन स्थळाच्या नैसर्गिक ठेवणीमध्ये बदल करू नये हे त्यात प्रामुख्याने सांगितले आहे. उलट हि भूरूपे, जैवविविधता यांचा पर्यटनासाठी वापर करून निसर्गभ्रमंती, जंगलभेटी, गिर्यारोहण, प्रस्तरारोहण, नौकानयन, जंगली श्वापदांचा मागोवा, पक्षीनिरीक्षण, औषधी वनस्पतींचा अभ्यास, वननिवास अशा अनेक संकल्पना राबविता येतील ज्याद्वारे तेथील निसर्गाचे संरक्षण व संवर्धन होईल. तसेच कृषी पर्यटन व ग्रामिण पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिक लोकांचा आर्थिक व सामाजिक विकास साधता येईल. शहरातील चकचकीत झगमगाटापेक्षा खेड्यातील साधे राहणीमान, स्थानिक परंपरा व खाद्यसंस्कृती याबद्दल पर्यटकांना कुतूहल असते. शेतीच्या विविध पद्धती, जेवणात शेतात पिकलेली ताजी भाजी, ताजी फळे, शेतीकामात सहभाग याद्वारा पर्यटकांना एक वेगळा अनुभव मिळू शकतो. या जराशा 'हटके' उपक्रमांचे व संकल्पनांचे पर्यटक स्वागतच करतात, एव्हाना त्यासाठी जादाचे पैसे मोजायलाही तयार असतात. यामधे बाहेरून आलेल्या व्यवसाइकांपेक्षा मुख्यत्वेकरून स्थानिक लोकांचाच आर्थिक फायदा जास्त होईल तसेच तेथील निसर्गाशी स्थानिकांची नाळ जोडलेली असल्याकारणाने पर्यावरणाचेही संरक्षण, संवर्धन होईल. गरज

आहे ती फक्त चंगळवादी वृत्ती बदलण्याची, काही सवयी अंगी बनवण्याची व डोळसपणे निसर्गाकडे बघण्याची. या समृद्ध नैसर्गिक ठेव्याचा आपण आनंद घेतानाच उद्याच्या पिढीलाही त्याची गोडी चाखायला मिळावी एवढीच काळजी एक जागरूक पर्यटक म्हणून घेऊया. मामाच्या गावाला तर भेटून झालं, आता म्हणूया कि चला, निसर्गाच्या गावाला जाऊया!भारतामध्ये जमीन, हवामान, पीकपद्धती यामध्ये फार मोठ्या प्रमाणावर विविधता आढळूनयेते. आपल्या देशाचे ते एक प्रमुख वैशिष्ट्य आहे. ह्या वैशिष्ट्यामुळेच आपल्या देशात पर्यटनासाठी

व्याप्ती फार मोठी आहे. आपल्या देशात जवळजवळ सर्व प्रकारची पिके कमी-अधिक प्रमाणातघेतली जातात. त्यांमध्ये तृणधान्य, कडधान्य, फळे, भाजीपाला, गळितांची पिके, मसाल्याचीपिके यांचा प्रामुख्याने समावेश होतो. यांपैकी काही वैशिष्ट्यपूर्ण पिके प्रत्यक्ष शेतीमध्येच बघणे वत्यांबद्दल माहिती करून घेणे हे नेहमीच औत्सुक्यपूर्ण असते. याबाबत काश्मीरमधील केशर व

सफरचंदाच्या बागा, हिमाचल प्रदेशातील फुलांची व्हॅली आणि आसाममधील चहाचे मळे, महाराष्ट्रातीलआंबा, द्राक्ष, डाळिंब बागा वा फुलशेती प्रकल्प अशी काही उदाहरणे सांगता येतील. तसेच प्रसिद्धव महत्त्वपूर्ण पर्यटनस्थळांच्या आसपास असलेली कृषीसंशोधन केंद्रे, कृषीशिक्षणसंस्था यांचादेखील कृषीपर्यटनस्थळांच्या यादीत समावेश करता येईल महाराष्ट्राचा विचार केल्यास राज्यातील चारही कृषीविद्यापीठे, त्यांच्या अंतर्गत कार्यरतअसणारी संशोधन केंद्रे, काही प्रगत शेतकऱ्यांची प्रक्षेत्रे, कृषीविज्ञान केंद्राचे प्रक्षेत्र अशा काहीप्रमुख कृषीपर्यटनस्थळे आहेत, असे आपल्याला म्हणता येईल. तसेच महाराष्ट्र, कर्नाटक, पंजाब,हरियाणा इत्यादी राज्यांत कृषीपर्यटन ही संकल्पना राबविण्याचे प्रयत्न चालू आहेत. याचा फायदाकाही प्रगतिशील व भांडवलदार शेतकरी व्यावसायिक तत्त्वावर करून घेत आहेत.

## ८.४ पर्यावरणीय पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण स्थळे

राष्ट्रीय उद्यान (उत्तराखंड), बांधवगड राष्ट्रीय उद्यान (मध्य प्रदेश), कान्हा राष्ट्रीय उद्यान (मध्य प्रदेश), गिर राष्ट्रीय उद्यान आणि अभयारण्य (गुजरात) आणि रणथंबोर राष्ट्रीय उद्यान (राजस्थान), गालगीबागा बीच, गोवा, तेयडा आंध्र प्रदेश, चिल्का तलाव, ओरिसा, सुंदरबन नॅशनल पार्क, पश्चिम बंगाल, काझीरंगा नॅशनल पार्क आसाम, कांगचेनजंगा बायोस्फियर रिझर्व सिक्कीम, ग्रेट हिमालयन नॅशनल पार्क हिमाचल प्रदेश इ. इको-टूरिझम ही संकल्पना भारतात तुलनेने नवीन आहे.महाराष्ट्रातील अजिंठा आणि एलोराची लेणी ही सर्वात जुनी पर्यावरणीयपर्यटनस्थळे आहेत. राज्यात 124 वन उद्याने, 43 ऐतिहासिक किल्ले, 6 व्याघ्र प्रकल्प, 33 वन्यजीव अभयारण्ये, 52 धार्मिक स्थळे, 55 निसर्ग पयर्टन स्थळे, 5 हिल स्टेशन्स आहेत. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानासारखे मुंबई महानगरालगतचे उद्यान आहे महाराष्ट्र हे गड-किल्ले, सागरतटीय पर्यटन, जंगलभ्रमंती, अध्यात्मिक पर्यटन, साहसी पर्यटन यासारख्या सर्व प्रकारच्या पर्यटनासाठी सर्वोत्तम राज्य आहे. स्थानिकांच्या रोजगारनिर्मितीसाठी पर्यटन हे राज्याचे मोठे शक्तीस्थान आहे. या सर्व गोष्टींचा विचार करूनच निसर्ग पर्यटन मंडळ विविध उपक्रम राबवत.

**निसर्गपयर्टनस्थळाचीखालीलआकर्षणेआहेत.**

- पक्षीनिरीक्षण,
- फोटोग्राफी, स्टारगेझिंग,
- जंगलभेटी-कॅम्पिंग,
- हायकिंग,
- शिकार,
- मासेमारी
- उद्यानांना भेट देणे.
- गिर्यारोहण.
- नौकानयन

## ८.५ संचालित सहली व शासकीय धोरण

**(स्थानिक/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय)**

**संचालित सहली**

वेळेच्या मर्यादेमुळे पर्यटकांना कमी काळात अनेक ठिकाणांना भेट देणे आवश्यक बनते.अशा परिस्थितीमध्ये त्यांच्या गावापासून विमान, रेल्वे, बस व इतर साधनांचे आरक्षण, मुक्कामाच्याठिकाणी हॉटेलमध्ये आरक्षण, प्रवास व इतर शंकांसंबंधी सल्ला व सेवा, विविध प्रकारच्या आवश्यककागदपत्रांची पूर्तता अशी सर्व कामे करण्यासाठी संपूर्ण पर्यटन कार्यक्रमाचे काळजीपूर्वक नियोजनकरणे अतिशय गरजेचे असते. असे नियोजन करण्यासाठी बराच वेळ लागतो; परंतु पर्यटकाकडेजर कामांसाठी आवश्यक असलेला वेळ उपलब्ध नसेल तर ही सर्व कामे एखाद्या व्यक्ती वासंस्थेमार्फत करून घेता येऊ शकतात. अशा प्रकारच्या सेवासुविधा पुरविणाऱ्या संस्थेस प्रवासकंपनी असे म्हणतात. अशा प्रकारच्या प्रवास कंपनीमार्फत पर्यटकांना वैयक्तिकरीत्या मार्गदर्शनदेखीलकेले जाते. त्याचबरोबर पर्यटकांच्या गरजा आणि अंदाजपत्रकानुसार सहलीचे नियोजनसुद्धा करूनदिले जाते. त्यामध्ये प्रवास, निवास, आरक्षण, स्थलदर्शन अशा गोष्टींचा समावेश असतो. अशाप्रकारच्या सेवा पुरविण्यापोटी कंपनीला ग्राहकाकडून सेवाशुल्क मिळते. अनेक महानगरांमध्येतसेच अन्य शहरांमध्ये अशा पद्धतीने सहलींचे आयोजन करण्याचा प्रकार हल्ली अधिक प्रमाणावरलोकप्रिय होऊ लागला आहे.याउलट, एखादी कंपनी ठराविक प्रवासमार्गावरील निश्चित कालावधीमध्ये काही ठिकाणांचीएकत्रित सहल आयोजित करते. अशा आयोजित सहलींना संचालित सहली असे म्हणतात. अशाप्रकारच्या सहलींसंबंधी वृत्तपत्रामधील जाहिराती तुम्ही बघितल्या असतील.संचालित सहलींची काही वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत:

१. हे मूलत: एक आनंद आणि मनोरंजकसहलीं.

२. अनोळखी प्रवाशांच्या सहभाग, ते ज्या ठिकाणी भेट देतात, भागात त्यांचा मुक्काम तात्पुरता असतो.

३ प्रवास, निवास, आरक्षणाची व्यवस्था कंपनी करते.

मर्यादित कालावधीमध्ये एखाद्या विभागातील अनेक स्थळे पाहणे शक्य होते.गटाने पर्यटन केल्याने ते काही प्रमाणात स्वस्त पडते. पर्यटकाला स्वतःच्या प्रवास, निवास, आरक्षणाची काळजी करावी लागत नाही. त्याचीव्यवस्था कंपनी करते. सहलीबरोबर व्यवस्थापक/ मार्गदर्शक असतो. त्यामुळे काही अडचणी आल्यास मदत मिळू शकते, तसेच प्रवासातील ठिकाणांबद्दलची माहिती मिळते.विशिष्ट पद्धतीचे भोजन उपलब्ध होऊ शकते. त्यामुळे वृद्ध व्यक्ती, तसेच काही पथ्य

असणाऱ्या व्यक्तींची सोय होते.प्रवासामध्ये काही प्रसिद्ध ठिकाणी खरेदी करावयाची असल्यास त्याबद्दल योग्य मार्गदर्शनमिळते. त्यामुळे फसवणूक होत नाही.वैयक्तिक व सामानाची सुरक्षितता मिळते.अशा प्रकारे आज संचालित सहली ह्या सर्व प्रकारच्या पर्यटनांसाठी लोकप्रिय झालेल्याआहेत. अनेक वर्तमानपत्रे आणि इतर प्रसिद्धी माध्यमांतून तुम्ही त्यांच्या जाहिरातीदेखील बघितल्याअसतील. कृषीपर्यटनांच्या संदर्भात अशा प्रकारच्या संचालित सहली इस्त्राईल व अन्य कृषीप्रगतदेशांमध्ये आयोजित केल्या जातात. पीक-उत्पादन, पाणीव्यवस्थापन, तसेच अन्य प्रगत तंत्रांबद्दलचीमाहिती अशा ठिकाणी मिळते. महाराष्ट्राच्या कृषीप्रगत भागातील शेतकरी अशा संचालित सहलींमध्येमाहिती मिळवू लागलेले आहेत. स्थानिक, तसेच राष्ट्रीय पातळीवर मात्र संचालित कृषीसहलीआयोजित करण्याचे प्रमाण अत्यल्प आहे. त्यामुळे व्यवसायक्षेत्र म्हणून अशा संचालित कृषीसहलींच्याआयोजनाला उज्ज्वल भवितव्य आहे.

**शासकीय** धोरणराज्यात महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या प्रयत्नाने स्थानिक व राज्याबाहेरील तसेच परदेशी पर्यटकांची संख्या हळूहळू वाढत आहे. राज्यातील विविध धार्मिक स्थळे, ऐतिहासिक महत्त्वाच्या जागा, समुद्रकिनारे, डोंगरदऱ्या आणि जंगले या ठिकाणी पर्यटकांचा ओघ वळू लागला आहे. या पार्श्वभूमीवर पर्यटक संकुलांऐवजी पूर्णवेळ वा कायमस्वरूपी वापरात नसलेले बंगले, घरे वा जागांचा उपयोग पर्यटकांच्या निवासाकरिता करता येऊ शकतो. या कल्पनेतून महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत शासनाच्या आदेशाप्रमाणे स्वतःच्या मालकीच्या घरामध्ये पर्यटकांसाठी **निवास व न्याहारी योजना** राबवण्यात येत आहे.

या योजनेअंतर्गत स्थानिक घरमालकांची घरे/बंगले पर्यटकांच्या सोयीसाठी उपलब्ध करुन दिल्यास दोन फायदे संभवतात. एक म्हणजे पर्यटकांसाठी किफायती पद्धतीवर स्वच्छ, निवासाची घरगुती सोय उपलब्ध होईल. तसेच स्थानिक घरमालक किंवा त्यांच्या नातेवाईकांसाठी स्वयंरोजगार निर्माण होईल. दुसरा महत्वाचा फायदा म्हणजे राज्याबाहेरील किंवा परदेशी पर्यटकांना मालकांसमवेत राहून स्थानिक संस्कृति, राहणीमान, चालीरीती आणि खाद्यपदार्थ यांची चांगल्या प्रकारे ओळख होईल. याचा दूरगामी परिणाम म्हणजे राष्ट्रीय एकात्मतेचे ध्येय साध्य करता येईल

## ८.६ हंगाम-हवामानानुसार व्यवस्थापन

पर्यटनाचा हंगाम हवामानाशी मोठ्या प्रमाणावर निगडित असतो. उन्हाळ्याच्या काळात अनेक लोक थंड हवेच्या ठिकाणी पर्यटनास जातात, किंवा हिवाळ्यामध्ये बर्फावरील खेळ,

गिरिभ्रमणअसे पर्यटन प्रकारदेखील लोकप्रिय आहेत. आता तर पावसाळ्यामध्येही अनेक लोक वर्षासहलींचा आनंद घेतना दिसतात. माळशेज घाट, लोणावळा, आंबोली अशी काही ठिकाणे वर्षासहलींसाठी प्रसिद्ध झाली आहेत, त्याचप्रमाणे कृषीपर्यटन स्थळाचेदेखील हंगाम-हवामानानुसार व्यवस्थापन करावे लागते. त्याची आवश्यकता आपण थोडक्यात समजून घेऊ.

१. कृषीपर्यटन स्थळावर उपलब्ध असलेल्या पीक प्रकारानुसार पर्यटकांच्या गर्दीचा काळ निश्चित असतो. उदाहरणार्थ, धान्यपिकांच्या बाबतीत ज्वारी, हरबरा, गहू यांसारखी पिके असतील. तर कोवळ्या कणसांच्या वा घाट्यांच्या अवस्थेत हुरडा उपलब्ध करून पर्यटकांना आकर्षीत करता येतो.

२. तसेच आंबा, द्राक्षे यांसारखी फळपिके पूर्ण बहरात असताना अशा बागांमध्ये पर्यटकांना नियोजनबद्ध पद्धतीने आकर्षीत करता येते. ह्यासाठी कृषीपर्यटनस्थळाची योग्यकाळात जाहिरात व प्रसिद्ध करणे गरजेचे असते. कृषीपर्यटनस्थळावर पर्यटकांसाठी खुला भाग आणि अन्य प्रतिबंधित भाग असे व्यवस्थितविभाजन असणे आवश्यक असते. कृषीपर्यटन स्थळावर जर गर्दी वाढली तर अशा परिस्थितीमध्ये त्या अतिरिक्त गर्दीमुळे उभ्या पिकांचे वा शेतावरील साधने, उपकरणे,अवजारे यांचे नुकसान होऊ शकते. अशा प्रकारच्या नुकसानीमुळे दीर्घकालीन तोटे देखील होऊ शकतात. म्हणून कृषीपर्यटनस्थळावर योग्य रीतीने आखलेले रस्ते असावेत. ते कच्च्या स्वरूपाचे देखील चालतील; मात्र ते प्रक्षेत्रावरील पिकांपासून योग्य अंतरावर असावेत.पर्यटक पिकांमध्ये शिरून नुकसान करणार नाहीत याची दक्षता घेण्यासाठी राखणदार असावेत. तसेच शक्य असल्यास प्रतिबंधित क्षेत्राला पक्के कुंपण असावे अथवा प्रतिबंधितक्षेत्राचे फलक असावेत. कृषीपर्यटनस्थळावर एका वेळी मर्यादित गटांनाच प्रवेश देता येऊ शकतो. फार गर्दी झाल्यासतेथील पिकांचे वा मालमत्तेचे नुकसान होऊ शकते. त्यासाठी प्रवेशसंख्येवर मर्यादा ही कृषीपर्यटन स्थळाच्या व्यवस्थापनातील महत्त्वाची बाब आहे.खरीप व रब्बी हंगामात निरनिराळी धान्यपिके घेतली जातात. त्या पिकांच्यादेखील अनेकजाती असतात. त्यामुळे त्यांत मोठ्या प्रमाणावर विविधता असते. हे सर्व वैविध्यपूर्ण प्रकारएकाच हंगामात एकत्रितपणे पर्यटकांना बघण्यासाठी उपलब्ध करून देता येतात. उदाहरणार्थ,एकाच पिकाच्या अनेक जाती किंवा एका वर्गातील पिके (वेलवर्गीय, कंदपिके इत्यादीशेतावर स्वतंत्र विभाग करता येईल. हे सर्व शक्य । योग्य नियोजन व्यवस्थापन करणे गरजेचे असते.

## ८.७. पर्यावरणीय पर्यटन जन-जागृती आणि प्रचार

**१. प्रसिर्दी:** पर्यटनस्थळाच्या ठिकाणी/गावांमध्ये देखील पर्यटन सुविधा निर्माण करून त्यांचाप्रचार केल्यास गर्दीचा प्रवाह तिकडे वळविता येईल. त्यामुळे एकाच ठिकाणावर ताण पडणार नाही.त्याद्वारे पर्यावरणाचा समतोल काही प्रमाणात सांभाळला जाईल. त्याचबरोबर व्यवसायाच्या वाढीव संधीदेखील उपलब्ध होतील.

**२. सवयींमध्ये बदल:** पर्यटनाला गेल्यावर आपल्या शहरी जीवनातील काही सवयी बदलणे गरजेचे असते. त्यामध्ये प्रामुख्याने पर्यावरणास हानीकारक बाबींचा वापर टाळला पाहिजे. उदाहरणार्थ, प्लास्टिकच्या वस्तूंचा कमी वापर करून कमीतकमी प्लास्टिक कचरा तयार

करणे, पर्यटनस्थळावर शक्य तेथे वाहनांऐवजी सायकलचा वापर करणे अथवा पायी फिरणे, तसेच काही प्रमाणात खाण्याच्या सवयींमध्येदेखील बदल केला पाहिजे. हवाबंद प्रक्रिया केलेल्या पदार्थाऐवजी ताजे, स्थानिकरीत्या उपलब्ध असलेलेअन्न, फळे व भाजीपाला यांचा आहारात समावेश असावा. त्यामुळे पर्यटन स्थळावर कचऱ्याची समस्या कमी प्रमाणात निर्माण होईल.

**३. पर्यावरणाबद्दल जाणीव-जागृती:** फिरत असताना आसपासच्या प्रदेशातील झुडपे, गवत व अन्य वनस्पती निष्कारण तोडूनयेत, झाडांची फुले/फळेदेखील तोडू नयेत. अशाने त्या भागाचे सौंदर्य तर कमी होतेच, परंतु पर्यावरणाचे देखील नुकसान होते. पर्यटनाच्या ठिकाणी उपलब्ध असलेल्या जलस्त्रोतांचा (उदाहरणार्थ विहीर, नदी, ओढ्वा इत्यादी) वापर काळजीपूर्वक करावा. त्यामध्ये कचरा व अन्य टाकाऊ पदार्थटाकून प्रदूषण करू नये, तसेच निष्काळजीपणे आगपेटीची जळती काडी फेकू नये. अशा अनेककृतींमधून आपणास पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करता येईल.स्वतःची वागणूक हाच इतरांना आदर्श असतो. त्यामुळे पर्यावरण पर्यटनामध्ये पर्यटकांची भूमिकाच अधिक महत्त्वाची असते. ते स्वतःच्या वागण्यातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश सर्वत्र पोहोचवू शकतात. पर्यावरणाचा प्रश्न हा एखादे गाव, राज्य अथवा देश पातळीवर मर्यादित नाही.त्यामुळे पर्यावरणाच्या बाबतीमधील निष्काळजीपणाचे दुष्परिणाम सर्वांनाच भोगावे लागतात. असेदुष्परिणाम काही प्रमाणात टाळण्यासाठी पर्यावरण पर्यटन ही काळाची गरज आहे.

**४. जाहिरात:** व्यापार आणि उद्योगांच्या संदर्भात सध्याचे युग जाहिरातींचे आहे असे हल्लीच्या काळीनेहमीच म्हटले जाते, तेपूर्णपणे सत्य आहे. विविध माध्यमांद्वारे होणाऱ्या प्रभावी जाहिरातीमुळे एखादे उत्पादन अतिशय लोकप्रिय कसे होऊ शकते, याची काही उदाहरणे तुम्हाला माहीत असतील.पर्यटनक्षेत्रामध्ये व्यवसायाच्या अनेक नवीन संधी निर्माण झाल्यामुळे त्या क्षेत्रामध्येदेखील अनेकसंस्था वा व्यक्ती यांनी सेवा पुरविण्यास सुरूवात अशा प्रकारच्या स्पर्धेमुळे आपापल्या सेवासुविधांची जाहिरात करून जास्तीत जास्त ग्राहकांना स्वतःकडे कसे आकर्षीत करून घेता येईलयाचे प्रयत्न सुरू झाले आहेत. त्यातूनच स्वतःच्या व्यवसायाचा प्रचार करण्याचे आणि प्रचारासाठीयोग्य असे साहित्य विकसित करण्याचे तंत्र उदयाला आले.

प्रभावी प्रचार जाहिराती, तसेच आकर्षक प्रचारसाहित्यामुळे पर्यटन-व्यवसायाची उलाढाल फार मोठ्या प्रमाणावर वाढल्याचे दिसून येते.पर्यटनाच्या दृष्टीने प्रचाराचे विशेष महत्त्व आहे. त्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत.पर्यटन हा प्रामुख्याने हंगामी/मर्यादित काळातील व्यवसाय आहे. त्यामुळे पर्यटन हंगामसुरू होण्यापूर्वी नियोजनात्मक जाहिराती, तसेच पर्यटन हंगामामध्ये प्रोत्साहनपर जाहिरातीकरून पर्यटकांना आकर्षीत करता येते.काही विशिष्ट प्रकारच्या संचालित सहलींसाठी जाहिरात करताना समाजातील वृद्ध व्यक्तीहा लक्ष्यगट असतो. अशा जाहिरातींमध्ये लक्ष्यगटाच्या गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने माहितीदिलेली असते. उदाहरणार्थ, मधुमेहींसाठी विशिष्ट आहार, याच काळामध्ये वैद्यकीय सुविधाउपलब्ध असणे, इत्यादींमुळे लक्ष्यगटाच्या विशिष्ट गरजा लक्षात घेऊन जाहिरात केल्यासती उपयुक्त ठरते.

**५.पर्यटन सेवांमागणी:** पर्यटनाच्या सेवेची मागणी ही बऱ्याचदा किमतीवर अवलंबून असते आणि ती आर्थिक गटांनुसारबदलते. पर्यटनसहलींचा खर्च हा त्यामध्ये पुरविल्या जाणाऱ्या प्रत्यक्ष सेवांच्या दर्जावरअवलंबून असतो. प्रवास, निवास किंवा वाहतूक या सेवांसाठी जर उच्च श्रेणीच्या सुविधावापरल्या तर सहलीचा खर्च वाढतो. उदाहरणार्थ, वातानुकूलित वाहनाने प्रवास, विमानप्रवास, उच्च श्रेणीच्या हॉटेलमध्ये वास्तव्य व भोजन यांसारख्या सेवांमुळे सहलींचा खर्चवाढतो. मात्र त्याऐवजी सामान्य सेवा वापरल्यास कितीतरी कमी खर्चात सहल करता येते.म्हणजेच पर्यटन करणे हे प्रत्येकाला आपापल्या कुवतीनुसार शक्य होते, हे जाहिरात प्रचारानेसिद्ध करता येते.पर्यटनक्षेत्रामध्ये सेवा वापरण्यापूर्वी त्याचे पैसे भरावे लागतात. उदाहरणार्थ, प्रवास तिकिटांचेआरक्षण, हॉटेलाचे आरक्षण इत्यादी, त्यामुळे ग्राहकांना पर्यटनाकडे आकर्षीत करण्यासाठी प्रभावी जाहिरात व प्रचार करणे आवश्यक असते.पर्यटनव्यवसायामधील स्पर्धा खूप वाढलेली आहे. त्यामुळे ग्राहकांसाठी त्यांच्या स्वतःच्यागरजा व कुवतीनुसार अनेक पर्याय उपलब्ध आहेत. स्पर्धा वाढल्यामुळे या व्यवसायातअनेक अनिष्ट प्रथा सुरू झालेल्या दिसतात. अशा सर्व परिस्थितीमध्ये वाढत्या स्पर्धेतटिकून राहण्यासाठी प्रभावी प्रचार करणे आवश्यक ठरते.उपलब्ध सेवांची माहिती लोकांपर्यंत पोहोचली नाही तर लोक त्याचा वापर करत नाहीत.अनेकदा पर्यटनस्थळांची तसेच तेथे उपलब्ध असणाऱ्या सर्व सेवासुविधांची माहिती लोकांपर्यंत,पूर्णपणे पोहोचविली जात नाही. त्यामुळे उपलब्ध पर्यायांची माहिती लोकांना नसते. अशीमाहिती जाहिरातीद्वारे करून देता येईल.प्रचार या शब्दाचा अर्थ कोणताही विक्रेता आणि ग्राहक यांमधील संवाद असा होतो. अशासंवादांचा हेतू प्रामुख्याने ग्राहकास वस्तू विकत घेण्यास प्रवृत्त करणे असा असतो. त्याबरोबर उत्पादनाबद्दलची माहिती देणे असादेखील असतो. जाहिरात म्हणजे विविध माध्यामांद्वारे केलेलीवस्तूंची/सेवांची प्रसिद्धी. प्रचार/जाहिरात म्हणजे खर्च नसून व्यवसायासाठी एक प्रकारची गुंतवणूक असते असे म्हटले जाते. मात्र, त्यासाठी अतिशय काळजीपूर्वक नियोजन करणे आवश्यक असते.

## ८.८ यशस्वी पर्यावरणीय पर्यटन नियोजनाचे प्रमुख मुद्दे

**अ) प्रचार नियोजन:**यशस्वी प्रचार नियोजनाचे प्रमुख मुद्देयशस्वी प्रचार नियोजनाचे चार प्रमुख मुद्दे आहेत, ते पुढील प्रमाणे:

**१. लक्ष्यगटाची निश्चिती:**जाहिरात वा प्रचार करताना लक्ष्यगट निश्चित करणे अतिशय गरजेचे असते. आपलेउत्पादन किंवा आपली सेवा वापरणारा संभाव्य लक्ष्यगट कोणता, त्याची वैशिष्ट्ये कोणती आहेत,याचा विचार करणे आवश्यक असते. तसेच प्रचार करताना लक्ष्यगटाची आर्थिक, सामाजिक वशैक्षणिक पार्श्वभूमीदेखील विचारात घ्यावी लागते. जाहिरातीमधील संदेश योग्य अशा लक्ष्य गटापर्यंत पोहोचणे यावरच जाहिरातीचे यश अवलंबून असते.

**२. प्रचारउद्दिष्टे निश्चिती:** प्रचार व जाहिरात करण्यामागील उद्दिष्टे स्पष्ट आणि निश्चित असावीत. अशी उद्दिष्टे खालीलप्रमाणे असू शकतात.

(१) संभाव्य ग्राहकांना उपलब्ध सेवा-सुविधांची माहिती करून देणे,

(२) व्यवसायात वाढ करणे,

(३) प्रतिस्पर्ध्यापेक्षा वेगळेपण दाखविणे,

(४) नवीन सेवा-सुविधा लोकप्रिय करणे.

**३. विविध प्रचार पर्यायांचा आढावा घेणे:**विविध पद्धती वा माध्यमांद्वारे प्रचार केल्यामुळे प्रत्येक पद्धतीचे फायदे आणि मर्यादा लक्षातयेतात. त्यातूनच आपली उद्दिष्टे साध्य करणारी योग्य पद्धत निवडता येते. अशी पद्धत निवडताना लक्ष्यगटांची पार्श्वभूमी लक्षात घेणेदेखील गरजेचे असते. साक्षर लक्ष्यगटासाठी मुद्रित माध्यमांचा प्रभावी वापर करता येतो. त्यासाठी वृत्तपत्रे, घडीपत्रिका अशा साधनांचा उपयोग होतो. लक्ष्यगटजर उच्च आर्थिक गटामधील असेल तर विविध मासिके, आकर्षक माहितीपुस्तके अशा साधनांचादेखील उपयोग करता येतो. दृक-श्राव्य माध्यमांपैकी दूरचित्रवाणी हे सर्व प्रकारच्या जाहिरातीसाठी उपयुक्त आहे, असे आढळून आले आहे. त्याच्या साहाय्याने तरूण, वृद्ध, निरक्षर, ग्रामीण अशाविविध स्तरांतील लक्ष्यगटापर्यंत सहजपणे संदेश पोहोचू शकतो. आता इंटरनेटच्या साहाय्यानेदेखील जाहिरातीचे तंत्र मोठ्या प्रमाणावर विकसित झालेले दिसून येते.

**४. प्रचाराची योग्य वेळ साधणे:**

जेव्हा लोक पर्यटनाला जाण्याच्या मनःस्थितीमध्ये असतात, म्हणजेच ऐन पर्यटनाच्या हंगामात प्रचार करून उपयोग होत नाही. त्याऐवजी पर्यटन हंगामाच्या पूर्वीच योग्य प्रकारे प्रचार केल्यामुळे लोकांना पर्यटन कार्यक्रमाचे नियोजन करता येते. योग्य वेळ साधून केलेला प्रचार अधिक परिणामकारक असतो असे दिसून येते. जाहिरात व प्रचाराद्वारा ग्राहकांपर्यंत पोहोचून त्यांना सर्वसेवा सुविधांची माहिती करून देता येते. या दृष्टीने जाहिरात व प्रचाराच्या काही प्रमुख प्रकारांची आपण माहिती करून घेऊया.

**i) वैयक्तिक प्रचार:**

संभाव्य ग्राहकांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांना वस्तूची वा सेवेची माहिती पुरविली जाते.प्रचाराची ही अतिशय प्राचीन पद्धत आहे. ही पद्धत वेळखाऊ असली तरी पुष्कळ परिणामकारक असल्याचे आढळून येते. ग्राहकांच्या सोयीनुसार प्रचारासाठी वेळ व ठिकाण निश्चित करावे लागत असल्यामुळे ही पद्धत खर्चीक असल्याचे दिसून येते. मात्र या पद्धतीद्वारे ग्राहकांच्या सर्व शंकांचे समाधान तात्काळ करता येणे शक्य होते. त्यामुळे वैयक्तिक प्रचार पद्धतीची विश्वासार्हता अधिक आहे, पर्यटन क्षेत्रासाठी ही पद्धत अधिक उपयुक्त असल्याचे आढळून आले आहे.

**ii) दूरचित्रवाणीद्वारे प्रचारः**

या पद्धतीमध्ये विक्रेता ग्राहकांना आपल्या मालाची किंवा सेवांची माहिती दूरचित्रवाणीद्वारे देतो. अशा प्रचारासाठी ठरावीक कार्यपद्धती निश्चित केलेली असते. त्यानुसार एखाद्या शहराचे त्यातील लोकसंख्येनुसार काही भागांमध्ये विभाजन केले जाते. प्रत्येक विक्री-प्रतिनिधीला ठरावीक प्रभाग नेमून दिले जातात. आपल्या प्रभागातील संभाव्य ग्राहकांची यादी तयार करणे, दूरध्वनीवरून त्यांच्याशी संपर्क साधणे, त्यांच्याशी झालेल्या संभाषणाची नोंद ठेवणे आणि त्यानुसार पुढील कार्यवाहीकरणे अशी कामे विक्री प्रतिनिधीला करावी लागतात. अशा प्रकारे दूरध्वनीद्वारे काही नावीन्यपूर्ण सेवा अथवा

वस्तूंची प्रसिद्धी करता येते. हीप्रचाराची पद्धत इंग्लंड, अमेरिका आणि अन्य युरोपियन देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रचलित आहे. आपल्या देशात काही महानगरांपुरताच असा प्रचार करण्यात आलेला दिसतो. मात्र ही पद्धत अद्याप पर्यटनसेवांच्या प्रचारासाठी भारतात फारशी रूढ झालेली नाही. आपल्या देशातील दूरध्वनीसेवेची वाढती उपलब्धता आणि पर्यटन व्यवसायाचे बदलते स्वरूप लक्षात घेता आपल्या देशातदेखील दूरध्वनीद्वारे प्रचार करण्याचे तंत्र मोठ्या प्रमाणावर वापरले जाईल, असे आशादायक चित्र आज

दिसते आहे.

### iii) मुद्रित माध्यमांमार्फत प्रचार:

आपल्या उत्पादनात अथवा सेवांची जाहिरात करण्यासाठी मुद्रित माध्यमांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो, हे तुम्हाला ठाऊक असेल, विविध वर्तमानपत्रांमध्ये, नियतकालिकांमध्ये अनेक व्यवसाय, उत्पादने, सेवा यांच्या जाहिराती तुम्ही पाहिल्या असतील. अशा मुद्रित माध्यमांच्या वापरामुळे फार मोठ्या विस्तृत ग्राहकगटापर्यंत प्रभावीपणे संदेश, माहिती पोहोचविता येते. त्या मानाने त्यासाठी कमी खर्च येतो.म्हणूनच जाहिरातीसाठी मुद्रित माध्यमाचा वापर मोठ्या प्रमाणावर होत असल्याचे आढळूनयेते. वृत्तपत्रे, नियतकालिके मासिके यांच्या जोडीने आकर्षक पद्धतीची हँडबिल्स, घडीपत्रिका, माहितीपुस्तिका यांचादेखील जाहिरात प्रसिद्धीसाठी मोठ्या प्रमाणावर उपयोग होतो. ह्याप्रचार साहित्यामध्ये मजकुराची प्रभावी भाषा, आकर्षक चित्रे यांचा वापर केलेला असतो. त्याचबरोबर मुद्रणाच्या आधुनिक तंत्रामुळेदेखील साहित्य अतिशय आकर्षक व परिणामकारक बनलेले दिसते.त्यामुळे असे प्रचारसाहित्य खूप उपयोगी असते. व्यावसायिक दृष्टिकोनातून अशा प्रचार साहित्यामध्ये संदेश प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी विविध क्लृप्त्या वापरलेल्या असतात. सुटसुटीत, आटोपशीर आकार आणि माफक किंमत यासह परिणामकारक प्रसिद्धीक्षमता ह्या गुणांमुळे पर्यटनसेवांच्या प्रचारासाठी मुद्रित माध्यमांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होत असल्याचे दिसून येते.

### iv) दृक्-श्राव्य साधनांमार्फत प्रचारः

प्रत्येक नवीन विकसित माध्यमाचा ज्ञान आणि करमणूक यांबरोबरच जाहिरात तसेच प्रचार क्षेत्रासाठीदेखील प्रभावीपणे उपयोग करून घेता येईल असे लक्षात आले. त्यामुळे प्रत्येक

माध्यमाचा वापर विविध सेवा/ उत्पादने यांची जाहिरात करण्यासाठी केला जाऊ लागला.पर्यटन व्यवसायाची व सेवांचीदेखील जाहिरात या माध्यमांद्वारे प्रभावीपणे होऊ लागली. वर्तमानपत्रवा अन्य मुद्रित साहित्य दुर्गम भागात पोहोचण्यामध्ये अनेक अडचणी होत्या. तसेच निरक्षर व्यक्तींसाठी मुद्रित प्रचार साहित्याचा उपयोग होत नसे. मात्र रेडिओ, दूरचित्रवाणी, ध्वनि-चित्रफिती अशादृक्-श्राव्य साधनांमुळे मुद्रित साहित्याची मर्यादा व त्यातील अडचणी यासंबंधी प्रभावी पर्याय उपलब्ध झाला. दूरचित्रवाणीवरील जाहिरातीची परिणामकारकता आपणाला माहिती आहेच. आज तर संगणक आणि माहिती- तंत्रज्ञानातील प्रगत सुविधांमुळे जाहिरात व प्रचार क्षेत्र फार विस्तारले आहे. कोणत्याही उत्पादन/ सेवेची उपलब्धता आता भौगोलिक क्षेत्रांवर मर्यादित राहिलेली नाही, तर त्याची व्याप्तीसंपूर्ण जगभर झालेली आहे. त्यामुळे जाहिरात व प्रचार पद्धतीमध्ये आमूलाग्र क्रांती झालेली आहे.

### v) अन्य प्रचारपद्धतीः

मुद्रित तसेच दृक-श्राव्य माध्यमांखेरीज पर्यटनसेवांच्या प्रचारासाठी अन्य पद्धतीदेखील वापरल्या जातात. त्यामध्ये प्रामुख्याने प्रवासी/पर्यटक मेळावे, पर्यटन मार्गदर्शिका, रस्त्यांवरील फलक, पोस्टर/छायाचित्रांचे प्रदर्शन यांसारख्या उपक्रमांचा समावेश होतो. सामूहिक प्रचाराच्यादृष्टीने अशा पद्धती उपयुक्त आहेत.पर्यटनाच्या प्रकारामध्ये अनेक प्रकारचे बदल झाले असले तरीदेखील पर्यटनाची बाजारपेठप्रवास, प्रवासाचे ठिकाण आणि पर्यटनाचा प्रचार या पर्यटन प्रणालीतील चार महत्त्वाच्या मुद्यांमध्ये कोणताही फरक झालेला नाही. पर्यटकांच्या इच्छेनुसार किंवा पर्यटनाच्या ठिकाणांच्या वैशिष्ट्यांनुसार पर्यटनाचे स्वरूप बदलते त्यातूनच विशेष पर्यटन ही कल्पना उदयाला आलेली आहे. डोंगरावरील पर्यटन, समुद्रकिनाऱ्यावरील पर्यटन, जंगल पर्यटन, क्रीडा पर्यटन ही विशेष पर्यटनाचीकाही उदाहरणे आहेत. पर्यावरणाचे रक्षण करून, तसेच त्यांचे संवर्धन करून पर्यटनाचा आनंदघेणे हे पर्यावरण पर्यटनामागील प्रमुख उद्दिष्ट असते.एखादे ठिकाण पर्यटनाच्या दृष्टीने प्रसिद्ध झाले की त्या ठिकाणी पर्यटकांची गर्दी वाढतचजाते. त्यामुळे तेथील सोयी-सुविधांवर ताण पडतो. अशा प्रकारांमुळे होणारे नुकसान हे कायमस्वरूपीव न बदलण्यासारखे असते. त्यामुळे पर्यटनस्थळाचे सौंदर्य नष्ट होणार नाही, तेथे प्रदूषण होणारनाही याची काळजी पर्यटक, आयोजक, स्थानिक रहिवासी आणि व्यावसायिक यांनी एकत्रितपणेघेणे आवश्यक ठरते. त्यासाठी पर्यायी पर्यटनस्थळांचा प्रचार व विकास, सवयींमध्ये बदल,पर्यावरणाबद्दल जाणीवजागृती असे उपाय करता येतील. पर्यावरण पर्यटनामध्ये पर्यटकांची भूमिकाच अधिक महत्त्वाची असल्याने ते स्वतःच्या वागण्यातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश सर्वत्र पोहोचवू शकतात.

## ८.९ पर्यटनाचा पर्यावरणीय घटकांवरील परिणाम

पर्यावरण म्हणजे जमीन, हवा, पाणी, वनस्पती, प्राणी व लोक त्यांची सामाजिक व सांस्कृतिक परिस्थिती यांच्या संयुक्त प्रक्रियेने बनलेली परिस्थिती की ज्यामध्ये भूपृष्ठावरील लोक व प्राणी जगतात. अशा पर्यावरणाचा पर्यटनाशी निकटचा संबंध आहे. अनेक पर्यावरणीय घटकांमुळे जी नैसर्गिक सृष्टीसौंदर्याची स्थळे निर्माण होतात, पशुपक्षी मोठ्या संख्येने एखाद्या भागात वावरतात त्यामुळे पर्यटनाला चालना मिळते. परंतु अलीकडे पर्यटनामध्ये या पर्यावरणीय घटकांचे जतन व संवर्धन करण्याची संकल्पना सामावलेली आहे. या दृष्टीनेही या दोहोंचे परस्पर घनिष्ठ संबंधआहेत. या संदर्भात पुढील घटक महत्त्वाचे ठरतात.पर्यटनाच्या इतिहासात त्याचा उद्गम व विकास यामध्ये पर्यावरणाचे महत्त्व मोठे आहे.भूदृश्य, नैसर्गिक सृष्टीसौंदर्य, हवा, पाणी यांनी बनलेल्या पर्यावरणाकडे पर्यटक आकर्षीत होतात.या जोडीला मानवनिर्मित उपलब्ध सोयी, सामाजिक व सांस्कृतिक घटकांनी पर्यटनाचे क्षितिजविस्तृत बनते. (या घटकांचा पर्यटनवृद्धीवर होणारा परिणाम प्रकरण दोनमध्ये दिला आहे.) पर्यटनाच्या विकासाबरोबर या पर्यावरणीय घटकांमध्ये काही बदल घडून येतात. यासाठी पूर्वीपेक्षा अधिक काळजीपूर्वक पर्यावरणाचे जतन, संवर्धन करून, पर्यटनाचा विकास करण्याचे अवघड कार्य सध्यात्या त्या देशातील पर्यटन विभागाला करावे लागते. यासाठी या व्यवसायाचे शास्त्रीय नियोजनकरून पर्यटनामुळे पर्यावरणाचे नुकसान टाळण्याची गरज आहे. पर्यावरणाच्या विविध घटकांवर ***पर्यटनाचा होणारा परिणाम पुढीलप्रमाणे:***

***१. पर्यटन व नैसर्गिक वनस्पती:***नैसर्गिक वनस्पती हा एक पर्यटन विकासातील महत्त्वाचा नैसर्गिक घटक आहे. या घटकामुळेनैसर्गिक सृष्टीसौंदर्यात मोलाची भर पडते, पशुपक्ष्यांना आसरा व अन्न मिळते. अशा या घटकांवरपर्यटनाचा जो परिणाम होतो तो पुढीलप्रमाणे :

(i) पर्यटक जी झाडे, फळे, फुले, शेवाळ गोळा करतात त्यामुळे त्या विभागातील नैसर्गिकवनस्पतींच्या स्वरूपात बदल घडून येतात.

(ii) पर्यटक राष्ट्रीय उद्याने, जंगले व गवताळ कुरणात जी आग लावतात त्यामुळे झाडे, वेली,गवत यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते.

(iii) पर्यटक बऱ्याच वेळा झाडांची तोड करून तंबूसाठी खुंट्या, सोट व शेकोटीसाठी झाडांचीतोड करतात.

(iv) पर्यटकांकडून जंगलात कचरा टाकून दिल्यामुळे तेथील वातावरण प्रदूषीत होते.

(v) मनोरंजन, हॉटेल्स, रस्ते इत्यादींमुळे जंगलव्याप्त, गवताळ क्षेत्रांत झपाट्याने घट होत आहे.

(vi) जंगलातील पर्यटक व त्यांची वाहने यांच्या वावरण्याने झाडांवर विपरीत परिणाम होतो.

(vii) जंगलातील वन्य पशुपक्ष्यांच्या सवयी पर्यटकांमुळे बदलू लागतात. उदा. पर्यटक पशुपक्ष्यांना जे खाण्याचे पदार्थ टाकतात. त्यामुळे त्यांच्या सवयी बदलतात. काही वेळा त्यांना निरनिराळेआजार होतात.

(viii) फर, कातडी, चामडी, हाडे, कूस, सुळे इत्यादी प्राणिज उत्पादनांना दिवसेंदिवस चांगलीकिंमत येऊ लागल्याने पर्यटक अशा पशुपक्ष्यांची शिकार करतात,

(ix) पर्यटनाच्या विकासासाठी राष्ट्रीय उद्याने, राखीव जंगले, अभयारण्ये इत्यादींसाठी लागणारे क्षेत्र सभोवतालच्या शेती क्षेत्रातून वन्य जमिनीच्या भागातून घेतले जाते. हे लोक त्यांचीलोकसंख्या वाढली की, या सुरक्षित भागात आक्रमण करतात. त्यामुळे या संरक्षित भागाचेअति नुकसान होते. या सुरक्षित क्षेत्राबाहेर वन्य पशुपक्ष्यांना वावरता येत नाही. पर्यटकत्यांची शिकार करतात. अशा रीतीने पर्यटनाचा या घटकांवर विस्तृत परिणाम होतो.यामुळे पशुपक्ष्यांची संख्याच नव्हे, तर अनेक वृक्ष, वेलींच्या जाती नष्ट होण्याच्या मार्गावरआहेत.पर्यटक फोटो घेतात, मोठमोठ्याने रेडिओ, टेप लावतात. या आवाजामुळे पशुपक्ष्यांच्यापुनर्निर्माणाच्या कार्यावर प्रतिकूल परिणाम होतो. त्यांची संख्या अभयारण्यात असूनही झपाट्यानेकमी होऊ लागली आहे. याशिवाय मोटारी, रेल्वे, दुचाकी वाहनांच्या आवाजाचा वाईट परिणामहोत आहे.

***२. पर्यटन व पर्यावरणाचे प्रदूषण:***पर्यावरणीय प्रदूषण व पर्यटन यांचा जवळचा संबंध आहे. वास्तविक पर्यावरण प्रदूषण ही एक जागतिक गंभीर समस्या बनलेली आहे. त्यामध्ये पर्यटनाच्या विकासामुळे भर पडत आहे. उत्तर अमेरिका, युरोप व भूमध्य सागराच्या किनाऱ्यावरील पुळणी (बीचेस) प्रदूषणाच्या शिकार बनलेल्या आहेत. जंगलातील तळी, तलाव, सरोवरे यांचे प्रदूषण तेथील पर्यटकांमुळे होते. पर्यटकांच्यामोटारी, दुचाकी वाहने, विमाने, रेल्वे यामुळे ध्वनीचे व हवेचे प्रदूषणही वाढत आहे.

***(अ) बीचेसचे प्रदूषण :***उष्ण कटिबंधातील चालुकामय पुळणी (बीचेस) गेल्या दोन-तीन दशकांत प्रगत राष्ट्रातील ,पर्यटकांचे प्रमुख आकर्षण ठरले आहे. यासाठी पर्यटक संयुक्त संस्थानातील (अमेरिकेतील)मियामी, कॅरिबियन बेटे, भूमध्ये सागरीय किनारा, उष्ण कटिबंधातील सागरी बेटे उदा. मॉरिशस,मालदीव इत्यादी. भारतातील गोवा व इतर सागर किनारे येथे मोठ्या प्रमाणावर गर्दी करू लागले.त्याचबरोबर देशांतर्गत पर्यटकही वाढू लागले. या पर्यटकांनी टाकून दिलेल्या विविध वस्तू, अन्न वपेय यांच्या प्लॅस्टिक बॅगा, कागद यांच्या कचऱ्याचे ढीग अशा बीचेसवर वाढू लागले आहेत. पर्यटकांच्या, सातत्याच्या वावरामुळे कासवासारख्या जलचर प्राण्यांच्या प्रजनन क्षमतेवर परिणाम होऊ लागलाआहे.

***(ब) जलप्रदूषण:*** पर्यटनाच्या विकासामुळे पाण्याचे प्रदूषण वाढत चालले आहे. या पर्यटकांच्या तंबू (tents) सांडपाण्याची विल्हेवाट यामुळेही जलप्रदूषण वाढत चालले आहे, पर्यटन क्षेत्रे शक्यतो तळी,तलाव, नद्या, सरोवर यांच्या सान्निध्यात उभारली जातात आणि सांडपाणी अशा जलाशयात मिसळत राहिल्यामुळे या जलाशयांचे झपाट्याने प्रदूषण होत आहे. पर्यटकांनी टाकून दिलेल्या वस्तू पाण्यातमिसळून या प्रदूषणास हातभार लावतात. पर्यटकांचे मलमूत्र विसर्जन हेसुद्धा याचे मुख्य कारणआहे. महाबळेश्वरच्या वेण्णा तलावाच्या प्रदूषणाचे 'पर्यटन' हे मूळ कारण आहे.

***(क) ध्वनिप्रदूषण:***वास्तविक नागरी वस्तीपासून दूर, शांत, वनांच्या नीरव स्तब्धतेच्या सान्निध्यात, पशुपक्ष्यांच्यासहवासात काही काळ आरामात घालवावा ही पर्यटनाची मूळ प्रेरणा आहे. शहराच्या गोंधळ,गोंगाटापासून दूर जावे असे प्रत्येकाला वाटते. यातूनच पर्यटन स्थळांचा विकास झाला. परंतु हीचपर्यटन स्थळे आज गोंगाटयुक्त बनलेली आहेत. या गोंगाटातून केवळ पर्यटकच नव्हे, तर जंगलातीलपशुपक्षीही सुटलेले नाहीत. पर्यटकांच्या वाहनांचा आवाज, रेडिओ, टेपरेकॉर्डर यांचा गोंधळ, घोळक्याने मोठ्या आवाजात म्हटलेली गाणी यामुळे ही पर्यटन केंद्रे गोंगाट व गर्दीची ठिकाणीझालेली आहेत. जंगलव्याप्त भागात अशा आवाजांचा तेथील पशुपक्ष्यांवर विपरीत परिणाम होतो वत्यांची प्रजननक्षमता कमी होते.पर्यटनामुळे निर्माण होणाऱ्या पर्यावरणाच्या समस्येच्या समाधानासाठी पर्यटनाचे नियोजनकरणे आवश्यक आहे. कोणतेही पर्यटन स्थळ अति गर्दीचे ठिकाण (Over Crowded) बनणारनाही. याकडे लक्ष दिले पाहिजे. अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने येथे मर्यादित पर्यटकांना प्रवेश द्यावा.सर्व पर्यटनस्थळी सांडपाण्याची योग्य विल्हेवाट लावून जलप्रदूषण नियंत्रण करावे लागेल. जंगलव्याप्तभागात वाहनांचा वेग कमी ठेवावा लागेल. इतर आवाज करणारी मनोरंजनाची साधने यांच्या वापरावरबंदी आणणे इत्यादी उपायांनी ही प्रदूषण समस्या सोडविता येईल.

***३. पर्यटन व पशुपक्षी:***वन्य पशुपक्षी हा पर्यावरणाचा एक महत्त्वाचा घटक असून पर्यटन विकासात त्याचा महत्त्वाचा वाटा आहे. भारतातील जिम कॉर्बेट नॅशनल पार्क, काझीरंगा अभयारण्य, भरतपूरचे पक्षी अभयारण्य अशा कित्येक राष्ट्रीय उद्यानांना पर्यटक दरवर्षी लाखोंच्या संख्येने भेट देतात व पशुपक्ष्यांच्या सान्निध्याचा रोमहर्षक अनुभव घेतात. परंतु तेथील पशुपक्ष्यांच्या दृष्टीने ज्या गंभीर समस्या निर्माण होतात, त्यांचा विचार केला पाहिजे. पर्यटकांच्या अतिरिक्त संख्येमुळे अभयारण्यांचे शांत वातावरणबिघडते. सातत्याने होणाऱ्या आवाजांमुळे पशुपक्ष्यांचे स्वास्थ्य खराब होते. त्याचा परिणाम त्यांच्याआरोग्यावर, इतर सवयींवर व पुनर्निर्मिती क्षमतेवर होतो. गीर अभयारण्यातील सिंहाच्या संख्येमध्येवाट न

होणे हे याचे उदाहरण आहे. पर्यटनाचा अशा रीतीने पर्यावरण घटकांवर जो विविध प्रकारचा अनुकूल अथवा प्रतिकूल परिणाम होतो. त्यामुळे पर्यटनाच्या मर्यादा स्पष्ट होतात. यातूनच पर्यटनाच्या शास्त्रीय व परिपूर्ण नियोजनाची आवश्यकता निर्माण झाली आहे. योग्य वेळी त्या संदर्भातील उपाययोजना करूनजगातील विकसित आणि विकसनशील देशात वेगाने पसरणाऱ्या पर्यटन व्यवसायाचे भवितव्य आशादायक ठेवण्याचा प्रयत्न करावा लागेल.

## ८.१० स्वाध्याय

१. पर्यावरण पर्यटन म्हणजे काय ते स्पष्ट करून देशाच्या दृष्टीने त्याचे महत्त्व सांगा.

२. पर्यटनाचे स्वरूप पर्यावरणीय करण्यासाठी कोणत्या उपाययोजनांची गरज आहे ते सांगा,

३. पर्यावरणीय पर्यटनाच्या यशस्वी प्रचार व जाहिरातीसाठी कोणत्या गोष्टीची गरज पडते तेसांगा

४. पर्यटनाचा पर्यावरणीय घटकांवरील परिणाम सांगा.

## ८.११. संदर्भग्रंथ.संदर्भ सूची


***1. समृद्धीचा महामार्ग कृषी पर्यटन : कटोले रवींद्र, गोडवा कृषी प्रकाशन, पुणे - 9.***

***2. Agri-Tourism - Romila Chawla , Sonali Publication, Delhi. - 110002.***

***3. कृषी पर्यटन एक शेतीपूरक व्यवसाय , मनोज हाडवळे, सकाळ प्रकाशन, पुणे - 411002.***

***4. Dr. Sinha H. K. challenges in Rural Development,1998 Discovery Publication House New Delhi-110002.***

***5. Dr. Dubey M. K. Rural and Urban Development in India, 2000, common wealth Publisher DoryaGonj New Delhi-110002.***

***6. Dr. Desai A. R. Rural Society in India 1978 Popular Publication House***

***7. Article by,*** अनुपगरगटे. पर्यावरणशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.


❖❖❖❖